हवा खेळती राहते. त्याच्या फांद्या व पारंब्या भुईसरपट असल्यामुळें हिंवाळ्या पावसाळ्यांतही वडाखालीं निवारा मिळतो. घर बांधावयाचें तें विटांचे बांधावें. विटा उष्णतावाहक नसल्यामुळें उन्हानें भिंतींची बाहेरली बाजू तापली तरी घराच्या अंतर्भागांतील गारवा नाहींसा होत नाहीं. स्त्री कशी असावी? विशेषतः हिंदुस्थानांत? अर्थात् आपली! श्यामला! कां? कारण ती 'शीते सुखोष्ण सर्वाङ्गी ग्रीष्मे या सुखशीला।' अशी असल्यामुळें सर्व ऋतूंत सुखकारक असते. शिवाय त्यांच्या शरीराला सुगंधहि विशेष असतो असें जाणते सांगतात. श्री. राजवाडे सांगतात (नासदीय-सूक्त-भाष्य पृ. ७३६), योजनगंधा मत्स्यगंधा ही श्यामला असावी, कारण तिला पराशरापासून झालेला पुत्र वर्णानें काळा होता. गोरवर्ण स्त्रिया संसाराच्या धकाधकींत, विशेषतः हिंदुस्थानांत, टिकाव धरूं शकत नाहींत हा सिद्धांत शास्त्रीय प्रमाणांनीं प्रस्थापित होण्याजोगा नसला तरी तो अनुभवाच्या कसोटीला उतरलेला आहे. सर रिचर्ड बर्टन हाही या अनुभवाशीं सहमत आहे. 'काळी नार, सकत फार' हें एका लावणींतील वचन येथें उद्धृत करण्याचा मोह आवरत नाहीं. या वचनांतील उत्तान सूचना बगळली तरी व्यावहारिक सिद्धांत या दृष्टीनें त्याचें महत्त्व सहज पटण्याजोगें आहे. पण सध्याचें सुधारलेलें व सुसंस्कृत' म्हणवून घेणारें जग वर उद्धृत केलेल्या सुभाषिताचीं प्रचीति घेण्याच्या मनःस्थितींत नाहीं. विलायतेंतही "Gentlemen Prefer Blondes, बिचाऱ्या Brunettes!

गोरवर्ण हा पांढरपेशांचा आवडता आणि श्यामवर्ण बहुजनसमाजाचा. गोरा म्हणजे पांढरा शुभ्र नव्हे आणि श्याम वर्ण म्हणजे काळा कुट्ट नव्हे. श्यामला म्हणजे निमगोरी कीं निमकाळी? कोण जाणे! श्यामला म्हणजे सांवळी, हेंच खरें. प्रतिशब्द नाहीं, उपमाही नाहीं, कारण देश, काळ व वैयक्तिक आवड यांच्या अनुरोधानें या वर्णाची छटा गडद किंवा फिकट होते, इतकेंच नव्हे, त्याच व्यक्तीच्या बाबतींत विशिष्ट परिस्थितीच्या अनुरोधानेंही वर्णाची चलबिचल होते. लाल रंगाला जसा मोतिया, किंवा निळ्या रंगाला जसा अस्मानी—तसाच कृष्णवर्णाला श्यामळ! उन्हाची तिरीप लागली कीं जरा मळूल झाल्यामुळें काळसर झालासा भासतो-पण आणखी निरखून पाहिलें

की त्यावर मोतियाची फिक्की छटा आलेली असावीसें वाटतें ! आणि सावलीचा आश्रय मिळतांच तो पूर्वपदावर येतो; मनोवृत्ति उत्तेजित होतांच गौरतेकडे झुकतो आणि स्थिरस्थावर होतांच पूर्वपदावर येतो; असा हा वर्ण आहे ! गंगा व यमुना यांचा संगम होतो तेथें गंगेचा गौर व यमुनेचा श्यामल वर्ण यांचा प्रत्यय येतो, असें सांगतात. कल्पना करा: गंगा व यमुना या दोन्ही नद्यांना उन्हाळयांतला पूर आलेला आहे. हिमालयांत उगम पावणाऱ्या या नद्यांना बर्फ वितळल्यामुळें उन्हाळयांतही पूर येतो आणि वितळणारें पाणी सुक्या मातीवरून लोटत नसल्यामुळें पूर आला तरीही या नद्यांचें पाणी गढूळ होत नाहीं; गंगा व यमुना यांच्या पुराच्या पाण्याबरोबर वाहणारें फेंसाचे पुंजके संगमावर एकामेकांत मिसळतील तेव्हां त्यांचा जो दिसेल तो श्यामवर्ण !

आणि श्यामला ? म्हणजे अशा वर्णाची स्त्री. निमगोरी, निमकाळी, श्यामला पण तकतकीत. श्यामला ही सौंदर्याची सीमा, समाधानाचें निधान; अप्रसूता–पण बाला नव्हे, यौवनमध्यस्था–यौवन व प्रौढत्व यांच्या चंचल सीमारेषेवर, एक पाऊल जरा इकडे की दुसरें जरा तिकडे, अशा तरल अवस्थेंत असलेली; अल्लड भूतकाळाकडे अपाङ्ग दृष्टीनें अवलोकन करीत असलेली; आणि भविष्यांतील उपभोगाकडे आतुर व आसक्त दृष्टिक्षेप करणारी !

श्यामला हें एक स्वप्न आहे, सुखस्वप्न आहे. तें वस्तुस्थितींत कधीं अवतरत नाहीं, पण प्रत्ययावर स्वप्नाचा आरोप केला जातो, इतकेंच.

प्रसाधन :

शारीरिक स्वास्थ्य व सौंदर्य संवर्धन यांसाठीं गाथासप्तशतींतील स्त्रीपुरुष अनेक प्रसाधनांचा उपयोग करतात.

स्त्रिया केंसांना सुगंधी तेल (क्र. ८०, २९९, ५७२) लावून न्हातात, केंस कोरडे होईपर्यंत ते मोकळे (क्र. २९९) ठेवतात, नतर आरशांत (क्र. २०४ ८०८, ८१३, ८१७) पाहून भांग (क्र. ६८२) काढतात व वेणीफणी (क्र. ८०) करतात, अगवळ (क्र. २९३) लावून अंबाडा (क्र. २९१) बांधतात आणि त्यांत फुलें (क्र. २९९) माळतात व ओघळता गजरा (क्र.

९९२) धारण करतात. कालिदासाच्या नायिका धुपाच्या धुरांत (ऋतु : १·४ ५·१२; कुमार : ७·१४) केंस वाळवतात. भांग काढणें हें सौभाग्याचें लक्षण (E. 1 : I . 129) मानण्यांत येत असे. अथर्वांत शंभर दांत्यांच्या फणीचा (१४·२·६८) उल्लेख आहे. युक्तिकल्पतरूंत (पृ. ७८–७९; ९१–९७) प्रसाधनीचें वर्णन केलेलें आहे :

काष्ठजा धातुजा चैव शृङ्गजाता यथाक्रमम् ।
गुरुता लघुता चैव तथा घनशलाकता ।
मनोहरत्वमुदितं प्रसाधन्या गुणग्रहः ॥

स्नानानंतर सुवासिनी कपाळावर तिलक (क्र. १६, ११६, १७९) लावतात. डॉ. स्मिथ यांनीं History of Fine Arts in India & Ceylon मध्यें (Pl LVII) अजंठ्याच्या भित्ति चित्रांतील एकाची प्रतिकृति दिली आहे; त्यांतील सर्व स्त्रियांनीं तिलक धारण केलेला आहे. क्र. १७९ या गाथेंतील ललाटिका संज्ञक आलिंगनानें उपनायिकेच्या मुखावरील तिलकाचा रंग प्रथम नायकाच्या मुखावर व नंतर नायिकेच्या चरणांवर परिवर्तित झालेला आहे; त्या अर्थी तत्कालीन तिलक तैलमिश्रित ओलसर असावा असें अनुमान होतें. क्र. ९ या गाथेंत कटीनें मुखराग म्हणून हरितालाचा वापर केलेला आहे. स्त्रिया न्हातांना अंगाला हरिद्रा (क्र. ५८, ८०, २४६) किंवा जम्बूकषाय (क्र. १८९) लावीत; शरिराला कान्ति येण्यासाठीं हरिद्रा आणि अंगाचा तेलकटपणा जाण्यासाठीं जांभळाचें उटणें. रजस्वला मुखाला वर्णघृत (क्र. २२, २८९, ५१९, ५२८) लावीत. पुरुषही जम्बूकषाय वापरीत असें क्र. १८९ मधील उल्लेखांवरून दिसतें. मुखरागानंतर डोळ्यांत शलाकांवर घेऊन अंजन (क्र. ८६४) किंवा काजळ (१५३, ३०२) घालीत आणि अधरांवर राग (क्र. १०६, ४५८, ८०२) लावीत. डोळ्यांत घालावयाचें तें अंजन व ओंठांना लावावयाचें तें रंजन असा भेद भरतानें नाट्यशास्त्रांत (२३·२०) केलेला आहे. अधरराग मेणांत (क्र. ४५८) तयार केलेला असे. पुरुषही मेणाची गुटिका व आलित्याचा हात अधारांवरून फिरवीत असें वात्स्याय-नाच्या उल्लेखावरून (कामसूत्रम् : १·४·१६) दिसतें. हल्लींप्रमाणेंच तेव्हांही

अधररागामुळें गुप्त प्रीति प्रकट होत (क्र. १०६) असावी असें दिसतें. ग्रीष्मताप किंवा कामताप सहन व्हावा म्हणून स्त्रीपुरुष अंगाला चंदनाचें उटणें (क्र. २८८) लावीत. स्वागताचे वेळीं प्रियकराच्या अंगावर सुगंधी चूर्ण (क्र. ३१२) उधळीत असत. कौषीतकी उपनिषदांत अप्सरांना चूर्णहस्ता म्हटलेलें आहे; यावरून हा रिवाज फार प्राचीन असावा. गाथासप्तशतींतील स्त्रिया हातांना धातुरंग (क्र. ६७८) व पायांना लाक्षारस (क्र. ४६४) किंवा आळित्याचा रंग (क्र. ९४०) लावीत. या प्रसाधनांनाही प्रीति बोलकी करण्याची खोड दिसते. आमंत्रित प्रेयसी व वेश्या कसोशीनें प्रसाधन करीत असें क्र. २१ मधील उल्लेखावरून दिसतें.

क्र. ४०८ मध्यें कापालिकेनें प्रियकराच्या शरिराच्या रक्षेचें प्रसाधन धारण केलेलें आहे. अवमालिका-धारण (क्र. १९४) व उच्छिष्ट-ग्रहण (क्र. १८९, २४६) आणि पावलावर पाऊल (क्र. ६८), वौंउ (क्र. ३५९) व मदिरा-चषक (क्र. ९११) हीं प्रियकर किंवा प्रेयसी यांच्या अप्रत्यक्ष स्पर्शामुळें प्राप्त होणाऱ्या संवेदनाजन्य सुखाचीं प्रतीकें मानली पाहिजेत. प्रतीकासक्ति (Fetichism) ही लैङ्गिक विकृति अर्वाचीन मानसशास्त्रज्ञांनीं सूक्ष्म दृष्टीनें अभ्यासिली आहे. क्र. ३६९ च्या नायिकेनें फाल्गुनोत्सवांत कर्दम. प्रसाधन धारण केलें आहे, अशा अभिमानानें कीं तो जणूं कस्तुरीचा लेप आहे! क्र. ६३३ या गाथेंत वैधव्यमण्डनाचा उल्लेख आहे. प्रस्तुत विषयापुरता याचा संबंध विस्कटलेल्या वेणीशीं आहे. सुतकांत वेणीफणी करावयाची नाहीं या रिवाजाचा उल्लेख अथर्ववेदांत (११·९·१४) आलेला आहे. प्रियकराकडून सौभाग्यवतींचीही कधीं अशी दशा करण्यांत येते! म्हणून तें सौभाग्यलक्षणही ठरतें. कपाळावर भरलेल्या मळवटाशींही या उल्लेखाचा संबंध असणे शक्य आहे.

अंजन, अळिता, तिलक, मेंदी, हळद वगैरे प्रसाधनाचीं साहित्यें घरोघर तयार करण्यांत येत. लक्खारस मात्र कारागीर तयार करीत. हा व्यवसाय महत्त्वाचा होता असे उल्लेख अनेक प्राकृत (निर्यावलियाओ : ३·५; आवश्यक : टीका : हरिभद्र : पृ. ३९८) या ग्रंथांत आढळतात.

सुरत :

सुरत हें तात्त्विक दृष्ट्या मानवी संसाराच्या सातत्याचें साधन आणि व्यावहारिक दृष्ट्या काम भावनेचें साध्य.

खरोखर, प्रेम बहुविकारी (क. १२६) आहे; त्याचीं लक्षणें विपरीत (क. ८२३) वाटतात. प्रेमाची धग विलक्षण; ओल्या हृदयांत ती पेटते व कोरड्या हृदयांत विझते (क. ४३०); शृंगाररसाच्या सिंचनानें प्रेमाग्नि प्रज्वलित होतो (क. ७१३), मात्र तप्त हृदयावर प्रेमरसाचा बिंदु पडला कीं तें तडकतें (क. ७९२). परंतु प्रीतीची गति वक्र (क. १०, ९०४) असते आणि कैतवरहित प्रीति ही कल्पनाच अशक्य कोटींतील (क. १२४) आहे. प्रेमामुळें दुःखांतही सुख (क. १००) वाटतें, नरकांत स्वर्ग निर्माण (क. ८७२) होतो. पण केव्हां? प्रीति सफल होईल तेव्हां. अशा प्रीतीची प्राप्ति पूर्वपुण्याईवांचून (क. १७४) होत नाहीं. प्रेम दैवघेवीवर अवलंबून नसतें. (क. २८७), हें खरें पण तें तस असलें तरी स्वागतार्ह (क. ७३८) आहे. म्हणून कवीनें प्रार्थना केली आहे, (क. ८३८) कीं देवा, मला मनुष्यजन्म देऊं नको, दिलास तर प्रेमांत गुंतवूं नको, गुंतवलेंस तर अप्राप्य अशा ठिकाणीं गुंतवूं नकोस!

अनुनय, आलिंगन व चुंबन हे सुरतपूर्व विधि.

एकाकिनीची अडवणूक (क. ८७१, ९५५) किंवा पाठलाग (क. ३३१) हें अनुनयाचे आसुरी प्रकार; होय, अनुनयाचेच. अनिमिष आराधना (क. ९३३) किंवा लाडीगोडी (क. ९८६) हे शिष्ट प्रकार. उद्दिष्ट साध्य होण्यासाठीं प्रेमिकाचे ठायीं थोडाबहुत निर्लज्जपणा असावा लागतोच!

गाथासप्तशतींत अनुनय ही संज्ञा (क. १७, ८७, ९१, १०१, २७७, ४२०, ८८६, ९०८ ९०९, ९१०, ९२१, ९२४, ९३५) विवाहपूर्वप्रियाराधन, कोर्टशिप या अर्थानें वापरलेली नाहीं. या गाथांत मानिनी आणि विन्मुख (क. २७, ३३, ८७) नायिकेला प्रसन्न व सन्मुख करण्यासाठीं नायक अनुरंजन करीत आहे, प्रभुत्वाच्या प्रदर्शनानें नव्हे. दास्य वृत्तीनें (क. ९१); पादवंदनपूर्वक (क. ११, ३९०, ४३२, ८८८, ९०४, ९१०, ९४०); कधीं

एकांतीं तर कधीं सवतीच्या (क्र. ९२१) देखत; कधीं हें मानधारण केवळ अनुनयाच्या अपेक्षेनें (क्र. १०१) केलेलें आहे तर कधीं अपराधांचा (क्र. २७७) कबुलीजबाब मिळविण्यासाठीं; कधीं अनुनय सफल झालेला आहे तर कधीं त्यामुळेंच प्रेमाचें पर्यवसान खेद, चांड व पराङ्मुखता (क्र.४२०,९०९)यांत झालेलें आहे. प्रेयसीच्या हृदयांत प्रीतीचा प्रादुर्भाव झाल्याचें पुलक (क्र. २०, २८, ५५, ७७, ८७, ९६, १००, २१६, ३१४, ४०६, ७१६, ७१९, १८२, ८३०, ९२३, ९६८) हें पहिलें प्रसादचिन्ह. प्राकृत-संस्कृत साहित्यांत पुलकाला आहे तेवढें महत्त्व अन्य भाषांत आढळत नाहीं. या गाथांवरून कवींचें सूक्ष्म निरीक्षण प्रत्ययास येतें. क्र. २० मध्यें गण्डपरिचुंबनानें अलीकप्रसुप्तक नायक रोमाञ्चित झाला आहे आणि क्र. २१६ च्या नायिकेच्या शरिरावर उमललेले पुलक तिच्याच अश्रूंचा भेद करीत आहेत. क्र. ७७ ची नायिका अप्रत्यक्ष स्पर्शानें आणि क्र. ८३० ची नायिका स्वप्नांत आलिंगनाच्या अपेक्षेनें पुलकित झालेली आहे !

आलिंगनाचे अनेक उल्लेख गाथासप्तशतींत (क्र. ९८, १३३, २७६, २८८, ३४४, ३५१, ३५४, ३६८, ४२९, ४५९, ७८०, ८२९, ९१५, ९२३, ९२८ ९८८, ९९०) आलेले आहेत. आलिंगन ही संज्ञाच सुरतद्योतक आहे, आलिंगन हा रतिनाटकाचा पूर्वरङ्ग आहे असें क्र. ३४४ या गाथेंत सांगितलेलें आहे; क्र. ३५१ मधील आलिंगन तसें आहेही; आणि क्र.९८८ व ९९० मध्येंही. पण तें नेहमीच असें असतें असें नाहीं. क्र. ४५९ मधील आलिंगन सुरतोत्तर आहे आलिंगनाचा महिमा काय सांगावा ? चन्दनानें नव्हे, आलिंगनानें कामताप शांत(क्र.२८८) होतो; त्यासाठीं बाहुलता (क्र. ३५४) स्वयंस्फूर्तीनें सरसावतात. आणि त्याचा आवेश काय वर्णावा ? त्यामुळें जणूं नायिकेचे स्तन नायकाच्या छातींत रुततात, आणि केवळ आवेशाच्या दर्शनामुळें चिरडण्याच्या धास्तीनें नायिकेचा कृत्रिम (क्र. ९२८) मान आपोआप ओसरतो. क्र. २२ मधील आलिंगनाला वात्स्यायनानें स्पृष्टक (२. २. ९) अशी संज्ञा दिलेली आहे : हालचाल बुद्धिपुरःसर होत आहे असा कोणाला संशयही येणार नाहीं अश रीतीनें, कांहा तरी बहाणा करून शरीराचा शरीराला कोठेंतरी स्पर्श करणें. क्र. १७९ मधील आलिंगन हें वात्स्यायनाच्या लतावेष्टिका (२. २. २७) वर्गांत

बंब. मुखे मुखमासज्याक्षिणी अक्ष्णोर्ललाटेन ललाटमाइन्याल्ललाटिका ॥'
क्र. २७६ मधील आलिंगनाचें नांव विद्धक (२. १. १०); कारण येथें स्तनानें शल्याप्रमाणें वेध झालेला आहे. क्र. १३३ व ८२९ मधील आलिंगनें मनोमय प्रियकराला दिलेलीं आहेत. आलिंगन हें चुम्बनापेक्षां ठसठशीत व दीर्घकालीन असल्यामुळें त्याची तहान हाताला हात (क्र. ७४३) लावून किंवा अडचणीत आधार (क्र. १९३) घेऊन त्रोटक आलिंगनानें भागवावी लागते. क्र. २२ मधील रजस्वलेचें आलिंगन असेंच त्रोटक आहे. पण क्र. ५२८ मधील मात्र दीर्घकालीन असलें पाहिजे. आलिंगनाचें व स्तनांचें गोत्र जुळतें. (क्र. २७६, ३६८), पण, किंवा त्यामुळेंच त्याचें हाराशीं (क्र. ४२९, ९८८, ९९०) सूत जमत नाहीं !

गाथासप्तशतीत चुंबनाचे अनेक उल्लेख (क्र. २०, २२, ८९, ९६, १००, ११४, १७६, २००, २१३, ३००, ४५५, ४५८, ४६५, ५०७, ५१९, ६०५ ६६१, ७२९, ८२०, ८२१, ८२४, ८६६, ८८८, ८९२, ९१७, ९२७, ९३२, ९६५ ९७२) आलेले आहेत. चुंबनाला आलिंगन, अंतःशोषण व गंधग्रहण हीं अभिप्रेतआहेत. आलिंगन हा मुख्यत्वेंकरून स्तनांचा गौरव आणि चुंबन हा अधराचा. त्यामुळें बालेला एकाएकीं स्त्रीत्व प्राप्त होते. कधीं कधीं चुंबनातील आवेशाचें पर्यवसान दंतव्रणांत होतें. ह्या क्रीडा कोणी कोणाला शिकवाव्या लागत नाहींत (क्र. ६६१), हेंच खरें. वात्स्यायनानें विहित चुंबनस्थानें (२.३.६) सांगितलीं आहेत. ललाट अलक कपोल नयन वक्ष स्तन ओष्ठ अन्तर्मुखेषु चुम्बनम्। क्र. २० मधील चुम्बनाला वात्स्यायनानें रागदीपन (सुप्तस्य मुखमवलोकयन्त्याः स्वाभिप्रायेण चुम्बनम्) म्हटलेलें आहे; आणि क्र. २२ मधील चुम्बनाला स्पृष्टक व क्र. ११४ मधील चुंबनाला संक्रान्तक (प्रतिमायाः चुम्बनम्); अनङ्गरङ्गांत क्र. ८२१ ला स्फुरित (९. १४); क्र. ८८८ ला मिलित (९. १३ : वात्स्यायनाचें निमित); (क्र. ९२७) ला संपुटक (९. १८). सलता रजःकण काढण्यासाठीं डोळयांत फुंकर घालणें हें पहिलें चुंबन घेण्याचें जुनेंनिमित्त आहे असे क्र.८९व१७६ या गाथांवरून दिसतें; आजूबाजूला माणसें वावरत असली तरी हे निमित्त वेळ निभावून नेतें. दिवसा उजेडीं तोंडाचा वास घेणें हेंहो असेंच सोईस्कर निमित्त (क्र. ८८६) आहे; येथें तें नायिकेनें

मोठ्या साहसानें योजलेलें आहे. दिवसां उजेडीं अंधाऱ्या खोलींत हा विधि (क्र. ७२९) लगोलग उरकलां येतो ! क्षत पडलेंच तर रानावनांत वावरणारांना मधमाशीची सबब (क्र. ६३४, ८८०) उपलब्ध असतेच. पुरुषाला व स्त्रीलाही. क्र. ४५५ मध्यें पार्वतीनें शंकराच्या नेत्राचें चुंबन घेतलें आहे. आणि क्र.८२४ मध्यें नववधूनें नवऱ्याचें, अनेकदां, ओठ सुकेपर्यंत. क्र. २२ व ५१९ मध्यें नायकानें रजस्वलेचें चुंबन घेतलेलें आहे. क्र. २४९ च्या नायकानें नायिकेचा अधर दांतांत धरलेला असून त्यांच्या पकडांतून सुटण्यासाठीं ती शीर्षप्रघूर्णन करीत आहे. साहित्यदर्पणांत सांगितलें आहेः " केशस्तनधरादीनां ग्रहे हर्षेऽपि संभ्रमेत्। प्राहुःकुट्टमितं नाम शिरःकरविधूननम् ॥ " क्र. २११ मधील चुंबन आवेशपूर्ण आहे आणि क्र. ९२७ मधील दीर्घकालीन. कसेंही असलें तरी सिद्धान्त एकच. अधर एकच असला तरी स्वयंस्फूर्तीनें त्याचें चुंबन मिळालें तर त्यापासून अनेक रसांची प्राप्ति होते !

गाथासप्तशतींतील व्यभिचारी सुरतक्रिया सामान्यतः उघड्यावर, दिवसां उजेडीं, निःशंकपणें (क्र. ६३५, वृक्षादिकांच्या आश्रयानें (क्र. १५३) चालतात. कंदमुळांसाठीं किंवा शिकारीसाठीं जंगलांत वावरणाऱ्या व शेतीवर अवलंबून असणाऱ्या समाजांत, लोकवस्ती तुरळक असलेल्या भागांत असेच रिवाज प्रचलित असलेले दिसतात. कुलीन व विहित सुरतव्यवहार साधारणतः घरीं व रात्रीं, कधीं अंधारांत आणि कधीं सदीप (क्र. २६४, ५४७, ५८९). व्यभिचारिणी ही स्वैरिणी होईपर्यंत पतिशय्येची अदब राखते आणि चौर्यरताला अन्यत्र अवसर नसला तर तें रात्रीं, अंधारांत (क्र. ३३३) उरकण्यांत येतें. ही सामान्य पद्धति झाली, अपवाद आहेतच. वेळ काय, कोणताही, संधि मिळेल तेव्हां. क्र. ४९ व २९९ मधील सुरत दुपारीं झालेलें आहे. सुरतासाठीं आवाहन कोण करतात ? स्त्रिया कीं पुरुष ? स्त्रियांचें शील बिघडविण्याची जबाबदारी पुरुषांवरच पडते ही सामान्य समजूत परंपरागत दाक्षिण्याला व प्रचलित व्यवहारालाही धरून असली तरी प्राचीन व मध्य-युगीन साहित्यांत ती निदर्शनाला येत नाहीं. सुरत व्यवहाराचें आवाहन स्त्रियांनीं करावयाचें ही योजना गाथासप्तशतींतही आढळते; मग ती तत्कालीन रिवाजाच्या अनुरोधानें केलेली असो किंवा कवींनी समातीयांच्या शौक-

प्रच्छादनार्थ केलेली असो. क्र. १६१, २००, २५४, ८७३, ९५५ या गाथांसलें आवाहन स्त्रियांनीं केलेलें आहे. ज्या गाथांत कथावस्तु आहेत तेथें तर हा प्रकार जवळ जवळ सर्वत्र आढळतो. सुरतासक्ति ही भावना क्षणिक आहे, विलंबानें ती ओसरते, हा कामशास्त्रांतला व्यावहारिक सिद्धान्त क्र. २१ या गाथेंत मांडलेला आहे. आळवली तर ही भावना चित्ताचाच नव्हे, शरिराचा व जीवनाचाही कबजा घेतें. कामदशा ही या भावनेची साहित्यांतील आळवणी; साहित्यदर्पणांत कामाच्या दहा दशा सांगितलेल्या आहेत: "अभिलाषश्चिन्तास्मृति गुणकथनोद्वेगसंप्रलापाश्च। उन्मादोऽथ व्याधिर्जडता मृतिरिति दशाच कामदशाः ॥" कामविकार प्रबल होण्यापूर्वीच आवरला तर मनाला व्यथा होते (क्र. ८११) पण तो मनांतल्या मनांत जिरूं शकतो, या अनुभवावरच कामविन्मुखांची निवृत्ति आधारलेली आहे. बाला (क्र. ७५५, ७९५), गर्भिणी (क्र. ९२ (व नवप्रसूता) क्र. २००) या सुरतव्यवहाराला त्याज्य असल्याचें सांगितलेलें आहे गर्भधारणेनंतर सातव्या महिन्यापासून बाळाला दांत येईपर्यंत सुरताला मनाई होती. तरीही मासप्रसूता (क्र. २५९) ही अतिसुखदायिनी असल्याचा उल्लेख आढळतोच! कलिका उमलली कीं मधुकराला (क्र. ७४९) मन आवरत नाहीं, कधीं तो कलिकेचें उत्फुल्लकरण मोठ्या कौशल्यानें व सावधगिरीनें (क्र. ४४२) करतो आणि कधीं तर ती उमलण्यापूर्वीच तिचें मर्दन (क्र. ४४४) निर्दयपणें (क्र. ६१३) करण्यास उद्युक्त होतो! प्रेमाचे सर्वच व्यवहार अनिर्बंध हेंच खरें!

स्त्री-पुरुष सुरतासाठीं भिन्न आसनांची योजना कां करतात? कारण रसिक मनुष्य (क्र. ४७६) ऋजुक रतानें संतुष्ट होत नाहीं!

कामशास्त्रकारांनीं नमूद केलेल्या आसनांपैकीं गाथासप्तशतींत फक्त पुरुषायिताचा नामपूर्वक (क्र. ४, ५२, १५१, १९६, ३९३, ४४६, ४८३, ६१४, ६५४, ८१०, ९८८) पुनःपुनरुच्चार झालेला आहे: अन्य आसनें आरोपित आहेत. पुरुषायित मानवांना आवडतें, तसेंच गंधर्व देवादिकांनाही (क्र. १५१, ४४६, ८१०). पैगंबरानें मात्र धर्मविरुद्ध म्हणून पुरुषायिताचा निषेध केलेला आहे (राजवाडे : पूर्वोक्त : पृ. ८२८); तरीही शेख नफजवी यानें

(The Perfumed Garden : पृ. 81) त्याचा उल्लेख केलेला आहे. गर्भिणींना हें आसन अयोग्य (क्र. ४८३) मानलेलें आहे, इतकेंच नव्हे, विपरीत संभोगानें गर्भसंभव होत नाहीं (क्र. ६५४) असाही उल्लेख आलेला आहे. वात्स्यायनानें (२. ८. ३२) नवप्रसूतेला पुरुषायिताची मनाई केलेली आहे. पुरुषायितानें गर्भसंभव होत नाहीं असें यशोधरानें जयमङ्गलेंत (काव्यालंकार खुपरकर शास्त्री प्रत : पृ. २६३) सांगितलें आहे. क्र. ११ मध्यें धेनुकासनाची सूचना आहे असें टीकाकार सांगतात. वात्स्यायनानें याचें लक्षण (२. ६. ३७) सांगितलें आहे : " भूमौ वा चतुष्पदवदास्थितायाः वृषलीलयावस्कन्दनं धैनुकम् ॥ " क्र. ४११ व ४२५ मध्यें त्रिविक्रमबंधाची सूचना आहे असें टीकाकार सांगतात. क्र. ५२१ मधील सुरत हें मार्जार सुरतासारखें भासतें. क्र. ५५८ मध्यें जलक्रीडेचा उल्लेख आहे. जलांतील आसनप्रयोग सुलभ असल्याचें सुवर्णनाभाचें मत उद्धृत करून वात्स्यायन(२. ६. ३३) सांगतो कीं जलामध्यें सुरतक्रिया शिष्टजनांनीं निषिद्ध मानली आहे, सबब ही अयोग्य आहे. क्र. ८८४ या गाथेंत गोयूथिकरताची सूचना आहे असें टीकाकार सांगतात. त्याचें लक्षण वात्स्यायनानें (२. ६. ४१) सांगितलें आहे: " बह्वीभिश्च सह गोयूथिकम् । " गाईंच्या खिल्लारांत एक बैल जसा वावरतो तसा एक पुरुष स्त्री-समूहांत रममाण होत असल्यामुळें गोयूथिक ही संज्ञा पूर्णतया समुचित आहे, असें या सूत्रावरील टीकेंत यशोधरानें सांगितलें आहे.

सुरतसमयीं अनेक विकल्प व विभ्रम संभवतात. नववधूला सुरतविषयीची माहिती नसते. लज्जा व धास्ती मात्र बहुत असते, म्हणून ती डोळ्याला डोळा भिडवीत नाहीं (क्र. ६४५) व संविष्टितोरु (क्र. ६४६) असते; तिला अनुकूल करून घेण्याला अनेक डावपेंच लढवावे लागतात; तरीही, किंवा म्हणूनच, तिचा समागम रुळलेल्या प्रथमगृहिणीपेक्षां अधिक सुखदायक (क्र. ४७९) वाटतो. प्रियकराला संतुष्ट करण्याची तिची इच्छा असते, पण विरामस्थिति माहीत नसते (क्र. १५१), यामुळें प्रियकराचा मात्र विरस होतो, स्वतःच्या सामर्थ्याबद्दल साशंकता वाटते; माहितगार महिला मात्र अवसानानंतर परस्परांचा श्रमभार हलका करण्याचा यत्न (क्र. २९९) करतात. हा विषयच असा विलक्षण आहे कीं पत्नीच्या मनांत पतीविषयीं कितीही

आदर असला तरी ती सुरतसमयीं त्याला एकवचनांत आज्ञा देण्याला धजते ! सामान्यतः विवाहित स्त्रीपुरुषांना एकनिष्ठेची अपेक्षा असते. पति अन्येच्या नादीं लागला किंवा आहारीं गेला किंवा तसा संशय आला कीं पत्नीला मत्सर (क्र. १, ३३, ४३, ७२६, ७३१, ८६२, ९०२, ९३२) वाटतो; प्रतिबिंबाचा (क्र. ९३२) आणि आख्यानांतील नायिकेचा (क्र. ८६२) ही. एकादीच अशी उदार असते कीं ती मत्सर आवरून स्वतः पतीसाठीं दौत्य (क्र. ८४) करावयास सिद्ध होते. पण ज्यांचे अंगीं विशेष गुण असतात व याची जाणीव असते त्यांना त्यांचें चीज व्हावें अशीही अपेक्षा असते. म्हणूनच क्र. ४८ च्या गुणी नायिकेला एकान्तरस पति अरसिक वाटतो. मानवाची मनोवृत्ति संकीर्ण असते; म्हणूनच क्र. ४४ च्या नायकाला अन्यमहिलाप्रसंगीं स्वमहिलेची आठवण झालेली आहे; म्हणूनच क्र. ६६१ च्या नायकाला सुरतरसिक भार्या बहुशिक्षिता असावी असा संशय आलेला आहे ! वस्तुतः सुरतांतील विलास कोणी कोणाला शिकवीत नाहीं; फार तर कुसुम्भ (क्र. ३९२) कुमारिकांना विभ्रम शिकवतो; पण स्नेहानुबंध (क्र. ४७७) हाच त्यांचा एकमेव आचार्य ! अर्थ तो तोच असला तरी 'कौशल्य मोठें रचनेंत आहे.' क्र. ४४२ चा नायक कलिकाभङ्गप्रसंगीं अनुभवसिद्ध कौशल्य उपयोजीत आहे. क्र. ४६२ या गाथेंत हाच सिद्धान्त कुशल गवळ्याचा दृष्टांत देऊन मांडलेला आहे. अनुभवसिद्ध कौशल्य हेंही केव्हां केव्हां तांत्रिक किंवा यांत्रिक वाटतें; चर्वितचर्वणासारखें (क्र. २७४) वाटतें, इतकेंच नव्हे, दुर्विदग्धसुरत सशास्त्र असलें तरीं दुःखद (क्र. ५६) होतें. रसिकाशीं सुरताचा संकल्प ठरण्यांत (क्र. ६१) होतें तेवढें सुख, मग भले तो संकेत सिद्धीस न जावो. तेवढें समाधान कांहीं अविदग्धाशीं होणाऱ्या संभोगानें होत नाहीं. जो सुरतरसिक असतो तो सौंदर्याच्या पुरेपूर आस्वादासाठीं सदीप सुरत (क्र. ५४७) रमतो, इतकेंच नव्हे, सुरतानंतर स्त्रीच्या विकलांगाच्या निरीक्षणानें वैदग्ध्य प्रकट (क्र. ४१३) करतो; एवढेंच नव्हे, दुसऱ्या दिवशीं तिच्या मुखावर प्रकट होणाऱ्या छटा पहावयास अधिक उत्सुक (क्र. २०९, ७१२) असतो !

गाथासप्तशतीच्या नायिका सामान्यतः सुरतसमयीं विवस्त्र (क्र. ३५१, ४५५, ४५६, ४६१, ५२०, ७१८) आहेत; हेरोडोटस (३. १०. १) सांगतो त्या-

प्रमाणें घराबाहेरच (क. ४६१) नव्हे, घरांतही; असा रिवाजच (क. [illegible]) असावा. कुलवधूला सुरतोत्तर एकांतांतही याची लाज (क. ४५९) वाटते. क. ३१६ व ८७३ या गाथांत ग्रामस्त्री सुरत सूचित आहे. कुग्रामांतल्या स्वयं-पाकांत तूप मीठ नसतें; साधें अन्न मात्र पोटभर असतें, त्याप्रमाणें ग्रामस्त्री-सुरतांत बाह्योपचार मिळणार नाहींत पण कुचराई होणार नाहीं; कुग्रामांत मऊ शय्या मिळणार नाहीं, पण उन्नत पयोधरांचा आश्रय मिळेल. क. १५६ व ८८४ मध्यें वेश्यासुरताचा उल्लेख आहे. हें सुरत रसिकाला संपूर्णतया सुसंतुष्ट करतें, कारण या बाबतींत पुरुषाच्या ज्या ज्या अपेक्षा व तृषा असतात त्या त्या तेथें भागतात; आणि गौयूथिकेची व्यवस्था अन्यत्र अशक्यच! क. ३११ मधील चौर्यरताचा उल्लेख वास्तवपूर्ण आहे असें टीकाकार सांगतात! यासाठीं आणखी कोणती सावधगिरी घेतली पाहिजे याविषयीं सूचना क. ४१५, ९५२, ९५३ या गाथांत दिलेल्या आहेत. अंगावर कोठें ओरखडा किंवा गाला-वर नाजूक कांटा उमललेला दिसला कीं संशयाला संधि मिळावयाची; असा घ्राणाक्षांच्या दृष्टींतून अधरव्रण (क. ८८८), धाप (क. ८७५) किंवा भग्नवलय (क. ४३८), सुगंध (क. ५१), स्वेद (क. ३५८, ३५९, ४०७, ४०८, ४४०, ७१८, ८२२, ८२८, ८७५, ९३२), इत्यादि चिन्हें कशा निसटणार? रतिसमयीं प्रकट होणाऱ्या विभ्रमांबद्दल वात्स्यायन (२.७) सांगतोः रतिचक्रप्रवृत्तस्य नास्ति शास्त्रं न च क्रमः।......स्वप्नेष्वपि न दृश्यन्ते ते भावास्ते च विभ्रमाः॥ क. ५ या गाथेंत सांगितलें आहे कीं नैसर्गिक विभ्रम हे तृप्तीपर्यंतच व्यक्त होतात; अन्य विभ्रम हे कृत्रिम होत. कुलस्त्रीचा शृंगार (क. ८७२) व विभ्रम फक्त पतीसाठीं असतात आणि तो प्रवासाला निघाला कीं तेही, इतकेंच नव्हे, तिचें यौवन व सौंदर्य हींही त्याच्याबरोबर प्रवासाला जातात, असें सांकेतिक विधान क. ८६५ या गाथेंत आढळतें.

सुरतासाठीं वेश्येप्रमाणेंच चरक चालविणाऱ्या धडधाकट पुरुषानें नीरस व वयस्क नायिकेकडून मोबदल्याची अपेक्षा केलेली आढळते. प्रौढाला किंवा वृद्धालाही बाला हवीशी वाटते, म्हणून बालिकेचें संगोपन हां केलें जातें; त्याचप्रमाणें वृद्धेलाही तरुणाची हौस वाटते (क. १९, ७७०) असें दिसतें; एवढेंच काय, मद्यपान केलें असतां (क. ९७८) ती आकर्षकही दिसते!

स्त्रीच्या समागमामुळें तरुणालाही षंढत्व येतें असा कामशास्त्राचा इषारा आहे तो पत्करत असेल त्यानेंच असें साहस करावें ! क्र. ४०० या गाथेंतला प्रसंग कुटुंबवत्सलांना वारंवार अनुभवाला येणारा आहे; पण तथाकथित सुसंस्कृत साहित्यांत प्रचलित संकेतांमुळें असे उल्लेख करावयास कोणी धजत नाहात.

निष्कर्ष :

संस्कृत काम, नाट्य व साहित्य शास्त्रकारांनीं शरीराचीं अकरा अंगोपांगें व नऊ प्रत्यंगें कल्पिलेलीं आहेत; अंगें : मस्तक, स्कन्ध, वक्ष, कटि, पार्श्व, हस्त व पाद; उपांगें : भुज, मणिबन्ध, जंघा व ऊरु; प्रत्यंगें : मुख, भ्रू, दृष्टि, कपोल, नासिका, अधर, दंत, जिव्हा व हनु. या सर्व अंगप्रत्यंगांचे उल्लेख गाथासप्तशतींत अनेकदां आलेलें आहेत. आणि त्यांहा व्यक्त होणारे व्यक्तिमत्व व सौंदर्य गाथासप्तशतींत प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षपणें वारंवार प्रत्ययास येतें. प्राचीन व मध्ययुगीन संस्कृत व प्राकृत कवींनीं स्त्रीसौंदर्यवर्णनाचे अनेक संकेत रूढ केलेले आहेत. त्यांची तेवढी योजना येथें केलेली आढळत नाहीं. गाथासप्तशतीच्या संपादनकालांत हे संकेत एवढे रूढ झालेले नसावेत. शिवाय त्यांच्याप्रमाणें स्थिर सौंदर्यवर्णनाकडे गाथाकवींचा कल नाहीं; आणि स्वीकारलेल्या माध्यमाच्या त्रुटित स्वरूपामुळें यांना तेवढी सवडही नाहीं. गाथाकवींना चल सौंदर्यच अभिप्रेत आहे. आडपडद्याच्या व कृत्रिमतेच्या अभावीं, सामान्य व्यवहारांत; भावनांच्या प्रेरणांनीं, गात्रांच्या चलनवलनामुळें व्यक्त होणारा सौंदर्याचा आविष्कार गाथाकवींनीं वर्णिला आहे. गाथाकवि स्थिर अवयवांभोंवतीं घुटमळत नाहींत, त्यांना उपमा देण्यांत रंगत नाहात. नायिकेचें नग्नदर्शन झालें तरी, तर ते फार तर श्वास रोधून धरतील. चार दोन शब्दांत प्रसंगाचें बाह्य व स्थूल चित्रण करून गाथाकवि अंतःप्रेरणांकडे वळतो आणि त्यांचें ही दिग्दर्शन तेवढ्याच झटक्यांत चार दोन शब्दांत असें करतो कीं जिवाला जन्माचा चटका लागावा ! ह्या चित्राच्या ठळक बाह्यरेषांमध्यें छायाप्रकाशाच्या किंवा रंगीबेरंगी छटा भरलेल्या नसल्या तरी तें इतकें स्वयंपूर्ण असतें कीं जणू जिवंतपणां समोर उभें ठाकतें !

गाथासप्तशतीच्या नायिकेच्या सामूहिक (Composite) स्वरूपाबद्दल कांहीं अनुमानें काढतां येतात.

गाथासप्तशतीच्या नायिका मुख्यत्वेंकरून तीन वर्गांच्या आहेत : आर्य, हलिक व वन्य. आर्य या वरिष्ठ वर्गांत क्षत्रिय व वैश्य हे समाविष्ट होतात. हे वर्ग हलिकांना हलके लेखतात, हें खरें, पण तें केवळ आर्थिक व सांस्कृतिक दृष्ट्या. आर्यांचे अंगीं असलेल्या गुणांचें वैशिष्ट्य सामान्य जनतेला मान्य आहे; त्यांच्या साहचर्यामुळें त्यांचे गुणावगुण सामान्य वर्गांमध्यें अनुस्यूत होत आहेत. आणि मुख्यत्वेंकरून स्त्रियांचे मार्फत सामान्य वर्गांचें उत्थापन होत आहे. आर्य व द्रविड यांच्या समन्वयानें दक्षिणापथाची वसाहत झालेली असावी या अनुमानाला गाथासप्तशतींत आधार आढळत नाहीं. वरिष्ठ वर्गांतील स्त्रिया व्यवस्थितपणें वेषधारण करतात, प्रसाधनें वापरतात आणि आभिजात्याच्या बंधनांत वावरतात. हलिक व वन्य स्त्रिया सामान्यतः कृत्रिमतेपासून अलिप्त आहेत. त्यांची शरीरयष्टि मजबूत आहे आणि चाल ताठ आहे. उन्नत स्तन व पृथुल नितंब यांमुळें त्यांच्या गतीला गांभीर्य आलेलें आहे; पण कुलीनतेच्या कृत्रिम कल्पनांच्या भारामुळे त्या आपल्या अवयवांचा गौरव छपविण्यासाठीं पाठीला पोंक आणून किंवा आंग चोरून चालणार नाहीत. हिंदी लोकवाङ्मयांत आढळणारे व म्हणींत समाविष्ट करून गौरविलेले ' मरहट्टनिके कुच ' गाथासप्तशतींत वारंवार दिसतात. गाथासप्तशतीच्या नायिका दिलखुलास, मनमोकळया आहेत; निर्भय आहेत. पण त्या काळाच्या मानानें निर्लज्ज नाहींत. नदीवर स्नानाला किंवा वनांत विहाराला चल असें प्रियकरानें किंवा मैत्रिणीनें सुचविण्याचा अवकाश, कीं लगेच आडेवेढे न घेतां ती घराबाहेर पडेल; मित्रमैत्रिणींच्या समवेत वाळवंटांत धिंगाणा घालील आणि कामधामाला किंवा पुरुषांशीं बरोबरीनें सहकार्य करण्याला उरणार नाहीं. पतीनें वाद्य हातीं घेतलें तर त्याच्या तालावर ती नाचेल किंवा सुरावर गाणे म्हणेल; प्रियकरानें सुरतासाठीं आवाहन केलें तर ती आढेवेढे घेणार नाहीं; इतकेंच नव्हे, कोठें व केव्हां याचा नेम नाहीं, स्वयंप्रेरणेनें सुरताची मागणी करील आणि सामान्यतः हल्लीचे चोखंदळ अश्लील मानतील असे उद्गार सुरतसमयीं सीत्कारपूर्वक काढण्यांत आनंद मानील; प्रसंगाचें व्यवधान सांभाळील आणि साहसाला प्रवृत्त होईल. अशी ही दिलदार व हौशी आहे.

गाथासप्तशतीच्या सामूहिक नायिकेच्या लैङ्गिक गुणदोषांचें विवेचन

देश	आचार	आलिंगन	कुचमर्दन	चुंबन	दंतक्षत	नखक्षत	प्रहणन	सुरत	
अपरान्त-लाट		उत्सुक	मंद	अविरत-रत	मंद	मंद	मंद-रत	रतिललित	सुरसतमयीं सीत्कार, आलिंगन समयीं प्रियकराचे गळ्यांत मिठी. नायकाच्या शरीरावर क्षतें करण्याविषयीं उत्सुक.
अवन्ति				विरक्त	विरक्त	विरक्त		चित्ररत-प्रिय	अपशब्द आवडतात. अमंगल आवडी.
आन्ध्र	आचारभ्रष्ट		असह्य					रतिप्रिय	क्षतांनीं जखम करीत नाहींत.
आभीर		प्रिय	अतिप्रिय	प्रिय	प्रिय-विरक्त	प्रिय-विरक्त	प्रहणन-साध्य		गीतवाद्यादि चौसष्ट कलांच्या (?) (आसनांच्या) प्रयोगानें संतुष्ट.
मध्यदेश	आर्यप्रधान सात्त्विक	उत्सुक		विरक्त	विरक्त	विरक्त	मध्यम-प्रवृत्ति.	चित्ररत	अश्लील व कठोर शब्द धीटपणें रतांत प्रवृत्त – स्वयंप्रवृत्त – स्वतः आरंभतात.
महाराष्ट्र		प्रिय		प्रिय	प्रिय	प्रिय	प्रसिद्ध	उघड्यावर	पाटलीपुत्राच्या स्त्रियांचीं लक्षणें अशींच आहेत. पण त्या सुरतास उघड्यावर नव्हे, अंतःपुराच्या एकांतींच प्रवृत्त होतात.

येथवर केलें, त्यावरून तिच्या प्रादेशिकत्वाबाबत कांहीं निर्णय घेतां येतो किंवा कसें तें आतां पाहूं. वात्स्यायनादि कामशास्त्रकारांनीं हिंदुस्थानांतील देशोदेशींच्या स्त्रियांचीं लैङ्गिक वैशिष्ट्यें देश्योपचार प्रकरणांत सांगितलीं आहेत. त्या त्या देशांतल्या स्त्रीशीं प्रसंग आला असतां तिचें रंजन कसें करावें या अनुरोधानें त्यांनीं हीं लक्षणें सांगितलेलीं आहेत. त्यांनीं नमूद केलेला तपशील कारणापुरता दिला आहे.

कामशास्त्रकारांनीं सांगितलेलीं हीं लक्षणें त्यांच्या वैयक्तिक निरीक्षणावर आधारलेलीं आहेत कीं पारावर चर्चिल्या जाणाऱ्या ग्राम्य गोष्टींवर, हें सांगतां येणार नाहीं. हीं लक्षणें त्या त्या देशांतील व्यक्तिमात्राचे ठायीं हटकून आढळतीलच असा भरंवसा महर्षि म्हटल्या जाणाऱ्या वात्स्यायनालाही देतां येणार नाहीं. सामान्यतः अशीं लक्षणें अपेक्षावीत एवढेंच त्यांचें सांगणें आहे. तीं लक्ष्यांत घेतलीं असतां निष्कर्ष निघतो कीं गाथासप्तशतीच्या नायिकेच्या ठायीं दृष्टोत्पत्तीस येणारे गुणदोष विशेषतः अपरान्त, अभीर, लाट व महाराष्ट्र या देशांतील स्त्रियांचे अंगीं आहेत अशी या शास्त्रकारांची ग्वाही आहे. महाराष्ट्रांत स्थायिक झालेल्या समाजांत आभीर आहेत, तसेच पाटलीपुत्राहून आलेले लोक ही आहेत, असा समाजशास्त्रज्ञांचा सिद्धान्त आहे. त्याला या वर्गीकरणाचा पाठिंबा आहे आणि गाथासप्तशतींतील नायिकांच्या लैङ्गिक वैशिष्ट्यांचाही !

१८ संकीर्ण : सांस्कृतिक व साहित्यिक

शतकानुशतकात निर्माण झालेल्या संस्कृत व प्राकृत साहित्यांत नमूद असलेल्या अनेक उल्लेखांनीं गाथासप्तशतीच्या कर्तृत्वाचें श्रेय एकमुखानें हाल सातवाहनाला दिलेलें आहेत.

सातवाहन कुलाचा गौरव करणाऱ्या दोन अनामिक गाथा उपलब्ध आहेत.

उत्तरओ हिमवन्तो दाहिणओ सालवाहणो राआ
समभारभरक्कन्ता तेण पल्हत्थए पुहवी ॥
सच्चं भण गोदावरि पुव्वसमुद्देण साहिआसन्ती
सालाहण कुलसरिसं जइ ते कूले कुलं अत्थि ॥

खरेंच आहे; सातवाहन कुलाच्या थोरवीची तुलना उत्तुंग व विस्तीर्ण हिमालयाशींच होऊ शकते आणि गोदावरीच्या परिसरांत सातवाहनाएवढी कीर्ति दुसऱ्या कोणत्याही कुळानें आजवर संपादन केलेली नाहीं. मौर्य युग हें बौद्धाचें सुवर्णयुग आणि गुप्त युग हें वैदिकांचें. या युगांच्या दरम्यानच्या कालखंडाला सातवाहनयुग हेंच अभिधान द्यावें लागतें. या युगाला महाराष्ट्राचें पहिलें सुवर्णयुग असें अभिधान दिलें तर तें यथार्थ ठरेल. अशोकाच्या काळांत बौद्ध भिक्षूंना राजाश्रय मिळाला आणि गुप्त काळांत संस्कृत कवींना व पण्डितांना, स्मृतिकारांना व पुराणिकांना. गुप्त काळात वैदिकांना जें यश लाभलें त्याचा पाया सातवाहनांनींच घातलेला आहे. पहिल्या सातकर्णीनें यज्ञ संस्थेचा पुनरुद्धार केला आणि गोतमीपुत्र सातकर्णीनें चातुर्वर्ण्याची प्रस्थापना केली. हाल सातवाहनाचें कर्तृत्व असेंच अव्वल दर्जाचें आहे त्यानें स्वतंत्र प्राकृत साहित्याची निर्मिति केली व करविली आणि प्रचलित लोकगीतांचें संकलन केलें.

उत्तर हिंदुस्थानांत अशोक व दक्षिण हिंदुस्थानात पहिला सातकर्णी, हे प्राकृतांचे आद्य पुरस्कर्ते सम्राट्-पूर्वजांच्या या परंपरेला अनुसरून हाल सातवाहनानें महाराष्ट्री प्राकृतांत आणि गाथा या महाराष्ट्री वृत्तात (Colebrooke :- Sanskrit and Prakrit Poetry : Asiatic Researches ; X : p. 415) गाथासप्तशती या गाथाकोशात लोकसाहित्याचा संग्रह केला. गुणाढ्यानें पैशाची भाषेत लिहिलेला बृहत्कथा हा कथासंग्रह आणि कातन्त्र व्याकरण यांचाही हालाशीं (Smith : Z. D. M. G : p 60.) संबंध जोडण्यात येतो. या विषयीं अनेक दंतकथा प्रचलित आहेत. हाल शालिवाहन हा दर चार दिवसांनीं चार वर्णांतील एकेका सुंदरीशीं लग्न करून अंतःपुरांत भरती करूं लागला. यामुळें तरुणांना वधू मिळेनात. तेव्हा एका द्विजानें देवीची प्रार्थना केली देवीनें सुंदरीचें स्वरूप धारण केलें व एकातांत राजाला भेटून भेडसावलें. तेव्हापासून राजाचा बायकांचा नाद सुटला (लीलाई: प्रस्तावना : डॉ. उपाध्ये). सातवाहनाच्या अंतःपुरात पांचशें राण्या होत्या. पैकीं चंद्रलेखा ही पट्टराणी. एके दिवशीं ती सख्यासह प्रतिष्ठानच्या देवीकृति नामक तडागात जलक्रीडा करीत असतां राजा तिच्या अंगावर पाणी उडवूं लागला. माझ्या अंगावर पाणी उडवूं नको असें राणीनें त्याला संस्कृतात सांगितलें. मोदकैः हा समास ऐकून

राजाला वाटलें कीं राणीला मोदकांचा मार हवा आहे. त्यानें पाकशाळेतून मोदक मागवले व ते राणीच्या अंगावर फेंकले. तेव्हां राणीनें मैत्रिणींसमक्ष राजाचा उपहास केला. ही राणी सुसंस्कृत म्हणवून घेणाऱ्या घराण्यांतील असावी. अशा घराण्यांशीं सोयरीक करण्याची पद्धत सातवाहन कुलांत वारंवार आढळते. संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन हा पतंजलि प्रेरित क्रांतीचा एक परिणाम उत्तर हिंदुस्थानांत विशेष प्रसृत झाला होता. अपमानामुळें व्यथित झालेल्या राजानें सरस्वतीची आराधना केली. प्रबन्धकोशांत सरस्वतीला भारती म्हटलेलें आहे. देवी प्रसन्न झाली तेव्हां हालानें वर मागितला कीं माझ्या राजधानींतले सारे नागरिक व राज्यातले सारे लोक कवि व्हावेत. त्याप्रमाणें झालें. या नवकवींनीं लिहिलेल्या एक कोटि, कोणी सांगतात दहा कोटि गाथा जमवून हालानें त्यांपैकीं सातशें गाथा निवडल्या आणि त्यांचा गाथासप्तशती या सुभाषितकोशांत संग्रह केला. हालानें चार गाथांना दहा कोटि मुद्रांचें मूल्य दिलें अशी कथा प्रबन्ध-चिंतामणींत सांगितलेली आहे. संस्कृत व्याकरण शिकविण्याविषयीं राजानें आपल्या पण्डितांना आवाहन केलें असतां गुणाढ्यानें ६ वर्षांची मुदत सांगितली आणि शर्ववर्म्यानें सहा महिन्यांत राजाला व्याकरणांत पटाईत करण्याची प्रतिज्ञा केली. शर्ववर्म्यानें कार्तिकेयाच्या कृपेनें कातन्त्र व्याकरण संपादन केलें व तें राजाला शिकविलें. व्युत्पन्न राजानें प्रसन्न होऊन शर्ववर्म्याला भरुकच्छची सुभेदारी दिली. ही कथा कथासरित्सागरात आलेली आहे.

अगदीं अलीकडे श्री सोहनी यांनीं "कालिदास, हाल सातवाहन व चंद्रगुप्त II" हा लेख लिहून प्रसिद्ध केला (Journal of the Bihar Research Society : Vol. XLI : Part 2 ; 1955 : pp. 229-244) आहे. त्याचा सारांश येथें दिल्यावांचून राहवत नाहीं :

" मेघदूतांत कालिदास सांगतो

हित्वा हालामभिमतरसां रेवतीलोचनांकाम्
बन्धुप्रीत्या समरविमुखो लांगली याः सिषेवे
कृत्वा तासामभिगममपां सौम्य सारस्वतीनाम्
अन्तः शुद्धस्त्वमपि भविता वर्णमात्रेण कृष्णः ॥

अमरकोशावरील टीकेंत क्षीरस्वामी सांगतो, ' जहाति लज्जामनया हाला ।

मल्लिनाथ टीकेंत सांगतो, "अभियुक्त देशभाषा पदमित्यत्र सूत्रे हाला इति देशभाषापदमप्यतीव कविप्रयोगात् साधु।' काव्यालंकारसूत्रांत वामन सांगतो, 'अतीव कविभिः प्रयुक्तं देशभाषापदं योज्यम्। यथा-योषिदिति अभिलाष न हालाम्। अत्र हाला देशभाषापदम्।' गाथासप्तशतींत सांगितलें आहे कीं प्राकृत काव्य हें अमृतासारखें आहे. प्राकृत काव्य हें 'ललित, मधुराक्षर व सशृंगार' असतें असें वज्जालग्गांत वचन आहे. आढ्यराजाची प्रजा प्राकृत-भाषी आणि साहसांकाची संस्कृतभाषी, असें विधान भोजानें सरस्वती-कंठाभरणांत केलेलें आहे. साहसांक म्हणजे चंद्रगुप्त विक्रमादित्य. त्याच्या अंतःपुरांत संस्कृत व कुंतल सातवाहनाच्या अंतःपुरांत प्राकृत भाषा चालत, असें राजशेखरानें काव्यमीमांसेंत सांगितलेलें आहे. कुंतल शातकर्णी शातवाहनानें कर्तरि प्रयोगानें महादेवी मलयवतीला मारलें असें वात्स्यायनानें कामसूत्रांत सांगितलेलें आहे. गाथासप्तशतीच्या एका प्राचीन हस्तलिखितांतला अखेरचा मजकूर डॉ. पीटर्सन यांनीं प्रसिद्ध केला आहे. 'गाथासप्तशतीचा कर्ता श्री सातवाहन नरेंद्र हा कुन्तलजनपदाचा राजा होता, त्याची राजधानी पैठण येथें होती व त्याचीं उपनामें हाल व शतकर्ण अशीं होतीं; द्वीपकर्ण हा त्याचा पिता आणि मलयवती ही त्याची राणी; शर्ववर्मा हा त्याचा मित्र होता व तो गुणाढयाचा आश्रयदाता होता.' या वचनावरून निष्कर्ष निघतात ते असे:— वात्स्यायनाचा कुंतल सातकर्णी व गाथासप्तशतीचा हाल सातवाहन हे एकच. मलयवती ही हालाची राणी होती असें लीलावती या प्राकृत काव्यावरूनही दिसून येतें; वात्स्यायनानें तिचाहि उल्लेख केलेला आहे. भोजाचा आढ्यराज हा ही हाल सातवाहनच. हाल सातवाहनचें दातृत्व विख्यात आहे. क्र. ४६७ या गाथेंतील शालिवाहनाची ओळख हालाशींच पटते. क्र ४६४ या गाथेंतील विक्रमादित्य हें अभिधान हालाचेंच आहे. त्याच्या दानशौर्याचें वर्णन भद्र-बाहूच्या निर्युक्ति भाष्यांत आलेलें आहे. कालिदासाला हाल माहीत होता, एवढेंच नव्हे, त्यानें गाथासप्तशतीचा सूक्ष्म अभ्यास केला होता. कालिदासाच्या ऋतुसंहारावर गाथासप्तशतीची छाप जागोजाग दिसते. गाथासप्तशतींतील शिव-पार्वतींचा कालिदासानें कुमारसंभव व मेघदूत यांत उपयोग केलेला आहे. कुमारसंभवांतील (१-३९; ५-२४) बलित्रयाचें उगमस्थान क्र. २७८ या

गाथेंत आढळतें. आणि मेघदूतांतल्या अकराव्या श्लोकाचें उगमस्थान क्र.४७१ या गाथेंत सांपडतें."

ज्याचें माहात्म्य बहुजनसमाजाच्या जीवनाशीं एकरूप होतें त्याच्याच दंतकथा समाजांत रूढ होतात. गाथासप्तशतींतल्या कांहीं गाथा लम्पट आहेत, म्हणून हालाच्या लंपटतेची कथा छिद्रान्वेषी लोकांनीं निर्माण केली असावी. संस्कृत पण्डितांनीं जीवनाला, बहुजनसमाजाला विन्मुख होऊन स्वतःपुरतें उच्च पातळीवरलें संकेताधिष्ठित सांस्कृतिक विश्व निर्माण केलें आणि त्या भोवतीं तत्वज्ञान, व्याकरण इत्यादि आर्ष विद्यांचे तट उभारले आणि उच्च सत्ताधारी व संपन्न वर्गाच्या आश्रयानें प्राप्त झालेल्या आसनावर भरल्या पोटीं मांडा ठोंकून उंच भिंवयांनीं प्राकृत जीवनाची व सारस्वताची हेटाळणी आरंभली तेव्हां मोदकांची कथा निर्माण करण्यांत आली असावी. हालाची रसिकता व विद्वता आणि त्यानें विद्वानांना व लोककवींना दिलेल्या आश्रयाची सत्यता नाकारता येण्याजोगी नसल्यामुळें आणि स्वतःच्या राजाश्रयाच्या अपेक्षा सशब्द करावयाच्या असल्यामुळें उत्तरकालीन पण्डितांनीं व कविमुखानीं अतिशयोक्त पारितोषिकांच्या कथा निर्माण केल्या असाव्या. हालासारख्या अत्युन्नत व महाराष्ट्रीय प्राकृत कवीला प्रतिभेचें श्रेय देणें जिवावर आल्यामुळें त्यानींच भारतीच्या वरदानाची अद्‌भूत कथा प्रसृत केली असावी असें वाटतें.

एवढ मात्र खरें कीं जणूं अशा कांहीं वरदानाचाच प्रभाव असेल असें भासावें एवढें सांस्कृतिक उत्थापन हालाच्या कारकीर्दींत झालें असावें असें गाथासप्तशतीवरून प्रत्ययास येतें. हालानें प्रथम संकलित केलेल्या गाथांच्या संख्येवरूनच नव्हे, त्यानें निवडलेल्या गाथांच्या दर्जावरून, या गाथा रचणाऱ्या कवींच्या व कवयित्रींच्या संख्येवरून आणि हा गाथानिर्मितीचा उद्योग चालला होता त्या क्षेत्राच्या विस्तारावरून.

गाथासप्तशतीच्या कर्तृत्वाबद्दल प्राचीन व मध्ययुगीन लेखकांची एकवाक्यता असली तरी अनेक आधुनिक संशोधकांनीं वेगवेगळ्या भूमिकांवरून या बाबतींत वेगवेगळे आक्षेप उपस्थित केलेले आहेत त्यांचा उपलसुपला विचार केला पाहिजे.

डॉ. देवदत्त भांडारकर (Bhandarkar Commemoration Volume : p. 188) सांगतात : या संग्रहांत राधा, बार व विक्रमादित्य यांचे उल्लेख आढळतात, त्या अर्थी त्याचें संकलन सहाव्या शतकाच्या सुरवातीस झालें असलें पाहिजे आणि साहित्याच्या प्राचीनतेबद्दल प्रचलित असलेल्या अनेक अन्य दंतकथांप्रमाणें गाथासप्तशतीबद्दलच्या कथा अग्राह्य मानल्या पाहिजेत. विद्याभूषण श्री. घुलेशास्त्री (वागीश्वरी : वर्ष १ अंक १) त्यांच्याशीं सहमत आहेत. कापालिक, गणपती व होरा या उल्लेखांवरून आणखी कांहीं संशोधकांनीं गाथासप्तशतीचें संकलन आणखी अलीकडे ओढण्याचा आग्रह धरलेला आहे. महामहोपाध्याय श्री. ओझा (प्राचीन लिपि माला पृ १६८) व डॉ. जयस्वाल (I. A : Vol. 47 ; p. 112) यांनीं डॉ. देवदत्ताच्या आक्षेपांचें निरसन केलेलें आहे. त्या त्या विषयाच्या अनुरोधानें मी या आक्षेपांची चर्चा केलेली आहे. खुद्द डॉ. वेबर यांनीं गाथासप्तशतीचा काळ तिसऱ्या शतकापूर्वी जात नाहीं असें विधान (Vorwort ; p. xxii) केलेलें आहे. गाथासप्तशतींतील व्यंजनांच्या स्थानावरून डॉ. कीथ यांनीं अनुमान (History of Sanskrit Literature ; p. 224) केलें आहे कीं हा ग्रंथ ई. स. २०० ते ४०० च्या दरम्यान मांडला पाहिजे. सर्वांत अधातरी अभिप्राय डॉ. मॅकडोनेल (Sanskrit Literature : p. 344) यांचा आहे; ते सांगतात हा ग्रंथ दहाव्या शतकांपूर्वी केव्हां तरी सिद्ध झाला असावा. डॉ. विंटरनिटझ् (Geschichte der Indischen Literatur; Vol. III. p. 102) यांनीं मात्र गाथासप्तशतीचा काळ पहिलें किंवा दुसरें शतक असा निश्चित केला आहे. त्याचप्रमाणें डॉ. व्हिन्सेंट स्मिथ (Z. D. M. G; 1902 : p. 661) यांनीं सांगितलें आहे आहे कीं गाथासप्तशती हा कोश आन्ध्र राजा हाल शातवाहन याच्या पुरस्कारानें ई. स. ६० ते ७० चे दरम्यान संकलित झाला असल्याबद्दल आणि बृहत्कथा व कातन्त्र व्याकरण हे ग्रंथ ही त्याच सुमारास सिद्ध झाले असलेबद्दल आपली खात्री झालेली आहे. यांपैकीं कातन्त्र व्याकरणाचा काळ डॉ. बेलवलकरांनीं पहिलें शतक (Systems of Sanskrit Grammar : p. 83) असा ठरविला आहे. या सिद्धान्तांपैकीं डॉ. स्मिथ यांचेच मत मला

ग्राह्य वाटतें. हे आक्षेप घेतले गेले तेव्हांपेक्षां आतां अधिक संशोधन झालेलें आहे आणि संशोधकांची वृत्ति अधिक सहिष्णु झालेली आहे. ज्याचा काल निश्चित ठरवितां येतो अशा साहित्यांत किंवा शिलालेखांत आढळणाऱ्या उल्लेखांचें आरंभस्थान तेंच किंवा त्यांच्या आसपासच असलें पाहिजे असें गृहीत धरण्याचा आग्रह संशोधकांनीं आतां सोडला आहे; आणि साऱ्या दंतकथा या भाकड आहेत असें मानण्याची वृत्ति ही आतां बदलली आहे या बाबतींत पूर्वी उद्धृत केलेल्या डॉ. फ्राउशर यांच्या विधानावर मी विसंबूं इच्छितों.

महामहोपाध्याय डॉ. मिराशी यांनीं Indian Historical Quarterly च्या १९४५ सप्टेंबरच्या अंकांत Some Royal Poets of Vākātaka Age आणि डिसेंबर १९४७ च्या अंकात The Date of Gāthāsapta-s'ati हे लेख लिहून मुख्यत्वें करून लेखकांच्या नामसादृश्याच्या अनुरोधानें गाथासप्तशतीचा काळ अलीकडे ओढण्याचा प्रयत्न केला आहे. बाणभट्टानें प्रशंसिलेल्या सुभाषितरत्नांच्या कोशाला असलेलें 'कोश' हें अभिधान हस्तलिखितात नसल्यामुळें लोकांपुढें आतां असलेला गाथासप्तशती हा ग्रंथच वेगळा असला पाहिजे, हें डॉ. देवदत्त भांडारकरांचें अनुमान, एवढा अविश्वास ठीक नाहीं, म्हणून यांनीं उडवून लावलें आहे. भांडारकर इन्स्टिट्यूट मधील क्र ३८६ सन १८८८–८९ आणि क्र ३८५ सन १८८७–९१ या हस्तलिखितांचें अभिधान 'गाथ–कोश' असेंच आहे; शिवाय कांहीं शतकाच्या अखेरीस येणाऱ्या गाथेंत गाथासप्तशतीला 'कोशच' म्हटलेलें आहे गाथासप्तशतींतील विक्रमादित्य हा चंद्रगुप्त विक्रमादित्य आहे, त्याच्या तथाकथित दानशौर्याचा उल्लेख अमोघवर्ष राष्ट्रकूटानें केलेला आहे. अशी गाथा विदर्भांत रचली जाणें समजण्याजोगें आहे असा त्यांचा अभिप्राय आहे. गाथासप्तशतीच्या हस्तलिखितांत गाथाकवींचीं नावें दिलेलीं आहेत. महामहोपाध्यायांनीं मध्ययुगीन ऐतिहासिक व्यक्तींशीं त्यांचा समन्वय केलेला आहे.

कर्ण : क्र ५४ वगैरे गाथांचा कवि = तऱ्हाळा मुद्रानिर्वीत (J N S. I: II. 83) ज्याचीं नाणीं मिळालेलीं आहेत तो "कण सातकणि" = कर्ण सातकर्णि = शांतिकर्ण = चंद्रश्री (२२९ ते २३८ इ).

प्रवरसेन : उर्फ प्रवर, प्रवरराज, प्रवरसेनः क्र ४५ वगैरे गाथांचा कवि =

दण्डि, बाण, आनंदवर्धन इत्यादिकांनीं प्रशंसिलेल्या सेतुबंध उर्फ रावणवहो या प्राकृत काव्याचा कर्ता, वाकाटक वंशांतील द्वितीय प्रवरसेन (४२० ते ४५० इ.)

सर्वसेन : क्र ५०२ वगैरे गाथांचा कवि = संस्कृत आलंकारिकांनीं प्रशंसिलेल्या हरिविजय या प्राकृत काव्याचा कर्ता = वाकाटकांच्या वत्सगुल्म शाखेचा संस्थापक पहिला प्रवरसेन याचा पुत्र. ज्यांच्या नांवाचें द्वितीयार्ध ' सेन ' असें आहे, जयसेन, मकरंदसेन, मल्लसेन, महासेन विश्वसेन, सत्यसेन, हे ही किंवा त्यांपैकीं कांहीं वाकाटक वंशांतील असणें अनुमानानें शक्य आहे.

मानः क्र १०१ वगैरे गाथांचा कवी = सातारा जिल्ह्यांतील माण – मानपुर येथील राष्ट्रकूट घराण्याची (A. B. O. R. I: XXV: pp 363) संस्थापक मानाङ्क.

देवराज = क्र १३८ वगैरे गाथांचा कवि = मानाङ्क राष्ट्रकूटाचा पुत्र. दुसऱ्या चंद्रगुप्त गुप्ताचा-विक्रमादित्याचा प्रतिनिधी म्हणून कालिदास याच्या दरबारीं आला होता. यानें देशी शब्दाचा कोश तयार केला होता.

आढ्यराज = ऊर्फ अर्धराज्य : क्र २६ वगैरे गाथांचा कवि = बाणभट्टानें हर्षचरितांत प्रशंसिलेल्या आख्यायिका या ग्रंथाचा कर्ता. याच्या अमदानींत सर्व प्रजा प्राकृत भाषिक असल्याचें भोजानें सरस्वतीकंठाभरणांत सांगितलें आहे. त्या अर्थी तो प्राकृत कवि असला पाहिजे. आख्यायिका हा ग्रंथ प्राकृत असणें शक्य आहे. आढ्यराज हें शालिवाहनाचेंच नांव असल्याचें टीकाकार रत्नेश्वरानें सांगितलें आहे. पण हें नांव पुराणांतील सातवाहनांच्या यादींत आढळत नाहीं. त्याचा हालाशीं समन्वय होत नाहीं.

वाक्पतिराज = क्र १५ वगैरे गाथांचा कवि = मधुमथनविजय व गउडवहो या प्राकृत काव्याचा कर्ता; भवभूतीचा समकालीन, कनोजच्या यशोवर्म्याचा आश्रित : काळ आठव्या शतकाचें द्वितीय चतुष्क.

महामहोपाध्यायांच्या पूर्वी पुरातत्वभूषण श्री. राजवाडे (ज्ञानेश्वरी : प्रस्तावना. पृ ४५) यानीं कालिराअ व कालइव (क्र २१ व २६ चे कवि) यांचा कालिदासाशीं समन्वय केला होता आणि प्रवरसेन हा कालिदासाचा आश्रयदाता असून त्याच्या ही गाथा गाथासप्तशतींत असाव्यात असा बळकट संशय व्यक्त केला होता. पण या अनुमानाचा त्यांनीं पाठलाग केला नाहीं. महामहोपाध्यायांच्या या दोन लेखांतील अनुमानांना नामसादृश्य आणि यांपैकीं

कांहींचें कुंतलाधिपत्व यांव्यतिरिक्त कोणताहि आधार नाहीं. शिवाय त्यांनीं गृहीत धरलेलीं गाथाकवींची नांवें अनधिकृत आहेत, तीं फक्त मध्य-युगीन टीकांत आढळणारीं आहेत आणि त्यांच्या बाबतींत टीकाकारांची एक-वाक्यता नाहीं. त्यांनीं कल्पिलेल्या कवींची प्राकृत भाषा व त्यांनीं योजिलेलीं वृत्तें गाथासप्तशतीहून स्पष्टपणें भिन्न आहेत. या ग्रंथांवर निर्विवादपणें अभि-जात संस्कृत काव्याची छाप आहे. खुद्द प्रवरसेनाचें सेतुबन्धकर्तृत्व विवाद्य आहे. खुद्द सातवाहन घराण्यांत सेन हें अंत्य नामार्ध असलेला पुरींद्रसेन पुराणांनीं नमूद केलेला आहे. केवळ सेन या अंत्यार्धावर आधारलेलें हें नामसादृश्याचें गमक मान्य केलें तर त्यापासून हास्यास्पद निष्कर्ष निघूं शकतील. सबब या बाबतींत अधिक व विश्वसनीय पुरावा हातीं आल्याशिवाय अस्तिपक्षीं निर्णय घेतां येण्यासारखा नाहीं असेंच म्हटलें पाहिजे.

अर्थात् हाल सातवाहनाचा जो काळ मी धरलेला आहे त्या काळांत म्हणजे पहिल्या शतकांत गाथासप्तशतींतील बहुसंख्य गाथांची मांडणी करण्यास कांहींही प्रत्यवाय नाहीं.

गाथासप्तशतींतला व त्या काळांतला बहुजनसमाज सुधारलेला आहे, सुसंस्कृत आहे. या बाबत पुरेसा अंतर्बाह्य पुरावा उपलब्ध आहे. आर्थिक, धार्मिक व सामाजिक परिस्थिति व प्रगति यांची चर्चा पूर्वी केली. आतां तत्कालीन सुसंस्कृततेविषयीं माहिती सांगतों.

गाथासप्तशतीचें संकलन होण्यापूर्वी नाणेघाट व तेथील देवकुल आणि कोंडाणें, भाजें, बेडसें इत्यादि लेणीं खोदून झालीं होतीं. त्यांवरून येथील कारागिरांची स्थापत्य व शिल्प या विषयांतील गति अजमावतां येते.

सह्याद्रींतील लेण्यांच्या मांडणींतूनच भारतीय मंदिरांची घाटणी उत्क्रांत झालेली आहे; एवढेंच नव्हे, पाश्चात्य ख्रिस्ती मंदिरांची ही..हें ध्यानीं आणलें म्हणजे या लेण्यांच्या कर्तृत्वाला जबाबदार असणाऱ्या शिल्पेश्वरांचें माहात्म्य अजमावतां येतें.

सह्याद्रींतील लेणीं खोदण्यासाठीं महाराष्ट्रानें परदेशचे किंवा अन्य प्रदेशांतले कारागीर आणले होते असा प्रवाद अलीकडे रूढ झालेला असून विशिष्ट विचारसरणीच्या बावदूकांत व विद्वानांतही तो विशेष प्रिय आहे. पण तो खरा

नाहीं. हे कारागीर महाराष्ट्रीयच होते. या विधानांत सत्याचा अपलाप नाहीं आणि भारतीय दृष्ट्या अराष्ट्रीय असें कांहीं नाहींच नाहीं. हें विधान सर्वमान्य होईपर्यंत पुनः पुनः ठांसून सांगण्यांत संकोच बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. माझे मित्र श्री. श्रीपाद टिकेकर सांगतात कीं सिंहलद्वीपांतलीं लेणीं कोरण्याकरतां महाराष्ट्रांतले कारागिर तिकडे नेले होते अशी परंपरा तेथें अद्याप प्रचलित आहे. आणि आपल्याला कोणी संकुचित वृत्तीचे असें म्हणूं नये म्हणून आम्ही मात्र ह्या त्या सिद्धान्ताला मान तुकावण्यास सिद्ध होत आहों. गाथासप्तशतीच्या संपादन कालातही हा लेणीं कोरण्याचा उद्योग चालू होता हें निश्चित. मग त्याचे पडसाद येथें कां उमटले नाहींत? अजंठा व वेरूळ येथील उत्तर कालीन लेण्याबाबतचे उल्लेख तरी आमच्या साहित्यात कोठें आले आहेत? प्रसिद्धी व व्यवहारपराङ्मुखता हा आमचा स्वभावधर्मच आहे. म्हणूनच आम्ही जें निःसंशय आमचें तें वारंवार गमावून भडंग होऊन बसलों आहोंत!

सह्याद्रीच्या लेण्यांतील भिंती व स्तंभ रंगीत आकृतींनीं व चित्रांनीं अलकृत केलेले होते, हें निश्चित. आतां ओबड धोबड दिसतात त्या मूर्ती ही एकेकाळीं गिलाव्यानें गुळगुळीत करून रंगविलेल्या होत्या. याच्या पुराव्यासाठीं त्या मानानें अर्वाचीन अशा अजंठ्यापर्यंत यातायाम नको. खुद्द भाजाच्या लेण्यातील स्तंभांवर अस्पष्ट अशीं रंगीत चित्रें अजून ही दिसतात. बुद्ध, बुद्धभिक्षु आणि आडव्या रंगीत पट्ट्यांचें वस्त्र नेसलेली स्त्री हीं चित्रें तर अगदीं स्पष्ट दिसतात. प्रसंगाचीं, वस्तूंचीं व व्यक्तींचीं रेखा व रंगीत चित्रे गाथासप्तशतींत जागोजाग दिसतात. क्र. ३५ या गाथेंत लक्ष्मणाचें चित्र कुलवधूनें भिंतीवर रंगवलेलें आहे. हें चित्र आहे कीं हा चित्रपट आहे याचा खुलासा मिळत नाहीं. क्र. ६१२ या गाथेंत रेखाचित्र व रंगीत चित्र याचे उल्लेख आहेत. क्र. ७३२ मधील चित्र सनला लावलेल्या भिंतीवर काढावयाचें आहे; धंदेवाइक चित्रकारांना स्थानशुद्धीची व वर्णक्रमाची माहिती असलीच पाहिजे असें ही या उल्लेखावरून दिसतें. क्र ६३२ या गाथेंत चित्रांत रंग भरण्याचा स्पष्ट उल्लेख आहे. चित्रकाराच्या वर्तिकेचा उल्लेख क्र. ६५६ या गाथेंत आलेला आहे. क्र.६४१ मधील चित्र हें वस्तूचें चित्र आहे, प्रत्यक्ष वस्तु नाहीं, हें ज्याला माहीत नाहीं तो त्याच्या दर्शनानें फसावा, इतकें तें हुबेहूब आहे. या चित्रापैकीं कांहीं

धंदेवाईक कारागिरांनीं काढलेलीं आहेत आणि काहीं या कलेचें शिक्षण न घेतलेल्या घरगुती स्त्रियांनीं. लक्ष्मणाचें चित्र रंगवणाऱ्या कुलवधूचा उल्लेख मला विशेष महत्त्वाचा वाटतो. येथें तिच्या कलाकौशल्याची वाखाणणी आवर्जून केलेली नाहीं. हा मुद्दा आणखी महत्त्वाचा. घरंदाज स्त्री हे समाजाचें अंतर्याम. अपवादात्मक नव्हे, सामान्य म्हणून जे गुण तिच्या अंगीं असतील ते समाजाचे गुण मानावयास प्रत्यवाय नाहीं. चित्रकला समाजाच्या अंगीं मुरलेली असणें हें निःसंशय सुसंस्कृततेचें लक्षण आहे.

क्र. ९ या गाथेंत हरितालमण्डितमल्ली नटीचा उल्लेख आलेला आहे आणि क्र. २५९ या गाथेंत रंगोत्तीर्णा नर्तिकेचा. क्र. ३४४ या गाथेंत रंगभूमि व पूर्वरङ्ग या संज्ञा आलेल्या आहेत. रंगभूमीवर होणारीं नाटकें व नृत्यें ग्रामीण बहुजनसमाजाला हो पूर्णपणें परिचित असलीं पाहिजेत असें या उल्लेखांवरून दिसून येतें. त्याचप्रमाणें तेव्हां नाटकात स्त्रियांचीं कामें स्त्रियाच करीत असत असें ही शाबीत होतें. मुसलमानी अमदानींत महाराष्ट्राचें श्वारदीकरण झालें आणि आमच्या परंपरागत नाट्यप्रियतेचा आम्हांला विसर पडला, याचें येथें स्मरण झाल्यावाचून रहात नाहीं.

गाथासप्तशतींत गायन, नर्तन, वादनाचे अनेक उल्लेख झालेले आहेत.

क्र. ३८१ व ६८९ मधील गीतें पुरुषांनीं गाइलेलीं आहेत, पैकीं पहिलें हृदयविदारक विरहगीत आहे व दुसरें प्रसन्न समृद्धिगीत आहे. शेतांत मालाची तयारी होत असतांना किंवा तयार माल बाजाराकडे चालविला असतांना अशीं समृद्धिगीतें वारंवार एकूं येतात. "पिकला गहुं ग हरभरा" या लावणीचें पर्यवसान शृंगारिक असलें तरी मूलतः हें समृद्धिगीतच आहे. फार काय, लावणी हा गीत-गायन प्रकार भाताच्या रोपांच्या सामूहिक लावणीशीं संबद्ध असावा अशी कल्पना वारंवार माझ्या मनांत येऊन गेलेली आहे. क्र १२८, ३३४ व ८८७ मध्यें उल्लेखिलेली गीतें ही विरह गीतें असून तीं स्त्रियांनीं म्हटलेलीं आहेत. क्र ६४२ व ६४३ मध्यें विवाहाचे वेळीं म्हणावयाच्या मंगलगीताचे उल्लेख आहेत. अशीं गाणीं वधूच्या मैत्रिणींनीं म्हणावयाचीं अशी प्रथा गाथासप्तशतीच्या काळांत प्रचलित होती असें त्यांवरून स्पष्ट दिसतें. उत्तरकालांत त्यांचा हा हक्क भटजींनीं काबीज केला. अनेक शतकानंतर अगदीं

अलीकडेच हा मान पुन्हां त्यांचेकडे आलेला आहे. क्र. १२८ मधील गीत हें विरहगीत असून तें गोपींनीं रानांत गाइलेलें आहे. आणि क्र. ११४ मध्यें कृष्ण-गोपींच्या सामूहिक नृत्याचा उल्लेख आलेला आहे. सामूहिक नृत्य गायनें ही भारताला अभीर व याद व यांची देणगी आहे. गोपालक व कृषिप्रधान देशांत गोप व गोपी यांच्या गाण्यांना व नृत्यांना प्राधान्य असणारच आणि त्यांचा आशय शृंगारिकच असणार. आपल्याकडे त्यांना तसा आशय व तसें महत्व होतेंही. म्हणूनच अनेक कवींनीं गोड गोड गवळणी रचल्या. पण पुढें उच्चभ्रूंनीं गवळणींचा कबजा केला आणि सामूहिक नृत्यावर भृकुटि वक्र केल्या; यामुळें आमच्या सामाजिक जीवनांतलें हें जिवंत व रसरशीत वैभव नष्टप्राय झालें. ज्यांनीं हें अंग संवर्धित केलें त्यांचा त्याबद्दल हेवा वाटत असूनही तें अनिष्ट होतें म्हणूनच आपण तें नष्ट केलें अशा नैतिक फुशारकींत आपण स्वसंतुष्ट समाधान मानून घेत आहोंत ! क्र. ३०४ व ३६१ या गाथांत कुलस्त्रीच्या नृत्याचे उल्लेख आहेत. क्र. ३०४ मध्यें पति वाद्य वाजवीत आहे व पत्नी त्याच्या तालावर नृत्य करीत आहे. ह्या विलासालाही आपण पारखे झालों आहोंत. गाथासप्तशतींत अनेक वाद्यांचे उल्लेख आलेले (डुण्डुअ = घंटा; क्र. १७२; ढक्कं = डंका; क्र. ५२६; तूर = तूर्य = तुतारी, क्र. ५३६; पटह; नगारा; क्र. २९, ६८५; मुरअ = मुरज = मृदंग; क्र. २५१; वज्ज = वाद्य; क्र. ४२०; वंस = वंश = बांसरी; क्र. ५५७; वीणा; क्र. ५६०) आहेत. पैकीं घंटा ही आकारानें मोठी असून रेड्याच्या गळयांत बांधावयाच्या माळें-तील आहे आणि डंका हें राजकीय प्रभुत्वाचें द्योतक असून येथें तो हत्तीनें धारण केलेला आहे. दरबारी मिरवणुकांत उंटावर डंका लादण्याची प्रथा उत्तरकालीन आहे. देवळांत घंटा बांधण्याची प्रथा अद्याप सुरू झालेली नाहीं. पटह हें वाद्य इफासारखें असावें. दोन मल्लांनीं खांद्यावर घेतलेल्या आडव्या दांड्याला धातूचा वाटोळा डोल बांधलेला असून त्यावर हातांतला दांडा हाणून ते मोठा नाद काढणार आहेत, असें दृश्य अजंट्यांत रंगवलेलें आहे. ही वाद्यें भारतांत फार प्राचीन काळापासून वापरीत आहेत; साध्या व सुधारलेल्या स्वरूपांत, जंगली जमातींपासून राजधानींतल्या नागरकांपर्यंत. अजंट्याच्या पहिल्या क्रमांकाच्या लेण्यांत पाश्चात्य गीताराच्या धर्तीची वीणा मांडीवर

घेतलेल्या बैठ्या पुरुषाचें चित्र आहे आणि उडत्या गंधर्वानें खांद्यावर घेतलेली एकतारीसारखी भोपळा बसविलेली वीणा (श्री हेरिंगहॅम : Ajanta Frescoes : Pl 36. 40) अठराव्या लेण्यांत रंगविलेली आहे. वीणा हें वाद्य ऋग्वेदापासून वापरांत आहे. गाथासप्तशतीच्या काळांतलें हें वाद्य झंकारानें सूर धरण्यापुरतेंच असावें असें वाटतें.

गाथासप्तशतींत कवि (क्र ३, ९७७) व त्यांनीं रचलेलीं आख्यानें (क्र ५१७, ८६२) आणि गाथा व काव्यें (क्र २,३, ४२८, ८०९) यांचे अनेक उल्लेख आलेले आहेत. सुशिक्षित लोक काव्यांचें पठण व मर्मग्रहण करीत असत आणि अशिक्षित स्त्रियांना आख्यानें ऐकवीत असत, असें अनुक्रमें क्र ४२८ व क्र ८६२ या गाथांवरून दिसतें. क्र. ६७१, ७२३ व ९८५ या गाथांत पण्डित व शास्त्री याचे उल्लेख आहेत. हाल गुणी जनांचा एवढा आश्रयदाता, तरी क्र ६७१ मधील पण्डित दारिद्री आहे; म्हणून जणूं दारिद्र्य हें पाण्डित्याचें अनादिसिद्ध लक्षण च आहे, आणि भूषण हीं ! क्र ८८६ या गाथेंत.कवित्व व व पाण्डित्य यांचा आणि क्र २ या गाथेंत पाण्डित्य व वैदग्ध्य यांचा संघर्ष सूचित केलेला आहे. अन्धारकोठडींतील एकान्तवासाहून भयंकर अशी शिक्षा कवीनें अरसिकाला क्र ८०९ या गाथेंत सुनावलेली आहे. क्र. ४२१ व ७३३ या गाथांत कलावन्तांचे उल्लेख आहेत. गुणी जनांचा गौरव होत असलेला पाहून निर्गुणी जनांनाही हस्तकांमार्फत आपला गौरव करवून घेण्याची बुद्धि होते किंवा उत्सव प्रिय निर्गुणी जन आपल्यांतल्याच एकाद्याचा गौरव करण्यास प्रवृत होतात. ही वस्तुस्थिति क्र. १९१ या गाथेला असह्य झालेली आहे.

क्र. ७३३ या गाथेंतील सूचित उल्लेख निःसंशय गोष्ठीचा आहे. गोष्ठ म्हणजे गाई चारावयाचें कुरण (ऐ. ब्रा : ३–१८–१४), गाई बांधण्याचा .गोठा (१.१९१.४). रानांत जनावरें चरायला सोडलीं म्हणजे त्यांवर फक्त नजर ठेवावयाची असते. येथेंच एकाद्या छायावृक्षाखालीं गोप–गोपी गप्पागोष्टी करीत बसतात. गोष्ठी म्हणजे गोतवळा, सभा, समाज, संमेलन : फावल्या वेळीं मित्र मंडळींनीं गप्पागोष्टी करण्याचें ठिकाण. गोष्ठी हा एक नाट्यप्रकार ही आहे. मला वाटतें कथा या अर्थानें गोष्ट हा शब्द या शब्दांशीं संबद्ध आहे. प्राकृत वाङ्मयांत गोट्ठी हा शब्द मित्रमंडळाचें संमेलन या अर्थानें वारंवार (Nisi

Cu : 8 : p. 502; Acā : II : 1 : 3 : 245) आढळतो. या संस्थांपाशीं बराच पैसा असे व समाजाच्या बैठकींत अनेक प्रकारची चैनबाजी (Nāvā: 16. 174) चाले. उत्सव, सण, यज्ञ, यात्रा हीं ही समाजिक व सांस्कृतिक संमेलनेंच; धर्मांच्या नांवानें संघटित झालेलीं, इतकेंच. गणिकांच्या दिवाणखान्यांतही अशीं संमेलनें भरत. कोणी काव्यशास्त्रविनोदांत कालहरण करीत आणि कोणी नृत्य गायनांत, कोणी मद्यपानांत व कोणी गौयूथिकादि सुरतोत्सवांत. अशा चैनी सुसंपन्नांच्या मेळाव्यांत एकादे वेळीं दरिद्री कलावन्ताची, गुणवन्ताची हेटाळणी व्हावयाचीच. धनिकांना कलावन्ताचा सहवास हवा असतो तो केवळ स्वतःला गुणीजनांचा आश्रयदाता म्हणवून घेण्यासाठीं; मनांतल्या मनांत व सामान्यतः ते यांना वृषमस्कन्याहून अधिक किंमत देत नाहीत !

गाथासप्तशतीच्या काळाच्या सुसंस्कृततेचें मूल्यमापन एवढ्यान उल्लेखांच्या पुराव्यावर करून भागणार नाहीं. हा सुभाषितकोश राजाश्रयानें सिद्ध झालेला आहे, हें खरें; येथें कालिदासासारख्या एकाद्या अपवादात्मक महाकवीच्या प्रतिभेचें दर्शन होत नसून महाराष्ट्राच्या सामुदायिक सहृदयतेचें व सुसंस्कृततेचें अंतर्याम येथें दृष्टोत्पत्तीस येतें, हें ही तितकेंच खरें; कारण, गाथासप्तशती हा अनेक कवि, कवियित्रीकृत सुभाषितांचा संग्रह आहे. कारण, या कवि कवियित्रींची सुसंस्कृतता त्यांना शालेय शिक्षणानें प्राप्त झालेली नाहीं; कारण आपल्या अभंग, ओवी लावणीकारांप्रमाणें हे लेखक व लेखिका ग्रामीण आहेत आणि त्यांचें कवित्व, संस्कृत कवींप्रमाणें शिक्षण व संकेत यांवर आधारलेलें नसून, आत्मप्रत्ययावर उभारलेलें आहे. आणि भारताचें आद्य लोकसाहित्य म्हणून गाथासप्तशतीचें महत्त्व अद्वितीय आहे.

गाथासप्तशतीची साहित्यिक चर्चा सुरू करण्यापूर्वीच सांगून ठेवतों कीं या भागांतून रस व ध्वनि, नायक व नायिका, प्राकृत शब्दांचीं रूपें इत्यादि विषय विस्तारभयास्तव हेतुपुरःसर वगळले आहेत.

गाथासप्तशती हें भारताचें आद्य लौकिक लोकवाङ्मय आहे आणि महाराष्ट्राचें आद्य अभिमानस्थान आहे. मी असें म्हणतों, याला अनेक कारणें आहेत.

संस्कृत ही सुसंस्कृत आर्यांच्या धर्मविधींची व सारस्वताची भाषा; अभि-

जात व अलौकिक, प्रौढ व व्याकरणबद्ध; बहुजनसमाजाच्या व्यावहारिक जीवनापासून एवढी अलिप्त कीं जणूं म्हणूनच तिला देवभाषा म्हणण्यांत येतें ! प्राकृत ही बहुजनसमाजाची भाषा; अभिनव व ऐहिक, अविराम व अनिर्बंध; प्रकृतिसिद्ध, वर्धनशील व सर्वव्यापी. आर्यांची संस्कृति वर्गनिष्ठ झाली, बहु-जनसमाजाला विन्मुख झाली; म्हणूनच बुद्धानें धर्मक्रान्तीसाठीं प्राकृतांचा आश्रय केला; किंवा त्यानें प्राकृत धर्माचा प्रसार केला असें म्हणा हवें तर. धर्म प्रसारार्थ बौद्धांनीं प्राकृतांत धार्मिक साहित्य निर्माण केलें आणि प्रचार कथा रचल्या. वैदिक साहित्यापेक्षां जातककथा बहुजनसमाजाला जवळच्या व सहज समजण्यासारख्या असल्या तरी त्या विशिष्ट हेतूनें लिहिलेल्या असल्या-मुळें आजही हें धर्मसाहित्य कृत्रिम वाटतें. गाथासप्तशतींत समाजाचें अंतर्याम प्रकट झालेलें आहे आणि तें ही अकृत्रिमपणें. येथील भावना उत्स्फूर्त आहेत आणि ऐहिक आहेत; म्हणूनच म्हटलें आहे कीं हें भारताचें आद्य लौकिक लोकसाहित्य आहे.

अहंमन्य व स्वसंतुष्ट संस्कृतनिष्ठ पण्डितांनीं मराठीची अवहेलना मांडलेली असली तरी माझ्या मुखांतून सशब्द होणारीं मराठी वचनें ही अमृतातें जिंकतील ही ज्ञानेश्वरांची प्रतिज्ञा आणि गाथासप्तशतींतील प्राकृत काव्याच्या अमृतमधुरत्वाची ग्वाही यांची तुलना करण्यासारखी आहे. ज्ञाने-श्वरांनीं ज्ञानाभोंवतीं पण्डितांनीं उभारलेली कोंडी फोडली आणि गाथासप्त-शतीनें काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत हिंदुस्थान जिंकलें; बाणभट्टासारख्या महापण्डितांचे उद्गार आणि अलंकार वाङ्मयांत समाविष्ट झालेलीं गाथा-सप्तशतींतील असंख्य वचनें हीं या विधानाला साक्षी आहेत.

शुष्काचार्यांच्या लब्धप्रतिष्ठितेविरुद्ध उठावणी हा महाराष्ट्राचा स्वभावधर्मच आहे व तो साहित्यांत वारंवार प्रकट झालेला आहे.

वाङ्मयाचे मुख्य वर्ग दोन : शिष्टवाङ्मय व लोकवाङ्मय. शिष्टसाहित्य वर्गनिष्ठ असतें, कृत्रिम व सांकेतिक असतें. लोकसाहित्य हें लोकनिष्ठ असतें, जीवननिष्ठ असतें; नैसर्गिक व व्यावहारिक असतें. शिष्ट साहित्यांतील नायक–नायिकांचे गुणावगुण सांकेतिक असतात, शास्त्रोक्त असतात; बोलतांना अलंकार साधण्याला उत्सुक असतात, जणूं हा अलंकार अमुक याची त्यांना जाणीव असते,

किंबहुना तो साधण्यासाठींच तें बोललें जातें. लोकसाहित्य हें बहुजनसमाजांतील कवींनीं बहुजनसमाजासाठीं निर्माण केलेलें असतें, बहुजनसमाजाच्या भाषेंत लिहिलेलें असतें आणि त्यांत बहुजनसमाजाचें जीवन सशब्द झालेलें असतें. या दृष्टीनें पहिलें असतां भर्तृहरीचें शतकत्रय शिष्टसाहित्यांत सामावतें आणि गाथासप्तशती लोकसाहित्यांत. गाथासप्तशतींतल्या अनेक गाथा समाविष्ट झालेल्या असल्या तरी उत्तरकालीन वज्जालग्गावर शिष्टपणाची अधिक छाप पडलेली दिसते. ज्ञानेश्वरीचा समावेश शिष्टवाङ्मयांतच केला पाहिजे. ज्ञानेश्वर हे खरोखरीच ज्ञानाचे ईश्वर होते. त्यांनीं हा ग्रंथराज मराठी बहुजनसमाजासाठीं लिहिला. भारतांत तुलसीदासाच्या रामायणाइतकें दुसऱ्या कोणत्या ग्रंथाचें अध्ययन किंवा पठण होत असलें तर तें ज्ञानेश्वरीचेंच; अर्थात् हा पुरस्कार बहुजनसमाजाचाच, हें निर्विवाद. तरी हा ग्रंथ महापण्डितांनीं पण्डितांसाठीं लिहिलेला आहे; निदान ज्ञानेश्वरांनीं ज्ञान्यांकरितां; हें कोणीहि नाकबूल करणार नाहीं. आणि नामदेव–तुकारामांच्या गाथांचा समावेश लोकवाङ्मयांतच करावा लागेल; कारण या गाथा बहुजनसमाजाच्या जीवनाशीं एकरूप आहेत. शिष्टसाहित्य हें संस्कृतीशीं एकनिष्ठ असतें पण बहुजनसमाजाच्या व्यावहारिक जीवनाशीं एकरूप नसतें. लोकवाङ्मय हें संस्कृतीशीं एकनिष्ठ असतें आणि जनतेशीं एकरूप असतें. या दृष्टीनें पाहिलें असतां गाथासप्तशती हें अव्वल दर्जाचें लोकसाहित्य आहे, संस्कृतीशीं एकनिष्ठ व बहुजनसमाजाच्या जीवनाशीं एकरूप असें लोकवाङ्मय आहे, असें दिसून येतें.

आणि गाथासप्तशती हें महाराष्ट्राचें आद्य लोकसाहित्य आहे.

कारण गाथासप्तशतींतील गाथा महाराष्ट्री प्राकृतांत लिहिलेल्या आहेत आणि महाराष्ट्री प्राकृतापासूनच मराठी भाषा उत्क्रांत झालेली आहे. महाराष्ट्री प्राकृतांत अशीं अनेक वैशिष्ट्यें आहेत कीं जीं फक्त मराठींतच आढळतात. मराठींत आणि मराठींतच आजही अनेक शब्द असे आढळतात कीं ज्यांचें मूळ प्राकृत व देशी प्रयोग गाथासप्तशतींत आढळतात. संपादकाचा वंश व भौगोलिक उल्लेख यांवरून तर गाथासप्तशतीचें महाराष्ट्रीयत्व निःसंशय सिद्ध होतें. म्हणूनच डॉ. घाटगे सांगतात (Mahārāṣtri Language & Literature : पूर्वोक्त : पृ. ३२) कीं गाथासप्तशती हा पूर्णतया महाराष्ट्री

ग्रंथ आहे.. या विषयीं डॉ. कीथ (Classical Sanskrit Literature : p. 115) सांगतात कीं महाराष्ट्री प्राकृतांत व वृत्तांत रचलेल्या या गाथांत प्रत्ययास येणारी सहजता ही मराठी वृत्तींतील रोखठोक वस्तुवत्तेची द्योतक आहे.

गाथासप्तशतींतील अनेक गाथा अश्लील आहेत असा आक्षेप वारंवार घेण्यांत येतो. प्रा. दत्तात्रय केशव केळकर (काव्यालोचन : आवृत्ति दुसरी : पृ. ६ व १०) सांगतात, " हालाच्या सप्तशतींतील पाचकळ कवनें मोठमोठ्या भट्ट, आचार्य, राजानक, पंडित, दीक्षित वगैरे धेडांनीं उत्कृष्ट काव्याचे मिष्ठान्न नमुने म्हणून जिभल्या चाटीत वाचकांस सादर करावींत हें नवल होय. यांतील बरींच उदाहरणें प्राकृतांतील असतांही, तत्कालीन प्राकृतोद्भव अर्वाचीन भाषांतील भक्तिपर वाङमयाकडे संस्कृत काव्यशास्त्रानें ढुंकूनही पाहिलें नाहीं." याचप्रमाणें ते सांगतात : " हालाच्या प्राकृत सप्तशतीमधील अश्लील लावण्यांतील ध्वनि उकलून मिटक्या मारणारे व त्यावर ध्वनिसिद्धांतांची इमारत उठविणारे रसिक मराठी लावण्यांस मिळाले नाहींत. त्यामुळें लावणी वाङमयाची काव्यशास्त्रदृष्ट्या मीमांसा निर्माण झाली नाहीं. पोवाड्यांची तीच गत. पोवाडे रचणारे शाहीर हे जातिवंत कवि होते; पण काव्यमीमांसकास लागणारें विद्वत्व त्यांच्या गांवींही नव्हतें आणि त्यांचा पोशिंदा व चाहता रसिकवर्ग हाहि तात्त्विक चर्चेनें रसिकता प्रकट करण्यापेक्षां खूष झालेल्या शाहिराच्या अंगावर हातांतलें सोन्यानें कडें किंवा कमरेचा भरजरी शालू फेकण्यांत अधिक धन्यता मानणारा होता. संतकवि संस्कृत पद्धतीच्या विद्वत्ताप्रचुर काव्यापासून जसे दूर रहात तसेच या शाहिरी व शृंगारी काव्याचाही विटाळ मानीत. भगवद्भजनाव्यतिरिक्त सर्व काव्य हलक्या दर्जाचे होय हा त्यांचा काव्यशास्त्रीय सिद्धान्त होय. रामदास म्हणतात " कामिक रसिक शृंगारिक । वीरहास्य प्रास्ताविक । कौतुक विनोद अनेक । या नाव धीट पाठ । " हें सर्व काव्य धीटपाठ म्हणजे दुय्यम व हलक्या दर्जाचें होय. "

उतारा थोडासा लांबला, पण तो घेतला. कारण ही विचारसरणी विशिष्ट वृत्तीची प्रातिनिधिक आहे. क्र. २ या गाथेंतला संघर्ष कामशास्त्र व प्राकृत गाथा यांमधला आहे; तो ही गाथासप्तशतीला मानवला नाहीं. येथें तर अध्यात्म व शृंगार यांमधला संघर्ष प्रतीत झालेला आहे. पोवाडे व लावण्या

रचणाऱ्या कवींचे ठायीं विद्वत्ता नव्हती हें खरें. नैसर्गिक शृंगाराच्या आविष्काराला शास्त्राची लागत नाहीं; तसाच काव्यालाही. आणि शृंगार सर्वस्वीं वर्ज्य मानावयाचा तर संतांनीं शृंगारिक गवळणी कां रचल्या? रामदास हे सत्पुरुष होते हें खरें, पण म्हणून त्यांचे साहित्यिक सिद्धान्त ग्राह्य मानावयाचे कीं काय? त्यांच्या विधानाप्रमाणें धीटपाठ म्हणून विनोद, वीर, शृंगार व हास्य हे साहित्यांतून बाद केले आणि रसिकांवरही बहिष्कार घातला तर साहित्यांत व जीवनांत राहिलें काय? क्षुद्र अहंकाराला अध्यात्म आणि समाजस्वास्थ्याची आस्था हीं फार मानवतात; निदान वेळोवेळीं हें प्रत्यक्षपणें प्रत्ययास येतें, हें मात्र अगदीं खरें.

कायद्यानें अश्लील-साहित्य-प्रकाशन हा गुन्हा ठरविलेला आहे; पण अश्लीलतेची व्याख्या हेतुपुरःसर केलेली नाहीं; कारण समाजाच्या विनयबुद्धीला आज जें अश्लील वाटतें तें उद्यां तसें वाटणार नाहीं, असा संभव असतो, म्हणून. आक्षिप्त साहित्याची प्रवृत्ति संस्कारक्षम वाचकाला दुराचाराला प्रवृत्त किंवा शील भ्रष्ट करण्याकडे असेल तर त्याला अश्लील म्हणावें, अशी जस्टिस् कोकबर्न यांची व्याख्या आहे (Regina v. Hicklin (1868) : Law Reports : Queen's Bench ; at p. 371). समाजाच्या विनयबुद्धीला जें साहित्य गर्ह्य वाटतें आणि ज्यामुळें संस्कारक्षम वाचकाच्या लैङ्गिक वासना उफाळून येतात. तें साहित्य अश्लील होय असा अमेरिकन फेडरल कोर्टाचा (Dysart V. United States, 4 Fed (2) (765 1925) निर्णय आहे. ज्यांची संस्कारग्रहणक्षमता अति चपल किंवा अति जड आहे त्यांच्या अभिप्रायावर विसंबूं नये, असाही अमेरिकन फेडरल कोर्टाचा निर्णय (United States V. Harmon, 45 Fed 417 (1891) आहे. समाजाच्या विनयभावनेचा भंग कशानें होईल याचा नेम नाहीं. पहा— बोस्टनमध्यें पुढील पुस्तकें आक्षेपार्ह ठरलेलीं आहेत : बर्ट्रंड रसेल : What I Believe; अप्टन सिंक्लेअर : Oil ; एच्. जी. वेल्स : The World of William Clissold ; हेमिंग्वे : The Sun Also Rises ; जज्ज लिंडसे ; The Revolt of Modern Youth. मराठी वाचकांना माहीत असलेले लेखक व त्यांचीं पुस्तकें, तेवढींच येथें दिलेलीं आहेत, कारण सरकारी यादी फार मोठी आहे.

समाजाच्या विनयबुद्धीचें परिवर्तन किती झपाट्यानें होत आहे, याचें प्रत्यंतर श्री. स्टॅन्ले कॉफ्मन् यांच्या फिलँडरर्स या कादंबरीबाबत झालेल्या खटल्यावरून प्रत्ययास येतें. ही कादंबरी अश्लील आहे असें सरकारचें म्हणणें होतें. नऊ पुरुष व तीन स्त्रिया अशा बारा पंचांनीं दिलेल्या निर्णयानुसार प्रकाशकांना दोषमुक्त ठरविण्यांत आलें. पंचांना खटला समजावून देतांना न्यायमूर्तींनीं केलेलें वक्तव्य The All England Law Reports : 1954: Vol. II : p. 683 मध्यें प्रसिद्ध झालेलें आहे. त्यांतील निवडक उतारे येथें देतों : या कादंबरीच्या नायकाचें व्यक्तिमत्व आकर्षक आहे. स्त्रीविषयक आसक्ति हा त्याच्या वृत्तीचा मध्यबिंदु आहे. लेखकानें व्यभिचाराची प्रशंसा किंवा समर्थन केलेलें नाहीं. मद्यपानाच्या अतिरेकाचे दुष्परिणाम माहीत असून ही त्यापासून परावृत्त होणें अशक्य झालेल्या व्यसनी इसमासारखी त्याची अवस्था झालेली आहे बाळपणीं मनावर झालेल्या संस्कारांत त्याच्या वृत्तीचें मूलकारण आढळतें. कादंबरीचा विषय उघडपणें लैङ्गिक आहे. लैङ्गिक भावना ही मानवी जीवनाची महाशक्ति आहे यात संशय नाहीं. ही भावना अजिबात त्याज्य ठरविण्याइतकी मानवजात अद्याप सुधारलेली नाहीं. तेवढी सुधारणा झाली तर मानवजात नष्ट होईल. एक काळ असा होता कीं टेबलाचे पाय मनुष्याच्या नागव्या पायांसारखे दिसतात म्हणून त्यांवर आवरण घालीत. लैङ्गिक बाबतींत लपवाछपव केल्यानें नाशच संभवतो; आणि नागव्या संभोग-साहित्यानें हीं. साहित्यानें सुवर्णमध्य साधला पाहिजे. केवळ वाचकाची करमणूक हें कादंबरीचें उद्दिष्ट नाहीं कादंबरीकाराला विशिष्ट कालखंडांतील समाजजीवनाचें यथार्थ चित्र रंगवावयाचें असतें. मुलामुलींना लैङ्गिक ज्ञानापासून अलिप्त ठेवणें हें त्याना नकाशा, सुकाणू व होकायंत्र यांच्या अभावी स्वतःच्या जबाबदारीवर महासागराच्या पर्यटणास पाठविण्यासारखें सर्वनाशकारक आहे. पोर्ट सय्यद सारख्या बंदरांत मिळणारें संभोग-साहित्य बहिष्काराला योग्य आहे यांत संशय नाहीं. या प्रकारच्या लिखाणाला साहित्य ही संज्ञा देतां येणार नाहीं. पण म्हणून आपण फौजदारी कायद्याचीं क्षितिजें अधिकाधिक विस्तृत केलीं पाहिजेत असें मात्र म्हणतां येणार नाहीं. असें झालें तर कायद्याची प्रतिष्ठा राहणार नाहीं. एखादा ग्रंथ सभ्य आहे की ग्राम्य आहे हें ठरविणें हें आपलें उद्दिष्ट नाहीं, यामुळें समाजाची नीति

भ्रष्ट होईल किंवा कसें हें आपण पहावयाचें आहे. शाळेंतल्या चौदा वर्षांच्या पडक्या पोरीच्या दृष्टीनें वाङमयाची इष्टानिष्टता मोजणें केव्हांही योग्य होणार नाहीं. आजवर कोणत्याही न्यायाधीशानें एवढया प्रांजळपणें या विषयीं वक्तव्य केलेलें नाहीं आणि पंचांनीं ही एवढया निर्भयपणें मतदान केलेलें नाहीं. म्हणूनच वर म्हटलें आहे कीं समाजाच्या विनय बुद्धीचें परिवर्तन झपाट्यानें होत आहे, तें या निकालामुळें स्पष्टपणें प्रत्ययास येतें.

प्राचीन व मध्ययुगीन साहित्याला आणि विख्यात लेखकांना खास वागणूक द्यावयाची असा न्यायालयांचा शिरस्ता आहे. श्री. फ्रेड्रिक सीबर्ट (Rights & Previledges of the Press ; p. 241,) सांगतात :

" Classical immorality, as opposed to modern indecency, has received special treatment at the hands of courts. Works of renowned authors which have survived the test of time as literary masterpieces can be printed without fear of prosecution."

या न्यायानें Hasley v. New York Society for the Suppression of Vice : 234 N. Y. I (1922) या खटल्यांत गोटिएरची मादमोझेल द मोपिन ही कादंबरी दोषमुक्त ठरविण्यांत आली; आणि या निर्णयावर विसंबून पेट्रोनियसचें सॅटिरिकॉन हें ही. पेनचें अरेबियन नाइटस्, ओव्हिडचें आर्ट ऑफ लव्ह, डिकॅमेरॉन्, हेप्टॅमेरॉन् इत्यादि ग्रंथही दोषमुक्त ठरले आहेत. सायकॉलजी ऑफ सेक्स, लेडी चॅटरलेज लव्हर वगैरे पुस्तकांवर न्यायालयांत रणें माजून तीं दोषमुक्त ठरलीं आहेत.

लोकसाहित्यांतील अश्लीलता ही वस्तुतः ग्राम्यता असते. हा केवळ ग्राम्य विनोदबुद्धीचा आविष्कार असतो. शिष्ट साहित्यांतील अश्लीलता ही सामान्यतः सहेतुक असते आणि लोकसाहित्यांतील अश्लीलतेला लैङ्गिक आवाहन नसतें. ग्राम्य विनोदाचा परिपाक हास्यांत होतो, चित्ताच्या कलुषिततेंत होत नाहीं, लैङ्गिक क्षुब्धतेंत होत नाहीं. म्हणूनच अशा विनोदाला अश्लील म्हणणें अन्यायाचें होईल. क्र १५ मध्यें सख्यांनीं नायिकेला दोहद प्रश्न विचारलेला आहे तेव्हां तिनें प्रियकराकडे दृष्टिक्षेप केलेला आहे. क्र. १२३ मध्यें नायिका नुक्तीच प्रसूत झालेली आहे आणि तिच्या मैत्रिणी तिला नवऱ्याचें नांव घेण्याविषयीं आग्रह करीत असून ती त्याचें नुसतें नांवही घेण्याला तयार नाहीं. ह्या गाथाही

कांहीं वर्षांपूर्वी अश्लील मानण्यांत आल्या असत्या. लोकसाहित्याविषयींची आपली सहानुभूति वृद्धिंगत होईल आणि बहुजनसमाजाच्या अंतर्यामाची आपल्याला ठाव लागेल तेव्हां एकही गाथा अश्लील आहे असें म्हणण्याचें साहस कोणालाही होणार नाहीं.

गाथासप्तशतीची आरंभींची मांडणी नाटकासारखी केलेली आहे; निदान अधिकृत आवृत्तींत ती तशी झालेली आहे.

नाटकाच्या प्रास्ताविक भागाला पूर्वरंग अशी संज्ञा आहे. नाटकाचा आरंभ नान्दीनें व्हावयाचा असा संकेत आहे. भरतानें नाटयशास्त्रांत (५.२४) नान्दीचें लक्षण सांगितलें आहे:

> आशीर्वचनसंयुक्ता नित्यं यस्मात् प्रयुज्यते।
> देवद्विजनृपादीनां तस्मान्नान्दीति संज्ञिता॥

सूत्रधारानें मध्यम स्वराचा आश्रय करून देवद्विजादिकांना वंदन करणारी नान्दी म्हणावयाची असें भरताचें वचन आहे. प्राचीन नाटकांत नान्दीचा एकच श्लोक असे. उत्तरोत्तर त्यांची संख्या वाढत गेलेली आढळते. नान्दीनंतर सूत्रधार व पारिपार्श्वक यांचे मार्फत लेखकानें स्वतःची माहिती सांगावयाची आणि प्रथम श्रोत्यांची प्रशंसा आणि नंतर त्यांना असह्य होणार नाहीं एवढी आत्मस्तुति करून नाटकाचें प्रयोजन सांगावयाचें, आगामी पात्रांचा परिचय करून द्यावयाचा, अशी प्रथा होती. नाटयवस्तूचा ओझरता परिचय हें प्रस्तावनेचें उद्दिष्ट होय. उपसंहारांतही लेखकानें भरतवाक्य म्हणून देवस्तुति करावयाची असते. मंगलाचरण हें नाटक निर्विघ्नपणें सिद्धीस जावें म्हणून आणि भरतवाक्य हें तें अपेक्षेप्रमाणें निर्विघ्नपणें सिद्धीस गेलें म्हणून.

गाथासप्तशतींत आरंभीं नान्दी व अखेरीस भरतवाक्य आहे. या गाथांत शालिवाहनानें इष्ट देवताची प्रार्थना केलेली आहे. येथें संपादक हाच सूत्रधार आहे. बाह्यतः कांहींही व्यवहार चाललेला असला, तरी व्यक्तिमात्राच्या अंतर्यामांत, सामान्यतः कामविचारांचें स्पदंन सुरू असतें हा लैङ्गिक मानसशास्त्रीय सिद्धान्त देवस्तुतीच्या, गौरीच्या मुखाच्या आरक्ततेच्या मिषानें शालिवाहनानें पहिल्याच गाथेंत मांडून गाथांतील व्यङ्ग्योक्तीची सूचना केली आहे. दुसऱ्या गाथेंत विषयोपन्यास आहे. या भागांत नाट्याचें बीज असावें असा भरताचा सिद्धान्त आहे. प्राकृत काव्य स्तुतीच्या निमित्तानें, जणूं विदग्ध

नायिकेच्या मुखानें त्यानें लब्धप्रतिष्ठित पंडितांची हजिरी घेतलेली आहे. आपण आपसांत लैङ्गिक चर्चा केली तर तो विद्वत्तेचा आविष्कार; कोठवर? जोंवर ती संस्कृतांत चाललेली आहे आणि प्राकृतजन चर्चेंत भाग घेत नाहींत तोंवर! बहुजनसमाजाला आवडणारें व समजणारें प्राकृत काव्य मात्र एकांतांत वांचतांना किंवा निवडक व मोजक्या मंडळींत ऐकतांना ओंठ उडवलेच पाहिजेत अशी ज्यांची वृत्ति त्यांना तीबद्दल शरम कशी वाटत नाहीं, असा उघड सवाल अप्रबुद्ध नायिकेनें प्रबुद्ध पण्डिताला दुसऱ्या गाथेंत केलेला आहे. या गाथेंत गाथासप्तशतींत संकलित केलेल्या गाथांच्या विषयाची व वृत्तीची चुणूक दाखविलेली आहे. हा गाथाकोश आपण केवढे परिश्रम घेऊन सिद्ध केलेला आहे हें तिसऱ्या गाथेंत संपादकानें सांगितलेलें आहे. प्रतिष्ठित सूत्रधार पहिल्या गाथेंत देवस्तुति करतो आणि दुसऱ्या गाथेंत विदग्ध नटी त्याची रेवडी उडविते, असेंही मानतां येईल. चवथ्या गाथेंत बिसनीपत्रांत जशी बलाका, मरकत भाजनांत जशी शंखशुक्ति, तशी रंगभूमी-वरल्या हिरण्यागार बैठकीवर नायिका निश्चल बसलेली दिसत आहे; जणूं ओळखा माझें अंतर्याम, असें तिचें प्रेक्षकांना आव्हान आहे- आणि जणूं म्हणूनच आलंकारिकांनीं या गाथेचें सूक्ष्म विश्लेषण केलेलें आहे.

नाटकांत नाट्यवस्तूच्या सूत्रानें अंगोपांगे बांधलेलीं असतात. तसा प्रकार संकीर्ण कोशांत संभवणें शक्य नाहीं. आरंभीं मात्र नाट्यवस्तूशीं साधर्म्य दिसतें.

शिवाय गाथासप्तशतींतल्या अनेक गाथांमध्यें नाट्यवस्तु बीजरूपांत आढळतात.

ऋग्वेदांत अनेक आख्यान व संवाद सूक्तें आहेत. ज्यांत कथावस्तु असते तें आख्यानसूक्त आणि ज्यांत विशिष्ट भावनेचा विकास संभाषणाच्या माध्यमानें केलेला असतो तें संवाद सूक्त. बृहस्पतीची बायको जुहू हिचें अपहरण व पुनरादान यांचा वृत्तांत ऋग्वेदांत (१०–१०९) सांगितलेला आहे; हें आख्यान सूक्त; त्यांत वर्णिलेली घटना प्रत्यक्षांत घडलेली असणें संभवनीय आहे. यम व यमी यांचें (१०–१०) संभाषण, हें संवाद सूक्त. या दोन्ही प्रकारांत नाट्यवस्तु स्पष्ट दिसते. आख्यान सूक्तांत अनेक पात्रें आहेत आणि संवाद सूक्तांत फक्त दोन. ऋग्वेदांत स्वगत भाषणाच्या ही अनेक ऋचा आहेत. असे प्रसंग रंगभूमीवर दिग्दर्शित केले जात असत किंवा कसें याबद्दल निश्चित अनुमान करण्यास साधन नाहीं. शुक्लवेदांतर्गत माध्यंदिन वाजसनेयि

संहितेंतील एकोणतिसाव्या अध्यायांतील प्रसंगच असा आहे कीं तो केवळ म्हटला जात असावा, फार तर प्रतीकांच्या द्वारें दिग्दर्शित केला जात असावा. अशीं प्रकरणें ब्राह्मण ग्रंथांतही आढळतात. अशा सूक्तांत सांकेतिक गूढार्थ भरलेला असून त्यांत सृष्टीची व मानवाची उत्पत्ति व उत्क्रांति आणि आर्यांचे ऐहिक व धार्मिक उद्योग यांचा इतिहास आलेला आहे असें अनेक विद्वानांचें प्रतिपादन आहे. हा शिष्टसंमत सिद्धान्त गवळणींच्या बाबतींतही योजण्यांत येतो. गाथासप्तशतीचा टीकाकार पीतांबर यानें तर गाथांच्या बाबतींत ओढून ताणून तो लागू केलेला आहे ! यामुळें असा प्रश्न उपस्थित होतो कीं हें संकेत खरे तर ते अशा उत्तान प्रसंगांच्या अनुरोधानें व लैङ्गिक संदर्भांत कां सांगण्यांत आले. पण हा न तुटणारा वाद आहे. कसेंही असो, या सूक्तांत भारतीय नाट्याचें मूळ स्वरूप दृष्टीस पडतें, हें मात्र अगदीं खरें, आणि सर्वमान्यही.

नाट्यशास्त्र, दशरूपक, साहित्यदर्पण इत्यादि प्राचीन व मध्ययुगीन ग्रंथांत नाटकांचे अनेक प्रकार सांगितलेले आहेत. प्रहसन हें सामान्यतः एकांकी असून त्यांत मुख्यत्वेंकरून शृंगार व हास्य या रसांचा परिपोष करण्यांत येतो; यांत लबाड व बदमाष लोकांत चालू असलेले कलहविग्रहादि प्रकार वर्णिलेले असतात; यांतील पात्र आपआपल्या प्राकृतांत बोलतात. भाण हा नाट्य प्रकार विट हा एकच नट करून दाखवितो. भाण हें मूक नाटक किंवा नृत्य यांपासून परिणत झालेलें आहे. गोष्ठी या एकांकी नाटकांत कामशृंगाराचा परिपोष केलेला असतो. यांत हलक्या दर्जाचे नऊ दहा पुरुष आणि पांच सहा स्त्रिया यांचें काम असतें. रासक या एकांकीं नाट्यप्रकारांत बढाई व व्यङ्ग्योक्ति आणि गीत व नृत्य यांवर भर असतो.

गाथासप्तशतींतल्या अनेक गाथांमध्यें नाट्यवस्तु आहेत आणि क्र. ९१७ व ८६२ या गाथांत आख्यानांचे उल्लेख आहेत. अनेक गाथांत प्रचलित लोककथाचा संदर्भ आढळतो असें टीकेंत जागोजाग सांगितलें आहे. मध्ययुगीन वाङ्मयांत शोध घेतल्यास आणखी अनेक कथा आढळतील. क्र. १६२ या गाथेंत सूचित असलेली कथा कथासरित्सागराच्या लावाणक लंबकांत पहिल्या तरंगांत आलेली आहे. क्र ९५१ मध्यें सूचित असलेल्या कथेसारखा प्रसंग कथासरित्सागराच्या मदनमञ्चुका लंबकाच्या सातव्या तरंगांत श्रुतसेनाच्या कथेंत आलेला आहे. नाट्य वस्तु असलेल्या गाथा हीं आंकणकडवीं असावींत व त्यांच्या अनुरोधानें ग्रामीण फड नाटक रंगवीत असावेत असें मला वाटतें.

उदाहरणार्थ क्र २३१ या गाथेंतील प्रसंग पहा. शुकबहात्तरींतील कथेशीं या गाथेंतील वस्तूचें किती साम्य आहे ! लावणीचा किंवा पोवाड्याचा एक एक चौक संपला कीं रंगभूमीवरील सर्वजण मिळून धृवपद घोळून म्हणतात; जणूं एक एक प्रवेश संपल्यानंतर तोंवरच्या नाचगाण्यामुळें व हावभावांमुळें, गद्य व ग्राम्य वक्तव्यामुळें भांबावलेल्या श्रोत्याना संदर्भाची आठवण करून देण्यासाटीं. तशाच या गाथा धृवपदासारख्या वारंवार म्हणण्यांत येत असाव्यात असें मला वाटतें.

हें मान्य झालें तर मराटी पोवाडा व लावणी यांचें मूळ आपल्याला गाथासप्तशतींत सांपडलेंसें होईल !

उदाहरणार्थ "सगनभाऊच्या लावण्या" ह्या संग्रहांत समाविष्ट झालेली "कस्तुरीचा सुगंध" ही सिद्धनाथाची लावणी (सारस्वत प्रकाशक मंडळी : पृ. २६) घ्या. या लावणीचें धृवपद असें आहे :

कस्तुरी वाळवित होती माडीवरती।
बेदरची कामसेना चतुर गुणवंती ॥ धृ ॥

एके दिवशीं ती अशी कस्तुरी वाळवीत असतां मंद वारा सुटला आणि कस्तुरीचा दरवळता श्वास दौलताबादेस राव बाच्छायप्रती गेला. बादशहानें दिवाणाला विचारलें, कस्तुरी कोणापाशीं श्वास मारिती ? ॥ धृ ॥ दिवाणानें कामसेनेचें नांव घेतलें. बादशहाला खोटें वाटलें. त्यानें धमकी दिली, खोटें ठरलें तर डोकें मारीन. मग बादशहानें पत्र देऊन बेदरला जासूद जोडी पाठविली. पत्रांत विचारलें होतें कीं तुम्ही कोणते दिवशीं, कोणते वेळीं कस्तुरी वाळवली. ॥ धृ ॥ वेल्हाळ गणिकेनें काळवेळ लिहून उत्तर पाठवलें. दरबारांत साबाजी अनंताने तें पत्र वाचून दाखवलें. बाच्छायानें दिवाणाला शाबासकी दिली. ॥ धृ ॥ तिकडे कामसेना मनांत झुरूं लागली. तिनें अलंकार धारण केले, द्रव्य गांठीं घेतलें. गाडींत बसून बादशहाच्या भेटीला निघाली. स्वर्गांतून रंभा सुखासाठीं आली दौलताबादेंत चांभार टेंकडीजवळ तिनें वस्ती घेतली. ॥ धृ ॥ तिनें गाणें सुरू केलें. ती गौरी रागिणी गाऊं लागली. तेव्हां रानांतलीं हरणें तें गाणें ऐकायला आलीं. तिनें गळ्यांतला हार काढला, तो हरिणाच्या गळ्यांत घातला. गाणें संपलें तेव्हां हरणें पळालीं. मग तिनें हाराच्या चोरी-बद्दल बादशहाकडे फियाद दिली. हिचा हार हिला मिळवून द्यावा असा बादशहानें दिवाणाला हुकूम दिला ॥ धृ ॥ साबाजी अनंत कामसेनेसह

चोरीच्या जागीं आला. त्यानें तिला हकीगत विचारली. काय झालें असावें तें त्यानें ओळखलें. तो ही गुणी होता. त्यानें गाणें सुरू केलें. तें ऐकून हरणांचा मेळ जमला. त्यात हाराचा धनीही आला. तो त्याच्याकडून मागून घेऊन साबाजीनें दरबारांत हजर केला ॥ धृ ॥ फिर्यादीपासून तीन दिवसांत मुद्देमाल हजर झालेला पाहून बादशहा खुषी झाला. त्यानें कामसेनेला तबकभर मोहरा दिल्या. तो तिच्यावर फिदा झाला. ती म्हणाली, माझा हेत आहे साबाजी अनंतावर, मला एक रात्र, चार घटका द्या. बादशहा बरें म्हणाला. त्यानें साबाजीला तिचें उजुर सांगितलें ॥ धृ ॥ साबाजीनें तिला माडीवर बोलावलें. शिडीचं पायरी त्यानें अगोदरच काढून ठेवली होती. तेथें ती खुंटली, साबाजीला म्हणाली, मला हात द्या. साबाजी उठला. त्यानें तिला हात दिला. पंजा धरतांच तिचा मदन उतरला. कामसेनेचा गर्व हरला. ही नाथपंथी सिद्धनाथाची कविता आहे ॥ धृ ॥

क्र. ३०१ माथेचें आंकणकडवें आणि टीकेंत दिलेली शुकबहात्तरींतील गोष्ट यांचा मेळ कसा बसतो तें पहा, म्हणजे आपण माझ्या वरील अनुमानाला आपखुषीनें दुजोरा द्याल.

नागरी, ग्रामीण व वन्य असे वर्ग समाजांत नेहमींच असतात. या वर्गांचें विशिष्ट प्रकारचें सांस्कृतिक व्यक्तिमत्व ही उत्क्रांत होत असतें. गाथासप्तशती-च्या काळांत या वर्गांच्या संस्कृत, प्राकृत व पैशाची या भाषा होत्या. काळ जरा वेळ बाजूला ठेवला तर म्हणतां येतें कीं अनुक्रमें कालिदास, हाल व गुणाढ्य हे या वा वर्गांचे प्रतिनिधि आहेत. पण गुणाढ्याच्या नांवावर हल्लीं उपलब्ध असलेल्या ग्रंथांत वन्य संस्कृति प्रत्ययास येत नाहीं. हाल हा प्रतिष्ठानचा राजा होता हें निःसंशय; पण परचक्रामुळें त्याचें राज्य अस्थिर व संकुचित झालेलें असावें, त्याला बरेचसें आयुष्य रानानजीकच्या खेड्यां-पाड्यांत, कदाचित अज्ञातवासांत काढावें लागलें असावें. हाल हें व्यक्तिनाम दुर्बोध आहे. त्याला हाला ही सुरा प्रिय होती, हाल हें त्याचें आयुध होतें, तो स्वतः हलिक होता, अशा वित्पत्ति सांगण्यांत आलेल्या आहे. कोण जाणे. कोणी तर सांगतात कीं कवि हाल हा हलिक होतात आणि कविवत्सल श्री हाल हा त्याचा आश्रयदाता होता. कोण जाणे. गाथासप्तशतींत ग्रामीण जीवनाचे उल्लेख बहुसंख्य आहेत. हे उल्लेख जिव्हाळ्याचे आहेत. कवि ग्रामीण जीवनाशीं एकरूप झाल्याचे त्यांवरून दिसून येतें. गाथासप्तशतींत नागर व

वन्य समाजांचीं हीं शब्दचित्रें आहेत, त्यांत एकरूपता इष्टोत्पत्तीस येत नसली तरी कृत्रिमता मात्र आढळत नाहीं. यावरून अनुमान होतें कीं गाथासप्तशतीच्या काळांत नागर किंवा शिष्ट संस्कृति, हल्लीं आपण या संज्ञा वापरतों त्या अर्थानें, उत्क्रांत किंवा संघटित झालेल्या नव्हत्या.

एखादा निष्णात चित्रकार कुंचलीच्या दहा पाच ठळक फटकाऱ्यांत अभिप्रेत चित्र जणूं सजीव करूं शकतो. नवशिका चित्रकार मात्र प्रभावासाठीं रेखांच्या सूक्ष्मतेवर व छायाप्रकाशाच्या यथार्थतेवर विसंबतो व त्यांतच फसतो. गाथासप्तशतींतील शब्दचित्रें निष्णात चित्रकाराप्रमाणें कमींत कमी शब्दांत आणि उपमा व अलंकारांच्या अभावीं हा अशा उठावात व बहारीनें निर्माण केलेलीं आहेत कीं त्यांना संस्कृत प्राकृत व इतरयात तोड नाहीं. कमींत कमी पात्रांच्या कार्यांचा किंवा भावनांचा संघर्ष अगर समन्वय करून एखादा त्रुटित प्रसंग अगदीं अल्प सामग्रीनिशीं असा उभारलेला आढळतो कीं त्यात जणूं जीवन नाट्याचें सर्वस्व समोर उभें राहतें. सृष्टिसौंदर्याचें वर्णन जेवढ्या सफाईनें केलेलें आढळतें तेवढीच कुशलता कवींनीं केलेल्या मनोविश्लेषणातही आढळते. आतां मनोविश्लेषण हा विषय विशेषतः साहित्यिकांमध्यें एवढा प्रिय आहे कीं काहीं साहित्य जणूं त्या साठींच हेतुपुरःसर निर्माण करण्यांत येत आहे; पण त्यांतलें बरेंचसें एवढें कृत्रिम असतें कीं त्याचा उथळपणा अजाणत्यालाही जाणवतो. गाथासप्तशतींत मनोविश्लेषणाचीं अशीं कितीतरी उदाहरणें आढळतील कीं ज्यांत नामवंत नवसाहित्यिकानाही नाविन्य वाटेल! गाथाकवींचें निरीक्षण सूक्ष्म आहे व त्यांच्या कल्पनेचा पल्ला अमर्याद आहे. गाथांच्या रचनेंत प्राकृताचें लालित्य प्रकट झालेलें आहे, एवढेंच नाहीं, शब्दसृष्टीची ताजवद्धता ही येथें प्रत्ययास येते. शिष्ट साहित्यांत वारंवार प्रत्ययास येणारी कृत्रिमता कोठेंही आढळत नाहीं; सुभाषितांतही. गाथा कवींचे नायक व नायिका आणि त्यांनीं व्यक्त केलेले प्रसंग सजीव वाटतात. एवढेंच नव्हे, ते सजीव आहेतच, आणि डोळे असतील त्याला ते हरघडी भोंवतीं घडत असतांना दिसतील. कारण गाथाकवि प्रामाणिक आहेत आणि जीवनाशीं एकरूप आहेत.

ज्ञानेश्वरीपाठीं । जो ओवी करील मऱ्हाटी ।
तेणें अमृताचे ताटीं । जाण नरोटी ठेविली ॥

जणूं याच भावनेनें मराठी कवींनीं गाथासप्तशतीनंतर अनेक शतकें लेखणी हातीं घेतली नाहीं!

॥ श्री महाराष्ट्रसरस्वत्यर्पणमस्तु ॥

शुद्धिपत्र

विशेष महत्त्वाच्या आणि विशेषतः प्राकृत भागांतील
चुका येथें दिलेल्या आहेत.

पान नं.	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२४	२	दंसणं गरु	दंसणं च गरु
३५	१०	ग्वणे	छणे
३९	३	दट्ठ	दड्ढ
४०	११	धारणा	धारणे
४७	२	यथात्या	यथास्या
४७	१८	मज्जाआ	मज्जाआ
५५	८	पहारा व्व पुण्णिम	पहाअ व्व पुण्णिमा
५५	१८	पावत्या	पार्वत्या
५८	१०	ताम्मिच्छामि	तमिच्छामि
६०	१०	सासुसएण	साणुसएण
६३	८	मणणं	सणेण
६५	७	महिला	महिलो
६६	२	सुहावास	सुहावेसि
७१	७	गुरुई	गुरुइं
७३	१६	कवाल	कवोले
७८	४	ताअि	तीअ
७९	५	पूरण	पूरेण
७९	१९	गालिप्यास	गलिप्यासि
८३	१४	कू	कु
९०	२०	रम्प	रुम्प
९३	१३	कइअव	कअव
९३	१४	अइ	अइ
९४	३	मह्रूत्तं	मुहुत्तं

पान नं.	ओळ	अशुद्ध	शुद्ध
९६	८	महूअर	महुअर
९७	२२	होऊ	होउ
१००	४	भूत	भूते
१०१	१	पाष्य	पोष्य
१०५	८	णीससिअं जाव	णससिअ वराइअ जाव
११०	१५	यांवना	यौवनो
११९	२२	ववक	वंकं
१२३	११	परिहरम्	परिहरन्
१२६	१०	उ्कल्ल	वङ्कुल्ल
१२६	११	उङ्कु	वङ्ख
१३२	१	सुख	मुख
१३४	१३	मणु	माणु
१४८	२	श्रमद्धदय	श्रनष्ट्हृदय
१४९	६	ित्र	त्र
१६०	१७	यया	यथा
१६४	१३	णीसाहो	णीसहो
१८२	१६	पसूअ	पसूअं
१९५	१२	हआसइ	हआसाइ
१९९	१३	दू:सह	दु:सह
२००	७	वट्ठिअ	वेट्ठिअ
२०४	२	जल्पल्य	जल्पत्य
२११	१९	अकअ कअ	अअं कअं
२१४	३	गुज्जाओ	गुञ्जाओ
२१५	१४	हंरिसूससिआए	हरिसूसुइआइ
२१८	१७	जण	जह
२२०	११	काऊं	काउं
२२०	२२	कुल्ह	कल्ह

पान नं.	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२२३	४	दून्वन्ति	दुन्वन्ति
२२४	१६	णिाक्क्व	णिक्किव
२३८	६	अम्हिं	अम्हेहिं
२४२	८	तुअ	तुह
२४६	२	क्लिज्जए	खिज्जए
२४९	१०	सुत्तव्व	सुत्तुव्व
२५३	१७	तत	तव
२५४	१९	भूतोच्चर	भूतोच्चर
२६०	१०	जत्तिओ	जेन्तिओ
२६१	३	सुमुहुत्तरन्त	समुद्दुत्तरन्त
२६१	५	सुमुद्र	समुद्र
२६६	१६	के	का
२६७	५	अण्णअ	अण्णुअ
२६९	१५	दट्ठुण	दट्ठूण
२७४	२	सिज्जिर	सिञ्जिर
२७४	१८	निषण्णया	निषण्णाया
२८३	१६	ब्भमर	भमर
२८३	१६	भरग्ग	भरभग्ग
२८४	१०	इदादीम्	इदानीम्
२८५	३	उज्जुअस	उज्जुअस्स
२९०	४	भणज्जप्रिबं	भणज्जप्यप्रियं
२९९	१२	गविरो	गव्विरो
२९९	१३	गुण	गुणे
३०१	१८	वअणाइ	वअणाइं
३०१	१९	अहृदंतर	अहरंतर
३०५	३	कररस	करस्स

पान नं.	ओळ	अशुद्ध	शुद्ध
३०५	५	प्रहरस्य	प्रहरस्व
३०५	१३	वड	वडं
३०६	१८	आलिङ्गेनन	आलिङ्गनेन
३०८	४	रन्तस्यकलम्पश्या	रन्तव्यकलम्पटया
३०९	७	प्रसृणं	मसृणं
३१०	१६	पसण्ण	पसण्णं
३११	६	रुसि	रूसि
३१४	१	पक्ष्म	पक्ष्मल
३१४	२	जानाति	जानन्ति
३१५	६	दूग्गअ	दुग्गअ
३१८	१५	वण्णसिएव	वण्णवसिए
३२४	१६	वानेन	वानिव
३२८	१२	पहिहाइ	पटिहाइ
३३७	८	दपैड्डेम्म	दड्डपेम्म
३३७	१६	णिग्गुआ	णिग्गुणा
३४२	२	वाहोह	वाहौह
३५४	१२	विवरन्तगलिअ	विवरन्नरगलिअ
३५५	४	नित्रृतिं	निर्वृतिं
३६०	५	कार्पस्यपि	कार्पास्यापि
३६१	९	जीहइ	जीहाइ
३६१	१०	मार्हिम	महिम
३६६	१६	चपआ	चणआ
३६७	२१	पिसुणन्नि	पिसुणन्ति
३७०	७	पुंसुबाण	पुंसुआण
३९०	१५	यश्चुंबिता	यैश्चुम्बिता
३९१	१३	पहिआअं	पहिआणं
३९५	११	अवेज्जइ	अवेज्जए

पान न.	ओळ	अशुद्ध	शुद्ध
३९८	१५	पहेणं	पहेण
४०८	८	सिणह	सिणेह
४१०	१	कपाटपिनद्ध	कपाटकपिनद्ध
४१९	९	निर्धौत शला	निर्धौतशिला
४२१	७	पेच्छइ	पेच्छह
४२३	१४	जुअणेहिँ	जुआणेहि
४२५	६	णववर	णववरं
४२६	१४	हान्ति	होन्ति
४२६	१४	विअसान्त	विकसन्ति
४३१	५	ज जं	जं जं
४३४	२	मस्था :	मंस्था :
४४२	११	संआरा	संचारा
४४४	३	जण	जल
४५१	२	निवर्तित	निर्वर्तित
४५३	१५	दट्ठण	दट्ठूण
४६३	२	रोत्तु	रोत्तुं
४६३	३	भेत्तमइ	मेत्तुम्मइ
४६४	१६	गंधेन	गंधेण
४६५	११	प्रसव	प्रवस
४६९	२	मिते	भिते
४७६	५	अभुत्तण	अब्भुत्तण
४७८	५	णिस्सारइ	णिस्सरइ
४९०	१०	उच्छंगियायं	उच्छंगियाएँ
४९३	७	पहियस्य	पहियस्स
४९३	७	धूसरस्य	धूसरस्स
४९८	७	दिहओ	दिअहो
४९८	१३	णिहेण	सिणेह

कविवत्सल श्री हाल सातवाहन संपादित

॥ गाथासप्तशती ॥

प्रथमं शतकम्

१ मङ्गल : 1. Obeisance.

पसुवइणो[1] रोसारुणपडिमासंकन्तगोरिमुहअन्दम्[2] ।
गहिअग्घपङ्कअं[3] विअ संझासलिलञ्जलिं णमह ॥ १ ॥

[पशुपते रोषारुणप्रतिमासंक्रान्तगौरीमुखचन्द्रम् ।
गृहीतार्घपङ्कजमिव संध्यासलिलाञ्जलिं नमत ॥]

संध्यासमयीं (उगवत्या) सूर्याला अर्घ्य देण्यासाठीं पशुपतीनें ओंजळींत पाणी घेतलें आहे; (मला उपेक्षून हे कोणाचें ध्यान करीत आहेत, अशा संशयामुळें आलेल्या) रोषानें लाल झालेला गौरीचा मुख-चंद्र त्या जलांत प्रतिबिंबित झाल्यामुळें ज्यानें जणूं आरक्त कमलासह अर्घ्य धारण केलेला आहे त्या पशुपतीला नमन असो.

१. वइ. २. यन्दम्. ३. पङ्कअम्मिअ.

● सूर्य 'उगवता' आहे हें मूळ गाथेंत सांगितलेलें नाहीं. गाथासप्तशतीच्या आरंभीं व अखेरीस शंकरानें केलेल्या संध्यावंदनाच्या किंवा सूर्यनमनाच्या गाथा आहेत; म्हणून पहिल्या गाथेंत उगवत्या व अखेरच्या गाथेंत मावळत्या सूर्याला अञ्जली देण्यांत येत असल्याचें गृहीत धरलें आहे. या गाथेंतील 'अरुण' या शब्दानें ह्या तर्काला पुष्टि मिळते; अखेरच्या गाथेंत हा शब्द नाहीं. प्रेमराज सांगतो कीं ग्रंथकारानें शिष्टाचार-परिपालनार्थ ग्रंथारंभीं इष्ट देवतेला नमन केलेलें आहे. कुलबालदेव सांगतो कीं शालिवाहनानें ग्रंथाच्या आरंभीं, मध्यें व अखेरीस (आदिमध्यांतेषु) इष्टदैवताप्रत नमस्कार-गाथा लिहिलेल्या आहेत. गाथासप्तशतींत शंकराला उद्देशून लिहिलेल्या अनेक गाथा आहेत; प्रत्यक्ष पशुपति ज्याला नमन करतो तो सूर्य हेंच शालिवाहनाचें इष्ट दैवत असलें पाहिजे असा तर्क केला तर हें वचन यथार्थ आहे असें दिसून येतें; कारण गाथासप्तशतींत सूर्यनमनाच्या गाथा तीनच आहेत आणि यांपैकीं मधली गाथा (क्रमांक ३३२) ही मूळ ग्रंथाच्या मध्याच्या आसपास आहे. गाथा-सप्तशती हा ग्रंथ शृंगारप्रचुर आहे असें 'रोषारुण' या शब्दांवरून ध्वनित होतें असें एका टीकाकाराचें मत आहे. गंगाधर सांगतो, मानिनी नायिकेचा प्रणयरोष असह्य झालेल्या नायकाप्रत हे दूतीचे उद्गार आहेत ! पार्वतीला गायत्रीबद्दल मत्सर वाटला, शंकरालाहि मत्सराचें लक्ष्य व्हावें लागलें, मग मनुष्यांची काय कथा ? स्त्रियांना संशयाची व मत्सराची लहर केव्हां, कोणाबद्दल व कोणत्या कारणानें येईल, याचा अंदाजहि करतां येणार नाहीं; या बाबतींत स्वभावतः विशेष चाणाक्ष असणाऱ्या स्त्रियांनाहि ! चंद्राला सौंदर्य आहे, पण तो फिकट आहे, पौर्णिमेच्या पहाटे मात्र तो लालसर असतो आणि गौरीचें मुख लालबुंद आहे; चंद्राला सौंदर्य आहे, पण सुगंध नाहीं, उमेच्या मुखचंद्राला कमलाचा सुगंध आहे ! पहा : चंद्रंगता पद्मगुणान्न भुङ्क्ते पद्माश्रिता चान्द्रमसीमभिख्याम्। उमामुखं तु प्रतिपद्य लोला द्विसंश्रयां प्रीतिमवाप लक्ष्मी ॥

(कुमारसंभव : १.४३)

२ प्रयोजन : 2. Nectar.

अमिअं पाउअकव्वं पढिउं सोउं अ जे ण आणन्ति।
कामस्स तत्तंतन्तिं कुणन्ति ते कहँ ण लज्जन्ति ? ॥ २ ॥

[अमृतं प्राकृतकाव्यं पठितुं श्रोतुं च ये न जानन्ति।
कामस्य तत्त्वचिन्तां कुर्वन्ति ते कथं न लज्जन्ते ॥]

अमृतासारखें प्राकृत काव्य वाचणें किंवा ऐकणें ज्यांना माहीत नाहीं ते कामशास्त्रांतील तत्वांची चर्चा मात्र करीत असतात. त्यांना लाज कशी वाटत नाहीं ?

● व्युत्पन्न नायकाप्रत विदग्ध नायिकेची उक्ति. पण्डितांनीं विचारलें, काय आम्ही प्राकृत पहावयाचें ? प्राकृत वाङ्मय मूढांनीं किंवा स्त्रियांनीं वाचावें. 'बालस्त्रीमूढमूर्खाणां नृणां चारित्रकाङ्क्षिणाम्। अनुग्रहार्थं तत्त्वज्ञैः सिद्धान्तः प्राकृतः कृतः॥' (दशवैकालिक टीका. पृ. ११३). नायिका सांगते, प्राकृत गाथा मनोरंजक आहेत, त्या मदनागारदूती आहेत, काम-कौशल्याच्या शिक्षिका आहेत; समयोचित ललित गाथा ऐकविल्यानें विदग्ध वनिता प्रसन्न होतात. म्हणून, साधारणदेव सांगतो, कामशास्त्राच्या फल-प्राप्तीच्या इच्छुकानें गाथांचा संग्रह अवश्य करावा. कामशास्त्राचें शुष्क चर्वितचर्वण ऐकून कंटाळलेली व ताटकळलेली विदग्ध नायिका प्राकृत काव्यस्तुतीच्या निमित्तानें व्युत्पन्न नायकाप्रत म्हणते, आतां हें संस्कृत पुरें नाहीं का झालें ? बैठकीच्या उत्तरार्धात प्राकृताची मागणी होते, याचा रसिकांना अनुभव आहेच ! कामशास्त्रांतील तत्वांची वा तंत्राची चर्चा करतांना पण्डितांना संकोच वाटत नाहीं, कारण अशी चर्चा पण्डितांनीं

१. अमअं, अमयं. २. अमयं पाइयकव्वं पढिउं सोउं च ये न याणन्ति (वज्जालग्ग). ३. कामस. ४. तत्तत्तिं, तत्ततत्तिं. ५. तन्त्रचिंताम्. ६. वार्ताम्.

पण्डितांसाठीं केलेली असते. स्त्रियांनीं किंवा प्राकृत जनांनीं त्यांचें अनुकरण केलें तर तें मात्र अश्लाघ्य, किंवा अश्लील! कारण यामुळें आपली प्रतिष्ठा कमी होईल अशी या लब्धप्रतिष्ठितांना धास्ती वाटते! प्राकृत काव्य रसाळ आहे, मधुर आहे, जिवंत आहे; कारण त्यांत हृदयांतल्या भावना प्रामाणिकपणें सशब्द केलेल्या असतात; एवढेंच नव्हे, अमृतमय आहे, कारण त्याच्या श्रवणानें नवचैतन्य प्राप्त होतें! अमृताच्या स्पर्शानें वस्तुमात्राला चैतन्य व चिरंजीवन प्राप्त होतें, असा संकेत आहे. मग प्रत्यक्ष अमृताचें धारण कोणी व कसें करावयाचें ? समुद्रमंथनाचे वेळीं देवदानवांनीं हा प्रश्न कसा सोडविला असेल तो असो!

३ ग्रंथस्वरूप : 3. Patron.

सत्त सताइं[1] कइवच्छलेण[2] कोडीअ मज्झआरम्मि ।
हालेण विरइआइं सालङ्काराणँ गाहाणम् ।। ३ ।।

[सप्त शतानि कविवत्सलेन कोटेर्मध्ये ।
हालेन[3] विरचितानि सालंकाराणां गाथानाम् ।।]

एक कोटि गाथांमधून अलंकारांनीं सजलेल्या अशा सातशें गाथा निवडून कविवत्सल हालानें हा संग्रह केला.

● प्राकृत-पिङ्गलात गाथालक्षण सांगितलें आहे : ' पढमं बारह मत्ता बीए अट्ठारएहिं संजुत्ता । जह पढमं तह तीअं दहपञ्चविहूसिआ गाहा ।। ' संस्कृतांत जी आर्या ती प्राकृतांत गाथा. हेमचंद्रानें काव्यानुशासनात (अ. १ : सू. ११) काव्यलक्षण सांगितलें आहे: ' अदोषौ सगुणौ सालंकारौ च शब्दार्थौ काव्यम् । ' गाथासप्तशतीला गाथाकोश अशीही संज्ञा आढळते. हेमचंद्रानें (पूर्वोक्त : अ. ८: सू. १३) कोशलक्षण सांगितलें आहे :

१. सयाइं. २. वत्थलेण. ३. शालवाहनेन, शालिवाहनेन.

' स्वपरकृतसूक्तिसमुच्चयः कोशः । यथा सप्तशतकादिः । ' साहित्यशास्त्रावरील अनेक संस्कृत ग्रंथांत अलंकारांची उत्कृष्ट उदाहरणें म्हणून गाथासप्तशतींतील अनेक गाथा उधृत केलेल्या आहेत. त्यांचें कोष्टक इतरत्र दिलेलें आहे. त्यावरून त्यांचें सालंकारित्व सिद्ध होतें. ' हालेन विरचितानि ' या प्रयोगावरून आधुनिक टीकाकार अनुमान करतात कीं वेगवेगळ्या कवींनीं रचलेल्या गाथांवरून हालानें अखेरचा हात फिरवून त्या सालंकृत केल्या असाव्यात. मध्ययुगांतील पण्डितांनाही सातवाहन वंशाचा एवढा विसर पडला होता कीं एकानें ' कविवत्सल ' हें व्यक्तिनाम असल्याचें नमूद केलें आहे !

४ बकध्यान : 4. All Quiet.

उअ णिच्चलणिप्पन्दा भिसिणीपत्तम्मि[1] रेहइ बलाआ[2] ।
णिम्मलमरगअभाअण[3]परिट्ठिआ[4] संखसुत्ति[5] व्व ॥ ४ ॥

[पश्य निश्चलनिःस्पन्दा बिसिनीपत्रे राजते बलाका ।
निर्मलमरकतभाजनपरिस्थिता[6] शङ्खशुक्तिरिव ॥]

पहा, कमळाच्या पानांमध्यें बगळी कशी एकाकी, निश्चल बसलेली आहे. जणूं निर्मळ पाचूच्या पूजापात्रांत मोत्यांची शिंपली ठेवावी तशी ती शोभत आहे.

● निश्चल व निःस्पन्द या शब्दांच्या अर्थांमधील भेद काव्यप्रकाशावरील श्री नागेशभट्टाच्या उद्योत टीकेंत स्पष्ट केलेला आहे. ' चलनं शरीरक्रिया । स्पन्दस्त्ववयवक्रिया । ' सुधासागर टीकेंत श्री भीमसेन दीक्षित सांगतातः ' निश्चलत्वं स्वप्रयत्नाधीनक्रियाशून्यत्वं, निष्पन्दत्वं स्वाधीनक्रियाशून्यत्वमिति न पौनरुक्त्यम् । ' अलंकारकौस्तुभाच्या टीकेंत श्री विश्वेश्वर पण्डित सांगतातः 'चलनमवयवक्रिया, स्पन्दस्त्ववयवविक्रिया.' शंखशुक्ति या प्रयोगाचा

१. वत्तम्मि. २. मळाआ. ३. भायणुवरि. ४. पडिट्ठिआ. ५. सिप्पि. ६. प्रतिष्ठिता.

नीट उलगडा होत नाहीं. उद्योतांत सांगितलें आहे: ' शंखशुक्तिः शुक्त्याकारं शंखघटितं पात्रम् । ' शुक्ति म्हणजे मोत्यांची शिंपली. अथर्ववेदांत हा शब्द या अर्थानें वापरलेला आहे (ज्ञानकोशः बुद्धपूर्व जगः पृ. ४६१). चंदनासाठीं कचोळें असतें तसें हें पात्र असावें. मध्यें शंख व त्याभोंवतीं मोत्यांच्या शिंपा, असें तर हें पात्र नसेल ? अलंकारकौस्तुभाच्या टीकेंत श्री विश्वेश्वर पण्डित सांगतातः ' शङ्खशुक्तिः शंखनिर्मितं शुक्त्याकारपात्रम् इति काव्यप्रदीपः । ' काव्यप्रकाशांत दिलेला या गाथेचा व्यंग्य अर्थ असाः ' अत्र निष्पन्दत्वेन आश्वस्तत्वं,तेन च जनरहितत्वम्, अतः संकेतस्थानमेतदिति कयाचित् कञ्चित्प्रत्युच्यते । अथवा, मिथ्या वदसि, न त्वमत्रागतोऽभूरिति व्यज्यते । ' अलंकारकौस्तुभांतील विवेचन पहाः ' क्वचिद्विंबप्रतिबिंबभावेन धर्मोक्तिः । स च वस्तुतो भिन्नयोरपि सारूप्यादेकत्वाध्यवसानम् । ' गाथासप्तशतीवरील व अलंकार ग्रंथांवरील टीकाकारांनीं ही व्यङ्ग्योक्ति आहे असें गृहीत धरून या गाथेंतून अनेक अकल्पित अर्थ काढले आहेत, त्यांचें कौतुक करावें तेवढें थोडेंच ! गंगाधरानें रतिरहस्यांतील उतारा (५-३) दिला आहे : ' कल्लोलिनी काननकंदरादौ दुःखाश्रये चार्पितचित्तवृत्तिः । मुदुक्रमारंभमभिन्नधैर्यः श्लथोऽपि दीर्घं रमते रतेषु ।। ' तो सांगतो, या गाथेंत दीर्घरताची सूचना आहे ! प्रेमराजानें आपल्या टीकेंत अमरुशतकांतील 'शून्यं वासगृहं विलोक्य', हें वचन उधृत केलें आहे. एका टीकाकाराला या गाथेंत विपरीत रताची सूचना दिसते ! भुवनपाल सांगतो, बिसिनी-पत्रांवरून नायिका पद्मिनी आहे असें ध्वनित आहे ! मग ती गोरीपान असावी व तिनें हिरवें वस्त्र परिधान केलेलें असावें असा तर्क कां करूं नये ? बलाका म्हणजे बगळी किंवा लाडकी. संकेताप्रमाणें ती तळ्याच्या पाळीं तुझी वाट पहात बसली आहे, अशी दूतीची सूचना. माणसाची चाहूल लागली कीं बगळे उडून जातात. बगळी निश्चल बसली आहे, अर्थात् आजूबाजूला कोणी नाहीं, निर्धास्तपणें येथें बसण्यास हरकत नाहीं, व्यत्यय येणार नाहीं, असें सुरतासक्तांचें परस्परांना आश्वासन. संकेतस्थानाकडे मी जाऊन आलों असें तुम्ही सांगतां, पण तेथें तर बगळी निश्चल बसली आहे; तुम्ही तिकडे गेला असतां तर ती केव्हांच उडून गेली असती;

म्हणून मला वाटतें, तुम्ही तिकडे गेलांच नाहींत, अशी दूतीनें केलेली नायकाची निर्भत्सना. काव्यप्रकाश, साहित्यदर्पण वगैरे ग्रंथांत या गाथेच्या अनेक छटा चर्चिल्या आहेत. त्या वाचून खवळलेले श्री. राजारामशास्त्री भागवत (प्राकृत भाषेची विचिकित्सा : आवृत्ति दुसरी. पृ. ६४) म्हणतात: 'ती काव्यप्रकाशकारानें उत्तमपैकीं ठरवून तिचा शिरस्त्याप्रमाणें जार जारिणीशीं संबंधही त्यानें लावून टाकला आहे...अलंकरानें खमंगपणा आलेली स्वभावोक्ति ('स्वभावोक्तिः ... क्रियारूपवर्णनम् ।' काव्यप्रकाश; उद्योत : 'साधारणस्वभाववर्णनस्य स्फुटत्वान्नालंकारत्वम् । असाधारणस्तु लोकसिद्धोऽपि प्रतिभामात्रवेद्यत्वादलौकिकवद्भातीत्यलंकार :') उघड झळकत असताना मुद्दाम आडवाटेनें जाऊन जारिणीचा उजू किंवा दासीच्या द्वारा जाराशीं संबंध लावणाऱ्या काव्यप्रकाशकारास शृंगाराची कावीळ झाली, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होईलशी वाटत नाहीं...संस्कृत आलंकारिकांनीं जी भलतीच वाट दाखविली त्या वाटेनें प्राकृत ग्रंथांवर टीका करणारे भट्ट व शास्त्री डोळे मिटून गेले ही अंधपरंपरा दांडगी नव्हे काय ?' खुद्द शास्त्रीबुवांनीं गाथासप्तशतींतील शृंगाराकडे पक्षपाती डोळेझांक केलेली असल्याचें त्यांच्या टीकाकारानीं दाखवून दिलें आहे.

५ विभ्रम : 5. Dalliance.

तावच्चिअ रइसमए महिलाणं बिब्भमा विराअन्ति ।
जाव ण[१] कुवलअदलसच्छ[२]आइं मउलेन्ति णअणाइं ॥ ५ ॥

[तावदेव रतिसमये महिलानां विभ्रमा विराजन्ते ।
यावन्न कुवलयदलसच्छा[३]यानि मुकुलीभवन्ति नयनानि ॥]

नीलकमलासारखी कांति असलेले डोळे रतिसमयीं तृप्तीनें मुकुलित झालेले नाहींत तोंपर्यंतच स्त्रियांचे विभ्रम मनोहर वाटतात.

१. जावण्ण. २. सछताइँ, सच्छहाइँ. ३. सदृशानि.

● गंगाधर सांगतो की हे उद्गार नायकानें विपरीतरतप्रसंगीं सदर्प नायिकेला उद्देशून काढलेले आहेत ! हाव म्हणजे स्त्रियांच्या शृंगारचेष्टा; याचे विलास, विव्वोक, विभ्रम, ललित, हेला व लीला असे सहा प्रकार आहेत. ‘ स्त्रीणां विलासविव्वोकविभ्रमा ललितं तथा । हेला लीलेत्यमी हावाः क्रियाः शृङ्गारभावजाः । ’ (अमरकोष, प्रथम काण्ड, नाट्यवर्ग). ‘ विभ्रमस्त्वरया काले भूषास्थानविपर्ययः ’ हें धनंजयानें दशरूपकांत दिलेलें लक्षण येथें लागू पडत नाहीं. भरत सांगतो : ‘ कामौत्सुक्यकृताकारं रूपयौवनसंपदा । अनवस्थितचेष्टत्वं विभ्रमः परिकीर्तितः ॥ ’ नागरसर्वस्वांत पद्मश्री सांगतो: “ क्रोधं स्मितं च कुसुमाभरणादि याञ्चा । तद्वर्जनं च सहसैव विमंडनं च । आक्षिप्य कांतवचनं लपनं सखीभिः निष्कारणोत्थित-गतं बत विभ्रमं तत् ’ ॥ (१३।१३)॥ विभ्रम म्हणजे कामौत्सुक्यानें प्रेरित अशा शृंगारचेष्टा. विभ्रम हा विलास भ्रूसमुद्भव आहे. गंगाधरानें असाच अर्थ घेतला आहे. तो सांगतो: ‘ सुरतावसानोपचाराद्यनभिज्ञतया रतान्तेऽपि कटाक्षभुजप्रक्षेपादि विभ्रमं कुर्वन्ती नायिकां प्रति सख्याः शिक्षोक्तिरियम् ।’ ह्या टीकेचा उत्तरार्ध मात्र अग्राह्य आहे; कारण नायिका कितीही अनभिज्ञ असली व तिची सखी कितीही जिवलग असली तरी अशा प्रसंगीं त्यांचें साहचर्य संभवत नाहीं; शिवाय, काय हेंही शिकवावें लागतें ? आणि, काय जें कृत्रिम तें अनुभविकाला ओळखणार नाहीं ? कामशास्त्रज्ञ सांगतात कीं तृप्तीमुळें स्त्रियांचे नेत्र मिटतात : ‘ नारी विसृष्टकुसुमेषुजला रतान्ते । नृत्यं करोति बहुवल्गनरोदनेच । कैवल्यमेतिमुकुलीकृतचारुनेत्रा । शक्नोति नो किमपि सोढुमतिप्रयासम् ॥ ’ (अनङ्गरङ्ग : तृतीय स्थल ॥ ११ ॥ : काशी संस्कृत सीरीज). हॅव्हेलॉक एलिस सांगतो कीं दोघांचेही नेत्र मुकुलित होतात. प्रेमराज सांगतो कीं तृप्तीमुळें पुरुषांचे डोळे मिटतात. म्हणून, आणखी एक टीकाकार सांगतो, नायिके, तुझें समाधान झालें नसलें तरी नायक तृप्त झालेला आहे हें बाह्य चिन्हांवरून ओळखून तूं विभ्रमांचा त्याग करावास, हें उक्त ! या गाथेची नायिका मध्या आहे असें धनंजयानें दशरूपकांत (२-१६) सांगितलें आहे.

६ कोरांटी : 6. Longing.

णोहलिअ[1]मप्पणो किं ण मग्गसे मग्गसे कुरवअस्स ? ।
एअं तुह[2] सुहग हसइ वलिआण[3]णपङ्कअं जाआ ॥ ६ ॥

[दोहद[4]मात्मनः किं न मृगयसे मृगयसे कुरबकस्य ।
एवं तव सुभग[5] हसति वलिताननपङ्कजं जाया ॥]

सुभग, (हौसेनें लावलेल्या) कुरबकाला (फुलें यावींत म्हणून त्याचा) दोहद पुरविण्यासाठीं (त्याला आलिंगन द्यावें म्हणून) तुम्ही प्रियेला प्रोत्साहन देतां; पण आपला पहिला दोहदही पुरवीत नाहीं, म्हणून तुमची पत्नी मुख तिरवें फिरवून (तुमच्या अडाणीपणाबद्दल) तुम्हांला हंसत आहे.

● नायिकेची सखी नायकाला विचारते, तिच्या हंसण्याचा गर्भित अर्थ कळूं नये, एवढे तुम्ही अडाणी कसे ? आतां ती लहान नाहीं; पहा, कशी बहरली आहे ! किंवा पत्नी स्वतःच सूचित करते कीं मी पुष्पिता आहे आणि मलाही स्वतःच्या अशा आशा व इच्छा आहेतच; त्या अगोदर कां पुरवीत नाहीं ? एक टीकाकार सांगतो, यांत प्रथम रजोदर्शनाची सूचना आहे ! दुसरा सांगतो, पत्नी गर्भिणी आहे, तिला स्वतःलाच डोहाळे लागले आहेत आणि हें पतीच्या लक्ष्यांत येत नसल्यामुळें ती त्याला हंसत आहे. भुवनपाल सांगतो कीं या गाथेची नायिका कुलटा आहे !

७ अशोक : 7. Revenge

ताविज्जन्ति असोएहिँ लडहवणिआ[6]ओ दइअविरहम्मि ।
किं सहइ कोवि कस्स वि पाअपहारं पहुप्पन्तो ? ॥ ७ ॥

१. दोहलिअं, दोहळम्. २. खु. ३. मुह. ४. नवदोहदम्. ५. एवं खु सुभग, एवं खलु सुभग त्वां. ६. विलआउ.

[ताप्यन्ते अशोकैर्विदग्ध[1]वनिता दयितविरहे ।
किं सहते कोऽपि कस्यापि पादप्रहारं प्रभवन्[2] ॥]

प्रियकराच्या विहारामुळें (विकल झालेल्या) विदग्ध स्त्रियांना अशोकही तापदायक वाटतो. सामर्थ्य असूनही कोण कोणाचा लत्ता-प्रहार सहन करील ?

● अशोकाला शोक माहीतच नाहीं, मग तो परपीडेला कसा उद्युक्त होईल ? पति सन्निध असताना, त्याच्या प्रोत्साहनानें किंवा त्याच्या पाठिंब्यावर विसंबून तिनें केलेल्या लत्ताप्रहारांची अशोकाला आठवण असेल; आतां वसंतांत तो फुलांनीं डंवरला आहे, मस्त झाला आहे; पति सन्निध नसल्यामुळें ती विकल झालेली आहे; तिच्या पूर्वींच्या धार्ष्ट्याबद्दल जणूं तिचा सूड घेण्याला अशोक उद्युक्त झाला आहे, आवेशानें लालबुंद झाला आहे; पुष्पित अशोकाचें दर्शन तिला कसें सहन होईल ? प्रोषित-भर्तृका विरहाच्या अखेरच्या अवस्थेंत आहे, शिवाय वसंत सुरू झाला आहे, त्वरेनें घरीं जा, अशी दूतीची प्रवासी पतीला सूचना; किंवा वसंतांत प्रवासाला सज्ज झालेल्या पतीचा निषेध.

८ तळ्याच्या पाळीं : 8. Withered stalks.

अत्ता[3] ! तह रमणिज्जं अह्मं गामस्स[4] मण्डणीहूअम्[5] ।
लुअ[6]तिलवाडिसरिच्छं सिसिरेण कअं भिसिणि[7]सण्डम्[8] ॥ ८ ॥

[श्वश्रु[9] तथा रमणीयमस्माकं ग्रामस्य मण्डनीभूतम् ।
लूनतिलवाटीसदृशं शिशिरेण कृतं बिसिनीषण्डम् ॥]

१. ललित, मनोहर. २. पुष्पितः. ३. अत्तन्तह. ४. गाअस्स. ५. मंडणअभूदं. ६. लुअ. ७. वि सिणिसंडं. ८. सण्डम्. ९. हे मातस्तथा, अत्यंत.

आत्याबाई, आपल्या गांवाला शोभा देणाऱ्या रमणीय तळ्यांतील कमळांची थंडीनें कोण दुर्दशा केली आहे (ती पाहिलीत का) ? तिळाचें सुंदर पीक कापल्यावर नुस्ते बुडखे राहातात ना, तसे तळ्यांत आतां कमळांचे दांडे मात्र राहिले आहेत.

● तिळवाडींत संकेत ठरला होता; पीक तयार झाल्यामुळें कापणीला शेतकरी तिकडे जातील, म्हणून संकेतस्थान बदलून तळयाच्या पाळीं जागा ठरविल्याची सूचना. हिंवाळ्यांतल्या थंडीनें कमळें करपलेलीं असल्यामुळें आता तिकडे कोणीही जाणार नाहीं व एकांत मिळेल अशी उपपतीला सूचना. या दोन्ही ठिकाणीं जमणार नाहीं, म्हणून घरींच संकेत ठरविला आहे, अशी या गाथेंत सूचना आहे, असें एका टीकाकाराचें म्हणणें आहे ! सासूच्या देखत सुनेनें आणखी किती स्पष्ट बोलावयाचें ? पण जें बोलावयाचें तें एवढें संदिग्ध, तर बिचाऱ्या प्रियकरानें जावें तरी कोठें ?

९ तागाच्या शेतांत : 9. Hemp.

किं[1] रुआसि ओणअमुही धवलाअन्तेसु सालिछित्तेसु[2] ।
हरिआलमण्डिअमुही णडि व्व सणवाडिआ जाआ ॥ ९ ॥

[किं रोदिष्यवनतमुखी धवलायमानेषु शालिक्षेत्रेषु ।
हरिताल[3]मण्डितमुखी नटीव शणवाटिका जाता ॥]

साळीचें शेत पिकून पांढरें झालें आहे. (तें कापण्याला शेतकरी येतील व एकांत मिळणार नाहीं) म्हणून मान खालीं घालून कां रडतेस ? नटीनें मुखाला हरितालाचा रंग लावून सज्ज व्हावें त्याप्रमाणें तागाचें शेत (पिंवळ्या धमक फुलांनी) नटलें आहे.

१. मा रुअसु. २. छेत्तेसु. ३. जाल.

● 'हरितालमण्डितमुखी' हा पाठ स्वीकारून केलेलें भाषांतर वर दिलेलें आहे. ' हरिजालमण्डितमुखी ' असाही पाठ आहे. हरि म्हणजे माकड; ज्याचें प्रवेशद्वार माकडांच्या घरट्यांच्या जाळ्यानें मण्डित झालें आहे असें तागाचें क्षेत्र, असा अर्थ गंगाधरानें दिला आहे. प्रवेशद्वारार्शीच ही अडचण आहे, म्हणून तेथें संकेताला योग्य असें निर्जन स्थान व्यक्त होतें, असें त्याचें म्हणणें. ' हरिआल ' म्हणजे मुंग्या खाणारा प्राणी किंवा पक्षी, असाही अर्थ आढळतो. मान खालीं घालून रडतेस कशाला ? दुसरीकडे संकेत ठरवून मी आलें सुद्धां; उठ, डोळे पूस, मुखराग लावून सज्ज हो आणि ती तिकडे पिंवळी पट्टी दिसते आहे ना, त्या तागाच्या शेताकडे जा, अगदीं प्रसन्न चित्तानें जा, शृंगारनाट्याची सामुग्री तेथें तयार आहे, अशी दूतीची सूचना.

१० कांकडीचा तंतु : 10. Tendril.

सहि[1] ! ईरिसिच्चिअ[2] गई, मा रुव्वसु तंसवलिअ[3]मुहअन्दम् ।
एआणँ वालवालुङ्कितन्तुकुडिलाणँ पेम्माणम् ॥१०॥

[सखि ईदृश्येव गतिर्मा रोदीस्तिर्यग्वलितमुखचन्द्रम् ।
एतेषां बालकर्कटीतन्तुकुटिलानां प्रेम्णाम् ॥]

सखे — मुखचंद्र तिरपा फिरवून रडूं नको. प्रेमाची गती कांकडीच्या कोंवळ्या तंतूसारखी (नाजूक व) वांकडीच असावयाची.

● कलहान्तरितेप्रत सखीचे उद्गार. प्रियकराच्या प्रीतींत वक्रता दिसली, म्हणून एवढें जिवाला लावून घेऊं नको; अपराधी प्रियकर पुन्हां अनुनयासाठीं आला तर फार ताणूनही धरूं नको. प्रेमाची गति वक्र असते, इतकेंच नव्हे, अनुबन्धाचा तंतु नाजुक असतो, ताणल्यानें तो सरळ होत नाहीं, तुटतो मात्र, हें जाणून, हे मानिनी, आतां तूंच त्याचा अनुनय कर.

१. गइ. २. एरिसि च्चिअ. ३. तिरिअ.

११ नवऱ्यावर स्वार :　　11. Cavalier.

पाअपडिअस्स पइणो पुट्ठिं पुत्ते समारुहन्तम्मि ।
दढमण्णुदुण्णिआएँ[1][2] वि हासो घरिणीएँ णेक्कन्तो ॥११॥

[पादपतितस्य पत्युः पृष्ठं पुत्रे समारुहति ।
दृढमन्युदूनाया[3] अपि हासो गृहिण्या निष्क्रान्तः ॥]

क्रुद्ध गृहस्वामिनीच्या पायां पडणाऱ्या पतीच्या पाठीवर पुत्र बसला. पत्नी अतिशय रागांत होती, तरी हें दृश्य पाहून ती खुद्कन् हंसली.

● पत्नीनें मान धारण केला होता आणि पति तिची मनधरणी करीत होता. पति स्वाधीन असल्यामुळें तिच्या मनात त्याच्याविषयीं थोडासा अनादरही होता. ती पुत्रवती, अर्थात् गलितयौवना; तरीही त्याच्या मनांत मात्र तिच्याविषयीं स्नेहातिशय होता. अलंकारकौस्तुभांत श्री विश्वेश्वरपण्डित सांगतो, पुत्राच्या विलक्षण चेष्टेमुळें तिचा मान ओसरला. गंगाधर सांगतो, बन्धविशेषस्मरणामुळें ती हंसली ! कदाचित् हे उद्गार सपत्नीचे असावेत, असाही त्याचा तर्क आहे ! अलंकारकौस्तुभांत समाधि अलंकाराचें उदाहरण : 'भवति समाधिः सुकरे हेत्वन्तर-समवधानतः कार्ये ।'

१२ योग्य :　　12. Praiseworthy.

सच्चं[4], जाणइ दट्ठुं ! सरसम्मि[5] जणम्मि जुज्जुए राओ ।
मरउ, ण तुमं भणिस्सं, मरणं वि सलाहणिज्जं से ॥१२॥

[सत्यं[6] जानाति द्रष्टुं सदृशे जने युज्यते रागः ।
म्रियतां न त्वां भणिष्यामि मरणमपि श्लाघनीयं तस्याः[7] ॥]

१. दठ. २. दूमिआए, दुम्मिआइ. ३. दृढमन्युदुर्मनस्काया: ४. सचिअ. ५. सरिस. ६. सैव. ७. अस्या:

अनुरूप व्यक्तीवर अनुराग करावा हें योग्य आहे. (तिनें तुझी निवड केली यावरून दिसून येतें कीं) तिची निवड चांगली आहे. (आतां तुझ्या विरहानें) ती गतप्राण झाली● तर तेंही प्रशंसनीय होईल; मी तुला बोल लावणार नाहीं.

● तिचें चित्त तुझें ध्यान करण्यांत गुंतलेलें असतांना ती गतप्राण झाली तर पुढील जन्मीं तरी तूं तिला प्राप्त होशील! नायक व नायिका परस्परांना अनुरूप आहेत अशी प्रशंसापूर्ण प्रस्तावना करून सखी नायकाला प्रोत्साहन देते, नंतर त्याची निर्भत्सना करते व अखेरीस त्रागा करून सांगते कीं तुझ्या समागमासाठीं तिनें प्राणांतिक अनुष्ठान मांडलें आहे आणि तिची अवस्था आसन्नमरण झालेली आहे. अलङ्काररत्नाकरांत ही गाथा व्यत्यासाचें आणि अलंकारकौस्तुभांत आक्षेपाचें उदाहरण म्हणून उदाहृत केलेली आहे. ' दोषगुणयोरन्यथात्वं व्यत्यासः ' ॥६६॥ अलङ्काररत्नाकर. ' इष्टस्याप्यपिधातुं योऽर्थस्य विशेषबोधाय । स्वयमेव प्रतिषेधः स वक्ष्यमाणोक्तविषय आक्षेपः ॥ ' अलंकारकौस्तुभ.

१३ चंद्रा : 13, Full Moon.

घरिणीएँ महाणसकम्मलग्गमसिमलिइ[१]एण हत्थेण ।
छित्तं[२] मुहं हसिज्जइ चन्दावत्थं गअं पइणा ॥१३॥

[गृहिण्या महानसकर्मलग्नमषीमलिनितेन हस्तेन ।
स्पृष्टं मुखं हस्यते चन्द्रावस्थां गतं पत्या ॥]

स्वयंपाक करीत असतांना हाताची काजळी लागल्यामुळें गृहिणीचें मुख मलिन झालें होतें. पण पतीनें तिच्या मुखाला प्रेमानें हात लावतांच ती हंसली व तिचें प्रफुल्ल मुख चंद्रासारखें दिसूं लागलें.

---

१. मइलिएण, मइलिळएण. २. छिक्कं.

● गाथेच्या परिचयांत गंगाधर सांगतो कीं हे उद्गार गृहकृत्यपराङ्मुख गृहिणीला उद्देशिलेले आहेत; आणि टीकेंत सांगतो कीं जें ज्याचें उचित कर्म तें करीत असतांना त्यामुळें वैरूप्य प्राप्त झालें तरी तें भूषणावह असतें. तिची कांति उजळ आणि मुख निष्कलंक असल्यामुळें चंद्राहून सुंदर होतें. अशा सुंदरींना चूलखण्डाविषयीं थोडाबहुत अनादर असतोच. तिच्या निष्कलंक मुखावर काजळी उडाल्यामुळें तें मलिन झालें, पण तें प्रेमस्पर्शामुळें उजळलें. तिचें मुख व वस्त्र मलिन असलें तरी दुर्लक्ष करूं नको, अशी दूतीची सूचना. या गाथेंत शृङ्गार व हास्य यांचा हास्यप्रधान सङ्कर आहे असें साहित्यमीमांसाकाराचें म्हणणें आहे. अलंकारकौस्तुभांत निदर्शना अलंकाराचें उदाहरण : 'उपमापर्यवसन्नो यत्रार्थोऽन्योन्यमन्वयानर्हः। यच्च क्रियया कारणकार्यान्वयधीर्निदर्शना सोक्ता ॥' सरस्वतीकण्ठाभरणांत विकृत प्रपञ्चोक्तिचें उदाहरण : 'साम्योत्कर्षापकर्षोक्तेरुपमानोपमेययोः। प्रकृता विकृता चेति प्रपञ्चोक्तिः प्रदर्श्यते ॥'

१४ रंगेल अग्नि : 14. Scent.

रन्धणकम्मणिउणिए ! मा जूरसु[1], रत्तपाडलसुअन्धम् ।
मुहमारुअं पिअन्तो धूमाइ सिही, ण पज्जलइ ॥१४॥

[रन्धनकर्मनिपुणिके मा क्रुध्यस्व[2] रक्तपाटलसुगन्धम् ।
मुखमारुतं पिबन्धूमायते शिखी न प्रज्वलति ॥]

तूं स्वयंपाक करण्यांत निपुण आहेस. चूल पेटत नाहीं म्हणून रागावूं नकोस. तुझ्या श्वासाला लाल पाटल पुष्पांचा सुगंध आहे. त्याचा स्वाद घेण्यासाठीं अग्नि धुराच्या रूपानें तुझ्या मुखाभोंवतीं घोंटाळत आहे व मुद्दामच प्रज्वलित होत नाहीं.

● चूल पेटली कीं तूं आणखी फुंकणार नाहींस. चुलीपासून दूर जाशील आणि प्रज्वलित अग्नीला तुझ्या मुखाजवळ घोंटाळतां येणार नाहीं, म्हणून

१. झूरसु. २. खिद्यस्व, सदिहि.

केवळ तुझ्या सहवासासाठीं तो धुमसत आहे, इंधन ओलें आहे म्हणून नव्हे; अधर आरक्त व सरस आहेत, म्हणून ! अग्नीच्या पूजेला रक्तपाटलपुष्पें विशेष उचित. धुराच्या रूपानें प्रत्यक्ष अग्निदेव तुला बिलगत आहे; त्याला जें आकर्षक वाटतें तें आम्हांलाही मोहवितें, आम्हीही तुझ्याभोंवतीं घोंटाळत आहोंत, आमच्या अंतःकरणांत आसक्ति अशीच धुमसत आहे; पण तूं आपल्याच नादांत गर्क आहेस, जरा मान वर करून पहा तर खरी, अशी अभिलाषसूचना. एक टीकाकार सांगतो, या गाथेची नायिका केवळ रन्धनकर्मांतच निपुण आहे असें नाहीं! सरस्वतीकण्ठाभरणांत गन्धरतीचें उदाहरण म्हणून ही गाथा उधृत केलेली आहे.

१५ बिचारी : 15. Innocence.

किं किं दे पडिहासइ ? सहीहिँ पुच्छिआएँ मुद्धाए ।
पढमुग्गअदोहॅणीए णवरं दइअं गआ दिट्ठी ॥१५॥

[किं किं ते प्रतिभासते सखीभिरिति पृष्टाया मुग्धायाः ।
प्रथमोद्गतदोहदिन्याः केवलं दयितं गता दृष्टिः ॥]

मुग्धेला प्रथमच डोहाळे लागले होते. सख्यांनीं तिला विचारलें, तुला काय काय आवडतें ? (लगेच) तिची दृष्टि फक्त प्रिय पतीकडे गेली. (वेडी बिचारी !)

● मुग्धेची प्रेमपरीक्षा. वेडी, कारण तिला प्रसूतीच्या वेदना माहीत नव्हत्या; बिचारी, कारण लवकरच बहुप्रसूता सपत्नींच्या अवमालिकेंत हिचा समावेश होणार होता ! णवरं = केवळ, णवरं = नवरा; तिनें फक्त आपल्या प्रिय पतीकडे पाहिलें आणि सुचविलें कीं मला यांच्याशिवाय कोणाचीहि, कशाचीही हौस नाहीं !

---

१. मुद्धअ, मुद्धय. २. दोहलिणीए, दोहलिण्णी, दोहणिणीअ ३. णवरि, णवर.

१६ स्पर्शसंक्रमण : 16. Divine Touch.

अमअमअ गअणसेहर रअणीमुहतिलअ चन्द दे छिवसु ।
छित्तो जेहिँ पिअअमो ममं पि तेहिं विअ करेहिं ॥१६॥

[अमृतमय गगनशेखर रजनीमुखतिलक चन्द्र हे स्पृश ।
स्पृष्टो यैः प्रियतमो मामपि तैरेव करैः ॥]

हे चंद्रा, तूं अमृतमय आहेस, गगनाचा मुकुट आहेस, रजनीच्या मुखावरील तिलक आहेस. प्रियकराला स्पर्श करशील त्याच किरणांनीं मलाही स्पर्श कर.

● चंद्रा—तुझे किरण अमृतमय आहेत असें लोक म्हणतात, पण त्यांची संजीवनशक्ति माझ्या प्रत्ययास येत नाहीं; तुझें दर्शन आल्हादजनक आहे असें लोक म्हणतात, पण मला तुझ्या सौम्य किरणांची प्रखरता सहन होत नाहीं; कारण मी विरहिणी आहे. ज्या किरणांनीं तूं माझ्या प्रियतमाला स्पर्श केलास ते, ते मात्र मला शीतल व सुखद वाटतील; त्यांचा स्पर्श झाला तरच मला विरहवेदना सहन होतील. तूं रजनीच्या मुखावरील तिलक आहेस, अर्थात् अबलांचा पक्षपाती आहेस, त्यांच्या सौभाग्याचें प्रतीक आहेस, म्हणून मी तुझी प्रार्थना करीत आहे, प्रियकराला त्वरित घराकडे परतण्याची प्रेरणा दे. परिकर अलङ्कार (अलंङ्कारकौस्तुभ) : ' साभिप्रायविशेषेण विन्यासः परिकरः प्रोक्तः । ' सुगंधाच्या संक्रमणाबद्दलचे भवभूतीचे (मालतीमाधव : अंक : १·३८) उद्गार पहा :

उन्मीलन्मुकुलकरालकुन्दकोश प्रश्चोतद्घन मकरन्दगन्धबन्धो ।
तामीषत्प्रचलविलोचनां नताङ्गीम् आलिङ्ग्य पवन मम स्पृशाङ्गमङ्गम् ॥

१७ मनोरथ : 17. Day Dreams.

एहइ[१] सो वि पउत्थो, अहं अ कुप्पेज्ज[२], सो वि अणुणेज्ज ।
इअ कस्स वि फलइ मणोरहाणँ माला पिअअमम्मि ॥१७॥

१. एहिज्ज, एहिइ. २. कुप्पिज्ज.

[एष्यति सोऽपि प्रोषितो अहं च कुपिष्यामि सोऽप्यनुनेष्यति[२] ।
इति कस्या अपि फलति मनोरथानां माला प्रियतमे ॥]

प्रवासी प्रियकर परत येईल, मग मी त्याच्यावर रागावेन, नंतर तो माझी मनधरणी करील; कोणा भाग्यशालिनीच्या अशा मनोरथांची माळ फुलेल, (माझी नाहीं.)

● सखि, आणखी झुरूं नको, उद्यां किंवा परवां तुझा पति प्रवासाहून परत येईल आणि आला कीं तो तुझ्या साऱ्या हौसा पुरवील, अशीं आश्वासनें देणाऱ्या मैत्रिणींना उद्देशून प्रोषितभर्तृकेचे नैराश्योद्गार. समजा, तो परत आला तरी मी मान धारण करूं शकणार नाहीं; कारण त्यातील काव्य समजण्याइतकी रसिकता त्याच्या अंगीं नाहीं, माझी मनधरणी करण्या-इतकें आर्जव त्याच्या ठायीं नाहीं किंवा त्याचा धिक्कार करण्याइतका धीर माझ्या अंगीं नाहीं. मी दुर्दैवी, हेंच खरें.

१८ दुर्दशा : 18. Poverty.

दुग्गअकुडुम्बअट्टी[३] कहँ णु मए धोइएण सोढव्वा ।
दसिओसरन्तसलिलेण उअह रुण्णं व पडएण ॥१८॥

[दुर्गतकुटुम्बाकृष्टिः[४] कथं नु मया धौतेन सोढव्या ।
दशोपसरत्[५]सलिलेन पश्यत रुदितमिव पटकेन ॥]

दरिद्री कुटुंबांत कपड्याचीसुद्धां इतकी दुर्दशा व ओढाताण होते कीं (ती असह्य झाल्यामुळें) धुऊन वाळत घातल्यावर, बिचारा दशांतून गळणाऱ्या पाण्याच्या रूपानें अश्रु ढाळतो.

१. आगमिष्यति. २. अनुनायिष्यति. ३. कुडुम्ब,कुडम्ब, कुडम्ब. ४. कुटुम्बकृष्टि. ५. दशावसरन्.

● वस्त्र विरलें तरी तें वापरावेंच लागतें, एकानेंच नव्हे, अनेकांनीं; जितकी दुर्गति अधिक तितकी ओढाताण जास्त. अनेक महिलांची मर्जी सांभाळूं पाहणाराची अशीच दुरवस्था होते. वेश्येला ग्रामप्रधान द्रव्य देत नाहींत आणि ओढाताण मात्र भरपूर करतात, तिनें कुट्टनीप्रत काढलेले हे उद्वेगाचे उद्गार असावेत, असें एक टीकाकार सांगतो ! दामोदरगुप्ताच्या कुट्टनीमतांतील पुढील समानार्थी उद्गार पहा : ' प्रिय सखि लोक समक्षं नगरप्रभुणा हठेण नीताऽस्मि । एवं तु नो कदाचिद्द्विगुणार्थप्रार्थने कृतो न्यायः । ' (श्री. तनसुखराम त्रिपाठी संपादित प्रतः गुजराती न्यूज प्रेस). दुसरा टीकाकार सांगतो कीं अनेक महिलांचा पति असलेल्या दुर्दैवी दुर्बलाचे हे उद्गार आहेत ! आणखी एक टीकाकार सांगतो, ही चण्डिका नेहमींच माझी अशी ओढाताण करते, ती मला यापुढें कशी सहन होईल, या विवंचनेनें व भावी आपत्तीच्या धास्तीनें वस्त्र अश्रु ढाळीत आहे !

१९ उंडारलेलें वासरूं : 19. Curse.

कोसम्बकिसलअवण्णअ तण्णअ ! उण्णामिएहिँ कण्णेहिं ।
हिअइ[1]च्छिअँ घरँ वच्चमाण धवलत्तणं पाव ॥१९॥

[कोशाम्रकिसलयवर्ण तर्णक उन्नामिताभ्यां कर्णाभ्याम् ।
हृदय[2]स्थितं गृहं व्रजन्धवलत्वं प्राप्नुहि ॥]

आंब्याच्या कोयींतून निघालेल्या कोंवळ्या पानासारखा (तांबूस) रंग असलेल्या वांसरा, तुला कान उचलून आपल्या आवडत्या घरांत घुसतां येतें. तुला तरी कृतार्थता प्राप्त होवो.

● वांसरा—तुझ्या जातीला व वयाला उंडारणें जमतें व शोभतें. तुला धवलत्व प्राप्त होवो. धवलत्व म्हणजे श्रेष्ठता : वांसरा, तुझें वय लहान आहे, तरी तुला सजातीयांमध्यें श्रेष्ठत्व प्राप्त होवो; धवलत्व म्हणजे शुभ्रत्वः वासरा, तुझा वर्ण तांबूस आहे, तरी तुला शुभ्रत्व, यश प्राप्त होवो; धवलत्व म्हणजे पंढत्वः तरुणा, मी वयस्क व इभ्रतीच्या ढोंगामुळें पराधीन; म्हणून

१. हिअइच्छिअं. २. हृदयेप्सितम्.

मला माझ्या आवडीच्या ठिकाणीं जातां येत नाहीं. तुझ्यासारख्या लालबुंद, उंडारलेल्या तरुणापुढें माझा टिकाव कसा लागणार? पण लक्षांत ठेव, तूं जिच्याकडे जात आहेस ती वयस्क आहे, तिच्या मानानें तूं अगदीं बछडा आहेस; अशा संभोगामुळें तुला म्हातारपण मात्र लवकर प्राप्त होईल! तूं माझा मनोभङ्ग केलास, या पापाचें फळ म्हणून तुला षंढत्व प्राप्त होवो! नायिकेच्या घरांत बेधडक घुसण्याचें नायकाला दूतीचें प्रोत्साहन. नायिकेबद्दलचा आपला अनुराग आणि पराधीनतेमुळें प्राप्त झालेली अगतिकता व्यक्त करण्यासाठीं नायकानें तिच्या घराच्या आवारांत उंडारणाऱ्या वांसराला किंवा प्रतिस्पर्धी तरुणाला उद्देशून काढलेले उद्गार.

२० लाडीगोडी : 20. Horripilation.

अलिअपसुत्तअ विणिमीलिअच्छ ! दे सुहअ[1] मज्झ[2] ओआसम् ।
गण्डपरिउम्बणापुलइअङ्ग ण पुणो[3] चिराइस्सम् ॥२०॥

[अलीकप्रसुप्तकविनिमीलिताक्ष हे[4] सुभग ममावकाशम् ।
गण्डपरिचुम्बनापुलकिताङ्ग न पुनश्चिरयिष्यामि ॥]

हे सुभग, तूं झोपेचें सोंग घेऊन (बिछान्यावर) डोळे मिटून पडला आहेस; मला (तुझ्याशेजारीं) जागा दे. (ढोंग्या, तूं जागा आहेस). मी तुझ्या गालाचें चुंबन घेतलें तेव्हां तुझें अंग पुलकित झालेलें मी पाहिलें. हें पहा, मी पुन्हां उशीर करणार नाहीं, बरें का?

● भावजिज्ञासेनें त्यानें निद्रेचें ढोंग केलें, तें तिनें पहिल्या दृष्टिक्षेपांतच ओळखलें. तिनेंही त्याच्या भावनांच्या तीव्रतेची पारख पाहिली. आपण त्याला पाहिजे आहोंत हें तिनें त्याच्या शरीरावर फुललेल्या

१. देसु धअ मज्झ, देसु हअ मज्झ. २. अम्ह. ३. उणो. ४. ददस्व, देहि.

पुलकांवरून ओळखलें. आधुनिक जीवनांत असे प्रसंग किती तरी येत असतील ! एक टीकाकार सांगतो, हे उद्गार उपपतीला उद्देशून आहेत; तुझ्या हृदयांत अनेक महिलांना स्थान आहे, हें मी जाणतें; त्यांतच मलाही थोडी जागा दे, असा आशय. अलंकाररत्नाकरांत उद्भेदाचें उदाहरणः 'निगूढस्य प्रतिभेद उद्भेद ॥ १०१ ॥' माझे मित्र श्री. मोरेश्वर दीक्षित यांना त्रिपुरी येथील उत्खननांत कलचुरी काळांत कोरलेल्या एका शिल्पांत गाथासप्तशतींतील हा प्रसंग दिग्दर्शित केलेला आढळला आहे. त्या खालीं आहे तो लेख त्यांच्या वाचनाप्रमाणें असा: 'अलिअपसुत्त अविलिमीलिअच्छि दे दु अ उवाभ। गण्डपरिच...म...णापुलइ...अ वाणउणो विराइ...॥' मला लिहिलेल्या पत्रांत ते कळवतात 'गाथासप्तशतींतील श्लोक उधृत केलेलें हें पहिलेंच शिल्प आहे.' त्यांच्या कृपेनें प्राप्त झालेलें या शिल्पाचें छायाचित्र मी या ग्रंथाच्या आरंभीं दिलेलें आहे.

२१ घटकेचें महत्त्व : 21. Crucial Moment.

असमत्तमण्डणाविअ[1] वच्च घरं से सकोउहल्लस्स ।
वोलाविअहलहॅलअस्स[2] पुत्ति चित्ते ण लग्गिहिसि ॥२१॥

[**असमाप्तमण्डनैव व्रज गृहं तस्य[3] सकौतूहलस्य ।**
व्यतिक्रान्तौत्सुक्यस्य[4] पुत्रि चित्ते न लगिष्यसि ॥]

(अनुभवी कुंटणि सांगते) मुली, तुझा साजशृंगार पुरा झाला नसला तरी तो उत्सुक आहे तोंवरच आहेस तशीच त्याच्या घरीं जा. (आपण) घटका साधली पाहिजे. (वेळ गमावलास तर) त्याची आसक्ति

१. मण्डणे विअ, मण्डण च्चिअ. २. हलवलं. ३. अस्य. ४. व्यतिक्रान्तरणरणकस्य, व्यतिक्रान्तहलहलकस्य.

शिथिल होईल आणि मग तूं (कितीही नटलेली असलीस तरी) त्याच्या मनांत भरणार नाहींस.

● वेश्यामातेचा दुहितेला उपदेश. ह्या व्यावहारिक खांचाखोंचा नवशिकीला कशा कळणार ? अनुभवासारखा शिक्षक नाहीं ! गंगाधर सांगतो, बाजीरावाचा अनुचर आमंत्रण घेऊन आला तेव्हां अंतर्गृहांत भुजंग बसला होता; विटाला थोपविण्यासाठीं, भुजंगाला सूचना देण्यासाठीं आणि कन्येला सावध करण्यासाठीं घरवालीनें हे उद्गार काढलेले आहेत !

२२ तें चुंबन : 22. Forbidden Kiss.

आअरपणामिओट्ठं अघडिअणासं असंहअणिडालम्[1]। वण्णघिअतुप्पमुहिए[3] तीए परिउम्बणं भरिमो ॥२२॥

[आदरप्रणामितौष्ठमघटितनासमसंहतललाटम्[4]। वर्णघृतलिप्तमुख्यास्तस्याः परिचुम्बनं स्मरामः ॥]

(रजस्वला असल्यामुळें) तिनें मुखाला वर्णघृत लावलें होतें. (मी इच्छा दर्शविल्यामुळें केवळ माझा मान राखण्यासाठीं) तिनें मला चुंबन देण्याकरतां आदरानें ओंठ लववितें, घृताचें चिह्न लागूं नये म्हणून तिनें नाकाचा अगर कपाळाचा स्पर्शही होऊं दिला नाहीं; त्या चुंबनाची आठवण होते.

● सदाचार सांभाळण्यासाठीं पत्नी उत्सुक व तत्पर असली तरी पतीच्या आग्रही प्रीतीपुढें तिचा निग्रह कसा टिकणार ? एकूण, हा अनाचार भासविण्यांत येतो तितका आधुनिक नाहीं ! टीकाकार सांगतात कीं या

१. असंगय, असंघअ, असंवालअ. २ णिलाद, णिदाह, लिलाडं. ३. घिअलित्त, घअलुप्प. ४. निटिलम्.

गाथेतील चुंबन हा अनुरागातिशयसूचक अशा आलिंगनाचाच एक प्रकार आहे; त्याचें नांव स्पृष्टक. वात्स्यायन त्याचें लक्षण सांगतो : ' संमुखागतायां प्रयोज्यायामन्यापदेशेन गच्छतो गात्रेण गात्रस्य स्पर्शनं स्पृष्टकम् ।। (सांप्रयोगिकमधिकरणम् । अध्याय २; निर्णयसागर प्रत; पृ. ९७). हें उष्टें चुंबन तिनें ओणव्यानें दिलेलें असावें ! या गाथेवरून चौरपञ्चाशिकेची आठवण होते !

२३ तीच का ही ? 23. Contrast.

अण्णासआइँ देन्ती तह सुरए हरिसं[1]विअसिअंकवोला ।
गोसे वि ओण[2]अमुही अह [3]सेत्ति पिआं ण सद्द[4]हिमो ।।२३।।

[आज्ञाशतानि ददती तथा सुरते हर्षविकसितकपोला ।
प्रातरप्यवनतमुखी इयं[5] सेति प्रियां न श्रद्दध्मः ।।]

सुरतकाळीं आनंदानें गाल फुललेले असतात तेव्हां ती (उद्दाम धृत्तानें) प्रियकराला शेंकडों आज्ञा देते. सकाळ झाली कीं मान खालीं घालून कामाला लागते आणि ती प्रिया हीच हें खरेंही वाटत नाहीं.

● सनातनी समाजांत मर्यादेच्या मर्यादा अमर्याद आहेत. मात्र मर्यादेचें क्षेत्र केवळ समाजांत. प्रीति एकान्तीं कोणतींही बंधनें जुमानीत नाहीं. पतीच्या अर्ध्या वचनांत असलेली गंभीर वृत्तीची पतिव्रताही पतीला एकांतीं शेंकडों आज्ञा देते, अगदीं एकवचनानें संबोधून ! विनय व विलास हीं सुगृहिणीचीं लक्षणें व भूषणेंही !

१. हसिअविआसिअ. २. ओणय, ओणह. ३. अहसेत्ति, सहसेत्ति. ४. सद्दहिमो. ५. सहसा प्रियेति न.

२४ कुलीन : 24. Etiquette.

पिअविरहो अप्पिअदंसणं गरुआइँ दो वि दुक्खाइं ।
जीएँ तुमं कारिज्जसि तीएँ णमो आहिजाईए[1] ॥२४॥

[प्रियविरहोऽप्रियदर्शनं च गुरुके द्वे अपि दुःखे ।
यया त्वं कार्यसे तस्यै नम आभिजात्यै ॥]

(मला ऋतु प्राप्त झाल्यामुळें लोकाचारासाठीं तुम्हांला इकडे यावें लागलें. यामुळें) तुम्हांला तुमच्या आवडतीचा वियोग झाला व नावडतीचें दर्शन झालें. हीं दोन दुःखें ज्यामुळें सहन करावीं लागलीं त्या कुलीनपणाला नमस्कार असो.

● कुलीन नववधूचे उद्वेगोद्गार. कुलीन घराण्यांतल्या एका उनाड तरुणाचें दुर्वर्तन या गाथेंत सूचित केलेलें आहे. गाथेच्या नायिकेशीं लग्न होण्यापूर्वीच त्यानें दुसरीकडे बिऱ्हाड थाटलेलें असावें. ही बिऱ्हाडकरीण हलक्या कुळांतली किंवा बिनलग्नाची असल्यामुळें त्याची घरधनीण होऊं शकत नव्हती. वडील माणसांच्या आग्रहामुळें, घराण्याच्या इज्जतीसाठीं, त्यांला नायिकेशीं विवाह करावा लागला असावा असें दिसतें. लग्न केलें, मग गर्भाधान केलेंच पाहिजे; आणि त्यासाठीं, त्या रात्रीपुरता तरी आवडतीचा वियोग व नावडतीचा सहवास सहन केलाच पाहिजे. बाह्यात्कारीं शिष्टाचारांचें पालन हाच कुलीनपणा ! आणि यालाच मध्ययुगांत बंगाल्यांत आत्यंतिक स्वरूप प्राप्त झालें.

२५ ओले डोळे : 25. Antelope.

एक्को वि कलसारो[2] ण देइ गन्तुं पआहिण[3]वलन्तो[4] ।
किं उण बाहाउलिअं लोअणजुअलं पिअमाए ॥२५॥

१. आहिजाईए, आहियाईए. २. कालसारो, किण्णसारो. ३. दआहिण, पाहिण. ४. वडन्तो.

[एकोऽपि कृष्णसारो न ददाति गन्तुं प्रदक्षिणं वलन्[1] ।
किं पुनर्बाष्पाकुलितं[2] लोचनयुगलं प्रियतमायाः ॥]

एक काळवीट उजवीकडून वळून आडवा गेला तर प्रवास थांबवावा लागतो; मग (हरिणाक्षी) प्रियेचे व्याकुल व ओले असे दोन डोळे तिरपे आडवे आल्यावर प्रवास रहित झाला तर काय नवल ?

● कृष्णसारदर्शनानें प्रवास विफल होतो, यात्रा निष्फळ होते, अशी समजूत प्रचलित होती; अर्थात् व्याधानें विद्ध केलेला कृष्णसार दिसला तरी प्रवाशानें परतलेंच पाहिजे. नायकानें प्रवासाची तयारी केली होती, पण तो कां गेला नाहीं ? भावी विरहाच्या वेदनांनीं व्याकुळ झालेले प्रियेचे ओलावलेले व वळलेले काळेशार डोळे दिसतांच विद्ध कृष्णसारांशीं असलेलें त्यांचें साम्य ध्यानीं आल्यामुळें त्यानें प्रवासाचा बेत रहित केला. अलङ्काररत्नाकरांत अर्थापत्तिचें उदाहरण : ' दण्डापूपिकयापतनमर्थापत्तिः ।... कस्यचिदर्थस्य निष्पत्तावर्थादर्थान्तरस्यापत्तिरिति । '

२६ मी तशी नाहीं : 26. Deceipt.

ण कुणन्तो व्विअ माणं णिसासु सुहसुत्तदरविबुद्धाणम् ।
सुण्णइअपासपरिमूसणवेअणँ[3][4] जइ सि जाणन्तो[5] ॥२६॥

[नाकरिष्य एव मानं निशासु सुखसुप्तदरविबुद्धानाम्[6] ।
शून्यीकृतपार्श्वपरिमोषणवेदनां[7] यद्यज्ञास्यः ॥]

रात्रीं सुखानें झोप लागल्यानंतर थोड्या वेळान जराशी जाग आली; पाहिलें तो पत्नी शेजारीं नाहीं ! (मी पतिव्रता असल्यामुळें) अशा

१. चलन्, चलन्तो. २. मृगपक्षे व्याधाकुलितम्. ३. सुण्णाइअ. ४. मंसण, म्हसण, मुसण. ५. वडन्तो. ६. विबुद्धाम्. ७. परिमर्षण.

फसवणुकीच्या वेदना तुम्हांला माहीत नाहींत, म्हणून सांगतें, माझ्या-बरोबर असे ताठ्यानें वागूं नका.

● अनुनयाचें ग्रहण करण्यांत अनौत्सुक्य दाखविणाऱ्या पतीला उद्देशून उद्विग्न पत्नीचे उद्गार. मला साऱ्यांचें सारें कांहीं माहीत आहे, सवतींचे ढंग व तुमचीं ढोंगें. तरीही मी तुम्हांला प्रसन्न करून घेण्याचा प्रयत्न करीत आहे. मी पतिव्रता आहे, हाही माझा दोषच आहे. स्त्री-वेदांतल्या एखाद्या श्रुतीवर ही गाथा आधारलेली असावी, असें वाटतें.

२७ ढोंग : 27. Pretense.

पणअकुविआणँ दोह्ण वि अलिअपसुत्ताणँ माणइल्लाणम्[1]
णिच्चलणिरुद्धणीसासदिण्णकण्णाणँ[2] को मल्लो ॥२७॥

[प्रणयकुपितयोर्द्वयोरप्यलीकप्रसुप्तयोर्मानवतोः ।
निश्चलनिरुद्धनिःश्वासदत्तकर्णयोः को मल्लः ॥]

दोघांनींहीं रागामुळें झोंपेचें ढोंग घेतलें आहे, श्वास रोधून धरला आहे; दोघेंहि निश्चल आहेत, पण (एकामेकांच्या हालचाली) कान देऊन ऐकत आहेत. हें भांडण प्रेमाचें, पण तेंही सहन करण्याचें सामर्थ्य कोणालाही नाहीं, (मग वृथा कलह कां ?)

● पति-पत्नींनीं एकशय्येवर एकमेकांकडे पाठ फिरवून झोंपेचें ढोंग केलेलें आहे हें निःश्वासनिरोधनावरून उभयतांच्याही लक्षांत आलेलें आहे. अगोदर कोण कुशीवर वळतो याचीच जणूं चढाओढ चाललेली आहे. पण त्यांचें एकमेकांवर प्रेम असल्यामुळें दोघेंहि दुर्बल आहेत आणि हें प्रेमच त्यांची खोडकी जिरवणार आहे. परस्परांना पराङ्मुख असतांना एवढी प्रीति, मग सन्मुख झाल्यावर त्याला केवढी भरती येईल ! पतिपत्नींचा

१. माणइन्ताणम् २. अण्णाण.

समेट करूं पाहणाऱ्या सखीचे उद्गार. सखीला अंतर्गृहांतही अनिर्बंध प्रवेश होता कीं काय ? ' को मल्लः ' हा प्रयोग प्रथमदर्शनीं अपरिचित वाटतो व अभिप्रेत प्रसंगामुळें अप्रयोजक वाटतो, पण तो अन्वर्थक आहे, इतकेंच नव्हे, बहुरुचि आहे !

२८ फोंक : 28. Birch.

णवलअपहरं[1] अङ्गे जहिँ जहिँ महइ देवरो[2] दाउम् ।
रोमञ्चदण्डराई[3] तहिं तहिं दीसइ बहूए ॥२८॥

[नवलताप्रहारमङ्गे यत्र यत्रेच्छति देवरो दातुम् ।
रोमाञ्चदण्डराजिस्तत्र तत्र दृश्यते वध्वाः ॥]

कोंवळ्या फोंकानें दीर तरुण भावजयीला जेथें जेथें प्रहार करूं पाहतो तेथें तेथें अगोदरच रोमांचांची रांग उभी राहते.

● प्रहारापूर्वींच जणूं वळ उमटतात; जणूं प्रीतिचिन्ह व्यक्त होण्यापूर्वींच त्याच्या रक्षणार्थ सभोंवार रोमांचांच्या रांगा उमलतात ! एवढी प्रतिक्रिया व्हावी इतकी सहसंवेदना अनुरक्तीमुळें त्यांच्या अंतःकरणांत निर्माण झाली होती, कीं वधूचें अधर्मापासून निवारण करण्यासाठीं हें कुंपण उभारलें गेलें होतें ! प्रस्तुत गाथेंतील नायिका देवरानुरक्त असल्यामुळें-असाध्य आहे अशी तिचा अभिलाप करणाऱ्या कामुकाला दूतीची सूचना. साहित्यमीमांसेंत या क्रीडेला ' नवलतिका ' अशी संज्ञा दिलेली आहे. भुवनपालानें नवलतिकेऐवजीं कुवलय प्रवाह केला आहे !

---

१. णवलआपहारभङ्गे, णवळअपअरं. २. दिअरो, देअरो. ३. दन्तुराइम्.

२९ मेघगर्जना : 29. Thunder.

अज्ज मए तेण विणा अणुहूअसुहाइँ[1] संभरन्तीए ।
अहिणवमेहाणँ[2] रवो णिसामिओ वज्झपडहो व्व ॥२९॥

[अद्य मया तेन विना अनुभूतसुखानि[3] संस्मरन्त्या ।
अभिनवमेघानां रवो निशामितो वध्यपटह[4] इव ॥]

अगोदरच त्यांचा वियोग आणि त्यांत ही पहिली मेघगर्जना. या गर्जनेमुळें भोगलेल्या सुखांची आठवण होऊन मी व्याकुल झालें आहे. गुन्हेगाराला वधस्तंभाकडे (नेतांना त्याच्या गुन्ह्यांची घोषणा करून) नगारा वाजवतात, त्याच्या आवाजासारखी ही गर्जना मला भासते.

● मेघांचा गडगडाट ही आलिंगनाला केवढी सबब ! कालिदास (मेघदूतः १-३) सांगतोः 'मेघालोके भवति सुखिनोऽप्यन्यथा वृत्ति चेतः । कण्ठाश्लेष प्रणयिनि जने किं पुनर्दूरसंस्थे ॥' मेघांच्या नुसत्या दर्शनानें चित्तवृत्ति एवढ्या उचंबळून येतात, मग त्यांच्या गर्जनेनें हृदयांत केवढी खळबळ उडत असेल ! गुन्ह्यांची घोषणा (प्रस्तावना पहा) होते त्या वेळीं गुन्हेगाराला आपल्या अपकृत्यांची आठवण होते, त्याचप्रमाणें मेघगर्जना ऐकून विरहिणीला पूर्वी उपभोगलेल्या सुखांची !

३० जायाभीरुक : 30. Henpecked.

णिंकिव[5] जाआभीरुअ दुद्दंसणं[6] णिम्बईडसारिच्छ[7] ।
गामो गामणिणन्दण तुज्झ कए तह वि तणुआइ ॥३०॥

---

१. अणुभूअसुहाइं. २. अहिणवमोहणरवो. ३. अनुभूतसुरतं. ४. वध्यपटह. ५. णिक्किअ. ६. दुद्दस्सण. ७. णिम्बकीड.

[निष्कृप[1] जायाभीरुक दुर्दर्शन निम्बकीटसदृक्ष[2] ।
ग्रामो ग्रामणीनन्दन तव कृते तथापि तनुकायते ॥]

पाटलाच्या पोरा, तूं बायकोच्या तंत्रानें वागतोस व तिला भितोस; तूं कडू लिंबाच्या झाडावरील किड्यासारखा आहेस. तूं कोणावरही कृपा करीत नाहींस; (आम्हांला) तुझें दर्शनही होत नाहीं. तरी गांव तुझ्यासाठीं झुरत आहे.

● पाटलांचा पोरगा कसा स्वच्छंन्दी, निर्भय व कृपाळु असला पाहिजे; पण हा—हा कांहीं करीत नाहीं, कोणावर प्रसन्न होत नाहीं, लग्नाच्या बायकोच्या तंत्रानें वागतो आणि तिला भितो; शिवाय ही बायको कशी ? लिंबाच्या पानांच्या रसासारखी कडू. कडू लिंबाच्या झाडावरील किड्याला कडू रसांतच स्वारस्य वाटतें; कारण मधुर रसाची गोडी त्यानें कधीं चाखले-लीच नसते; शिवाय तो कधीं बाहेर दिसतही नाहीं; तसाच हा. बायकोला सोडून घरांतून बाहेर पडला तरच तो गांवभवान्यांना दिसणार ! त्यांपैकीं एकीनें त्याला पाठविलेला निर्वाणीचा निरोप ह्या गाथेंत ग्रथित केलेला आहे.

३१ निर्धास्त : 31. Hero.

पहरवणमग्गविसमे जाआ किच्छेण लहइ से णिद्दम् ।
गामणि[3]उत्तस्स उरे पल्ली उण सा सुहं सुवई[4] ॥३१॥

[प्रहारव्रणमार्गविषमे जाया कृच्छ्रेण लभते तस्य निद्राम् ।
ग्रामणीपुत्रस्योरसि पल्ली पुनः सा सुखं स्वपिति ॥]

पाटलाच्या पुत्राच्या छातीवर जखमांचे वण आहेत. सारा गांव त्या छातीवर विसंबून सुखांत झोंपला आहे. (मात्र त्याच्या खडबडीत छातीवर मस्तक टेंकून शेजारीं पहुडलेल्या) त्याच्या पत्नीला झोंप येत नाहीं.

१. निष्क्रिय. २. सदृश. ३. गामिणि. ४. सुअई.

● ती सुखासक्त आहे, विलासिनी आहे, तिला मऊ मऊ उशांची संवय आहे. अशा खडबडीत छातीवर मस्तक टेंकून तिला झोंप कशी येणार? प्रीतीमुळें नव्हे, भीतीमुळें, अनिच्छेनें, केवळ कर्तव्य म्हणून तिनें त्याच्या छातीवर मस्तक टेकलें आहे. गांवकरी निर्धास्त असल्यामुळें गाढ झोंपले आहेत; आणि तोही. धास्तीमुळें तिला मात्र झोंप नाहीं. ती सुसाध्य आहे, जागी आहे, तळमळत आहे; निर्धास्तपणें तिच्याकडे जा व खूण कर, कोणताही अडथळा येणार नाहीं, अशी दूतीची भुजङ्गाला सूचना. पर्क्षीः उर = पुर; डोंगरी खेड्याकडे जाण्याची पहाडी वाट लांब आणि अवघड वळणांची व चढउताराची आहे; म्हणून तिकडे सहसा कोणी फिरकत नाहीं; शिवाय पाटलाच्या मुलाच्या शौर्यावर गांवकऱ्यांचा पूर्ण विश्वास असल्यामुळें रात्रीं पहारेकरीही हिंडत नाहींत. यामुळें तुला निर्धास्तपणें कार्यभाग साधतां येईल, असें दूतीचें भुजङ्गाला आश्वासन.

३२ संभावित : 32. Creditable.

अह संभाविअमग्गो सुहअ तुए जेव्वं णवरँ णिव्वूढो ।
एँह्णिं हिअए अण्णं अण्णं वाआइ लोअस्स ॥३२॥

[अयं संभावितमार्गः सुभग त्वयैव केवलं निर्व्यूढः ।
इदानीं हृदयेऽन्यदन्यद्वाचि लोकस्य ॥]

नेहमीं खरें बोलणें हाच खरा संभावितपणा, (तुम्ही खरें तेंच बोललांत) आणि खरें बोलण्यांत संभावितपणाच दाखविलांत. नाहीं तर इतरांच्या हृदयांत असतें एक व ते बोलून दाखवितात दुसरेंच.

● गाथासप्तशतींत नामस्खलनाच्या अनेक गाथा आहेत. पुनरुच्चारामुळें या विषयाला संकेताचें स्वरूप आलेलें आहे. या संकेताला मीं ‘ विरचिता-संकेत ’ (प्रस्तावना पहा) ही संज्ञा दिली आहे. भावप्रकाशांत सुभग-लक्षण

१. च्चअ, च्चिअ, च्चेव. २. णिव्वूहो. ३. इण्हिं. ४. सद्भावित. ५. कलिकाले.

दिलेलें आहे : ' सपत्नीनखदंतादिचिन्हं यस्य न दृश्यते । विस्मार्यमाणमानेर्ष्यः सुभगः सोऽभिधीयते ।। ' तुमच्या हृदयांत सदैव असणाऱ्या सहचरीचें नांव घेऊन तुम्ही मला कुरवाळतां; तिच्यावरच तुमचें खरें प्रेम आहे; म्हणून तुमचे हे उद्गारही खरे आहेत. नेहमीं खरें बोलणें हाच खरा संभावितपणा.

३३ पराङ्मुखी : 33. Repentence.

उह्लाइँ[1] णीससन्तो किंति मह परम्मुहीएँ सअणद्धे ।
हिअअं पलीविअ वि अणुसएण पुट्ठिं[2] पलीवेसि[3] ।।३३।।

[उष्णानि[4] निःश्वसन्किमिति मम पराङ्मुख्याः शयनार्धे ।
हृदयं प्रदीप्याप्यनुशयेन पृष्ठं प्रदीपयसि ।।]

बिछान्याच्या अर्ध्या भागावर मी तुमच्याकडे पाठ फिरवून पडलें आहे. (सवतीच्या मत्सरानें) तुम्ही प्रथम माझें हृदय पेटविलें आणि आतां ऊष्ण निःश्वासांनीं माझी पाठ कां तापवितां ?

● प्रणयकुपिता नायिका एकशय्येवर पतीकडे पाठ फिरवून पहुडली आहे, शेजारीं अस्वस्थ पति निःश्वास टाकीत आहे; पत्नी पराङ्मुख झाल्यामुळें त्याचें हृदय तापलें होतें, म्हणून त्याचे निःश्वास उष्ण होते. पण नायिकेला वाटलें, कारण तो अपराधी आहे असें तिनें गृहीत धरलें होतें, कीं त्यांतून त्याचा अनुताप व्यक्त होत नसून त्याची सपत्नीबद्दलची अनुरक्ति प्रतीत होत आहे; म्हणूनच या लटक्या दाक्षिण्याची धग तिला असह्य वाटली.

३४ विकल : 34. Languid.

तुह विरहे चिरआरअ ! तिण्णा[5] णिवडन्तवाहमइलेण ।
रइरहासिहरधएण व मुहेण छाहि व्विअ ण पत्ता ।।३४।।

---

१. उण्ण विणिस. २. पेट्टं. ३. पेलेप्पयासि. ४. उष्णं विनिश्वसन्. ५. तिस्सा.

[तव विरहे चिरकारक तस्या निपतद्बाष्पमलिनेन ।
रविरथशिखरध्वजेनेव मुखेन च्छायैव न प्राप्ता ॥]

सूर्याच्या रथावरील झेंड्याला केव्हांही छाया मिळत नसल्यामुळें तो नेहमीं मळूल असतो. तुझ्या विरहामुळें तिचें मुख संतत अश्रु-धारांनीं मलिन झालें आहे व त्यावर थोडीही छाया (कांति) राहिलेली नाहीं.

● प्रसाधनाच्या अभावीं आणि अश्रूंच्या ओघळांमुळें तिचें मुख निष्प्रभ व मलिन झालेलें आहे. तुझ्या सहवासाच्या सावलीच्या अभावीं आणि विरहाच्या तापामुळें तिच्या मुखावर कांति राहिलेली नाहीं. आतां तरी तिच्यावर अनुकंपा कर अशी दूतीची विनंती. विरहिणीच्या अवस्थेचें दूतीनें केलेलें वर्णन.

३५ लक्ष्मण : 35. Ideal.

दिअरस्स असुद्धमणस्स कुलवहू णिअकुड्डलिहिआइं ।
दिअहं कहेइ रामाणुलग्गसोमित्तिचरिआइं ॥३५॥

[देवरस्याशुद्धमनसः कुलवधूर्निजककुड्यलिखितानि ।
दिवसं कथयति रामानुलग्नसौमित्रिचरितानि ॥]

अशुद्ध मनाच्या दीराला (सन्मार्ग दाखविण्यासाठीं) रामाशीं एकनिष्ठ असणाऱ्या लक्ष्मणाच्या चरित्राचा वृत्तान्त कुलवधू भिंतीवर दिवसभर लिहीत असते.

● दीराचा अभिप्राय तिनें ओळखला होता. त्याची वाच्यता केली तर कुटुंब मोडेल या भीतीनें कुलवधू त्याचा उघड निषेध करीत नाहीं, पण आपली प्रतिकूलता विनयानें प्रकट करते. भावजयशीं दीरानें कसें वागावें

याचा आदर्श. लक्ष्मणानें नजर वर करून सीतेचें मुख कधीं पाहिलें नव्हतें; अवयवांपैकीं पावलें व अलंकारांपैकीं नूपुर, एवढेच त्याच्या परिचयाचे होते; तुम्ही माझ्याशीं लक्ष्मणासारखे वागा, सुग्रीवासारखे वागूं नका, अशी भाउजींना सूचना देण्यासाठीं तिनें लक्ष्मणाचें चित्र रंगविलें किंवा चरित्र लिहिलें. कदाचित् जावेनें आपल्या पतीचा अभिप्राय ओळखून व नववधूचा अल्लडपणा पाहून हा उपदेश केलेला असावा.

३६ शील : 36. Syllogism.

चंत्तरघरिणी[1] पिअदंसणा अ तरुणी पउत्थवइआ[2] अ ।
असई सअंज्जिआ[3], दुग्गआ अ, ण हु खण्डिअं सीलम् ॥३६॥

[चत्वरगृहिणी[4] प्रियदर्शना च तरुणी प्रोषितपतिका च ।
असतीप्रातिवेशिनी[5] दुर्गता च न खलु खण्डितं[6] शीलम् ॥]

तिचें घर भर चौकांत आहे; ती तरुण आहे, सुंदर आहे; तिच्या शेजारणी छिनाल आहेत; तिचा पति प्रवासांत आहे, तिची कौटुंबिक दुर्गति आहे; तरीही तिनें आपलें शील ढळूं दिलें नाहीं.

● असतीचें आत्मसमर्थन. गंगाधर सांगतो हा विशेषोक्ति अलंकार : 'विशेषोक्तिरखण्डेषु कारणेषु फलावच : ।' अलंकारकौस्तुभांत समुच्चयाचें उदाहरण : 'एकस्मिन्सति हेतौ हेत्वन्तरगीः समुच्चयः कथितः ॥ अत्रैषां व्रतभङ्गहेतुत्वादसतां योग : ।'

३७ भोंवरा : 37. Whirlpool.

तालूरभमाँउलखुडिअकेसरो[7] गिरिणईएँ पूरेण ।
दरवुड्डउवुड्डणिवुड्डमहुअरो[8] हीरइ कलम्बो ॥३७॥

---

१. चच्चर. २. पइआ. ३. सपाज्जिआ, सअंजिआ, सह्यज्जिआ, सअण्णआ. ४. चतुर. ५. सहवासिनी, प्रतिवेश्मिका. ६. स्फुटित. ७. भमणसंखुडिअ. ८ वुड्डवुड्डणिव्वुड्ड, वुड्डवुड्डणिव्वुड्ड.

[जलावर्तभ्रमाकुल[१]खण्डित[२]केसरो गिरिनद्याः पूरेण ।
दर[३]मग्नोन्मग्ननिर्[४]मग्नमधुकरो ह्रियते कदम्बः ॥]

डोंगरांतील नदीच्या पुरांत वाहत आलेली कदम्बाची फांदी भोंवऱ्यांत सांपडल्यामुळें तिच्यावरील फुलांचे पराग तुटून गेले आहेत (व मकरन्द धुऊन गेला आहे). त्या फुलांना बिलगलेला भ्रमर जरा बुडतो, जरा वर येतो, पुन्हा बुडतो, तरी तो त्यांवरील आपला स्नेह सोडीत नाहीं.

● नदीतीरावरील कदम्बाच्या कुंजांत संकेतस्थान निश्चित केलें आहे किंवा कदम्ब कुंजांतील संकेतस्थान नष्ट झालें आहे, अशी दूतीची सूचना. किंवा: ठरल्याप्रमाणें मी संकेतस्थानीं गेलें आणि पुष्कळ वेळ वाट पाहिली, पण तो आलाच नाहीं, अशी नायिकेची दूतीजवळ तक्रार. दुरवस्थेंतही सज्जन स्वधर्माचा त्याग करीत नाहींत, हें सरळ तात्पर्य; तिचें यौवन नष्ट झालें, तरी सज्जन प्रियकरानें तिचा त्याग केला नाहीं; आणि तूं, निर्दया, तिच्याकडे ढुंकूनही पहात नाहींस; ह्या टीकाकारांच्या सूचना.

३८ आभिमान : 38. Dignity.

अहिआअमाणिणो दुग्गअस्स छाहिं पअ[५]स्स रक्खन्ती ।
णिअबन्धवाणँ जूरइ घरिणी विहवेण एत्ता[६]णम् ॥३८॥

[आभिजात्यमानिनो दुर्गतस्य छायां पत्यू रक्षन्ती ।
निजबान्धवेभ्यः क्रु[७]ध्यति गृहिणी विभवेनागच्छ[८]भ्यः ॥]

---

१. भ्रमात्खण्डित. २. स्फुटितकेसरो. ३. दरमग्नमग्नोन्मग्न. ४. निर्मल. ५. पइअस्स, पइस्स, पिअस्स. ६. पत्ताणं, ७. खियति, निन्दति, ८. प्राप्तेभ्यः

माहेरचीं माणसें थाटमाट करून (अगर मदत म्हणून द्रव्य देण्याला) आलीं तर गृहिणी त्यांजवर रागावते; कारण तिच्या नवऱ्याला आपल्या उच्च कुलाचा अभिमान आहे आणि विपन्नावस्था आलेली असली तरी तिला त्याच्या अभिमानाचें रक्षण करावयाचें आहे.

● पतिव्रता नायिका. टीकाकार सांगतात, तिला पैशाचा लोभ नाहीं, पतीपुढें तिला बंधुजनांचेंही महत्त्व नाहीं, मग तिला कामीजनांची पर्वा कुठली ? ती असाध्य आहे, अशी सूचना.

३९ असाध्य : 39. Duty.

साहीणे वि पिअअमे पत्ते वि खणे ण मण्डिओ अप्पा ।
दुग्गअ[1]पउत्थवइअं सअज्झिअं[2] सण्ठन्वतीए ॥३९॥

[स्वाधीनेऽपि प्रियतमे प्राप्तेऽपि क्षणे न माण्डित आत्मा ।
दुर्गत[3]प्रोषितपतिकां प्रतिवेशिनीं संस्थापयन्त्या ॥]

प्रियकर स्वाधीन आहे व उत्सव सुरू आहे. तरी ती वेषभूषा करीत नाहीं, कारण तिच्या गरीब शेजारणीचा पति प्रवासाला गेला आहे व हिला तिचें सांत्वन करावयाचें आहे.

● पतिव्रता नायिका. तिच्या अंगावर अलंकार नाहींत म्हणून ती दरिद्री आहे असें समजूं नको; किंवा अलंकारांच्या आमिषानें ती वश होईल अशी अपेक्षा करूं नको. तिचा पति प्रवासी आहे आणि प्रवासी पतीच्या पत्नीनें अलंकार धारण करावयाचे नाहींत, वेणीफणी करावयाची नाहीं, असा आचार आहे. आपण उत्सवाच्या निमित्तानें अलंकार धारण केले तर आपली गरीब

१. दुक्खिअ. २. सज्झिअं. ३. दुःखित.

शेजारीण उद्विग्न होईल अशी तिला काळजी वाटते, सबब ती असाध्य आहे, अशी दूतीची सूचना. पहा—मेघदूत. १–८ : त्वामारूढं पवनपदवी-मुद्गृहीतालकान्ताः ।

४० अनुराग : 40. Reason.

तुज्झ वसइ त्ति हिअअं इमेहिँ दिट्ठो तुमं ति अच्छीहिं[1] ।
तुह विरहे किसिआइँ ति तीएँ अङ्गाइँ वि पिआइं ॥४०॥

[तव वसतिरिति हृदयमाभ्यां दृष्टस्त्वमित्यक्षिणी ।
तव विरहे कृशितानीति[2] तस्या अङ्गान्यपि प्रियाणि ॥]

हृदयांत तूं आहेस म्हणून तें, दृष्टीला तूं दिसतोस म्हणून ती व तुझ्या विरहानें अंग कृश होतें म्हणून तें, तिला प्रिय आहे.

● नायकाला अनुकूल करून घेण्यासाठीं नायिकेच्या अनुरागाबद्दल दूतीचे उद्गार.

४१ अस्थानीं आसक्ति : 41. Prosperity.

सब्भावणेहभरिए रत्ते रज्जिज्जइ[3] त्ति जुत्तमिणम् ।
अणहिअए उण हिअअं जं दिज्जइ तं जणो हसइ[4] ॥४१॥

[सद्भावस्नेहभरिते[6] रक्ते रज्यते[5] इति युक्तमिदम् ।
अन्यहृदये पुनर्हृदयं यद्दीयते तज्जनो हसति ॥]

सद्भाव व स्नेह यांनीं युक्त असलेल्या व्यक्तीवर अनुरक्त होणें

---

१. अच्छिद्दम २. कृशितानीति, कृशानीति. ३. रत्तिज्जइ, रच्चिजइ. ४. असइ. ५. रक्तीभूयते. ६. स्नेहमये, स्नेहभृते.

योग्य आहे. (ज्यानें आपलें हृदय दुसऱ्याला दिलें आहे त्यावर म्हणजे) अस्थानीं आसक्ति ठेवल्यास लोक उपहास करतात.

● खण्डिता नायिका. अन्यहृदय म्हणजे दुष्टहृदय, अन्यासक्तहृदय किंवा असदृशहृदय. सद्भावाचा रंग शुभ्र आणि प्रीतीचा आरक्त. ज्याला रंग द्यावयाचा तें वस्त्र शुभ्र व स्वच्छ असलें तर त्यावर रंग चांगला चढतो; वस्त्र मलिन असलें किंवा त्यावर दुसऱ्या रंगाची छटा असली तर तें चांगलें रंगत नाहीं !

४२ लक्ष्मीः 42. Success.

आरम्भन्तस्स धुअं[1] लच्छी मरणं वि होइ पुरिसस्स ।
तं मरणमणारम्भे वि होइ लच्छी उण ण होइ ॥४२॥

[आरभमाणस्य ध्रुवं लक्ष्मीर्मरणं वा भवति पुरुषस्य ।
तन्मरणमनारम्भेऽपि भवति लक्ष्मीः पुनर्न भवति ॥]

कार्याला सुरुवात करणाऱ्या पुरुषाला लक्ष्मी प्राप्त होते किंवा मृत्यु तरी येतो. जो कार्याला आरंभच करीत नाहीं त्याला मरण तर येतेंच, लक्ष्मी मात्र मिळत नाहीं.

● साशङ्क नायकाला प्रोत्साहन. अति विचार व अति शङ्का यांनीं कार्यनाश होतो, साहसाशिवाय कार्यसिद्धि होत नाहीं, हें तात्पर्य.

४३ आशाबन्धः 43. Hope.

विरहाणलो सहिज्जइ आसाबन्धेण वल्लहजणस्स[2] ।
एक्कग्गामपवासो माए ! मरणं विसेसेइ ॥४३॥

१. धरं, धुरं. २. दुल्लह.

[विरहानलः सह्यत आशाबन्धेन वल्लभजनस्य[1] ।
एकग्रामप्रवासो मातर्मरणं विशेषयति ॥]

आई ग, प्रवासाला गेलेला प्रियकर परत येईल या आशेवर विरह कसा तरी सहन करतां येतो; पण तो गांवांतल्या गांवांत इतरत्र गेला तर मरणाहून अधिक त्रास होतो.

● कारण तो सवतीच्या मोहांत गुरफटल्यामुळें आपल्याकडे परत येईल अशी आशा करावयाला जागा नसते आणि विरहाहून मत्सराच्या वेदना अधिक तीव्र असतात.

४४ अन्य महिला : 44. Memory.

अक्खडइ[2] पिआ हिअए अण्णं महिलाअणं रमन्तस्स ।
दिट्ठे सरिसम्मि गुणे ऽसरिसम्मि[3] गुणे अणीसन्ते[4] ॥४४॥

[आस्खलति[5] प्रिया हृदये अन्यं महिलाजनं रममाणस्य ।
दृष्टे सदृशे गुणे असदृशे गुणे अदृश्यमाने[6] ॥]

अन्य महिलेबरोबर विलास करीत असतांना प्रियेची आठवण झाल्यामुळें वल्लभ विमनस्क होतो; कारण प्रियेसारखे कांहीं गुण त्याला हिच्यांत आढळतात तर कांहींचा अभाव दिसून येतो.

● अन्यमनस्क होऊं नको, तिच्यापेक्षां सरस असा एकादा गुण येथेंही तुला आढळेल, असें दूतीचें आश्वासन. 'पृथ्वीप्रदक्षिणा' करून आलेल्यानेंही न पाहिलेलीं अशीं अनेक रम्य स्थळें भूतलावर असतातच. आपण जग पालथें घातलें आहे अशी फुशारकी मारण्यांत अर्थ नाहीं !

---

१. दुर्लभजनस्य. २. आवडइ, अक्खंडइ. ३. अईसंते, अदीसंते. ४. असरिसम्मे. ५. स्मृतिं याति. ६. अतिशयेवेति.

४५ अनित्य : 45. Effervescence.

णइऊरसच्छहे[1] जोव्वणम्मि अइपवसिएसु[2] दिअसेसु[3] ।
अणिअत्तासु[4] अ राईसु पुत्ति किं दड्ढमाणेण ॥४५॥

[नदीपूरसदृशे यौवने अतिप्रोषितेषु[5] दिवसेषु ।
अनिवृत्तासु च रात्रिषु पुत्रि किं दग्धमानेन ॥]

मुली, तारुण्य हें नदीच्या पुरासारखें अनित्य आहे. दिवस व रात्री निघून गेल्या कीं त्या कायमच्या जातात. मानिनी, मग तूं मानानें स्वतःला कां जाळून घेतेस ?

● यौवन नश्वर आहे, दुर्लभ आहे, तें फुकट घालवूं नकोस; तारुण्याची मस्ती नदीच्या पुरासारखी आहे, वाहत्या नदीच्या पाण्याच्या धांवत्या पृष्ठभागासारखी यौवनाची गति आहे, वाहत्या गंगेत डुंबून घे, अशी मानिनी नायिकेला महानुभवी दूतीची सूचना.

४६ रजनी : 46. Night.

कल्लं किल[6] खरहिअओ पवसिहिइ[7] पिओत्ति सुणइ[8] जणम्मि
तह वड्ढ भअवइ णिसे जह से कल्लं विअ ण होइ ॥४६॥

[कल्यं किल[9] खरहृदयः प्रवत्स्यति प्रिय इति श्रूयते जने
तथा वर्धस्व भगवति निशे यथा तस्य कल्यमेव न भवति ॥]

---

१. सच्छहे. २. णिच्चपहिएसु. ३. दिअहेसु. ४. अणिअणिअत्तासु. ५. नित्य-प्रोषितेषु, अतिप्रवसिनेषु. ६. किर. ७. पवसिहि, पवासिहिइ, पवसिहइ. ८. सुव्वइ. कल्ये. ९. खल.

पहाट झाली कीं निष्ठुर पति प्रवासाला जाणार असें लोकांकडून ऐकते. भगवती रजनी, तूंच वृद्धिंगत हो, म्हणजे सकाळच होणार नाहीं.

● पति उद्यां सकाळीं प्रवासाला जाणार आहे, तेव्हां उद्यां ये अशी स्वैरिणीनें उपपतीला दिलेली सूचना. पतिपत्नींचें विशेष रहस्य दिसत नाहीं, कारण पतीच्या प्रवासाची बातमी तिनें इतरेजनांकडून ऐकलेली आहे. पंडित मथुरानाथशास्त्री यांनीं टीकेच्या टीपेंत सदृश हिंदी पद दिलें आहेः सजन सकारे जाँयगे नैन मरैंगे रोय । विधिना ऐसी रैन करि, भोर कबहु ना होय ॥

४७ उद्यांची तरतूद: 47. Farewell.

होन्तपहिअस्स[१] जाआ आउच्छण[२]जीअधारण[३]रहस्सम् ।
पुच्छन्ती भमइ घरं घरेण पिअविरहसहिरीओ ॥४७॥
[भविष्यत्पाथिकस्य जाया आपृच्छन[४]जीवधारणारहस्यम्[५] ।
पृच्छन्ती भ्रमति गृहं गृहेण प्रियविरहसहनशीलाः ॥]

जिचा पति प्रवासाला निघणार आहे अशी पत्नी सहनशील विरहिणींच्या घरोघर जाऊन त्यांना (आर्जवून) विचारते कीं विरहांत जीव धारण करण्याचें रहस्य, (जें तुम्हांला माहीत आहे, तें) मला सांगा.

● पतिव्रता नायिका. पति प्रवासाला गेला तर पत्नीला जीव कसा धारण करवेल याबद्दल संशय व्यक्त करून सखी नायकाला प्रवासापासून परावृत्त करीत आहे; कुलटा नायिका : तिचा पति लवकरच प्रवासाला जाणार आहे, तोंवर धीर धर, अशी दूतीची कामुकाला सूचना; किंवा पतीच्या प्रवासाची वर्दी ती स्वतःच इष्ट अशा उपपतींच्या अगर समानशीला मैत्रिणींच्या घरोघरीं जाऊन देत आहे, अशा सूचना.

१. होन्त. २. आउछण, आउंछग, उछूण. ३. सहस्सम्. ४. आगामिक्षण, पुनर्दर्शनप्रश्न. ५. साहसम्.

४८ अहंकार : 48. Confidence.

अण्णमहिलापसङ्गं दे देवं[1] करेसु[2] अह्मं[3] दइअस्स ।
पुरिसा एकन्तरसा[4] ण हु दोसगुणे विआणन्ति ॥४८॥
[अन्यमहिलाप्रसङ्गं हे देव कुर्वस्माकं दयितस्य ।
पुरुषा एकान्तरसा[5] न खलु दोषगुणौ विजानन्ति ॥]

देवा, अन्य महिलांशीं माझ्या पतीचा संबंध होऊं दे, (म्हणजे तरी त्यांना माझे गुण समजतील). एकनिष्ठ पुरुषांना गुण समजत नाहींत व दोषही उमगत नाहींत.

● पतिव्रता व सहिष्णु नायिकाः रसिकाला अपराधांची क्षमा होते, आणि खुषामत्यालाही, ती अशी. पति अन्यत्र गेला तरच त्याला हिच्या गुणांची जाणीव होणार. स्वैरिणी नायिका : पति अन्यत्र गेला तरच हिलाही अन्यत्र जाण्याला सवड मिळणार. स्वाधीनभर्तृका नायिकाः स्वसौभाग्याचें वर्णन. गुणगर्विता नायिका : अगणित गुणांची व दोषरहित-त्वाची सूचना. खाणावळींत जेवून आल्याशिवाय घरच्या अन्नाची रुचि उमजत नाहीं, हेंच खरें ! अलंकाररत्नाकरांत 'परभाग' अलंकाराचें उदाहरणः 'अनुभूतस्यार्थान्तरोपलब्धौ परभागः ॥'

४९ ऐन दुपारीं : 49. Matinee.

थोअं पि ण णीसरई[6] मज्झण्णे उह सरीरतललुक्का[7] ।
आअवभएण छाई वि, पहिअ ता किं ण वीसमसि ॥४९॥
[स्तोकमपि न निःसरति मध्यान्हे पश्य शरीरतललीना[8] ।
आतपभयेन च्छायापि पथिक तत्किं न विश्राम्यसि ॥]

१. देव्व, दैव. २. कुणेसु. ३. मह्म. ४. एक्कत्त. ५. एकतरसा. ६. णीइ इमा. ७. लुग्गा. ८. शिरीष. ९. लग्ना, मग्ना.

ऐन दुपारीं छायासुद्धां शरीराच्या तळाशीं लपून बसते, जणूं उन्हाच्या धास्तीनें इकडे तिकडे थोडीसुद्धां सरकत नाहीं. मग पथिका, अशा या वेळीं तूं जरा विश्रांति कां घेत नाहींस ?

● स्वयंदूती, स्वैरिणी, माध्यान्हाभिसारिका नायिका. एका टीकाकाराच्या मतें हे उद्गार प्रपापालिकेचे—पाणपोईवर पाणी घालणाऱ्या स्त्रीचे आहेत, उन्हांतून तापून आलेल्या पथिकाला उद्देशून स्वाभिप्राय व्यक्त करण्यासाठीं ते काढलेले आहेत. आणखी एक टीकाकार सांगतो, रतार्थिनी अंगुलिनिर्देश करून पथिकाला विश्रांतिस्थान दाखवीत आहे, किंवा आतां थोडी विश्रांति घ्या, असें सुचवीत आहे. म्हणून ‘ अभिनय ’ अलंकार.

५० थोर तुझे उपकार : 50. Thanks.

सुहउच्छअं[१] जणं दुल्लहं पि दूराहि अम्ह आणन्त[२] ।
उअआरअ जर ! जीअं पि णेन्त ण कआवराहोसि ॥५०॥

[सुख[३]पृच्छकं जनं दुर्लभमपि दूरादस्माकमानयन् ।
उपकारक ज्वर जीवमपि नय[४]न्न कृतापराधोऽसि ॥]

मला ताप येत आहे असें समजल्यामुळें माझ्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठीं दुर्लभ प्रियकर दूर अंतरावरून आला. ज्वरा, तूं माझ्यावर उपकारच केलास; आतां तूं माझा जीव घेतलास तरी मी तुला अपराधी मानणार नाहीं.

● तिला ज्वर आला आहे असें समजलें, म्हणून तो तिच्या समाचारासाठीं आला. त्यानें सुखाची पृच्छा केली, सुखाची अपेक्षा केली नाहीं; तो आला तो केवळ लोकापवादाच्या भीतीमुळें, प्रीतीमुळें नव्हे; कुशल विचारलें तें औदासीन्यानें, उत्सुकतेनें नव्हे; आणि तेवढयानेंही तिला किती समाधान

१. उछलअं. २. आणेत. ३. शुभ. ४. गृण्हन्.

वाटलें ! विरहोत्कण्ठितेचे उपालम्भोद्गार. अलंकारकौस्तुभांत परिवृत्ति अलंकाराचें उदाहरण : ' सदृशासदृशैरर्थैरर्थानां विनिमयस्तु परिवृत्तिः । ' सरस्वतीकण्ठाभरणांत अप्रस्तुतप्रशंसेचें उदाहरण.

५१ स्वास्थ्य : 51. Formality.

आमं[1] जरो मे मन्दो अहव ण मन्दो, जणस्स का तत्ती[2] ।
सुहउच्छँअ[3] सुहअ सुअन्धअन्ध मा अँन्धिअं[4] छिवसु ॥५१॥

[आमज्वरो मे मन्दोऽथवा न मन्दो जनस्य का चिन्ता ।
सुखपृ[5]च्छक सुभग सुगन्धगन्ध मा गन्धितां स्पृश ॥]

च् ! उगाच माझ्या स्वास्थ्याची चौकशी कशाला करतां ? माझा ज्वर मन्द झाला आहे कीं नाहीं याची चौकशी लोकांनीं कशाला करावी ? हे सुभग, (अन्य महिलासंगामुळें) तुमच्या अंगाला सुगंध येत आहे आणि (या ज्वरामुळें) माझ्या अंगाला दुर्गंध; म्हणून सांगतें, मला स्पर्श करूं नका.

● स्वभार्येविषयीं उदासीन व अन्यमहिलासक्त पति आणि खण्डिता, ज्वरार्ता पत्नी. विषय पूर्वीचाच, प्रतिक्रिया वेगळी; कारण तो सुखपृच्छे-साठीं लांबवरून आला होता आणि हा बहुधा गांवांतल्या गांवांतून; कारण अन्यमहिलासंगाचे वेळीं याच्या अंगाला लागलेला सुगंध अद्याप घमघमत आहे; कारण त्याच्यापेक्षां याची सुखपृच्छा अधिक औपचारिक आहे. उदासीन पति पत्नीलाहि परका वाटतो. आमज्वर म्हणजे जागरणामुळें किंवा अमांशामुळें आलेला ज्वर. आम हा शब्द ईर्ष्यासूचकही आहे.

१. आमजरो. २. तन्ती. ३. सुहउंछअ. सुहउण्णअ. ४. गंधिरिं, गंधिरिं, गिधिरिं. ५. शुभ.

५२ मोरपंखी : 52. Dishevelled.

सिहिपिच्छलुलिअकेसे वेवन्तोरु विणिमीलिअद्धच्छि ।
दरपुरिसाइरि विसुमरि जाणसु पुरिसाणँ जं दुःखम् ॥५२॥

[शिखिपिच्छलुलितकेशे वेपमानोरु[1] विनिमीलितार्धाक्षि ।
ईषत्पुरुषायिते विश्रामशीले जानीहि पुरुषाणां यद्दुःखम्[2] ॥]

थोडा वेळ पुरुषाचें अनुकरण केलेंस, तर तेवढ्यांत तुझे केस मोराच्या पिसाऱ्यासारखे विखुरले, मांड्या थरकापूं लागल्या, डोळ्यांवर झांपड आली व तूं थकून गेलीस. थोडा वेळ विश्रांति घे आणि पुरुषांना किती श्रम होतात याची कल्पना कर.

● अल्प आयासानेंही श्रान्त झालेल्या सुकुमार नायिकेला उद्देशून नायकानें काढलेले सहासोद्गार. प्रोत्साहनार्थ कीं प्रशंसार्थक ? तिच्या डोळ्यावर आलेली झापड कसली ? धुंदीची ? कीं तृप्तीची ? कीं अतृप्तीची ? कीं केवळ परिश्रमाची ? कीं अपेक्षेची ? कीं हा नुसता अभिनय ?

५३ बेचव : 53. Tasteless.

पेम्मस्स विरोहिअसंधिअस्स पच्चक्खदिट्ठविलिअस्स[3] ।
उअअस्स व ताविअसीअलस्स विरसो रसो होइ ॥५३॥

[प्रेम्णो विरोधितसंधितस्य[4] प्रत्यक्षदृष्टव्यलीकस्य[5] ।
उदकस्येव तापितशीतलस्य विरसो रसो भवति ॥]

१. वेपन्तोरू. २. अर्धनिमीलिताधिक्षी सती क्षणेन श्रामयसि । पुरुषाणाम् अस्माकं यद् दुःखम् तन्न जिनासि. ३. विलअस्स. ४. सहितस्य. ५. विलयस्य.

प्रथम त्याला झिडकारलेंस आणि आतां त्याचें प्रेम जोडूं पाहत आहेस. (या खोटेपणांतील) अपराध दृष्टोत्पत्तीस आला म्हणजे तुझें प्रेम त्याला तापवून गार केलेल्या पाण्यासारखें बेचव वाटेल.

● पूर्वी त्याचा अनुनय अमान्य केलास, कारण तेव्हां त्याचें वैभव नष्ट झालें होतें. आता त्याला पुन्हा वैभव प्राप्त झालेलें आहे, म्हणून त्याचें प्रेम जोडण्यासाठीं तूं उत्सुक आहेस; प्रेमाला खोटेपणा सहन होत नाहीं; असा अपराध पुरुष विसरत नाहींस; सखीचे नायिकेच्या निर्भर्त्सनेचे उद्गार. नायक गरीब होता, तरी माझी खुषी होती, तेव्हां तूं मला त्याच्याकडे जाऊं दिलें नाहींस आणि आतां तो संपन्न झालेला आहे म्हणून त्याच्याकडे जाण्याविषयीं तूं मला प्रोत्साहन देत आहेस; हा अपराध त्याच्या लक्षांत आला तर समागमांत त्याला सुख वाटणार नाहीं; तरुण वेश्येनें मातेला उद्देशून काढलेले किंवा आत्मनिंदेचे उद्वेगोद्गार. प्रेम हें जिवंत झऱ्याच्या पाण्यासारखें असतें. सांठवून ठेवलेलें पाणीसुद्धां बेचव लागतें. तापवून गार केलेलें पाणी फक्त अनुपानासाठीं, विकृतिजन्य शोष शमविण्यासाठीं घ्यावयाचें असतें; नैसर्गिक व तीव्र तृषा त्यानें कशी शमणार ?

५४ टणत्कार : 54. Women in Bondage.

वज्जवडं[1]णाइरिक्कं पइणो सोऊण सिञ्जिणीघोसम् ।
पुसिआइं करिमरिएँ स[2]रिसवन्दीणं पि णअ[3]णाइं ॥५४॥

[वज्रपतनातिरिक्तं पत्युः श्रुत्वा शिञ्जिनीघोषम् ।
प्रोञ्छि[4]तानि बन्द्या सदृ[5]शबन्दीनामपि नयनानि ॥]

ती बंदिवासांत होती. पडणाऱ्या विजेच्या कडाडण्यापेक्षांही मोठा असा पतीच्या धनुष्याचा टणत्कार ऐकून तिनें आपल्याबरोबर बंदींत असणाऱ्या स्त्रियांचे अश्रु पुसले (व जणूं त्यांना सुटकेचें आश्वासन दिलें.)

१. पडणा. २ सरि. ३. अच्छीइं. ४. प्रोञ्छितानि, प्रोषितानि. ५. सदृग्.

● वज्र कडाडून कोसळतें, अचानकपणें; त्याच्यापुढें कोणाचा निभाव लागत नाहीं. तुरुंगावर अकल्पितपणें हल्ला चढवून, पहारेकऱ्यांचा निःपात करून, प्रियकर आपली सुटका करीलच, अशी बन्दिनीला खात्री होती, इतकी त्याच्या साहसी सामर्थ्यावर तिची श्रद्धा होती; कारण तिला पूर्वी असे अनुभव आलेले होते. दुरवस्थेत असणाऱ्या सहभाग्याच्या उद्धारासाठीं सज्जन सदैव सज्ज असतात.

५५ उत्साहभंग : 55. False Expectations.

करिमरि ! अआलगज्जिरजलआसणिपडनपडिरवो एसो ।
पइणो धणुरवकङ्खिरि[1] रोमञ्चं किं मुहा वहसि ॥५५॥

[बन्दि अकालगर्जनशीलजलदाशनिपतनप्रतिरव एषः ।
पत्युर्धनूरवाकाङ्क्षणशीले[2] रोमाञ्चं किं मुधा वहसि ॥]

अकालीं गर्जना करणाऱ्या मेघांतून पडणाऱ्या विजेच्या कडाडण्याचा हा प्रतिध्वनि आहे. पतीच्या धनुष्याच्या टणत्काराची वाट पाहणाऱ्या बन्दिनी स्त्रिये, वृथा कां रोमांचित होतेस ?

● पतिशौर्याभिमानिनी बन्दिनीचा उत्साहभंग करण्याच्या हेतूनें तिचा अभिलाष करण्याऱ्या तरुण चोराचे उद्गार. रोमाञ्चरूपानें रसोद्भव.

५६ दुर्विदग्ध : 56. Rude.

सहइ सहइ त्ति तह तेण रमिआ[3] सुरअदुव्विअड्ढेण[4] ।
पम्मा[5]असिरीसाइँ व जह से जाआइँ अङ्गाइं ॥५६॥

१. संकिणि, २. शङ्किणि, काङ्क्षिणि. ३. रमिआ. ४. अड्ढेण. ५. पम्माइअ, पम्भाअ, पव्वाअ (म्ला ऐवजीं वा-वर : ८·२१; हेम : ४·८)

[सहते सहत इति तथा तेन रमिता सुरतदुर्विदग्धेन ।
प्रम्लानशिरीषाणीव यथात्या जातान्यङ्गानि ॥]

(त्यानें कामशास्त्राच्या सिद्धान्तांचें अध्ययन केलें होतें व आपल्याला सारें कांहीं समजतें असा त्याला दुरभिमान होता.) ती सर्व कांहीं सहन करीत आहे हें पाहून तिला सारें कांहीं सहन होतें अशा गैरसमजुतीनें त्या अडाण्यानें तिचा अनेक प्रकारें यथेच्छ उपभोग घेतला आणि यामुळें बिचारीचें शरीर चुरगळलेल्या शिरीष कुसुमा-प्रमाणें म्लान होऊन गेलें.

● शिरीष हें पुष्पसृष्टींतील अत्यंत नाजूक फूल, केवळ स्पर्शानें किंवा निःश्वासाच्या झळीनें म्लान होतें ! आणि तेंही या निर्दयानें चुरगळलें ! वनस्पतिशास्त्राचा अध्यापक असावा ! एक टीकाकार सांगतो, हे वेश्यामातेचे उद्गार आहेत, भुजंगनिंदा हें निमित्त आहे व अभिप्रेत अर्थ आपल्या कन्येच्या सौकुमार्याची, सौंदर्याची, सुरतनैपुण्याची व सहनशीलतेची भलावण हा आहे. कीं भुजङ्गाची निंदा हा आहे ! अडाण्याला सूचना देतां येते, शिकवितां येतें, चुचकारतां येतें व प्रसंगविशेषीं चमकावतांही येतें. पण पण्डिताशी प्रसङ्ग म्हणजे प्राणाशीं गांठ !

५७ लोकमर्यादा : 57. Immodest

अगणिअसेसजुआणा बालअ वोलीणलोअमज्जाआ ।
अह सा भमइ[1] दिसामुहपसारिअच्छी तुह कएण ॥५७॥

[अगणिताशेषयुवा बालक व्यतिक्रान्तलोकमर्यादा ।
अथ सा भ्रमति दिशामुखप्रसारिताक्षी तव कृतेन ॥]

१. सहसा.

अरे बाळ, तुझ्याशिवाय बाकीचे तरुण तिच्या गणतींत नाहींत. तुझ्यासाठीं तिनें लोकमर्यादा सोडून दिल्या आहेत. तुझ्या दर्शनासाठीं दिशांच्या क्षितिजांकडे नजर लावून ती भटकत आहे.

● दहा कामदशापैकीं जडता ही नववी अवस्था. शृंगारतिलकांत (२-५) सांगितलें आहे; ' अभिलाषोऽथ चिंता स्यात्स्मृतिश्च गुणकीर्तनम् । उद्वेगोऽथ प्रलापः स्यादुन्मादो व्याधिरेवच ॥ जडता मरणं चैव दशमं जायते ध्रुवम् । ' दूती नायकाला सांगते, ' यापुढें तिची उपेक्षा करूं नको, नाहींतर तुला स्त्रीहत्येचें पातक लागेल. प्रेमामुळें दृष्टि शून्य होते, मर्यादा नष्ट होतात व लज्जेचें विसर्जन होतें. तिनें जनलज्जा सोडली आणि शठा, तूं तर मनलज्जाही सोडलीस !

५८ घिंगाणा : 58. Dissolute.

अज्जं[1] च्चेअ पउत्थो उज्जाअरओ[2] जणस्स अज्जे अ ।
अज्जे अ हलिद्दापिञ्जराइँ गोलाणइ[3]तडाइं[4] ॥५८॥

[अद्यैव प्रोषित उज्जागरको जनस्याद्यैव ।
अद्यैव हरिद्रापिञ्जराणि गोदानदीतटानि[5] ॥]

' आजच पति प्रवासाला गेले; आज लोक रात्रभर जागरण करतील आणि गोदावरीचे कांठ हळदकुंकवानें रंगतील.

● हा तिकडे प्रवासाला गेला, इकडे लोकांनीं जागरण का करावें ? कारण, टीकाकार सांगतात, तो गांवचा पुढारी होता, शूर होता; त्याच्या हजिरींत गांवकरी निर्धास्त असत, त्याच्या गैरहजिरींत त्यांना स्वसंरक्षणार्थ

१. अज्जं चेअ, च्चेय, च्चेअ. २. उज्जागरओ, उज्जागिरओ. ३. गोलाबइ, गोलाइ. ४. तूहाइं, तीराइं, रूहाइं, तोहाइं. ५. तीराणि, स्रोतांसि, तोयाणि, कूलानि.

सज्ज राहणें भाग होतें. हें पटत नाहीं. तसें असतें तर गोदातीरावर हळद-कुंकवाचा सडा कां पडता ? एक टीकाकार सुचवतो, तो स्वतःच दरवडेखोर होता; दुसरा सांगतो, तो चौर्यरतार्थ इतरत्र गेला होता ! मराठी स्त्रियांची गोदावरीवर आंघोळ करण्याची हौस प्रसिद्ध आहे. कोऊहल कवि लीलावई काव्यांत (संपादक डॉ. उपाध्ये : भारतीय विद्याभुवन. गाथा क्र. ६१) सांगतोः 'मरहट्ठिया पओहर हलिद्द परिपिंजरंबुवाहीए। धुव्वंति जत्थ गोलाणईए तद्दियसियं पाव ॥' आज पति प्रवासाला गेला, तो घरीं होता तोंवर त्याच्या स्त्रिया ताटाखालच्या मांजरासारख्या चोर पावलांनीं वावरत होत्या, तो गेला न गेला तोंच त्यांचा धिंगाणा सुरू झाला. असती सवती अभिसारासाठीं सज्ज झाल्या आहेत अशी ज्येष्ठ व साध्वी पत्नीची सासूकडे तक्रार. टीकेंत वेबरनें जर्मन म्हण दिली आहे: Ist die Katze fort, haben die Mäusa frei Tanzen : मांजर नसलें कीं उंदीर नाचूं लागतात !

५९ विकल्प : 59. Option.

असरिसचित्ते दिअरे सुद्धमणा पिअअमे विसमसीले[1] ।
ण कहइ कुडुम्बविहडणभएण[2] तणुआअए सोह्णा[3] ॥५९॥

[असदृशचित्ते देवरे शुद्धमनाः प्रियतमे विषमशीले ।
न कथयति कुटुम्बविघटनभयेन तनुकायते स्नुषा ॥]

भाऊजींच्या चित्तांतील विकल्प तापट नवऱ्याजवळ प्रकट केला तर कुटुंब मोडेल म्हणून शुद्ध अंतःकरणाची सून कांहीं बोलत नाहीं, कृश मात्र होते.

● सासूसासऱ्यांची व कर्त्या दीरांची सत्ता असलेल्या सासरीं कसें वागावें याबद्दल नणन्देनें भावजयीला केलेला हा उपदेश आहे, असें एक टीकाकार सांगतो. कीं एका जावेनें दुसरीला ? अबोल नववधूच्या कृशतेचें कारण.

१. विसमसीले. २. विहडण. ३, सुद्धा. ४. तनूभवति सुषा.

६० शून्य कलह : 60. Quarrelsome.

चित्ताणिअदइअसमागमम्मि कअमण्णुआइँ भरिऊण[2] ।
सुण्णं कलहाअन्ती सहीहिँ रुण्णा, ण ओहसिआ[3] ॥६०॥

[चित्तानीतदयितसमागमे कृतमन्युकानि स्मृत्वा ।
शून्यं कलहायमाना सखीभी रुदिता नोपहसिता[4] ॥]

नवऱ्याची भेट झाली न झाली तोंच रागाच्या गोष्टी आठवून निरर्थक कलहाला प्रवृत्त होणाऱ्या स्त्रीच्या अवस्थेबद्दल तिच्या मैत्रिणींना खेद होतो; (सहानुभूतीमुळें) त्या तिचा उपहास करीत नाहींत.

● सांत्वन-कोणाचें ? कलहान्तरितेचें ? प्रोत्साहन कोणाला ? अनुनय विफल झालेल्या प्रियकराला ? कीं पतीच्या गैरहजिरींत ती आपल्याशींच बडबडत होती ?

६१ संकल्प : 61 Log.

हिअअण्णएहिँ[5] समअं असमत्ताइं पि जइ सुहावन्ति ।
कज्जाइँ मणे ण तहा इअरेहिँ समाविआइं[6] पि ॥६१॥

[हृदयज्ञैः सममसमाप्तान्यपि यथा सुखयन्ति ।
कार्याणि मन्ये न तथा इतरैः समापितान्यपि[7] ॥]

हृदय जाणणाराशीं (नुसता संकल्प ठरला आणि) समागम साधला नाहीं तरी त्यामुळें होतें तेवढें सुख अडाण्याबरोबर समागम पूर्ण होऊनही प्राप्त होत नाहीं.

---

१. चिन्ताणिइअ. २. भणिऊण. ३. उवहसिआ. ४. न पुनर्हसिता. ५. अणुएहिं, अण्णुएहि. ६. समाणिआइं. ७. समाप्तान्यपि.

● गंगाधर सांगतो, या गाथेची नायिका विदग्धा, कुलजाभिसारिका असावी आणि नायक सदभिरुचिसंपन्न प्रच्छन्नरताभिलाषी नागरिक असावा. किंवा, अडाणी पामर पतीविषयीं नायिकेचें औदासीन्यप्रकटन; किंवा, दूतीनें केलेला अधमानुरक्तीचा निषेध.

६२ कोंब : 62. Sprout.

दरफुडिअसिप्पिसंपुडणिलुक्कहालाहलग्गछेप्पणिहम् ।
पक्कम्बाट्ठिविणिग्गअकोमलमम्बङ्कुरं उअह ॥६२॥

[ईषत्स्फुटितशुक्तिसंपुटनिलीनहालाहलाग्रपुच्छनिभम् ।
पक्वाम्रास्थिविनिर्गतकोमलमाम्राङ्कुरं पश्यत ॥]

अर्धवट उघडलेल्या शिंपल्यांत लपलेल्या हलाहल सर्पाचें शेंपूट थोडेसें बाहेर राहतें. पिकलेल्या आंब्याच्या कोयींतून जरासा बाहेर आलेला कोवळा कोंब तसाच दिसत आहे.

● कोयींना कोंब फुटूं लागले, आतां लवकरच पावसाळा सुरू होणार, या दिवसांत तुम्ही प्रवासाला गेलांत तर या कोंवळ्या कोंबांचें प्रदर्शन मला सर्पदंशासारखें असह्य वाटेल. पतीच्या नियोजित प्रवासाचा निषेध.

६३ बकुळी : 63. Spider.

उअह पडलन्तरोइण्णणिअअतन्तुद्धपाअपडिलग्गम् ।
दुल्लक्खसुत्तगुत्थेक्कबउलकुसुमं व मक्कडअम् ॥६३॥

१. विक्क. २. निलुक्क. ३. ओत्तण्ण. ४. गुच्छेक्क.

[पश्यत पटलान्तरावतीर्णनिजकतन्तूर्ध्वपादप्रतिलग्नम् ।
दुर्लक्ष्यसूत्रग्रथितैकबकुलकुसुममिव मर्कटकम् ॥]

पहा, कोळी स्वत: निर्माण केलेल्या व पटईपासून लोंबणाऱ्या तंतूला पाय वर करून लटकला आहे. सूक्ष्म धाग्यांत बकुळीचें एकच एक फूल गुंफावें, तसा तो दिसत आहे.

● दिवसां उजेडीं परक्या घरीं जाराला वाटणारी धाकधुक दूर करण्यासाठीं येथें निर्धास्त एकान्त असल्याची सूचना या उद्गारांत ध्वनित आहे असें गंगाधर सांगतो. कामशास्त्रावरील संस्कृत ग्रंथांत असें एकादें आसन असतें तर तेंही अभिप्रेत आहे असें सांगावयास टीकाकारांनीं कमी केलें नसतें.

६४ पारवा : 64. Pigeon.

उअरि दरदिट्ठथण्णुअणिलुक्कपारावआणँ विरुएहिं ।
णित्थणइ जाअवेअणँ सूलाहिण्णं व देअउलम् ॥६४॥

[उपरीषद्दृष्टशङ्कुनिलीनपारावतानां विरुतैः ।
निस्तनति जातवेदनं शूलाभिन्नमिव देवकुलम् ॥]

पडझड झालेल्या देवळावर पारवे घुमत आहेत. कळस कोसळल्यामुळें मेख वर दिसत आहे. जणूं शूलानें भेद केल्यामुळें पारव्यांच्या रूपानें देऊळच स्फुंदत आहे.

● संकेतस्थानाची सूचना किंवा दीर्घकालीन एकान्ताचें आश्वासन. गंगाधरानें 'कल्लोलिनीकाननकन्दरादौ' हें वचन या गाथेवरील टीकेंतही उद्धृत केलेलें आहे. तो सांगतो, वर पारवे कूजन करीत आहेत आणि आंत आपण, असा ध्वनितार्थ आहे ! मग विपरीत रताची सूचना कां

१. खण्णुअणिलीण, खण्णुअ. २. देउअलम्, देवउलम्. ३. उपरि दरदृष्टस्थाणुकनिलीन.

नाहीं ? एक टीकाकार सांगतो, जीर्णावस्था सर्वांनाच प्राप्त होते, देवळांनाही; हें ध्यानांत भरून समर्थांनीही धर्माचरण केलें पाहिजे, हें या गाथेचें तात्पर्य आहे.

६५ माजलेली पारडी : 65. Calf.

जइ होसि ण तस्स पिआ अणुदिअहं णीसहेहिँ अङ्गेहिं ।
णवसूअपीअपेऊसमत्तपाडि व्व किं सुवसि ॥६५॥

[यदि भवसि न तस्य प्रियानुदिवसं निःसहैरङ्गैः ।
नवसूतपीतपीयूषमत्तमहिषीवत्सेव किं स्वपिषि ॥]

तूं म्हणतेस कीं मी त्यांची लाडकी नाहीं. मग तुझें अंग असें विकल कां ? कोंवळें दूध पिऊन माजलेल्या तान्ह्या पारडीसारखी तूं दिवसभर कां झोंपून राहतेस ?

● सपत्नीचे उद्गार; तूं नाहीं नाहीं म्हणतेस, तरी तूं नवऱ्याची लाडकी आहेसच; अलीकडे रोज रात्रीं ते तुझ्याकडेच असतात, म्हणूनच तूं दुपारभर झोंपून राहतेस, दिवसभर सुस्तींत असतेस. लाडकी नाहीं असें पुन्हा म्हणणार असलीस तर सांग, रात्रीं कोणाबरोबर धिंगाणा घालतेस ?

६६ लोकापवाद : 66. Scandal.

हेमन्तिआसु अइदीहरासु राईसु तं सि अविणिद्दा ।
चिरअरपउत्थवइए ! ण सुन्दरं जं दिआ सुवसि ॥६६॥

१. ता दिअहं. २. महिष्य. ३. अइदीहतरासु, दीर्घतरासु.

[हैमन्तिकास्वतिदीर्घासु रात्रिषु त्वमस्यविनिद्रा ।
चिरतरप्रोषितपतिके न सुन्दरं यद्दिवा स्वपिषि ॥]

तुझा पति प्रवासाला जाऊन बरेच दिवस झाले आहेत. हिवाळ्यांतल्या रात्री फार मोठ्या असतात; तरी रात्रीं पुरी गाढ झोंप मिळत नाहीं म्हणून तुला दिवसां झोंपावें लागतें; हें ठीक नाहीं, बरें का !

● जनापवादामुळें भयभीत झालेल्या बन्धुवधूचे उद्गार. विरहामुळें डोळ्याला डोळा लागत नाहीं म्हणून, कीं रात्रीं कोठें भटकायला जातेस म्हणून ? कोण जाणे, डोळे लाल दिसतात खरे. कुलस्त्रियांनीं दिवसां झोंपणें हें सुद्धां लोकापवादाला कारण पुरतें.

६७ पावलावर पाऊल : 67. Step on Step.

जइ चिक्खल्लभउप्पअपअमिणमलसाइ तुह पए दिण्णम् ।
ता सुहअ कण्टइज्जन्तमङ्गमेहिं किणो वहसि ॥६७॥

[यदि कर्दमभयोत्प्लुतपदमिदमलसया तव पदे दत्तम् ।
तत्सुभग कण्टकितमङ्गमिदानीं किमिति वहसि ॥]

तिची चालच संथ आहे; पायांना रस्त्यावरला चिखल लागूं नये म्हणूनच ती माझ्या पावलांवर पावलें टाकीत आहे, असें तुम्ही म्हणतां; हे सुभग, हें जर खरें, तर तुमच्या अंगावर हे रोमांच काय म्हणून ?

● ती त्याच्या मागें आली, कीं मागोमाग आली, कीं मागावर आली ! मी तिच्या मागें लागलों असतों किंवा मागोमाग चाललों असतों तर त्याबद्दल आक्षेप घेतां आला असता; पण आहे या परिस्थितींत माझ्यावर कोणताही अपराध सिद्ध होत नाहीं, असा आरोपिताचा बचाव. आणि

१. हैमन्तिसु. २. अतिदीर्घतरासु. ३. कण्टइजुन्तं, कण्टइवुत्तं. ४. चिक्खिल्ल.

हे रोमांच ! ओले पाय व पावसाळ्याची थंडी ! फिर्यादीचा अखेरचा आधार, परिस्थितीचा पुरावा !

६८ विरस : 　　68. Disgust.

पत्तो छणो[1] ण सोहइ, अइप्पहाए[2] व्व पुण्णिमअन्दो
अन्ताविरसो व्व कामो, असंपआणो अ परिओसो ॥६८॥
[प्राप्तः[3] क्षणो न शोभते अतिप्रभात[4] इव पूर्णिमाचन्द्रः ।
अन्तविरस इव कामो असंप्रदानश्च परितोषः ॥

प्रभातसमयीं पौर्णिमेचा चंद्रहि निस्तेज होतो; सण संपला म्हणजे उत्सवाला शोभा राहत नाहीं. अखेरीस विरस झाला तर सुरतांत मौज नाहीं. त्याचप्रमाणें संतुष्ट केल्यानंतर बिदागी न देण्यांत शोभा नाहीं.

● वेश्येच्या कन्येवर भुजंग अति अनुरक्त होता. त्यानें एकदां तिला बिदागी दिली नाहीं. म्हणून त्याची निंदा करतांना आपल्या मुलीला शिक्षण देणाऱ्या अनुभवी वृद्धगणिकेचे उद्गार; अशा प्रसंगीं शोभा राहत नाहीं इतकेंच नव्हे तर शोभा केली जाते !

६९ पार्वतीचें सौभाग्य : 　　69. Bracelet.

पाणिग्गहणे व्विअ पव्वईए णाअं सहीहि सोहग्गम् ।
पसुवइणा वासुइकङ्कणम्मि ओसारिए दूरम् ॥६९॥
[पाणिग्रहण एव पार्वत्या ज्ञातं सखीभिः सौभाग्यम् ।
पशुपतिना वासुकिकङ्कणेऽपसारिते दूरम् ॥]

---

१. क्षणो, त्थणो. २. अइप्पहाअम्मि. ३. प्राप्तोऽतिक्रान्तः. ४. प्रभाते पूर्णिमा.

पार्वतीच्या सौभाग्याची कल्पना तिच्या पाणिग्रहणाचे वेळींच तिच्या सख्यांना आली; कारण त्या वेळीं पशुपतीनें आपल्या हातावरील वासुकीचें कंकण दूर सारलें.

● मेघदूतांतील कालिदासाचे (१.६३) उद्गार पहा : 'हित्वा तस्मिन् भुजगवलयं शम्भुना दत्तहस्ता । क्रीडाशैले यदि च विरहोत्पादचारेण गौरी ॥' नागकन्येला नागांची भीति वाटत होती म्हणून नव्हे, मंगलप्रसंगीं अमंगल दिसणारें व लोकविरुद्ध असणारें सर्पकंकण धारण केलेलें नसावें, म्हणून पशुपतीनें वासुकीचें वेटोळें दूर केलें.

७० अपन्हुति : 70. Dark Peaks.

गिह्मे दवग्गिमसिमइलिआइँ दीसन्ति विज्झसिहराइं[1] ।
आससु पउत्थवइए ! ण होन्ति[2] णवपाउसब्भाइं ॥७०॥

[ग्रीष्मे दवाग्निमषीमलिनितानि दृश्यन्ते विन्ध्यशिखराणि ।
आश्वसिहि प्रोषितपतिके न भवन्ति नवप्रावृडभ्राणि ॥]

विन्ध्य पर्वताचीं शिखरें काळींभोर झालेलीं पाहून तुला वाटत आहे कीं पाणकळ्याच्या आरंभींचे मेघ आकाशांत दाटले आहेत. प्रोषितपतिके, धीर धर, हे मेघ नाहींत, उन्हाळ्यांत पेटणाऱ्या वणव्यांच्या धुरामुळें पर्वतशिखरें काळवंडलीं आहेत.

● मेघांच्या भ्रांतीनें आर्त झालेल्या प्रोषितपतिकेला सखीचें आश्वासन, कीं धीर सोडूं नको, पति परत येण्याची वेळ अजून टळलेली नाहीं. उन्हाळा संपण्यापूर्वीच तो खास घरीं येईल. सरस्वतीकण्ठाभरणांत औपम्यवति अपन्हुतीचें उदाहरण: 'अपन्हुतिरपन्हुत्य किंचिदन्यार्थदर्शनम् ।'

---

१. वज्झ. २. हुन्ति.

७१ लोंढा : 71. Uniform.

जेत्तिअमेत्तं तीरइ णिव्वोढुं, देसु तेत्तिअं पणअम् ।
ण अणो विणिअत्तपसाअदुक्खसहणक्खमो सव्वो ॥७१॥

[यावन्मात्रं शक्यते निर्वोढुं देहि तावन्तं प्रणयम् ।
न जनो विनिवृत्तप्रसाददुःखसहनक्षमः सर्वः ॥]

जेवढें प्रेम कायमचें देतां येईल तेवढेंच द्या. कारण प्रेमभंगाचें दुःख सहन करण्याचें सामर्थ्य सर्वांनाच नसतें.

● पहिल्या भेटींत अनुरागातिशय प्रकट करणाऱ्या बहुवल्लभास. मी अल्पसंतुष्ट आहे, माझ्या अपेक्षा वाढवूं नका, मला मनोभंगाच्या वेदना सहन होणार नाहींत.

७२ मिठाईची मिठी : 72 Short & Sweet.

बहुवल्लहस्स जा होइ वल्लहा कह वि पञ्च दिअहाइं ।
सा किं छट्ठं मग्गइ ? कत्तो मिट्ठं व बहुअं अ ॥७२॥

[बहुवल्लभस्य या भवति वल्लभा कथमपि पञ्च दिवसानि ।
सा किं षष्ठं मृगयते कुतो मृष्टं च बहुकं च ॥]

ज्याला पुष्कळ स्त्रिया आहेत त्याचें प्रेम (वर्तमान) वल्लभेवर फार तर पांच दिवस असणार; आणि तीही सहावा दिवस कशाला मागेल ? जें गोड तें विपुल कसें असेल ?

---

१. णिव्वोढुं. २. ण अणो पिअअमकअमाणभंगदुक्खक्खमो सव्वो. ३. निर्वाहयितुं ददस्व. ४. बहुकं. ५. मगयसि. ६. मिष्टं.

● फारां दिवसांनीं फिरकलेला प्रियकर स्थिरस्नेही मानिनीचें सांत्वन करूं लागला, तेव्हांचे तिचे उद्गार; किंवा प्रियकर गेले चार दिवस आला, आज आला नाहीं, म्हणून खिन्न झालेल्या नायिकेचें सांत्वन करण्यासाठीं सखीचे उद्गार. मिष्टान्न सेवनानंतर उपोषण करावेंच लागतें! किंवा उपोषणानंतरच साधें अन्नही मिष्ट वाटतें!

७३ सांवरी पदर : 73. Exhibition.

जं जं सो णिज्झाअइ अङ्गोआसं[१] महं अणिमिसच्छो ।
पच्छाएमि अ तं तं इच्छामि अ तेण दीसन्तम् ॥७३॥

[यद्यत्स निर्धायत्यङ्गावकाशं[२] ममानिमिषाक्षः ।
प्रच्छादयामि च तं तामिच्छामि च तेन दृश्यमानम् ॥]

माझ्या ज्या ज्या अवयवावर त्याची दृष्टि स्थिर होते तो तो (वस्त्र सांवरून) झांकून घेण्याचा मी प्रयत्न करतें. तरीही तो त्याला दिसावा अशीच माझी इच्छा असते.

● स्वाधीनभर्तृका, स्वसौभाग्यगर्विता नायिका. नायिकेनें ही इच्छा केवळ्या प्रामाणिकपणें प्रकट केलेली आहे! तिचे अवयव प्रमाणबद्धअसून तिला याची जाणीव असावी. या गाथेच्या नायिकेचाच काय, जिचा पिंड भरदार असतो त्या प्रत्येक प्रमदेचा पावलोपावलीं हाच प्रयत्न प्रत्ययास येत असतो; तें पदर सांवरणें, निऱ्याचा घोळ आवरणें! प्रदर्शन हेंच अवगुंठनाच्या शैलीचें रहस्य!

७४ मुठींतली वाळू : 74. Handful of Sand.

दि[३]ढमण्णुदूणिआएँ वि गहिओ दइअम्मि पेच्छह इमाए ।
ओसरइ वालुआमुट्ठि उव्व माणो सुरसुरन्तो ॥७४॥

१. अङ्गं आसम्मि. २. अङ्गं पार्श्वे मम. ३. दढ. ४. दूमिआइ.

[दृढमन्युदूनयापि[१] गृहीतो दयिते पश्यतानया ।
अपसरति बालुकामुष्टिरिव[२] मानः सुरसुरायमाणः ॥]

मनांत क्रोध व खिन्नता दाटलेली असली तरी प्रियकराला पाहतांच तिचा मान मुठींतल्या वाळूसारखा सुरसुर ओसरून जातो.

● पतीला अनुनयाचें प्रोत्साहन देणाऱ्या कलहान्तरितेच्या सखीचे उद्गार.

७५ पाचू-माणकांचा हार : 75. Necklace.

उअ पोम्मराअमरगअसंवलिआ णहअलाओ ओअरइ[३] ।
णहसिरिकण्ठब्भट्ठ व्व कण्ठिआ कीररिञ्छोली ॥७५॥

[पश्य पद्मरागमरकतसंवलिता नभस्तलादवतरति ।
नभःश्रीकण्ठभ्रष्टेव कण्ठिका कीरपङ्क्तिः ॥]

पहा, पोपटांची रांग आकाशांतून उतरत आहे, जणूं नभःश्रीच्या कण्ठांतील पाचूंचा व माणकांचा कण्ठाच ओघळत आहे.

● हे उद्गारही मनसिजोद्दीपनार्थ, प्रियकराला अन्यमनस्क करण्यासाठीं आहेत असें गंगाधर सांगतो !

७६ बोंचणी : 76. Prick.

ण वि तह विएसवासो दोग्गच्चं[४] मह जणेइ संतावम् ।
आसंसिअत्थविमणो[५][६] जह पणइजणो णिअत्तन्तो ॥७६॥

[नापि तथा विदेशवासो दौर्गत्यं मम जनयति संतापम् ।
आशंसितार्थविमना[७] यथा प्रणयिजनो निवर्तमानः ॥]

१ दुर्मनस्कया. २. भस्तिरिव. ३. ओसरइ, आवरइ, ओतरइ. ४. दोहग्ग, दुग्गतं, दोगच्चं. ५. आसंधिअत्थ. ६. विमुहो. ७. अभिसंधितार्थ.

परठिकाणीं दारिद्र्यांत राहावें लागतें याबद्दल खेद होत नाहीं. जिवाला बोंचतें तें हें कीं आवेशानें अपेक्षिलेलें प्राप्त न झाल्यामुळें यापुढें प्रियजनाला निराश होऊन परत जावें लागणार.

● दुर्वर्तनी पत्नीला पतीनें परदेशीं, कुग्रामांत, बंदींत, दारिद्र्यांत ठेवलें. तिला हें बोंचलें नाहीं; सललें हें कीं आतां प्रियजनांना आपली भेट कशी होणार ! आज जमणार नाहीं, माझ्यावर पहारा आहे, परत जा, अशी प्रियकराला सूचना.

७७ स्तनोष्मा : 77. Radiation.

खंन्धग्गिणा वणेसुं, तणेहिँ गामम्मि, रक्खिओ पहिओ ।
णअरवसिओ णडिज्जइ सासुसएण व्व सीएण ।।७७।।

[स्कन्धाग्निना[2] वनेषु तृणैर्ग्रामे रक्षितः पथिकः ।
नगरोषितः खेद्यते[3] सानुशयेनेव शीतेन ॥]

रानांत मुक्काम होता तेव्हां ओंडक्यांच्या धगीनें व खेड्यांत आला तेव्हां गवताच्या शेकोटीनें पथिकाचें थंडीपासून रक्षण केलें. आतां तो या नगरांत आला आहे. आतांपर्यंत तो आपल्या तडाक्यांतून सुटल्यामुळें रागावलेली थंडी त्याला त्रस्त करीत आहे.

● दूती सखीला सांगते, या निर्दय नगरांत, शरद् ऋतूंतल्या थंडगार रात्रीं, या अगतिक पथिकाला तुझ्याशिवाय कोण आश्रय देणार? प्रियकराला ओसरीजवळच्या लाकडें व गवत ठेवतात त्या कोठींत लपवला आहे, तेथें बिचारा कुडकुडत बसला आहे ग ! अशी दूतीची नायिकेला सूचना. गंगाधर सांगतो, हे उद्गार स्वयंदूतीचे असून ती आपला आशय प्रवाशाजवळ प्रकट करीत आहे !

---

१. बंध. २. काष्ठाग्निना. ३. न नीयते, न क्षेपते.

७८ कमला : 78. Black & White.

भरिमो से गहिआहरधुअसीसपहोलिरालआउलिअम्[1] ।
वअणं परिमलतरलिअभमरालिपइण्णकमलं व[2][3] ॥७८॥

[स्मरामस्तस्या गृहीताधरधुतशीर्षप्रघूर्णनशीलालकाकुलितम् ।
वदनं परिमलतरलितभ्रमरालिप्रकीर्णकमलमिव ॥]

मी तिचा अधर दांतांत धरला तेव्हां सुटण्यासाठीं ती मुख हलवूं लागली; यामुळें तिचे केस सैल झाले व ते तिच्या मुखावर ओघळले. सुवासानें चंचल झालेले भृंगे कमलाभोंवतीं जमावे, तसें तिचें मुख दिसूं लागलें. तेव्हांची आठवण अजून होते.

● अशी एकादी आठवण कशी जन्मभर जीवाला सलत राहते !

७९ पारोशी : 79. Superiority.

हल्लफलण्हाणपसाहिआणँ[4] छणवासरे सवत्तीणम् ।
अज्जाएँ मज्जणाणाअरेण कहिअं व सोहग्गम् ॥७९॥

[उत्साहतरलत्वस्नानप्रसाधितानां[5] क्षणवासरे सपत्नीनाम् ।
आर्यया[6] मज्जनानादरेण कथितमिव सौभाग्यम् ॥]

सणाच्या दिवशीं मोठ्या उत्साहानें उष्ण सुगंधी जलानें न्हाऊन व थाटमाट करून सवती सज्ज झाल्या. श्रेष्ठ पत्नीनें मात्र स्नानाबद्दल अनादर दाखवून आपलें सौभाग्य प्रकट केलें.

---

१. पहुण्णआलआ, पहोलआलआ. २. भिमरा, भसरा. ३. पइण्ण. ४. हल्लप्फल, हलफफल. ५. किंचिदुष्णसुगन्धिचिक्कणजलस्नान, हारिद्रजलस्नान. ६. ईश्वरसुतया.

● अभिमानामुळें तिनें स्नानाबद्दल व प्रसाधनाबद्दल पूर्ण आणि प्रियकराबद्दल कृत्रिम अनादर दाखविला आणि आपलें सौभाग्य प्रकट केलें. तिच्या सवती मात्र न्हाल्यानंतर केस सडकतांना बाहुमूलें दाखवून प्रलोभनाच्या खटपटीला लागल्या. ही पत्नी श्रेष्ठ व आर्या होती आणि तिच्या सवती अनार्या होत्या असें कवीला सुचवावयाचें आहे कीं काय ? आर्या या शब्दाचा अर्थ पुत्रवती असाही आढळतो. या आढ्यतेमुळें तिनें अनादर दाखविला कीं काय ? देशी नाममालेंत (१. ५०) अज्जा या शब्दाचे अर्थ असती व नववधू असेही दिलेले आहेत. नवऱ्याला प्रसन्न करावयाला नववधूला स्नान-प्रसाधनांची काय जरूर ? कीं ती असती असूनही आपलें सौभाग्य प्रकट करीत होती ? विव्वोक अलंकारः ' विव्वोकस्त्वतिगर्वेण वस्तुनीष्टेऽप्यनादरः ' । साहित्यदर्पण.

८० जाळीच्या बांगड्या : 80. Blessed.

ह्णाणहलिद्दाभरिअन्तराइँ जालाइँ जालवलअस्स ।
सोहन्ति ! किलिञ्चिअकण्टएण कं काहिसी कअत्थम् ।।८०।।

[स्नानहरिद्राभृतान्तराणि जालानि जालवलयस्य
शोधयन्ती क्षुद्र[1]कण्टकेन कं करिष्यसि कृतार्थम् ।।]

तूं न्हालीस तेव्हां तुझ्या अंगावरून ओघळलेली हरिद्रा तुझ्या बांगड्यांच्या जाळींत अडकून बसली. त्या बांगड्या तूं बारीक कांट्यानें स्वच्छ करीत आहेस. सांग, तूं कोणाला धन्य करणार आहेस ?

● जालवलय या शब्दाचे अर्थ गंगाधरानें केशसंमार्जिनी व कङ्कण असे दिलेले आहेत. मी ' जाळीची बांगडी ' असा अर्थ घेतलेला आहे. फणीच्या दांत्यांत किंवा बांगडीच्या जाळींत अडकलेली हरिद्रा शोधण्याचे निमित्तानें बाहुमूलांचें दर्शन देणाऱ्या उन्नतस्तनीला पाहून कोणा प्रेक्षकानें

१. वंशकण्टकेन, काष्ठशलाकया.

हे अभिलाषोद्गार काढलेले आहेत. एक टीकाकार सांगतो कीं हें न्हाणें पुष्पवतीचें आहे; प्रेक्षक विचारतो, तूं कोणाला धन्य करणार आहेस? कीं कोणालाही नाहींस? गाथेतील किलिञ्चिअ या देशी शब्दाच्या उपयोगावरून टीकाकार निष्कर्ष काढतात कीं या गाथेची नायिका स्वैरिणी आहे असें ध्वनित होत आहे. कोणाला धन्य करणार आहेस, या प्रश्नावरूनहीं हाच ध्वनि निघतो.

८१ प्रवास : 81. Stale.

अद्दंसणणे पेम्मं अवेइ, अइदंसणेण वि अवेइ ।
पिसुणजणजम्पिएण वि अवेइ, एमेअ वि अवेइ ॥८१॥

[अदर्शनेन प्रेमापैत्यतिदर्शनेनाप्यपैति ।
पिशुनजनजल्पितेनाप्यपैत्येवमेवाप्यपैति ॥]

अदर्शनामुळें किंवा अतिदर्शनामुळें प्रेम नाहींसें होतें; त्याचप्रमाणें नीचांचे शब्द ऐकून किंवा अकारणही प्रेम नष्ट होतें.

● म्हणून म्हणतें, तुम्ही चार दिवस प्रवासाला जा, म्हणजे आपलें अवटरलेलें प्रेम पुन्हा टवटवीत होईल. पण फार दिवस परदेशीं राहूं नका हं !

८२ प्रेमनाश : 82. Lost Love.

अद्दंसणेण महिलाअणस्स, अइदंसणेण णीअस्स ।
मुक्खस्स पिसुणअणजम्पिएण, एमेअ वि खलस्स ॥८२॥

[अदर्शनेन महिलाजनस्यातिदर्शनेन नीचस्य ।
मूर्खस्य पिशुनजनजल्पितेनैवमेवापि खलस्य ॥]

फार दिवस दर्शन झालें नाहीं तर स्त्रियांचें, फार दर्शन झालें तर नीचांचें, हल्कटांच्या शब्दांमुळें मूर्खांचें व कांहीं कारण नसतां दुष्टांचें प्रेम नष्ट होतें.

● प्रियकराच्या संकल्पित प्रवासाचा निषेध. माझ्यावरलें तुमचें प्रेम नष्ट होणार नाहीं असा मला भरंवसा वाटतो; कारण तुमचें हृदय उदार, उदात्त व विवेकी आहे. सज्जनांचें प्रेम चिरंजीव असतें.

८३ काळवंडलेलें माणिक : 83. Dark Ruby.

पोट्टपडिएहिँ दुःखं अच्छिज्जइ उण्णएहिँ होऊण ।
इअ चिन्तआणँ[1] मण्णे थणाणँ कसणं[2] मुहं जाअम् ॥८३॥

[उदरपतिताभ्यां दुःखं स्थीयते[3] उन्नताभ्यां भूत्वा ।
इति चिन्तयतोर्मन्ये स्तनयोः कृष्णं मुखं जातम् ॥]

(प्रणयाचा मान मिळत होता तोंवर) स्तनाग्रें कशीं उंच, (व लालबुंद) होतीं. (गर्भधारणेमुळें) आपणांला अवनत होऊन पोटावर पडून राहावें लागेल, या चिंतेमुळेंच जणूं स्तनांचीं मुखें काळवंडलीं आहेत.

● गर्भधारणेनंतर स्तनाग्रें कृष्णवर्ण होतात. एका छत्तीसगढी लोकगीतांत सांगितलें आहे कीं हें वर्णांतर सातव्या महिन्यांत होतें. (Folk Songs of Chhattisgarh : Verrier Elwin : p. 4.) गर्भावस्थेंत असलेल्या बालकाचें प्रसूतीनंतर पोषण करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे ही जाणीव असल्यामुळें जणूं अगोदरपासूनच त्यांचीं मुखें चिंतेनें काळवंडतात ! किती तरी प्रसूतींनंतर आणि किती तरी काळानंतर त्यांना अवनतावस्था यावयाची असते. जणूं या भावी

---

१. चिंतताण. २. कसिणं. ३. आस्यते, स्थीयते.

परिस्थितीची आतापासूनच शरम वाटूं लागल्यामुळें त्यांचीं मुखें काळवंडतात. हा झाला रसिकाच्या सौंदर्यदृष्टीचा कल्पनाविलास. जीवसृष्टीच्या दृष्टीनें मात्र हीच त्यांची कृतार्थता ! तिचे स्तन शिथिल झाले व त्यांचीं अग्रें कृष्णवर्ण झालीं तरीही तिची सर्व जबाबदारी तुझ्यावर आहे अशी दूतीची नायकाला सूचना.

८४ पत्नीदूती : 84. Messenger.

सो तुज्झ[1] कए सुन्दरि ! तह छीणो[2] सुमहिला हलिअउत्तो ।
जह से मच्छरिणीएँ वि दोच्चं जाआएँ पडिवण्णम् ॥८४॥

[स तवकृते सुन्दरि तथा क्षीणः सुमहिलो हालिकपुत्रः ।
यथा तस्य मत्सरिण्यापि दौत्यं जायया प्रतिपन्नम् ॥]

सुंदरी, शेतकऱ्याचा मुलगा तुझ्यासाठीं झुरून इतका क्षीण झाला आहे कीं त्याची पत्नी सुंदर व मत्सरी आहे, तरी (त्याच्या जिवासाठीं) दूतीकर्म करावयास स्वतः सिद्ध झाली आहे !

● या गाथेंतील नायिका उच्चवर्णीय असावी असें दिसतें. दूतीची मलावण. केवळ तो शेतकरी आहे म्हणून त्याचा तिरस्कार करूं नको किंवा तो तुझ्या अनुरागाला लायक नाहीं असें मानूं नको. त्याच्या पत्नी-कडे पाहा आणि त्याच्यावर, निदान तिच्यासाठीं दया कर ! आतां तूं त्याच्यावर कृपा केली नाहींस तर तुला पुरुषवधाचें व तिला वैधव्य आणल्याचें पातक लागेल ! त्याच्या पत्नीचें सौंदर्य पाहा, म्हणजे तो तुझ्या-वर अनुरक्त झाला हें तुझेंच सद्भाग्य आहे अशी तुझी खात्री पटेल. तो स्वतः हालिक, नांगऱ्या नाहीं, संपन्न जमीनदाराचा पुत्र आहे, असाही एका टीकाकारानें श्लेष काढला आहे !

१. तुह कएण. २. झाणो, झिण्णो, सीणो. ३. खिन्नः.

८५ दाक्षिण्य : 85. Taunt.

दक्खिण्णेण वि एन्तो सुहअ सुहावास अह्म हिअआइं।
णिक्कइअवेण जाणं गओसि का णिव्वुदी ताणम् ॥८५॥

[दाक्षिण्येनाप्यागच्छन्सुभग सुखयस्यस्माकं हृदयानि।
निष्कैतवेन यासां गतोऽसि का निर्वृतिस्तासाम् ॥]

सुभग, केवळ दाक्षिण्य म्हणून तुम्ही माझ्याकडे येतां आणि त्यामुळेंही मला इतकें सुख होतें. मग ज्यांच्याकडे तुम्ही निष्कपटपणें जातां त्यांना किती आनंद होत असेल ?

● फारा दिवसांनीं फिरकलेल्या पतीला पत्नीनें ऐकविलेले उपालम्भ-मिश्रित स्नेहोद्गार. बहुवल्लभाला जागोजाग हेंच ऐकावें लागतें.

८६ अयाईऽ ! 86. Slap.

एक्कं पहरुव्विण्णं[१] हत्थं मुहमारुएण वीअन्तो।
सो बि हसन्तीएँ मए गहिओ बीएण कण्ठम्मि ॥८६॥

[एकं प्रहारोद्विग्नं[३] हस्तं मुखमारुतेन वीजयन्।
सोऽपि हसन्त्या मया गृहीतो द्वितीयेन कण्ठे ॥]

मीं त्यांना एक चापट मारली तर माझ्या हाताला कोण झिण-झिण्या आल्या ! तेव्हां माझा दुखता हात हातीं घेऊन ते त्यावर फुंकर घालूं लागले. मग मीही हंसत हंसत तो हात एका हातानें धरून ठेवला व दुसरा हात त्यांच्या गळ्यांत घातला.

---

१. णिव्वई, णिव्वुई. २. पहरुव्वाअं, पहरुत्थाअं. ३. प्रहारखातं, प्रहारोद्धातं.

● स्वाधीनभर्तृकेचें सौभाग्यकथन. असा मार कोणाकोणाला मिळत असेल, कोण जाणे ! ज्याचें भाग्य व भोग्य, त्याचें त्यालाच ठाऊक ! आणि तो फारसा लागतही नाहीं ! असें सांगतात !

८७ सन्मुख : 87. Inclination.

अवलम्बिअमाणपरम्मुहीएँ एन्तस्स माणिणि ! पिअस्स[१] ।
पुट्ठपुलउग्गमो तुह कहेइ संमुहट्ठिअं[२] हिअअम् ॥८७॥
[अवलम्बितमानपराङ्मुख्या आगच्छतो मानिनि प्रियस्य ।
पृष्ठपुलकोद्गमस्तव कथयति संमुखस्थितं हृदयम् ॥]

मानिनी, तुझा प्रियकर अनुनयासाठीं आला आहे व तूं रुसवा धरून त्याला विन्मुख होऊन बसली आहेस; पण तुझ्या पाठीवर उमललेल्या रोमांचावरून दिसतें कीं तुझें हृदय मात्र त्याजकडे सन्मुख आहे.

● अधीरा नायिका. प्रियकराची चाहूल लागतांच ती मुख फिरवून बसली; पण त्याच्या नेत्रांतून ओसंडणाऱ्या प्रीतीमुळें तिच्या पाठीवर पुलकाचा उद्भव झाला. यावरून तिच्या पाठराखणी सखीला समजलें कीं ती प्रियकराला शरीरानें पराङ्मुख असली तरी हृदयानें ती त्याला सन्मुख आहे. सखी सांगते, पुष्कळ झालें, आतां हा लटका मान सोडून दे.

८८ विनय : 88. Modesty.

जाणइ जाणावेउं अणुणअविद्दविअमाणपरिसेसम्[३] ।
अइरिक्कम्मि[४] वि विणआवलम्बणं साचिअ कुणन्ती ॥८८॥

---

१. पुट्ठि. २. सम्मुहट्ठिअं, ठिअं. ३. विद्द विए, विहुरीय, विद्दविअरीअ. ४. पइरिक्कम्मिअ, रइ विक्कमम्मि.

[जानाति ज्ञापयितुमनुनयविद्रावितमानपरि¹शेषम् ।
विजनेऽपि विनयावलम्बनं सैव² कुर्वती ॥]

खरोखर, पतीनें मनधरणी केल्यानंतर मन द्रवलें तरीही शिल्लक राहिलेला मान एकान्तांतही केवळ विनयानें कसा व्यक्त करावयाचा हें तीच जाणते.

● मानधारणाचें शिक्षण. गूढ मानधारिणी, उदात्ता नायिका. या गाथेंतील भावना फार सूक्ष्म आहेत. मनधरणीनंतरही मान शिल्लक राहतोच; अपराधाबद्दल शिक्षा भोगली किंवा क्षमा मिळविली· तरीही जिच्याविरुद्ध आपण अपराध केला तिच्या अंतःकरणांत आपल्या अपराधाची स्मृति राहतेच; त्याप्रमाणें मान राहिला आहे हें व्यक्त करावयाचें नाहीं आणि मान सर्वस्वीं सोडला आहे हेंही दिसूं द्यावयाचें नाहीं, अशी बाह्यतः औपचारिक व अंतर्यामीं सहृदय सहानुभूतीची संकीर्ण वृत्ति या गाथेंत आहे; राग व अनुराग, स्मित व उपहास याचें बहारदार संमिश्रण.

८९ गोरज : 89. Excuse.

मुहमारुएण तं कह्ण ! गोरअं राहिआएँ अवणेन्तो ।
एताणँ वल्लवीणं अण्णाण वि गोरअं हरसि ॥८९॥

[मुखमारुतेन त्वं कृष्ण गोरजो राधिकाया अपनयन् ।
एतासां बल्लवीनामन्यासामपि गौरवं हरसि ॥]

कृष्णा, संध्याकाळीं परतणाऱ्या गाईंच्या पावलांमुळें उडालेले धुळीचे कण राधेच्या डोळ्यांत गेले. ते गोरज काढण्यासाठीं तूं तिच्या डोळ्यांत फुंकर घालतोस आणि गवळणींचा व इतर स्त्रियांचाही गौरव व गौरता हरण करतोस.

---

१. अतिरिक्तमेव. २. सत्यं.

● कृष्णाची चाहूल लागतांच डोळ्यांत गोरज गेल्याचें निमित्त करून राधा डोळा चोळूं लागली. कृष्ण पाळतीवर होताच. डोळ्यांत फुंकर घालण्याच्या निमित्तानें त्यानें तिचें मुख जरा तिरपें करून आणि स्वतःचें मुख जरा ओणवें करून तिचें चुंबन घेतलें. निमित्त खरें होतें कीं खोटें, राम जाणे–पण तिला काय हवें होतें तें कृष्णानें मात्र जाणलें. हें इतर गोपींनीं पाहिलें. त्यांच्या देखत झालेल्या या प्रकारामुळें त्यांचा सौंदर्याभिमान दुखावला गेला आणि त्या काळवंडल्या. गोरज, गौरव व गौरवर्ण यांना प्राकृतांत गोरअम् हा एकच शब्द असून त्यांच्या श्लेषावर या गाथेंत चमत्कृति निर्माण केली आहे. कृष्णानें इतर गोपींचा अपमान केला आणि जणूं त्यांना कृष्णरूप देऊन त्यांचा गौरव केला! बहुवल्लभ नायक एकीवरच अनुरक्त असलेला पाहून अन्येनें कृष्णाच्या निमित्तानें काढलेले उद्गार.

९० निर्लज्ज : 90. Shameless.

किं दाव कआ अहवा करेसि कारिस्सि[1] सुहअ! एत्ताहे।
अवराहाणँ अलज्जिर! साहसु[2] कअए खमिज्जन्तु ॥९०॥

[किं तावत्कृता अथवा करोषि करिष्यसि[3] सुभगेदानीम्।
अपराधानामलज्जाशील कथय कतरे क्षम्यन्ताम्॥]

निर्लज्जा, सांग, मी तुला आतां कसली क्षमा करूं? केलेल्या अपराधांची, कीं करीत आहेस त्यांची, किंवा करणार आहेस त्या अपराधांची?

● खण्डिता नायिका, बहुवल्लभ नायक. तो तिची मनधरणी करीत होता. त्याचा कांहीं अपराध नुकताच तिच्या निदर्शनाला आला होता. तो म्हणाला, प्रिये, क्षमा कर. ती उसळून विचारते, निर्लज्जा, क्षमा कोण-

१. काहिसि. २. कहेसु. ३. करिष्यसि वा सुभग एतावत्काले.

कोणत्या अपराधांची करूं ? निषेधांतही अनुराग अधुकपणें व्यक्त झालेला आहे. आजवर अनेक वेळां तुझ्या अपराधांची मी तुला क्षमा नाहीं का केली ? म्हणूनच आपला स्नेह कायम राहिला. तूं माझा अंत कोठवर पाहणार ? बहुवल्लभ असल्यामुळें नायकाला सुभग म्हटलेलें आहे. होय, जे असे सुभग असतात ते निर्लज्जही असतातच ! किंवा त्यांना लज्जा सोडावी लागते.

९१ मालक : 91. My Lord.

णूमेन्ति[१] जे पहुत्तं[२] कुविअं दासो[३] व्व जे पसाअन्ति ।
ते च्चिअ महिलाणँ पिआ, सेसा सामि च्चिअ वराआ ॥९१॥
[गोपायन्ति ये प्रभुत्वं कुपितां दासा इव ये प्रसादयन्ति ।
त एव महिलानां प्रियाः शेषाः स्वामिन एव वराकाः ॥]

रागावलेल्या स्त्रियांचा अनुनय करतांना जे त्यांच्यावरील आपलें प्रभुत्व प्रकट करीत नाहींत, उलट दासाप्रमाणें त्यांची मनधरणी करतात, तेच त्यांना प्रिय असतात. बाकीचे बिचारे नुसते नांवाचे मालक !

● दुर्विदग्ध नायकाला दूतीनें केलेला अनुनयाचा उपदेश. दण्डप्रयोगानें प्रभुत्वाला मान्यता मिळेल, पण प्रेम निर्माण होणार नाहीं किंवा प्राप्तहि होणार नाहीं. प्रियकर हृदय नाचवतो आणि मालक फार तर देहावर सत्ता गाजवतो. प्रेम ही लूट नाहीं, प्रेम हा प्रसाद आहे. सरस्वतीकण्ठाभरणांत ' दूमेंति जे मुहुत्तं '–' दूनयन्ति ये मुहूर्तम् ' असा पाठ दिला आहे : " जे महिलांना क्षणभर चिडवतात आणि नंतर दासाप्रमाणें त्यांची सेवा करून त्यांना प्रसन्न करून घेतात तेच त्यांना प्रिय असतात. " समानार्थी

१. न कुणन्ति, गूसात्त, दूमंति, णूयेन्ति. २. मुहुत्तं, पहुत्थं. ३. दासव्व. ४. न कुर्वन्ति, नमन्ति.

सुभाषित पद्य : " आश्लिष्टा रभसाद्विलीयत इवाक्रान्ताऽप्यनङ्गेन या, यस्याः कृत्रिमचण्डवस्तुकरणाकूतेषु खिन्नं मनः। कोऽयं काऽहमिति प्रवृत्तसुरता जानाति या नान्तरं, रन्तुः सा रमणी स एव रमणः शेषौ तु जायापती ॥" अमरुक : सुभाषितावली.

९२ मालती : 92. Pregnant.

तइआ कअंग्घ[1] महुअर ! ण रमसि अण्णासु पुप्फजाईसु ।
बद्धफलभारगुरुइं मालइँ एह्निं परिच्चअसि ॥९२॥

[तदा कृतार्घ[2] मधुकर न रमसेऽन्यासु पुष्पजातिषु ।
बद्धफलभारगुर्वीं मालतीमिदानीं परित्यजसि ॥]

मधुकर, तूं पूर्वी फक्त मालतीचें पूजन करीत होतास व दुसऱ्या कोणत्याही जातीच्या पुष्पामध्यें रमत नव्हतास; पण आतां मालतीनें फल धारण केलेलें पाहून तूं तिचा त्याग केलास.

● उदासीन नायकाप्रत दूतीचे निषेधोद्गार. किंवा, गर्भधारणेमुळें आतां ती उपभोगाला योग्य नाहीं, विपरीतरताला अक्षम आहे, अशी भ्रमराच्या निमित्तानें दूतीची सूचना. फुलें होतीं तोंवर मकरन्द होता आणि त्यांभोंवतीं त्याच्या लोभानें भ्रमर घोंगावत होता. आतां फलधारणामुळें फुलें नाहींत व मकरन्दही नाहीं. म्हणून भ्रमरानें तिचा त्याग केला. कृतघ्न:!

९३ नाहीं मनिंची हौस फिटली : 63. Thirsty.

अविअह्णपेक्खणिज्जेण[3] तक्खणं मामि ! तेण दिट्ठेण ।
सिविणअपीएण व पाणिएण तण्ह व्विअ ण फिट्टा ॥९३॥

---

१. किअग्घ, किंअग्घ.-२. कृताघ्र, कृतार्थ. ३. पेछणिज्जेण.

[अवितृष्णप्रेक्षणीयेन तत्क्षणं मातुलानि तेन दृष्टेन[1] ।
स्वप्नपीतेनेव पानीयेन तृष्णैव न भ्रष्टा[2] ॥]

मामी, मी त्याच्याकडे क्षणभरच सतृष्ण नजरेनें रोंखून पाहिलें. स्वप्नांत पाणी प्याल्यानें तहान मिटत नाहीं तसें झालें व मी अतृप्तच राहिलें.

● मामीनें अगोदरच त्याची भलावण केली होती. तेवढ्यावरून नायिका त्याच्यावर अनुरक्त झाली होती. त्याचें प्रत्यक्ष दर्शन झालें तेव्हां तिनें केलेलें वर्णन त्याच्या गुणांच्या पासंगालाही पुरेसें नाहीं, असें नायिकेच्या प्रत्ययाला आलें. मामीनें त्यांचा संकेत ठरवून दिला व नंतर त्यांची भेट झाली. नंतर मामीनें विचारलें, कसें काय जमलें ? नायिका उद्वेगानें सांगते, मला दृष्टिसुख सुद्धां पुरेसें मिळालें नाहीं ! स्वप्नांतला घोट, ओंठही ओला झाला नाहीं, मग तहान कशी फिटणार ?

९४ देशालंकार : 94. Desolate.

सुअणो जं देसमलंकरेइ, तं विअ करेइ पवसन्तो ।
गामासण्णुम्मूलिअमहावडट्ठाणसारिच्छम्[3] ॥९४॥

[सुजनो यं देशमलंकरोति तमेव करोति प्रवसन् ।
ग्रामासन्नोन्मूलितमहावटस्थानसदृशम् ॥]

आपल्या निवासानें सुजन देशाला अलंकृत करतात, त्यांनीं त्यागलेला देश उदासवाणा दिसतो. आमच्या गांवाच्या शिंवेवरला मोठा वड, (जणूं गांवाचा अलंकार, तो होता;) उन्मळून पडल्यामुळें आतां पार कसा उजाड दिसत आहे.

● महावडाजवळ भेट ठरली होती, कारण तेथें पारंब्यांच्या आसऱ्याला दिवसांही अंधःकार असे. तो वृक्ष झंझावातांत कोसळल्यामुळें संकेतस्थानांत

१. अतुलितेन. २. नापगता, नष्टा. ३. भासण्णुम्मूलिअ.

बदल झाल्याची सूचना; किंवा, वडाजवळ तुझी बराच वेळ वाट पाहून प्रियकर परत गेल्याची सूचना. सुजनांच्या देशांतरामुळें प्रजा दुःखित होते, त्याचप्रमाणें वड पडल्यामुळें स्वैरिणी दुःखित झाल्या.

९५ आठवण : 95. Remembrance.

सो णाम संभरिज्जइ पब्भसिओ जो खणं पि हिअआहि।
संभरिअव्वं च कअं गअं, च पेम्मं णिरालम्बम् ॥९५॥

[स नाम संस्मर्यते प्रभ्रष्टो यः क्षणमपि हृदयात्।
स्मर्तव्यं[1] च कृतं गतं च प्रेम निरालम्बम् ॥]

क्षणभरच कां होईना, जें हृदयांतून नष्ट होतें त्याचीच आठवण करावी लागते; आणि ज्याची आठवण करावी लागते तें प्रेम अगोदरच निराधार झालेलें असतें.

● आमची आठवण राहाल ना? प्रियकरानें परत जातांना विचारलें. या प्रश्नाला प्रेयसीचें उत्तर. जें निराधार तें नष्ट व्हावयास फारसा वेळ लागत नाहीं. मन्दस्नेह, विरलदर्शन किंवा भविष्यत्पथिक नायकाप्रत अनुरागकथन.

९६ कांटेरी कुंपण : 96. Barbed Fencing.

णासं व सा कवाले अज्ज वि तुह दन्तमण्डलं बाला।
उब्भिण्णपुलअवइवेढ[2]परिगअं रक्खइ वराई ॥९६॥

[न्यासमिव सा कपोलेऽद्यापि तव दन्तमण्डलं बाला।
उद्भिन्नपुलकवृतिवेष्ट[3]परिगतं रक्षति वराकी ॥]

---

१. स्मरणीयं, संस्मर्तव्यं, संस्मृत्यं. २. वेढ, वेढ. ३. वेष्टन.

तूं बालेच्या गालांवर दन्तव्रणांचें मण्डल उमटविलेंस. आपल्याकडे जणूं ही ठेव ठेवलेली आहे ह्या भावनेनें बिचारी त्यांभोंवतीं रोमांचांचें कुंपण उभें करून त्यांचें अजून रक्षण करीत आहे.

● ती दन्तमण्डलाचें रक्षण करीत आहे, कारण तुझी ही ठेव परत मागण्यासाठीं तूं येशील अशी तिला आशा व भरंवसा वाटत आहे. तिला तुझी आठवण होते तेव्हां तिच्या गालांवर रोमाञ्च उभे राहतात आणि तुझी आठवण हृदयांत सारखी स्फुरत असल्यामुळें रोमाञ्चही सदैव फुललेले असतात. ती बालिका मुग्ध व निष्कपट आहे; तिला पुरुषांच्या चारित्र्याचा अनुभव नाहीं. बिचारी ! कारण आपण फसलों आहोंत याची तिला दादही नाहीं; आणि, शठा, तूं मात्र तिला गुंतवून अन्यत्र भटकत आहेस. मन्दस्नेह, विरलदर्शन नायकाला अनुकूल करून घेण्यासाठीं दूतीचे उद्गार.

९७ कोण कोणाचा ? — 97. Forlorn.

दिट्ठा चूआ[1], अग्घाइआ सुरा, दक्खिणाणिलो सहिओ ।
कज्जाइं व्विअ गरुआइँ, मामि[2] ! को वल्लहो कस्स ? ॥९७॥

[दृष्टाश्चूता[3] आघ्राता सुरा दक्षिणानिलः सोढः ।
कार्याण्येव गुरुकाणि मातुलानि[4] को वल्लभः कस्य ॥]

मामी–(मन्मथाचा उन्माद यावा म्हणून) मी आम्राङ्कुरांचें दर्शन व मद्याचा आस्वाद घेतला आणि मलयानिलाची झुळूक अंगावर घेऊन मी सज्ज झालें (पण पति प्रवासाहून परत आले नाहींत). माझ्यापेक्षां त्यांना आपल्या कामांचेंच महत्त्व अधिक वाटतें. (एवढी निराशा झाली तरी मी जगलें.) कोण कोणाचा प्रियकर ? (आणि कोण कोणाची प्रिया ?)

---

१. सुआ. २. यामि. ३. नूता. ४. भगिनी.

● तुझा वल्लभ लवकरच परत येईल, असें आश्वासन देणाऱ्या मामीला उद्देशून नायिकेनें काढलेले उद्वेगोद्गार; किंवा स्वनायकाबद्दल वैराग्य प्रकट करणारे स्वयंदूती प्रोषितभर्तृकेचे उद्गार. प्रवासांत असलेल्या पतीनें काय आम्राङ्कुर पाहिले नसतील? कीं आम्रवनांत फेरी टाकली नसेल? कीं मद्याचा आस्वाद घेतला नसेल? काय वसंतागम त्यांना जाणवला नसेल? ते माझ्यावर अनुरक्त असते तर अशा दिवसांत हजार कामें सोडून घरीं आले नसते काय? खात्रीनें, ते दुसरीकडे रमले असतील आणि सुखासाठीं हेंच करीत असतील; हींच त्यांचीं महत्त्वाचीं कामें! मग मीं तरी पातिव्रत्य कां सांभाळावें? मलयानिलाची झुळूक वाहूं लागली कीं स्त्री-पुरुषांना कशलेंही भान राहत नाहीं, हेंच खरें.

९८ पाहिलें पाऊल : 98. First Step.

रमिऊण पअं पि गओ[१] जाहे उवऊहिउं[२] पडिणिउत्तो।
अहअं पउत्थपइआ[३] व्व तक्खणं सो पवासि व्व ॥९८॥
[रन्त्वा[४] पदमपि गतो यदोपगूहितुं प्रतिनिवृत्तः[५]।
अहं[६] प्रोषितपतिकेव तत्क्षणं स प्रवासीव ॥]

रममाण झाल्यानंतर (ते प्रवासाला निघाले), एक पाऊल गेले न गेले तोंच मला आलिंगन देण्यासाठीं ते परत आले; आणि मध्यंतरींच्या त्या एकाच क्षणीं मी विरहिणी झालें व ते प्रवासी झाले.

● स्वाधीनभर्तृकेचे उद्गार. एका क्षणात आमची अशी अवस्था झाली. मग ते खरोखरीच लांबच्या प्रवासाला गेले तर काय दशा होईल! पतीनें अधूनमधून प्रवासाला जात असावें आणि पत्नीनें मान धारण करावा, त्याशिवाय प्रेमविलासांना रंग भरत नाहीं, असें सांगणाऱ्या सखीला नायिकेचें उत्तर.

१. पअं पि ण गओ. २. अवऊहिउं पडिणिअत्तो. ३. पउत्थवइअ्व. ४. रमित्वा, रमयित्वा. ५. प्रतिनिवर्तमानः ६. अथाहं.

९९ पूर्वपुण्याई : 99. Accumulated Merit.

अवि[1]इण्हपेच्छणिज्जं समसुह[2]दुःखं विइण्णसब्भावम् ।
अण्णो[3]ण्णहिअअलग्गं पुण्णेहिँ जणो जणँ लहइ ॥९९॥

[अवितृष्णप्रेक्षणीयं समसुखदुःखं वितीर्णसद्भावम् ।
अन्योन्यहृदयलग्नं पुण्यैर्जनो जनं लभते ॥]

ज्याच्याकडे कितीही वेळ पाहत राहिलें तरी तृप्ति होत नाहीं, जो आपल्या सुखदुःखांत सहभागी असतो, सद्भावना प्रकट करतो व हृदयाशीं एकरूप होतो असा पुरुष पूर्वपुण्याईमुळेंच प्राप्त होतो.

● मन्दस्नेही पतीला अनुकूल करण्यासाठीं पतिव्रतेचे उद्गार. पतीबद्दल वैराग्य व उपपतीवर प्रीति असणारी कुलटाही असेंच म्हणेल. प्रियकराच्या किंवा प्रियेच्या प्राप्तीचाही पूर्वपुण्याईशीं संबंध असतो तर !

१०० संवेदना : 100. Pain & Pleasure.

दुःखं देन्तो[4] वि सुहं जणेइ जो जस्स [5]वल्लहो होइ
दइअणहदूणिआणं[6] वि वड्ढइ[7] थणाणँ[8] रोमञ्चो ॥१००॥

[दुःखं दददपि सुखं जनयति यो यस्य वल्लभो भवति ।
दयितनखदूनयो[9]रपि [10]वर्धते स्तनयो रोमाञ्चः ॥]

१. अविअण्ह, अविण्ह. २. दुक्खसुहम् . ३. अणुण्ण. ४. देत्तो, देंतो, दिंतो. ५. सरस्वतीकण्ठाभरणांतील व साहित्यमीमांसेंतील पाठः जो जस्स हिअअदइओ दुक्खं देन्तो वि सा सुहं देइ. ६. दुम्मिआणं, दूमिआणं. ७. वड्ढइ, वट्ठइ, वड्ढइ. ८. थणआण, थणयाण. ९. दुर्मनस्कयोरपि, दुःखितयोरपि. १०. वर्तते.

जो जिचा वल्लभ त्यानें तिला (बाह्यतः) दुःख दिलें तरी त्यामुळें तिला (अंतर्यामीं) सुखच वाटतें. प्रियकराच्या नखांचे वण उमटले तरी प्रियेच्या स्तनांवर रोमांचच उमलतात.

● नायिकेच्या अंतःकरणाचा ठाव घेऊं पाहणारी दूती विचारते, तो तुला एवढें दुःख देतो, तरी त्याच्यावर तुझें इतकें प्रेम कसें ? या प्रश्नाला पतिव्रतेचें उत्तर. जो जिचा प्रियकर त्यानें तिला दुःख दिलें तरी त्यापासून प्रेयसीला सुखच होतें; किंबहुना थोड्याबहुत दुःखावांचून सुख संभवतच नाहीं. कामशास्त्राचा हा सिद्धान्त अनादिसिद्ध व अबाधित आहे. क्षत तामस, प्रेम राजस आणि रोमाञ्च सात्त्विक; या तिघांचा संयोग हीच सौख्याची परिसीमा !

● ● ●

रसिअजणहिअअइए कवइच्छलपमुहसुकइणिम्मविए ।
सत्तसअम्मि समत्तं पढमं गाहासअं एअं ॥

[रसिक जनहृदयदयिते कविवत्सलप्रमुखसुकविनिर्मिते ।
सप्तशतके समाप्तं प्रथमं गाथाशतकमेतत् ॥]

● ● ●

द्वितीयं शतकम्

१०१ अनुपान : 101 Prescription.

धरिओ धरिओ विअलइ उअेएसो पिहसहीहिँ दिज्जन्तो ।
मअरद्धअबाणपहारजज्जरे तीअ हिअअम्मि ॥१॥

[धृतो धृतो विगलत्युपदेशः प्रियसखीभिर्दीयमानः ।
मकरध्वजबाणप्रहारजर्जरे तस्या हृदये ॥]

मधून मधून प्रियकरावर रुसत जा, असा प्रिय सख्यांनीं वारंवार दिलेला उपदेश ऐकून तिनें मान धारण केलाच तर प्रियकराचें दर्शन होतांच मकरध्वजाच्या बाणांच्या प्रहारांनीं जर्जर झाल्यामुळें तो तिच्या ध्यानांतच राहत नाहीं.

● प्रियकरानें वारंवार आपला अनुनय करावा अशी स्त्रियांना इच्छा व अपेक्षा असते. प्रेमविवाह झालेला असल्यास विवाहापूर्वी केलेला अनुनय फलद्रूप झालेला असल्यामुळें आणि साधा विवाह झालेला असल्यास संसारांतील अडचणींत गुरफटल्यामुळें, किंवा कांहीं अन्य कारणांमुळें पतीला ही अपेक्षा उमजत नाहीं किंवा पुरी करतां येत नाहीं. ही आपली उपेक्षा, असें स्त्रियांना वाटतें. यामुळें पतिपत्नींच्या प्रेमांत, कधीं बाह्यतः तर कधीं अंतर्यामींही, अंतर पडतें. कोमेजलेल्या प्रेमाला टवटवी आणण्यासाठीं कृत्रिम उपाय योजावे लागतात. रुसवा हा असाच एक प्रकार आहे; कधीं तो स्त्रियांच्या मनाच्या बांधणींत असतो, तर कधीं तो अपेक्षा-भंगाच्या पोटीं जन्माला येतो. नायिका सांगते, आमचें प्रेम इतकें उज्ज्वल आहे कीं तें फुलविण्यासाठीं कृत्रिम उपायांची जरूरच भासत नाहीं; रुसण्याचा विचारच माझ्या मनांत येत नाहीं आणि कोणी भरवून दिलाच

---

१. उवएसो. २. तीए.

तर प्रियकराचें दर्शन होतांच ओढून ताणून धारण केलेला मान आपोआप व एकाएकीं गळून पडतो; अनुनयाची इच्छा-अपेक्षा यांचें मानच राहत नाहीं.

१०२ पूर :   102 Flood.

तडसंठिअणीडेक्कन्तपीलुआरक्खणेक्कदिण्णमणा ।
अगणिअविणिवाअभआ पूरण समं वहइ काई ॥२॥

[तटसंस्थितनीडैकान्तशावकरक्षणैकदत्तमनाः ।
अगणितविनिपातभया पूरेण समं वहति काकी ॥]

पूर आलेल्या नदीच्या तीरावरील झाडावरल्या घरट्यांत आपल्या पिलांचें रक्षण कसें होईल या विचारानें वृत्ति एकाग्र झाल्यामुळें स्वनाशाची पर्वा न करणारी एकाकी कावळी पुराबरोबर वाहून गेली.

● संकेतस्थानभंगाची सूचना; किंवा नदीला पूर आला होता तरी संकेताप्रमाणें मी झाडाखालीं नायकाची वाट पाहत बसलें होतें, पण तो आलाच नाहीं अशी नायिकेची दूतीजवळ तक्रार. पुरुषांपेक्षां स्त्रियांचें प्रेम दृढ असतें, अशी सूचना.

१०३ निमित्त :   103 Arbour.

बहुपुप्फभरोणामिअभूमीगअसाह सुणसु विण्णत्तिम् ।
गोलातडविअडकुडङ्ग महुअ ! सणिअं गलिज्जासु ॥३॥

[बहुपुष्पभरावनामितभूमीगतशाख शृणु विज्ञप्तिम् ।
गोदातटविकटनिकुञ्जमधूक शनैर्गलिष्यास ॥]

१. पीलक, डिम्भ.

मधूक वृक्षा, गोदातीरावरील गर्द राईत तुझ्या फांद्या फुलांच्या भारानें जमिनीपर्यंत लवल्या आहेत. माझी विनंति ऐक, तूं आपलीं फुलें अगदीं हळू हळू ढाळ.

● म्हणजे तीं वेंचावयास खूप वेळ लागतो या निमित्तानें माझें अभिसरण पूर्ण होईल. स्वैरिणी नायिका. मोहाचीं फुलें वेंचण्यासाठीं मी नदीतीरीं जाणार आहे, मला खूप सवड आहे, अशी सूचना. मोहाची निशा आणि गोदेचें सान्निध्य !

१०४ बहराची अखेर : 104 Last Blossoms.

णिप्पच्छिमाइँ असई दुःखालोआइँ महुअपुप्फाइं[1] ।
चीए बन्धुस्स[2] व अट्ठिआइँ रुअई[3] समुच्चिणइ ॥४॥

[निष्पश्चिमान्यसती दुःखालोकानि मधूकपुष्पाणि ।
चितायां बन्धोरिवास्थीनि रोदनशीला समुच्चिनोति ॥]

मधूकपुष्पांचा हंगाम संपत आल्यामुळें असतीचें अंतःकरण व्यथित झालें आणि ती अश्रु ढाळीत उरलीं सुरलीं फुलें वेंचूं लागली. हें पाहतांना वाटतें कीं जणूं ती आपल्या बांधवांच्या अस्थीच गोळा करीत आहे.

● मधूकांचा बहर संपला आणि स्वैरिणीला सुतक आलें. आतां दिवसांउजेडीं नदीकांठच्या झाडींत रेंगाळण्याला सबब राहिली नाहीं व सोइस्कर असें संकेतस्थानही नष्ट झालें.

---

१. महुअउप्फाइं. २. बंधुअस्स. ३. रुअरी.

१०५ ओंडका : 105. Drifting Log.

ओ हिअअ मडहसरिआजलरअहीरन्तदीहदारु[1] व्व ।
ठाणे ठाणे व्विअ लग्गमाण केणावि डज्झिहसि ॥५॥

[हे हृदय स्वल्पसरिज्जलरयन्हियमाणदीर्घदारुवत् ।
स्थाने स्थाने एव लगत्केनापि घर्ष्यसे ॥]

थोडें पाणी असलेल्या पण वेगानें धांवणाऱ्या ओढ्यांतून मोठा ओंडका अडखळत वाहत जातो, कोठें कोठें अडकतो व शेवटीं कोणी तरी तो ओढून घेऊन जाळतो. माझें अस्थिर हृदय असेंच वाहवत चाललें आहे. हृदया, तुलाही कोणी तरी असेंच दग्ध करील.

● पाणी उथळ व त्याला खळखळ, म्हणून ओंडका अडखळत वाहत आहे. त्याची मूळची वृत्ति स्थिर, पण प्रवाहपतित झाल्यामुळें त्याचा इलाज चालत नाहीं. त्या वाहत्या ओंडक्याला सुद्धा किनारा जागोजाग आश्रय देतो. डोहाचा आधार मिळाला कीं तो स्थिर होईल. माझें हृदय अस्थिर आहे, हें खरें, पण म्हणून मी वृत्तीनें अधम आहे असें मात्र नाहीं. माझ्यावर थोडा तरी विश्वास ठेव व अनुभव पहा; मी त्या ओंडक्याइतका नीरस खासच नाहीं. तुझें हृदय विशाल आहे. तेथें मला आश्रय दे, अशी नायकाची विनवणी.

१०६ अधरराग : 106. Lip-Stick.

जो तीऍ अहरराओ रत्तिं उव्वासिओ पिअअमेण ।
सो व्विअ दीसइ गोसे सवत्तिणअणेसु संकन्तो ॥६॥

१. शुष्कदारु. २. क्षुद्रनदी, कुल्या. ३. भंज्यसे.

[यस्तस्या अधररागो रात्रावुद्वासितः प्रियतमेन ।
स एव दृश्यते प्रातः सपत्नीनयनेषु संक्रान्तः ॥

तिनें ओठाना लावलेला (लाल) रंग रात्रीं प्रियकरानें आपल्या ओठांनीं पुसून घेतला. सकाळीं (हें दिसलें तेव्हां) जणूं तोच रंग तिच्या सवतींच्या नेत्रांचे ठिकाणीं प्रकट झाला.

● सवतींच्या अंतःकरणांत ईर्ष्या आहे. त्या अतृप्त व सुसाध्य आहेत, असा दूतीचा अभिप्राय. परिवृत्ति अलंकार: ' व्यत्ययो वस्तुना यस्तु यो वा विनिमयो मिथः । परिवृत्तिः ': सरस्वतीकण्ठाभरण.

१०७ अपेक्षा : 107. Helping Hand.

गोलाअडट्ठिअं पेच्छिऊण गहवइसुअं हलिअसोण्हा ।
आढत्ता[1] उत्तरिउं[3] दुःखुत्ताराएँ[2] पअवीए ॥७॥

[गोदावरीतटस्थितं प्रेक्ष्य गृहपतिसुतं हलिकस्नुषा ।
आरब्धा[4] उत्तरीतुं[3] दुःखोत्तारया पदव्या ॥]

घरधन्याचा मुलगा गोदावरीच्या तीरावर उभा असलेला पाहून शेतकऱ्याची सून मुद्दाम अवघड वाटेनें नदी उतरूं लागली.

● आपली अडचण ओळखून त्यानें आधारासाठीं हात द्यावा म्हणून. कांहीं साधावयाचें असलें म्हणजे बायकांना अडाणीपणाचें ढोंग सहज साधतें. ' हस्तावलंबदानेन आवयोरस्तु संगमः । ' तो तिचा पति होता कीं प्रियकर ? कीं ती अगर तिचा नवरा कामाला होतीं त्या घरधन्याचा मुलगा ? गंगाधर सांगतो, तो तिचा पति होता. मग त्यांचा उल्लेख असा तिऱ्हाइतांसारखा कां ? भाव अलंकार : ' अभिप्रायानुकूल्येन प्रवृत्तिर्भाव उच्यते । ': सरस्वती-कण्ठाभरण.

---

१. आरद्धा, आढत्ता. २. दुक्खुत्ताराइ. ३. अवतरितुं, उत्तर्तुं. ४. प्रारब्धा.

१०८ केशाकर्षण : 108. At the Feet of the Mistress.

चलणोआसणिसण्णस्स तस्स भरिमो अणालवन्तस्स ।
पाअङ्गुट्ठावेढिअकेसदिढाअड्ढणसुहेल्लिम् ॥८॥

[चरणावकाशनिषण्णस्य तस्य स्मरामोऽनालपतः ।
पादाङ्गुष्ठावेष्टितकेशदृढाकर्षणसुखम् ॥]

माझा राग शांत करण्यासाठीं तो माझ्या पायांजवळ गुपचुप पडला होता आणि त्याचे केस पायाच्या अंगुष्ठाला गुंडाळून मी ओढीत होतें. यांतच त्याला सुख वाटत होतें. त्याची अजून मला आठवण होते.

● काळ बदलला. आतां हें सुख किंवा दुःख अप्राप्य झालें आहे. विलास रिवाजाशीं समान्तर असतात. नवरा माझ्या इतका आधीन आहे, तरी मी तुझ्यावर अनुरक्त आहे, हें तुझें भाग्य. माझा अनुनय तूंही तशाच लीनतेनें केला पाहिजेस, अशी स्वैरिणीची नायकाला सूचना.

१०९ अस्वल : 109. Bear.

फाँलेइ अच्छभल्लं व उअह कुग्गामदेउलद्दारे ।
हेमन्तआलपहिओ विज्झाअन्तं पलालग्गिम् ॥९॥

[पाटयत्यच्छभल्लमिव पश्यत कुग्रामदेवकुलद्वारे ।
हेमन्तकालपथिको विध्मायमानं पलालाग्निम् ॥]

हिंवाळ्यांत कुग्रामांतील देवळाच्या दारांत प्रवाशाचा मुक्काम आहे. फाडलेल्या अस्वलासारखी दिसणारी, विझत आलेली, भाताच्या पेंढ्याची शेकोटी फुलविण्यासाठीं (फुंकर घालून) तो ती फोडीत आहे.

---

१. वेटिअ, वेढिअ, वेढिअ. २. अट्ठण, कड्ढण. ३. सुखकेलिम्. ४. फाडेइ. ५. बुज्झाअन्तम्. ६. भल्लुकम्. ७. निर्वाप्यमाणं, निर्वांतं.

● देवळांत संकेत ठरविला होता, पण आतां तेथें एकान्त राहिलेला नाहीं, अशी नायकाला दूतीची सूचना : किंवा संकेताप्रमाणें तूं तिकडे गेली नाहींस म्हणून नायक अस्वस्थ झाला आहे, अशी नायिकेला दूतीची सूचना. अस्वलाचें शरीर फाडतांना त्याच्या शरीराचा लालभडक अंतर्भाग दिसतो, तशीच ती शेकोटी दिसत आहे.

११० उताणें आभाळ : 110. Reflection.

कमलाअरा ण मलिआ, हंसा उड्डाविआ ण अ पिउच्छा ! ।
केणॉवि गामतंडाए[1] अब्भं उत्ताणअं[2] व्वूढम्[3] ॥ १० ॥

[कमलाकरा न मृदिता हंसा उड्डायिता न च पितृष्वसः ।
केनापि ग्रामतडागे अभ्रमुत्तानितं[4] क्षिप्तम् ॥]

आत्याबाई, आपल्या गांवच्या तळ्यांत कोणी तरी आभाळ उताणें टाकलें आहे, (तें पाहिलेंत का ? तरीही तळ्यांतील) कमळांचे ताटवे तुडवले गेलेले नाहींत आणि हंसही उडवून लावले गेलेले नाहींत.

● नवकवीला अकल्पित वाटेल अशी कल्पना. एवढें मोठें आभाळ कोणी तरी पाण्यांत टाकलें; पण येथें झटापटीच्या खुणा दिसत नाहींत, हें कसें ? पहाटे संकेत ठरविलास पण तिकडे गेला नाहींस म्हणून दूतीनें केलेला नायकाचा निषेधः किंवा तळ्याजवळ निर्धास्त एकान्त असल्याची सूचना.

१११ विषबाधा : 111. Poisonous Words.

केण मणे भग्गमणोरहेण संलाविअं[5] पवासो त्ति ।
सविसाइँ व अलसाअन्ति जेण बहुआएँ अङ्गाइं ॥ ११ ॥

१. तलाए. २. उत्ताणिअं. ३. छूढम्. ४. उत्तानकम्. ५. उल्लाइयं, उल्लाविअं.

[केन मन्ये भग्नमनोरथेन संलापितं प्रवास इति ।
सविषाणीवालसायन्ते येन वध्वा अङ्गानि ॥]

कोणा भग्नमनोरथिनीनें वाटतें प्रवास हा शब्द उच्चारला आणि लगेच वधूचें अंग विषबाधा झाल्यासारखें जड झालें.

● गंगाधर सांगतो, पति प्रवासाला जाणार अशा समजुतीनें तिची अशी अवस्था झाली, सबब ती असाध्य आहे, अशी दूतीची कामुकाला सूचना; किंवा, जार प्रवासाला जाणार असें वाटल्यामुळें ती विमनस्क झाली आणि हें ध्यानीं आलेल्या सासूचे हे उपालम्भोद्गार आहेत; दुसरा टीकाकार सांगतो, ज्येष्ठ सवतीनें सासूजवळ काढलेले हे उद्गार आहेत; किंवा पतीवर अनुरक्त, पण गृहकृत्यपराङ्मुख वधूची सासूनें केलेली निंदा.

११२ इङ्गित : 112. Secret.

अज्जवि बालो दामोअरो त्ति इअ[2] जम्पिए जसोआए ।
कह्णमुहपेसिअच्छं णिहुअं हसिअं वअवहूहिं ॥ १२॥

[अद्यापि बालो दामोदर इति इति जल्पिते यशोदया ।
कृष्णमुखप्रेषिताक्षं[3] निभृतं हसितं व्रजवधूभिः ॥]

बाळ दामोदर अजून लहान आहे, हो, आहेच लहान, असें यशोदा म्हणाली, तेव्हां कृष्णाकडे पाहून तरुण गोपी चोरून हंसल्या.

● या प्रस्तावनेनंतर गोपींना राहवलें नाहीं, त्यांनीं चोरून काण्या डोळ्यानें बालकृष्णाकडे पाहिलें. यशोदा कृष्णाला कुरवाळीत होती व तो भोंवतालच्या गोपींना दटावीत होता. त्यांना यशोदेची मर्यादा राखावयाची होती आणि त्यांचें हंसूं तर ओठांत मावत नव्हतें; कारण त्यांचीं रहस्यें

१. प्रगे प्रवासीति. २. किर. ३. प्रहिताक्षं.

एकीमेकींना माहीत होतीं; म्हणून त्या वदन वेळावून हंसल्या. इङ्गितगोपन-शिक्षा. पर्याय अलंकारः 'मिषं यदुक्तिभङ्गिर्यावसरो यः स सूरिभिः। निराकाङ्क्षोऽथ साकाङ्क्षः पर्याय इति गीयते॥' येथें साकाङ्क्ष, कारण 'अत्रानेकेनार्थजातेन साकाङ्क्षता व्यक्तैव।'

११३ वारसा : 113. Heritage.

ते विरला सप्पुरिसा जाण सिणेहो अहिण्णमुहराओ।
अणुदिअह वेड्ढमाणो रिणं व पुत्तेसु संकमइ॥१३॥

[ते विरलाः सत्पुरुषा येषां स्नेहोऽभिन्नमुखरागः।
अनुदिवसवर्धमान ऋणमिव पुत्रेषु संक्रामति॥]

ज्याच्या मुखावरील भाव कधींही पालटत नाहीं व जो दिवसानुदिवस वृद्धिंगत होत जातो असा दृढ स्नेह ठेवणारा सत्पुरुष विरळा. वडिलोपार्जित कर्जाप्रमाणें अशा स्नेहाचा वारसा पुत्रांकडे येतो.

● व्याजामुळें ऋण दिवसानुदिवस वाढत जातें. अदालतीच्या नव्हे, दुर्गतीच्या धास्तीमुळें वडिलार्जित ऋण फेडावेंच लागतें. सज्जनांच्या स्नेहांत व्याज नसतें, तो निर्व्याज असतो, म्हणूनच आदिमध्यांतीं अभिन्न असतो. ऋण नष्ट होतें, पण असा स्नेह मंद होत नाहीं. उलट, खलांचा स्नेह आरंभीं दृढ असतो, पुढें तो विरल होतो आणि अखेरीस त्याचें परिवर्तन द्वेषांत होतें. सज्जनस्तुतीच्या निमित्तानें मन्दस्नेह नायकाला उपदेश. प्रीति हृदयांच्या, उरोजांच्या नव्हे, दृढतेवर अवलंबून असते.

११४ कौतुक : 114. Proxy.

णच्चणसलाहणणिहेण पासपरिसंठिआ णिउणगोवी।
सरिसगोॅविआणँ चुम्बइ कवोलपडिमागअं कण्हम्॥१४॥

१. वड्ढ, विवड्ढ.

[नर्तनश्लाघननिभेन पार्श्वपरिसंस्थिता निपुणगोपी ।
सदृशगोपीनां चुम्बति कपोलप्रतिमागतं कृष्णम् ॥]

नाचण्याच्या श्रमांमुळें गोपींना घाम आला होता, त्यांच्या ओल्या गालांवर कृष्णाच्या प्रतिमा उमटल्या होत्या. एक निपुण गोपी मागें (प्रेक्षकांच्या घोळक्यांत) उभी होती. नर्तिकांच्या कौशल्याची स्तुति त्यांच्या कानांत सांगण्याच्या निमित्तानें ती पुढें झाली व त्यांच्या गालांवर उमटलेल्या कृष्णाच्या प्रतिबिंबांच्या चुंबनांचें श्रेय तिला (अनेक वेळां) मिळालें.

● इतर गोपींप्रमाणें तीही कृष्णावर अनुरक्त होती. पण तिला तोंवर अनुकूल संधि मिळाली नव्हती. मनांतली प्रीति जनांत प्रकट न करतां तिनें प्रियकराच्या अप्रत्यक्ष चुंबनाचें श्रेय एकदां नव्हे, अनेकदां मिळविलें, हेंच तिचें नैपुण्य. चार चौघांसमक्ष, पण त्यांच्या ध्यानींमनींही येऊं न देतां, प्रसंगाला साजेल अशा सबबीवर, तृप्तीचें श्रेय मिळविण्यासाठीं अंगीं असें नैपुण्य असावें लागतें, अशी नायिकेला सखीची सूचना.

११५ वल्कल : 115. Bark Garments.

सव्वत्थ दिसा[२]मुहपसॉरिएहिँ अण्णोण्णकडअलग्गेहिं ।
छल्लिं व्व मुअइ विञ्झो मेहेहिँ विसंघडन्तेहिं ॥१५॥

[सर्वत्र दिशामुखप्रसृतैरन्योन्यकटकलग्नैः ।
छल्लीमिव[३] मुञ्चति विन्ध्यो मेघैर्विसंघटमानैः ॥]

सर्व दिशांच्या क्षितिजांवरून येणारे आणि कड्यांवर एकमेकांना भिडून अलग होणारे मेघ, हींच जणूं वल्कलें, विन्ध्य सोडून ठेवतो. (आणि नवें सौंदर्य धारण करतो)

१. व्याजेन. २. दिम्मुह. . कञ्चुकमिव, त्वचमिव.

● गंगाधर सांगतो, वर्षागमवर्णनाच्या निमित्तानें प्रवासाला न जाण्याबद्दल कांता पतीची विनवणी करीत आहे.

११६ पुलिंद : 116. Vindhya.

आलोअन्ति पुलिन्दा पव्वअसिहरट्ठिआ धणुणिसण्णा।
हत्थिउलेहिँ व विञ्झं पूरिज्जन्तं णवब्भेहिं ॥१६॥

[आलोकयन्ति पुलिन्दाः पर्वतशिखरस्थिता धनुर्निषण्णाः।
हस्तिकुलैरिव विन्ध्यं पूर्यमाणं नवाभ्रैः ॥]

विन्ध्य पर्वतावर नवे मेघ हत्तींच्या जमावाप्रमाणें दाटत आहेत आणि पर्वतशिखरांवर धनुष्यांना टेंकून उभे असलेले (कुंजरमृगयासक्त) पुलिंद त्यांकडे पहात आहेत.

● टीकाकार सांगतात, पुलिंद व शबर हे एकच ! रानांत हिंडणारे हत्तींचे कळप व डोंगरांवर वावरणारे धनुर्धर वन्य यांचें हें शब्दचित्र वास्तविक व फार मनोहर आहे. इतके लोक आजूबाजूला वावरत असल्यामुळें आतां वनाभिसार अशक्य आहे अशी सूचना ध्वनित आहे.

११७ तुषार : 117. Spray.

वणदवमसिमइलङ्गो रेहइ विञ्झो घणेहिँ धवलेहिं।
खीरोअमन्थणुच्छलिअदुद्धसित्तो व्व महुमहणो ॥१७॥

[वनदवमषीमलिनाङ्गो राजते विन्ध्यो घनैर्धवलैः।
क्षीरोदमथनोच्छलितदुग्धसिक्त इव मधुमथनः ॥]

१. पमअ. २. धणुम्मि णिसण्णा. ३. अच्चति, निषण्णा. ४. घणेहि. ५. छीरोअ.

वणव्यांमुळें काळवंडलेल्या विन्ध्य पर्वताच्या कड्यांवर पांढरे ढग भुरभुरले, तेव्हांची शोभा पाहून वाटलें कीं जणूं क्षीरसागराचें मंथन चाललें आहे व मधुमंथन कृष्णाचे अंगावर दुधाचे तुषार उडत आहेत.

● विन्ध्याचा वर्ण काळा, दुरून पाहिल्यास निळा. कृष्णाचा वर्णही तसाच. क्षीरसागर मंथनाचे वेळीं कृष्णाच्या अंगावर उडालेले तुषार पाहून प्रेक्षकाला वाटलें असतें कीं जणूं आभाळांत नक्षत्रें उडत आहेत. प्रवासी पति लवकरच परत येईल असें प्रोषितभर्तृकेला सखीचें आश्वासन.

११८ गुणग्रहण : 118. Appreciation.

वन्दीअ णिहअबन्धवविमणाइ वि पक्कलो[1] त्ति चोरजुआ।
अणुराएण पलोइओ, गुणेसु को मच्छरं वहइ ॥१८॥

[वन्द्या निहतबान्धवविमनस्कयापि प्रवीर इति चोरयुवा।
अनुरागेण प्रलोकितो[2] गुणेषु को मत्सरं वहति ॥]

ती (चोरांच्या) कैदेंत होती. (त्यांच्याबरोबर झालेल्या झटापटींत तिचे) बान्धव मारले गेल्यामुळें ती विमनस्क होती. तरी विजयी चोरांच्या तरुण नेत्याचें शौर्य प्रत्यक्ष दिसल्यामुळें तिनें त्याच्याकडे प्रेमानें पाहिलें. गुणांबद्दल कोणाला मत्सर वाटेल ?

● पत्नीनें परपुरुषाकडे कौतुकानें पाहिलें, तिच्या अभिप्रायाबद्दल साशंक झालेल्या नायकाला सखीचें आश्वासन. स्निग्ध दृष्टि सुरतेच्छेचीच द्योतक असते असें नाहीं. पाहण्यापाहण्यांत फरक असतो; तो सूक्ष्म असतो; त्याचें निदान करण्यास अंगीं विदग्धता पाहिजे आणि सहिष्णुताही.

---

१. एक्कलो. २. विलोकितो, विलोमितो.

११९ उन्मत्त : 119. Heavyweight.

अज्ज कइमो वि दिअहो वाहवहू रूवजोव्वणुम्मत्ता।
सोहग्गं धणुरुम्पच्छलेण रच्छासु विकिरइ ॥ १९॥

[अद्य कतमोऽपि दिवसो व्याधवधू रूपयौवनोन्मत्ता।
सौभाग्यं धनुस्तष्टत्वक्छलेन रथ्यासु विकिरति ॥]

आज कांहीं दिवस झाले, रूपयौवनोन्मत्त व्याधस्त्री नवऱ्याचें धनुष्य तासून त्याच्या छिलप्या रस्त्यांत विखरीत आहे. जणूं या मिषानें ती आपलें सौभाग्यच प्रकट करीत आहे.

● नायिकेवरील आसक्तीमुळें तो इतका दुबळा झाला कीं पूर्वीचें जाड-जूड धनुष्य त्याला पेलेनासें झालें. म्हणून तिनें तें तासून हलकें केलें. उन्मत्त धनिक रस्त्यावर द्रव्य उधळतो; त्याचप्रमाणें रूपयौवनोन्मत्ता नायिका जणूं आपल्या सद्भाग्याचे कण उधळीत आहे. अत्यासक्तीच्या दुष्परिणामांचें प्रात्यक्षिक किंवा नायिका असाध्य आहे अशी सूचना.

१२० वातचक्र : 120. Whirlwind.

उक्खिप्पइ मण्डलिमारुएण गेहङ्गणाहि वाहीए।
सोहग्गधअवडाअ व्व उअइ धणुरुम्परिञ्छोली ॥ २०॥

[उत्क्षिप्यते मण्डलीमारुतेन गेहाङ्गणाद्व्याधस्त्रियाः।
सौभाग्यध्वजपताकेव पश्यत धनुःसूक्ष्मत्वक्पङ्क्तिः ॥]

---

१. रम्य. २. रत्थासु. ३. विक्खिरइ. ४. धनुस्तक्षण, धनुरुल्लिखन. ५. धणुहरोरम्प. ६. गेहाङ्गणाद्व्याद्यात्. ७. धनुर्मनोरम्परिच्छोली, पश्य धनुस्तक्षणरिञ्छोली, सूक्ष्मकणपङ्क्तिः, धनूरजत्वक्पंक्तिः

व्याधस्त्री घराच्या अंगणांत धनुष्य छिलीत बसली होती. इतक्यांत सोसाट्याचें वातचक्र आलें व छिलप्यांची रांग आभाळांत उडाली. जणूं तिच्या सौभाग्याच्या ध्वजाची पताकाच आकाशांत फडफडूं लागली.

● विखुरलेल्या छिलप्या वावटळीच्या सोसाट्यासरशीं आभाळांत प्रथम फिरत्या खांबासारख्या वर उडाल्या आणि वाऱ्याचा जोर ओसरल्यावर त्यांच्या रांगा वरच्यावर पांगल्या व हळूं हळूं खालीं उतरतांना पताकांसारख्या फडफडल्या. तिनें नवऱ्याला जिंकलें व याची खूण म्हणून झेंडा फडकावला. क्र.११९ या गाथेची नायिका रूपयौवनोन्मत्ता आहे आणि या गाथेची नायिका स्वसौभाग्यगर्विता आहे. दोघींच्या कृति त्याच. त्यांच्या स्वभावांतील फरक त्यांच्या आसनांवरून दिसून येतो. ती रस्त्यालगत ओट्यावर बसलेली आहे आणि ही घराच्या अंगणात.

१२१ मद : 121. Rut.

गअगण्डत्थलणिहसणमअमइलीकअकरञ्जसाहाहिं ।
एन्तीअ कुलहराओ[1] णाणं वाहीअ पइमरणम् ॥२१॥

[गजगण्डस्थलनिघर्षणमदमलिनीकृतकरञ्जशाखाभिः ।
आगच्छन्त्या कुलगृहाज्ज्ञातं व्याधस्त्रिया पतिमरणम् ॥]

व्याधस्त्री माहेराहून परत येत होती. हत्तींनीं गंडस्थळें घासल्यामुळें मदानें मलिन झालेल्या करंजांच्या फांद्या तिला वाटेवर दिसल्या. तेव्हांच आपल्याला वैधव्य आल्याचें तिनें ओळखलें.

● तिचा पति हयात होता तोंवर त्याच्या धास्तीनें त्या रानांत हत्ती फिरकत नसत, आतां ते उन्मत्त होऊन निर्धास्तपणें जंगलांत धुमाकूळ घालूं लागले आहेत, हें पाहून तिनें आपलें दुर्दैव ओळखलें. आपल्या

१. घराओ णाअं.

गैरहजिरींत तो अन्य स्त्रीच्या नादीं लागला असावा आणि म्हणून हत्ती माजले असावेत, अशीही कल्पना तिच्या मनांत येऊन गेलेली असावी. स्त्रियांच्या अनुमानांना बुद्धिप्रामाण्याचा आधार नसतो. तीं केवळ स्वभाव-प्रेरित असतात, म्हणून तीं चुकींचीं असतात असें थोडेंच आहे !

१२२ नवी बायको, जुनें धनुष्य : 122. Burden.

णववहुपेम्मतणुइओ पणअं पढमघरणीअ रक्खन्तो ।
ओलिहिअदूप्परिल्लं पि णेइ रण्णं धणुं वाहो ।।२२।।

[नववधूप्रेमतनूकृतः प्रणयं प्रथमगृहिण्या रक्षन् ।
तनूकृतदुराकर्षमपि नयत्यरण्यं धनुर्व्याधः ।।]

नव्या बायकोच्या प्रेमामुळें व्याध दुबळा झाला आहे; तरीही प्रथम गृहिणीवरील प्रेमाचें तो रक्षण करीत आहे. जुनें धनुष्य छिलून हलकें केलें, तरीही आतां तें त्याला पेलत नाहीं. मात्र (आपलें दौर्बल्य दिसूं नये म्हणून) तो तेंच घेऊन अरण्यांत भटकतो.

● दौर्बल्य व वार्धक्य झांकण्यासाठीं किती तरी लोक तरतरीत व तरुण दिसण्याच्या खटपटींत असतात; त्यांतलाच हा प्रकार. कोरें करकरीत, लवचिक व कमानदार धनुष्य हातीं आलें म्हणजे जुनें धनुष्य बोजड, अवजड, अवठरलेलें वाटावयाचेंच ! व्याधाची प्रथम पत्नी सुसाध्य असल्याची दूतीची सूचना !

१२३ प्रसूति-वैराग्य : 123. Woman's No.

हासाविओ जणो सामलीअ पढमं पसूअमाणाए ।
वल्लहवाएँण अलं मम त्ति बहुसो भणन्तीए ।।२३।।

---

१. अलिहिअ. २ .दुप्परिअल्लं, दुप्पारिगेज्झम्, दुम्मोज्झम्. ३. अलिखितमतनू-कृतम्. ४. राएण.

[हासितो जनः श्यामया प्रथमं प्रसूयमानया ।
वल्लभवादेनालं ममेति बहुशो भणन्त्या ॥]

(सुकुमार) श्यामला प्रथमच बाळंतीण झाली, तेव्हां वल्लभाचें नांव घेण्याबद्दल तिच्या मैत्रिणी तिला आग्रह करूं लागल्या. तेव्हां ती पुन्हा पुन्हा म्हणाली, ' त्याला माझा वल्लभ म्हणूं नका ग बायांनों; यापुढें मी त्याचें नांवसुद्धां घेणार नाहीं.' मग साऱ्या जणी हसूं लागल्या !

● प्राचीन कौटुम्बिक विनोदाचा एक उत्कृष्ट नमुना. पहिलटकरणीला बाळंतपणांत क्लेश होतातच. हिची कुडी लहान व नाजूक, म्हणून हिला विशेष त्रास झाला होता. तिचे त्राग्याचे उद्गार ऐकून ज्या हंसल्या त्या माहेरच्या मैत्रिणी असाव्यात; ज्या हंसल्या त्यांना सराव झालेला असावा; कदाचित् त्यांनींही आरंभीं असेच उद्गार काढले असतील !

१२४ मानवी प्रेम : 124. Mortal Love.

कइअवरहिअं पेम्मं ण त्थि व्विअ मामि[२] माणुसे लोए ।
अह होइ कस्स विरहो ? विरहे होत्तम्मि को जिअइ ? ॥ २४ ॥

[कैतवरहितं प्रेम नास्त्येव मातुलानि मानुषे लोके ।
अथ भवति कस्य विरहो विरहे भवति[३] को जीवति ॥]

मामी, मनुष्य लोकांत निष्कपट प्रेम नसतेंच ! असतें, तर विरह कां होता ? आणि विरहानंतर जीव कसा राहता ?

● प्रोषितभर्तृका नायिका; विरहांतही मी जीव धरून राहिलें आहे, यावरूनच दिसतें कीं माझ्याही प्रेमांत लबाडी आहेच. विरहामुळें मी आसन्नमरण झालें आहे, यावरून माझ्या प्रेमाची अलौकिकता सिद्ध होते, असाही श्लेष निघतो.

१. वञ्चनेन, रागेण. २. भगिनि, मातुलिः ३. भवत्यपि.

१२५ अमृतानुभव : 125. Exultation.

अच्छेरं व, णिहिं विअ, सग्गे रज्जं व, अमअपाणं व ।
आसि म्ह तं महुत्तं विणिअंसणदंसणं तीए ॥२५॥

[आश्चर्यमिव निधिमिव स्वर्गे राज्यमिवामृतपानमिव ।
आसीदस्माकं तन्मुहूर्तं विनिवसनदर्शनं तस्याः ॥]

मी तिला क्षणभरच नग्नावस्थेत पाहिली. त्याक्षणीं मी आश्चर्यचकित झालों; जणूं मला (परमसुखाचा) निधि सांपडला, स्वर्गाचें राज्य मिळालें; जणूं मी अमृताचा घोंट घेतला.

● गुप्त धन अकल्पितपणें सांपडलें म्हणजे प्रथम आश्चर्याचा झटका बसतो, नंतर आनंदाला उकळी येते; वाटतें, सर्व सुखें हातीं आलीं. तोंच भीतीनें छाती थरारते; गुप्त संपत्तीचें रक्षण करणारे महासर्प आजूबाजूस वावरत असावेत अशी धास्ती वाटते; कोणा प्रतिस्पर्ध्याची आपल्यावर नजर तर नाहीं ना, अशी शंका मनांत येते. जें आपल्याला आढळलें तें आपलेंच आहे, असें मानण्याकडे मनुष्यमात्राची वृत्ति असते. वस्तुलाभांत भागीदार नसावा, असेंही वाटतें. या गाथेंतील दृश्य पाहणाराच्या मनांत असेच विचार आले असतील. अमृतसेवन म्हणजे तृप्तीची परिसीमा. अमृत म्हणजे मद्य नव्हे, कीं त्याचे अनेक घोंट घेण्याची लालसा वाटावी. या दृष्टीनें पाहतां अधररसाला अमृत कां म्हणतात याचा उलगडा होत नाहीं ! आणि या दृश्याचा प्रेक्षक नुसत्या दर्शनानें एवढा तृप्त व उन्मत्त कसा झाला याचाही.

१२६ यां चिंतयामि : 126. The Way by All Flesh.

सा तुज्झ वल्लहा, तं सि मज्झ, वेसो सि तीअ, तुज्झ अहम् ।
बालअ ! फुडं भणामो पेम्मं किर बहुविआरं त्ति ॥२६॥

[सा तव वल्लभा[1] त्वमसि मम द्वेष्योऽसि तस्यास्तवाहम् ।
बालक स्फुटं भणामः प्रेम किल बहुविकारमिति ॥]

तुमचें प्रेम तिच्यावर आणि माझें तुमच्यावर; ती तुमचा द्वेष करते व तुम्ही माझा; तुम्ही बालकासारखे अजाण आहांत; स्पष्ट सांगतें, खरोखर, प्रेम बहुविकारी आहे.

● मीं तुमच्या शेजारीं, ती तुमच्या हृदयामाझारीं, तरीहि ती मला बोंचते आणि मी तुम्हांला. पति, पत्नी व प्रेयसी हा त्रिकोण अनादिसिद्ध आहे. ह्या त्रिकोणाचें वैशिष्ट्य असें कीं त्याच्या भुजा प्रसंगानुरोधानें लहान मोठ्या होत असतात आणि कोनांचे अंशही !

१२७ मेंदी : 127. Footprints.

अहअं लज्जालुइणी[2], तस्स अ उम्मच्छराइँ[3] पेम्माइं ।
सहिआअणो[4] वि णिउणो, अलाहि किं पाअराएण ? ॥२७॥

[अहं लज्जालुस्तस्य[5] चोन्मत्सराणि[6] प्रेमाणि ।
सखीजनोऽपि निपुणोऽपगच्छ किं पादरागेण ॥]

मी अशी लाजाळू, त्यांचें प्रेम उत्कट; आणि माझ्या मैत्रिणी तर अशा हुशार (कीं त्यांच्यापासून कांहीं लपायचें नाहीं); जा–माझीं पावलें मूळचींच लाल आहेत; त्यांना आणखी रंग कशाला ?

● पावलांनीं रंग लावण्याला आलेल्या दासीप्रत स्वाधीनभर्तृकेचे उद्गार. पावलांना रंग लावला व तो वेळेवर नीट वाळला नाहीं तर त्यांच्या

१. वल्लभा मम त्वं द्वेष्योऽसि, वल्लभा त्वमसि मम प्रियस्त्वमासि तस्या. २. लुइंरी, उज्जुअरूआ. ३. उम्मत्तआइ, उम्मन्थराइं. ४. हलाओ. ५. ऋजुकरूपा, लज्जावती. ६. उन्मत्तकानि, उन्मस्तकानि.

अंगावर अगर कपड्यावर कोठें तरी खूण उमटावयाची आणि तीमुळें रहस्याचा स्फोट व्हावयाचा अशी तिला धास्ती पडली होती. एक टीकाकार सांगतो. ' प्रेमावेशवशः माम् अवश्यम् पुरुषायितम् कारयिष्यति, तदा निपुणसखीजनः शय्यागतैस्तालक्तकपदैः पदांकैस्तदनुमायाऽपहसेयु । ' पतीचें वैदग्ध्य व आपलें सौभाग्य यांचें नायिकेनें केलेलें वर्णन. 'उद्भेदप्रच्छादनं व्याजोक्तिः' अलंकाररत्नाकर.

१२८ झंकार : 128. Spring.

महुमासमारुआहअमहूअरझंकारणिब्भरे रण्णे ।
गाअइ विरहक्खरॉबद्धपहिअमणमोहणं गोवी ॥२८॥

[मधुमासमारुताहतमधुकरझंकारनिर्भरेऽरण्ये ।
गायति विरहाक्षराबद्धपथिकमनोमोहनं गोपी ॥]

रानांत वसंताचा वारा भरला आहे, त्याच्या झोतानें झपाटलेल्या मधुकरांचा झङ्कार घुमत आहे आणि (विरही) पांथस्थांचें अंतःकरण व्याकुल होईल अशी विरहगीतें गोपी गात आहेत.

● संकेताप्रमाणें गोपी रानांत तुझी वाट पाहत आहे, अशी सूचना.

१२९ सुसंधि : 159. Reaction.

तह माणो माणधणाएँ तीअ एमेअ दूरमणुबद्धो ।
जह से अणुणीअ पिओ एक्कग्गाम व्विअ पउत्थो ॥२९॥

[तथा मानो मानधनया तया एवमेव दूरमनुबद्धः ।
यथा तस्या अनुनीय प्रिय एकग्राम एव प्रोषितः ॥]

१. माणहणाए. २. मानहताया. ३. तस्या मे अदूरमनुबद्धः

मानधन मानिनीनें मान (निष्कारण) इतका ताणून धरला कीं अनुनय करूनही प्रियकर (तिला प्रसन्न करूं शकला नाहीं व तो) गांवांतल्या गांवांतच प्रवासी झाला.

● निष्कारण मानग्रहणानें प्रेमाचा नाश होतो, प्रियकर पराधीन होतो, अधिक ताणून धरूं नको, असा सखीचा उपदेश. किंवा, नवरा घरीं नाहीं अशी नायकाला आणि प्रियकर आला आहे अशी स्वैरिणी नायिकेला दूतीची प्रच्छन्न सूचना.

१३० पादप्रक्षालन : 130. Fetters.

सालोएँ व्विअ सूरे घरिणी घरसामिअस्स घेत्तूण।
णेच्छन्तस्स वि पाए धुअइ हसन्ती हसन्तस्स ॥३०॥

[सालोक एव सूर्ये गृहिणी गृहस्वामिनो गृहीत्वा ।
अनिच्छतोऽपि पादौ धावति हसन्ती हसतः ॥]

(चंचल पतीचें इंगित ओळखून) पत्नीनें सूर्यास्त होण्यापूर्वीच, त्याची इच्छा नव्हती तरीही त्याचे पाय धरून ते धुतले. एकमेकांनीं एकमेकांचें मनोगत ओळखलें आणि दोघेंहि हसूं लागलीं.

● अंधार पडल्यावर जरा चक्कर मारून येण्याचा त्याचा विचार होता. नायिका मनकवडी खरी. पादप्रक्षालनानन्तर घराबाहेर पडणें निषिद्ध असल्यामुळे तिनें या युक्तीचा अवलंब केला. प्रयोग करून पाहण्यासारखा आहे ! पादप्रक्षालनानें हृदयक्षालनही होतें कीं काय !

१३१ उपालम्भ : 131. Censure.

वाहरउ मं सहीओ ! तिस्सा गोत्तेण किं त्थ भणिएण ?
थिरपेम्मा होऊ जहिं तहिं पि, मा किं पि णं भणह ॥३१॥

७

[व्याहरतु मां सख्यस्तस्या गोत्रेण किमत्र भणितेन ।
स्थिरप्रेमा भवतु यत्र तत्रापि मा किमप्येनं भणत ॥]

त्यांनीं मला दुसऱ्याच नांवानें हांक मारली म्हणून काय झालें ? तेथें तरी त्यांचें प्रेम स्थिर होऊं द्या, म्हणजे झालें. मात्र त्यांना कोणी कांहीं बोलूं नका.

● विरचिता संकेत. पतीनें पत्नीला भलत्याच नांवानें संबोधलें. हें ऐकून तिची सखी चमकली. 'अलीकडे यांची दृष्टि दुर्बल झालेली आहे कीं काय ?' सखीनें विचारलें. पतीला म्हातारपण आल्याचा उल्लेख कोणी केलेला स्त्रियांना रुचत नाहीं, त्याला मद्यपी किंवा बाहेरख्याली म्हटलें तरी चालतें, अशी एक अवस्था स्त्रियांच्या जीवनांत येत असते. सखीच्या कुशंकेचें निवारण करून पत्नी म्हणते, जी त्यांची आवडती ती मीच आहे अशा धुंदीमुळें त्यांची गैरसमजूत झालेली आहे; तरीही त्यांचा सहवास मिळत असल्यामुळें मी संतुष्ट आहे; मात्र वस्तुस्थिति त्यांच्या निदर्शनास आणून कोणी माझ्या सुखांत व्यत्यय आणूं नका.

१३२ वैशिष्ट्य : 132. Speciality.

रूअं अच्छीसु ठिअं, फरिसो[2] अङ्गेसु, जम्पिअं कण्णे ।
हिअअं हिअए[3] णिहिअं विओइअं किं त्थ देव्वेण ॥३२॥

[रूपमक्ष्णोः स्थितं स्पर्शोऽङ्गेषु जल्पितं कर्णे ।
हृदयं हृदये निहितं वियोजितं[4] किमत्र दैवेन ॥]

त्यांचें रूप माझ्या नेत्रांत स्थिर झालेलें आहे आणि स्पर्श अंग-प्रत्यंगांत, बोल कानांत आणि हृदय हृदयांत. आमचा वियोग दैवाला तरी कोठें करतां आला ?

१. कुत्रापि. २. पंसो. ३. हिअएण समं. ४. वियोतितं तु खलु दैवेन.

● दुष्ट दूती प्रोषितभर्तृकेच्या हृदयाचा ठाव घेत होता. असा कसा तुझा पती, तुझ्या ऐन ज्वानींत याची फिरती ! नायिका सांगते, प्रत्यक्ष दैव आमच्या प्रेमांत व्यत्यय आणूं शकलें नाहीं, तें काय तुझ्या गळीला बळी पडणार ? अलंकारकौस्तुभांत तुल्ययोगिता व विशेष या अलंकाराचें उदाहरण : ' प्रकृतानां तादृक्त्वे भिन्नानां यापि तुल्ययोगित्वे । ' ' स्थिति-राधाराभावे वृत्तिरनेकेषु युगपदेकस्य । एककरणेन दुष्करकार्यान्तरसिद्धिरिति विशेषः । '

१३३ मनोमय प्रियकर : 133. Self-Embrace.

सअणे चिन्तामइअं काऊण पिअं णिमीलिअच्छीए ।
अप्पाणो उवऊढो पसिढिलवलआहिँ बाहाहिं ॥३३॥

[शयने चिन्तामयं कृत्वा प्रियं निमीलिताक्ष्या ।
आत्मा उपगूढः प्रशिथिलवलयाभ्यां बाहुभ्याम् ।]

बिछान्यावर पडल्या पडल्या तिनें मनोमय प्रियकर निर्माण केला आणि (विरहामुळें) ज्यांवरील बांगड्या सैल झाल्या आहेत अशा (कृश) बाहूंनीं त्याला आलिंगिलें. तेव्हां (वाटलेल्या सुखामुळें) तिचे डोळे अर्धे मिटले.

● अर्धोन्मीलित नेत्र हें प्रेमतृष्णेचें आणि निमीलित नेत्र हें प्रेमतृप्तीचें लक्षण. वस्तुतः तिनें स्वतःलाच आलिंगिलें होतें. ' स्वप्नांत सुखाची (सख्याची ?) सुरत पाहुनि गोमटी । बाजुची उशी कवळून मारिते मिठी ॥' ती विरहाच्या उन्मादावस्थेंत होती. तिच्या भेटीला त्वरित जा, नाहींतर ती हातीं लागणार नाहीं, अशी दूतीची पतीला सूचना.

१. सिविणे. २. पसिढिल. ३. आत्मना पश्य रूढः.

१३४ कुंटीण : 134. Procuress.

परिहूएण[1] वि दिअहं घरघरभमिरेण अण्णकज्जम्मि ।
चिरजीविएण इमिणा खविअह्मो दड्ढकाएण ॥३४॥

[परिभूतनापि दिवसं गृहगृहभ्रमणशीलेनान्यकार्ये ।
चिरंजीवितेनानेन क्षपिताः स्मो दग्धकायेन ॥[2]]

लोकांनीं तिरस्कार केला व पुन्हां पुन्हां हांकून लावलें तरी कावळा अन्नासाठीं लोंचटासारखा पुन्हां पुन्हा घरोघर जातो व जळकें जीवन चिरकाल जगतो. (म्हातारी कुंटिण म्हणते) वारंवार अपमान झाला तरी तो सोसून मला पोटासाठीं लोकांच्या घरोघर हिंडावें लागतें; खूप जगलें, दुष्ट शरीर खंगलें आणि जन्मभर केलें काय ? दुसऱ्यांचीं कामें !

● अन्नकार्य व अन्यकार्य आणि दग्धकाकेन व दग्धकायेन या शब्दांच्या श्लेषावर रचना. एक सुभाषित व दुसरें कुभाषित. " पोटासाठीं आम्हांला असा लोंचटपणा करावाच लागतो, धुडकावून लावलें तरी निलाजरेपणानें फिरून यावें लागतें. आमचें आयुष्य कावळ्यासारखें, टपून राहावयाचें, टिपून घ्यावयाचें. तुम्हां राजहंसींना आमच्या अपेष्टांची काय कल्पना ! " वृद्ध कुंटिणीची कार्यसाधु आत्मनिंदा. इतर उपाय हरले म्हणजे या मार्गानें कार्यसिद्धि होते असा तिचा अनुभव असावा ! कलहान्तरितांच्या समजावणी-साठीं हेलपाटे घालून निराश व त्रस्त झालेली दूतीही असेच उद्गार काढील.

१३५ काजळी : 135. Soot.

वसइ जहिं चेअ खलो पोसिज्जन्तो सिणेहदाणेहिं ।
तं चेअ आलअं दीअओ व्व अइरेण मइलेइ ॥३५॥

१. परिभूएण. २. चिरजीविनामुना खादिताः स्मो.

[वसति यत्रैव खलः पाप्यमानः स्नेहदानैः ।
तमेवालयं दीपक इवाचिरेण मलिनयति ॥]

दुष्टाला स्नेहभावानें वाढविला व रक्षिला तरी तो दिव्याप्रमाणें आपल्या आश्रयदात्याला लवकरच काळिमा आणतो.

● स्नेह म्हणजे मैत्री आणि तेल; या अर्थांच्या श्लेषावर रचना. दिव्यांत तेल घातलें व निवाऱ्यासाठीं तो देवळींत ठेवला तरी तो कोनाड्याला काजळी चढविल्यावांचून राहत नाहीं. उघड्या ज्योतींच्या दिव्यांच्या युगांत खालीं अंधेर, वर काजळी, शिवाय आगीची धास्ती; म्हणूनच तो कामापुरता वापरावयाचा व दूर ठेवावयाचा. खलांशीं स्नेह करूं नये, त्यांना आश्रय देऊं नये, रहस्यें सांगूं नयेत, नाहींतर ते आश्रयदात्याला काळोखी आणल्या-वांचून राहणार नाहींत.

१३६ दुपारची छाया : 136. Futile.

होन्ती वि णिप्फलच्चिअ धणरिद्धी होइ किविण[1]पुरिसस्स ।
गिह्माअवसंतत्तस्स णिअअछाहि व्व पहिअ[2]स्स ॥३६॥

[भवन्त्यपि निष्फलैव धनऋद्धिर्भवति कृपण[3]पुरुषस्य
ग्रीष्मातपसंतप्तस्य निजकच्छायेव पथिकस्य ॥]

उन्हाळ्यांतल्या उन्हानें तापलेल्या प्रवाशाला स्वतःच्या छायेचा उपयोग होत नाहीं, त्याचप्रमाणें कृपणाची संपत्ति व समृद्धि हीं निष्फल असतात.

● कृपण भुजङ्गाला दानोन्मुख करण्यासाठीं कुंटिणीनें केलेली निंदा. ती छायेसारखी तुझ्या सन्निध असली तरी तुझ्या चिक्कूपणामुळें तिला कांहीं प्राप्ति होणार नाहीं आणि तुलाही सुख मिळणार नाहीं, अशी सूचना.

---

१. दानरहिअस्स. २. रुक्खस्स. ३. दानरहितस्य.

१३७ डावा डोळा : 137. Tremour.

फुरिए वामच्छि ! तुए जइ एहिइ सो पिओ ज्ज ता सुइरम् ।
संमीलिअ दाहिणअं[1] तुइ अवि[2] एहं पलोइस्सम् ॥३७॥

[स्फुरिते वामाक्षि त्वयि यद्येष्यति स प्रियोऽद्य तत्सुचिरम् ।
संमील्य दक्षिणं त्वयैवैतं[3] प्रेक्षिष्ये[4] ॥]

माझा डावा डोळा लवत आहे. या शुभ शकुनामुळें प्रियकर परत आला तर (कृतज्ञता दर्शविण्यासाठीं) उजवा डोळा मिटून फक्त डाव्या डोळ्यानेंच मी त्याच्याकडे डोळा भरून पाहीन.

● आणि खरोखर, सुलोचनेनें दोन्ही डोळ्यांनीं त्याच्याकडे पाहण्यापेक्षां हेंच त्याला अधिक आवडेल !

१३८ सोंगटी : 138. Gambler's Luck.

सुणअपउरम्मि गामे हिण्डन्ती तुह कएण सा बाला ।
पासअसारिव्व घरं घरेण कइआ वि खज्जिहिइ[5] ॥३८॥

[शुनकप्रचुरे ग्रामे हिण्डमाना तव कृतेन सा बाला ।
पाशकशारीव गृहं गृहेण कदापि खादिष्यते ॥]

ह्या गांवांत हुंगत हिंडणारीं कुत्रीं पुष्कळ आहेत. बाला तुझ्यासाठीं पटावरल्या सोंगटीसारखी घरोघर फिरत आहे. तूं त्वरा केली नाहींस तर कोणीही फांसा टाकून तिला खाऊन टाकील.

---

१. दाहिणणयणं. २. अविअण्हं. ३. त्वया अवितृष्णम्, अविघ्नं. ४. प्रलोकयिष्ये, प्रलोकयिष्यामि. ५. रक्खेज, डज्झिहिसि.

● पासअ म्हणजे फांस आणि सारि म्हणजे मैना; पासअ म्हणजे फांसा आणि सारि म्हणजे सोंगटी. फांसेपारधी पांखरें पकडण्यासाठीं जंगलांत जाळीं पसरतात आणि त्यांभोंवतीं असे आवाज व हालचाली करतात कीं बिचारीं मोहित होऊन, बावरल्यामुळें किंवा स्वसंरक्षणासाठीं आपखुषीनें पाशांत चालून येतात; उडत बागडत, चिवचिंव करीत. स्त्रियांना, विशेषतः अल्लड तरुणींना गटविण्यासाठीं भुजङ्गांनीं टाकविलेले पाश अधिक आकर्षक असतात. अज्ञाताच्या किंवा अज्ञानाच्या कुतूहलामुळें अगर आसक्तीच्या आवेशामुळें त्या जणूं पाशांत गुंतण्याला उत्सुक असतात. फांस व फांसा यांत फरक फार थोडा. दैव अनुकूल असलें व हातीं कौशल्य असलें कीं हेरलेली सोंगटी कितीही भटकली तरी उडवितां येते. गांवांत हुंगतीं कुत्रीं सारखीं हिंडत असतात. हुंगावयाचें, जरा उत्तेजन मिळालें कीं गोंडा घोळायचा, लाडी-गोडी लावावयाची, जमलें तर पाय चाटावयाचे, धुडकावलें तर भुंकायचें. नायिकेच्या भोंवतीं कुत्रीं मंडल करीत आहेत; होय, तुझ्याशीं तुलना केली तर तीं कुत्रींच आहेत; तीं तिच्या मागावर आहेत. तिच्या मार्गावर पाश टाकले जात आहेत, तिच्यासाठीं फांसे टाकले जात आहेत, दानें पडत आहेत. ती तुझ्यावर अनुरक्त आहे, तरीही कोणीही फशीं पाडावें अशा अवस्थेंत आहे; बावरल्यामुळें पटावरल्या सोंगटीसारखी आश्रयाच्या शोधार्थ ती घरोघर हिंडत आहे. म्हणून त्वरा कर, तिला कटीवर आश्रय दे, अशी नायकाला दूतीची विनवणी.

१३९ दोष कुणाचा ? 139. Honey.

अण्णण्णं कुसुमरसं जं किर सो महइ महुअरो पाउम्[१] ।
तं णीरसाणँ दोसो कुसुमाणं णेअ भमरस्स ॥३९॥
[अन्यमन्यं कुसुमरसं यत्किल स इच्छति मधुकरः पातुम् ।
तन्नीरसानां दोषः कुसुमानां नैव भ्रमरस्य ॥]

१. महपाणणेहलो.

आज ह्या, उद्यां त्या, वेगवेगळ्या फुलांचा आस्वाद घेण्याची भ्रमर इच्छा करतो; हा दोष फुलांच्या नीरसतेचा, भ्रमराचा नाहीं.

● वेगवेगळ्या फुलांतील मधुपान हें लोलुप मधुपाला स्वाभाविक आहे. पुष्पमात्राचे ठायीं कमीअधिक रस असतोच. रूप, रंग व गंध हीं प्रसिद्धीचीं साधनें अनुकूल असलीं तरच पुष्पाकडे मधुप आकर्षिला जातो. स्वगुणगर्विता स्वाधीनपतिका नायिका आपल्या अजाण सखीला सांगतें, ' मी माझ्या गुणांनीं प्रियकराचें चांचल्य शमविलें, तुलाही तसें करतां येईल. तूं रसपूर्ण आहेस व तो रसज्ञ आहे; पण तुला स्वतःचे गुण व त्यांची शक्ति माहीत नाहींत; जरा कळी खुलव, मग पाहा, तुझा मधुकर तुझ्या भोंवतींच भ्रमण करीत राहील.

१४० वाट बघत द्वारिं उभी— 140. Blue Carpet.

रत्थापइण्णणअणुप्पला तुमं सा पडिच्छए[1] एन्तम् ।
दारणिहिएहिँ दोहिँ वि मङ्गलकलसेहिँ व थणेहिं ॥४०॥

[रथ्याप्रकीर्णनयनोत्पला त्वां सा प्रतीक्ष्यते[2] आयान्तम्[3] ।
द्वारनिहिताभ्यां द्वाभ्यामपि मङ्गलकलशाभ्यामिव स्तनाभ्याम् ॥]

ती तुझी वाट पाहत दरवाजांत उभी आहे. तुझ्या सुस्वागतासाठीं दरवाजाच्या बाह्यांना तिनें आपल्या स्तनांचे मंगलकलश लावले आहेत आणि दृष्टिक्षेपांनीं रस्त्यावर नील कमलांची पायघडी पसरली आहे.

● दारांत उभी राहणारी, नजर अशी गहिरी, यौवनाची अशी उभारी, कौतुकाच्या नाना परी. अमरुशतकांतील समानार्थी वचन : " दीर्घा वन्दनमालिका विरचिता दृष्ट्यैव नेन्दीवरैः । पुष्पाणां प्रकरः स्मितेन रचितो ना कुन्दजात्यादिभिः ॥ दत्तः स्वेदमुचा पयोधरभरेणार्घो न

१. तुमं पुत्ति कं पलोएसि. २. त्वं पुत्रि कं प्रलोकयासि. ३. आगच्छन्तम्.

कुम्भाम्भसा । स्वैरेवावयवैः प्रियस्य विशतस्तन्व्या कृतं मङ्गलम् ॥ "
दरवाजांत उभे रहावयाचा रिवाज आणि निळ्या डोळ्यांचें आकर्षण हीं सकृद्दर्शनीं वाटतात तितकीं आधुनिक नाहींत! पाठभेदांतील दूती विचारते, 'मुली, तूं कोणाची वाट पाहत आहेस? मला सांग, मी त्याची तुझी भेट घडवून आणीन.'

१४१ दया करा, प्रियकरा—   141. Mercy.

ता रुण्णं जा रुव्वइ, ता छीणं[1] जाव छिज्जए[2] अङ्गम् ।
ता णीससिअँ जाव अ सासा पहुप्पन्ति ॥४१॥

[तावद्रुदितं यावद्रुद्यते तावत्क्षीणं यावत्क्षीयतेऽङ्गम् ।
तावन्निःश्वसितं वराक्या यावत्[3] श्वासाः प्रभवन्ति ॥]

रडणें शक्य होतें तोंवर ती रडली, शरीराला शक्य होतें तेवढें झिजली, श्वासोच्छ्वास चालू आहे तोंवर बिचारी निःश्वास टाकीत आहे.

● तुझ्या अनुनयाचा स्वीकार केला नाहीं याचा तिला पश्चात्ताप झालेला आहे, कलहान्तरिता आतां आसन्नमरण अवस्थेत आहे, अपराध तिचाच असला तरी आतां तिची उपेक्षा करूं नको, अशी पतीला दूतीची सूचना.

१४२ स्मरण व मरण :   142. Life & Death.

समसोक्खदुक्खपरिवँड्ढिआणँ[4] कालेण रूढपेम्माणम् ।
मिहुणाणँ मरइ जं, तं खु जिअइ, इअरं मुअं होइ ॥४२॥

[समसौख्यदुःखपरिवर्धितयोः कालेन रूढप्रेम्णोः ।
मिथुनयोर्म्रियते यत्तत्खलु जीवति इतरन्मृतं भवति ॥]

१. छीणं, सीणं. २. छिज्जए, खिज्जए. ३. यावन्निश्वासाः ४. समवड्ढिआण.

सम सुखदु:खांत बरोबर वाढल्यामुळें कालांतरानें प्रेमाला स्थिरता येते. अशा दांपत्यापैकीं जी व्यक्ति अगोदर मरते ती (दुसऱ्याच्या हृदयांत) जिवंत राहते व जी जिवंत राहते ती मृतवत् होते.

● विरहाचें दुःख जीवाला जाळतें, त्यापेक्षां मरण पुरवतें. सजीव व्यक्ति सदैव मृताच्या चिंतनांत असल्यामुळें मृतवत् होते आणि अशा स्मरणामुळें जणूं निर्जीव व्यक्ति सजीव होऊन सजीवाभोंवतीं वावरत असते.

१४३ प्रस्थानकलश : 143. Blossom.

हरिहिइ पिअस्स णवचूअपल्लवो पढममञ्जरिसणाहो ।
मा रुवसु, पुत्ति ! पत्थाणकलसमुहसंठिओ गमणम् ॥४३॥

[हरिष्यति प्रियस्य नवचूतपल्लवः प्रथममञ्जरीसनाथः ।
मा रोदीः पुत्रि प्रस्थानकलशमुखसंस्थितो गमनम् ॥]

मुली, (पति प्रवासाला निघणार, म्हणून) खिन्न होऊं नको. (शुभशकुनासाठीं मी दाराबाहेर ठेवलला) प्रस्थानकलश (घराबाहेर पडतांना) त्याला दिसेल, त्यांतलीं आंब्याचीं कोंवळीं पानें व ताजा मोहोर पाहून (त्याला वसंताच्या आगमनाची जाणीव होईल आणि) तो प्रवास रहित करील.

● वसंतांतलें वातावरण विलासाला अनुकूल, म्हणून तो प्रवास तहकूब करील असें कुलवधूला विदग्ध सखीचें आश्वासन. अलंकाररत्नाकरांत हेतु अलंकाराचें उदाहरण : ' परप्रत्यायकं लिङ्गं हेतुः । '

१४४ चोरकामुक : 144. Paramour.

जो कहँ वि मह सहीहिं छिद्दं लहिऊण पेसिओ हिअए ।
सो माणो चोरिअकामुअ व्व दिट्ठे पिए णट्ठो ॥४४॥

[यः कथमपि मम सखीभिश्छिद्रं लब्ध्वा प्रवेशितो हृदये ।
स मानश्चोरकामुक इव दृष्टे प्रिये नष्टः ॥]

सख्यांच्या प्रोत्साहनामुळें प्रणहकलहाचें छिद्र साधून मान माझ्या हृदयांत कसा तरी शिरला. पण पतीला पाहतांच चोरकामुकाप्रमाणें मान नष्ट झाला.

● अमरुशतकांतील समानार्थी वचन: 'जाता नोत्कलिका कुचौ न लुलितौ गात्रं न रोमाञ्चितं । वक्त्रं स्वेदकणान्वितं न वदनं यावत्छठेनामुना । दृष्टेनैव मनो हृतं धृतिमुषा प्राणेश्वरेणाद्य मे । तत्केनापि निरूप्य माननिपुणो मानः समाधीयताम् ॥' पति कलहान्तरितेचा अनुनय करूं लागला; ती सांगते, मी आपण होऊन मान धारण केला नाहीं, मैत्रिणींनी कांहीं तरीच मनांत भरवलें, पण आतां रुसवा गेला, गोडवा आला.

१४५ कुसुम्भपुष्पें : 145. Petals.

सहिआहिँ भण्णमाणा थणए लग्गं कुसुम्भपुप्फं ? त्ति ।
मुद्धवहुआ हसिज्जइ पप्फोडन्ती णहवआइं ॥४५॥

[सखीभिर्भण्यमाना स्तने लग्नं कुसुम्भपुष्पमिति ।
मुग्धवधूर्हस्यते प्रस्फोटयन्ती नखपदानि ॥]

मुग्धवधूच्या स्तनांवरील नखक्षतें (युक्तीनें पाहिल्यावर) थट्टेखोर मैत्रिणींनी तिला सांगितलें कीं त्यांवर कुसुम्भाचीं फुलें चिकटलीं आहेत. (बिचारीला तें खरेंच वाटलें आणि ती टिचकीनें) फुलें झटकूं लागली, तेव्हां त्या हसूं लागल्या.

● सख्यांचें बोलणें तिला खरें वाटलें, कारण तिनें कुसुम्भाच्या कुञ्जांत क्रीडा केली होती. एक टीकाकार सांगतो, ती फुलें वेचण्याच्या निमित्तानें,

१. चोरिकाकामुक. २. उपहस्यते, प्रहस्यते.

पण वस्तुतः प्रियकराला भेटण्यासाठीं तिकडे गेली होती, तेथें तिचें शीलखंडन झालें. हा अर्थ लादणें जड वाटतें; कारण, तसें असतें तर सख्यांनीं तिचा उपहास केला असता. कीं कोणत्याही परिस्थितींत समानशील सख्या हंसल्याच असत्या ? आणि फक्त सपत्नांनींच उपहास केला असता ? तिच्या स्तनांवर शशप्लुत (Jump of a Hare) नखचिन्हें उमटलेलीं होतीं. नागरसर्वस्वांत पद्मश्री याचें लक्षण (२२·४) सांगतोः 'शशप्लुतं पञ्च नखव्रणानि । सान्द्राणि पृष्ठस्तनगुल्फदेशे ॥ स्तनस्य पृष्ठे विरलानि तानि । निगद्यतामुत्पलपत्रमेतत् ॥' अनङ्गरङ्गांत कल्याणमल्ल सांगतोः 'एकपाद शशप्लुतंसर्वनखैः कुचाग्रेः ।' हेतु व अभिनय-अलंकार.

१४६ अवहेलना : 146. Disdain.

उम्मूलेन्ति व हिअअं इमाइँ रे तुह विरज्जमाणस्स ।
अवहीरणवसविसंठुलवलन्तणअणद्धदिट्ठाइं ॥४६॥

[उन्मूलयन्तीव हृदयं इमानि रे तव विरज्यमानस्य ।
अवधीरणवशविसंष्ठुलवलन्नयनार्धदृष्टानि ॥]

अरे प्रेमहीना, मला टाळूं पाहणारी व तिरस्कारानें भरलेली तुझी चंचल व वांकडी नजर पाहिली कीं माझें हृदय जणूं उन्मळून पडतें.

१४७ कर्मभोग : 147. Punishment.

ण मुआन्ति दीहसासं, ण रुआन्ति चिरं, ण होन्ति किसिआओ ।
धण्णाओ ताओ जाणं बहुवल्लह ! वल्लहो ण तुमम् ॥४७॥

१. अवहीरअसविसंठुल. २. अवधीरितसविसंष्ठुल. ३. विरहाकिसिआओ.

[न मुञ्चन्ति दीर्घश्वासान्न रुदन्ति चिरं न भवन्ति कृशाः[1] ।
धन्यास्ता यासां बहुवल्लभ वल्लभो न त्वम् ॥]

हे बहुवल्लभ, तूं ज्यांचा वल्लभ नाहींस त्या स्त्रिया धन्य होत. त्यांना (आमच्याप्रमाणें) दीर्घ निःश्वास टाकावे लागत नाहींत, चिरकालपर्यंत अश्रु ढाळावे लागत नाहींत आणि कृश अवस्था प्राप्त होत नाहीं.

● आम्हीं तुझ्या नादीं लागलों व फसलों, शारीरिक स्वास्थ्य व मानसिक समाधान गमावून बसलों ! निराशेमुळें उसासे टाकावे, आठवणी काढून रडावें आणि जागरणें करून झिजावें, हेंच तुझ्यावरील आमच्या प्रेमाचें फळ !

१४८ तिरछी नजरियां : 148. Glance.

णिद्दालसपरिघुम्मिरतंसवलन्तद्धतारआलोआ ।
कामस्स वि दुव्विसहा दिट्ठिणिवाआ ससिमुहीए ॥४८॥

[निद्रालसपरिघूर्णनशीलतिर्यग्वलदर्धतारकालोकाः ।
कामस्यापि दुर्विषहा दृष्टिनिपाताः शशिमुख्याः ॥]

(पहाटेच्या अंधुक प्रकाशात) पापण्या अर्धवट उघडून चंद्रमुखी मजकडे रोखून पाहत आहे. रात्रीच्या जाग्रणामुळें तिची नजर अजून सुस्त आहे; तिरकी, अस्थिर, भिरभिरती आहे. असा दृष्टिक्षेप प्रत्यक्ष मदनालाहि असह्य होईल.

● त्या नजरेंत काय नाहीं ! भूत, भविष्य व वर्तमान; तृप्ति, अपेक्षा व स्मृति; तृप्तीची सुस्ती व अतृप्तीची मस्ती; स्वप्नांची चंचल तरलता व सिद्धीची जड वास्तवता !

---

१. विरहकृशाः

१४९ निरगांठ : 149. Enlanglement.

जीविअसेसाइ मए गमिआ कहँ कहँ वि पेम्मदुद्दोली[1] ।
एह्णिं विरमसु, रे डड्ढहिअअ, मा रज्जसु कहिं पि ॥४९॥

[जीवितशेषया मया गमिता कथं कथमपि प्रेमदुर्दोली ।
इदानीं विरम रे दग्धहृदय मा रज्यस्व कुत्रापि ॥]

मी आतांपर्यंत कसाबसा जीव धरून राहिलें आहे व प्रेमाची निरगांठ उकलूं दिलेली नाहीं. दुष्ट हृदया, आतां तरी थांब आणि यापुढें कोठेंही गुंतूं नको.

● निषेधांतही अनुराग. गंगाधर सांगतो, ही अनुरक्ति व्यभिचारी असावी. वस्तुतः पतिपत्नींचा धर्मसंबंध हाच निरगांठीसारखा असतो. आणि जणूं म्हणूनच त्यांतून सुटण्यासाठीं स्त्री-पुरुष धडपडत असतात !

१५० पूजा : 150. Admiration.

अज्जाएँ णवणहक्खअणिरीक्खणे[2] गरुअजोव्वणुत्तुङ्गम् ।
पडिमागअणिअणअणुप्पलच्चिअं होइ थणवट्ठम्[3] ॥५०॥

[आर्याया नवनखक्षतनिरीक्षणे गुरु यौवनात्तुङ्गम् ।
प्रतिमागतनिजनयनोत्पलार्चितं भवति स्तनपृष्ठम् ॥]

विशाल व यौवनामुळें उत्तुंग अशा आपल्या स्तनांवरील ताजीं व पहिलीं नखक्षतें आर्येनें कौतुकानें पाहिलीं, तेव्हां तिच्या स्तनपृष्ठांवर तिच्या नील नेत्रांचें प्रतिबिंब उमटलें, जणूं तिनें त्यांची नीलकमलांनीं पूजा केली.

---

१. दुद्दोणी, दंदोलि. २. णवणहक्खणिविक्खणे. ३. स्तनतटं, स्तनपट्टम्.

● आरक्त कमलदलांची नीलोत्पलांनीं पूजा बांधली. जें असाधारण तेंच विशेष आकर्षक वाटतें, उदाहरणार्थ नीलनेत्र !

१५१ कौस्तुभ :　　151. Jewel.

तं णमह जस्स वच्छे लच्छिमुहं कोत्थुहम्मि[1] संकन्तम् ।
दीसइ मअपरिहीणं ससिबिम्बं सूरबिम्ब[2] व्व ॥५१॥

[तं नमत यस्य वक्षसि लक्ष्मीमुखं कौस्तुभे संक्रान्तम् ।
दृश्यते मृगपरिहीनं शशिबिम्बं सूर्यबिम्ब इव ॥]

ज्याच्या वक्षस्थलावरील (हारामधील) कौस्तुभ-रत्नांत प्रतिबिंबित झालेलें लक्ष्मीचें मुख – निष्कलंक चंद्राचें प्रतिबिंब सूर्यावर उमटावें तसें दिसत आहे, त्याला नमस्कार असो.

● गंगाधर सांगतो, स्त्रीसेवाविमुख नायकाला अभिमुख करण्यासाठीं आणि विपरीतरताविषयीं अनभिज्ञ असलेल्या नायिकेच्या शिक्षणासाठीं दूतीनें हें विपरीतावस्थेंतील लक्ष्मीचें वर्णन केलेलें आहे. ही टीका निःसंशय विपरीत आहे !

१५२ मान :　　152. Conceit.

मा कुण पडिवक्खसुहं अणुणेहि पिअं पसाअलोहिल्लम् ।
अइगहिअगरुअमाणेण पुत्ति रासि व्व छिज्जिहिसि[3] ॥५२॥

[मा कुरु प्रतिपक्षसुखमनुनय प्रियं प्रसादलोभयुतम्[4] ।
अतिगृहीतगुरुकमानेन पुत्रि राशिरिव क्षीणा भविष्यसि ॥]

१. कोत्थहम्मि, कोथु, कोछ, कोछु. २. सुरबिम्बे. ३ झिज्जिहिसि, झिज्झिहिसि.
४. प्रसादलोभिष्टम्, लोभयुक्तम्.

मुली, फार मान करूं नको, ज्यामुळें तुझ्या सवतींनाच आनंद होईल असें वागूं नको. प्रियकराची मनधरणी कर; त्याला अनुनयाची आवड आहे. धान्याची रास कितीही मोठी असली तरी मोठ्या मापानें तिच्यांतलें धान्य काढलें तर तीही क्षीण होते, त्याप्रमाणें या मानामुळें तुझी तूंच क्षीण होशील.

● रास कितीही मोठी असली तरी तिच्यावर मोठें वजन ठेवलें म्हणजे ती खचते, असा या गाथेचा आशय आहे असें गंगाधर सांगतो. राशींतलें धान्य मोठ्या मापानें काढलें असतां ती ओसरते, हा अर्थ अधिक अन्वर्थक वाटतो. प्रियकर व प्रेयसी याचें एकामेकांवर कितीहि प्रेम असलें तरी रुसण्यामुळें त्याला ओहोटी लागते, असा आशय.

१५३ काजळ : 153. Collyrium.

विरहकरवत्त[1]दूसहफालिज्जन्तम्मि[2] तीअ हिअअम्मि ।
अंसू कज्जलमइलं[3] पमाणसुत्तं व्व पडिहाइ ॥५३॥

[विरहकरपत्रदुःसहपाट्यमाने तस्या हृदये ।
अश्रु कज्जलमलिनं प्रमाणसूत्रमिव प्रतिभाति ॥]

तिला विरह दुःसह झाला आहे. काजळामुळें काळवंडलेले अश्रु तिच्या हृदयावर ओघळले आहेत व त्यांनीं उमटलेली काळसर रेषा जणूं प्रमाण दर्शविण्यासाठीं अरेकसानें ओढलेल्या रेषेसारखी दिसत आहे; जणूं विरहवेदनांच्या करवतीनें तिचें हृदय कापलें जात आहे.

● लांकूड कापण्यासाठीं अरेकस त्यावर कोळशाची रेघ अजूनही ओढतात. तिचें हृदय कापलें जात होतें व त्यासाठीं जणूं प्रमाण रेषा तिची तिनेंच आंखली होती.

---

१. पत्त. २. फाडिज्जन्तस्स तीअ हिअअस्स. ३. सकज्जलमिस्सं.

१५४ आकर्षक : 154. Deposit.

दुण्णिक्खेवअमेअं, पुत्तअ ! मा साहसं करिज्जासु ।
एत्थ णिहिताइँ मण्णे हिअआइँ [2]पुणो ण लब्भन्ति ॥५४॥

[दुर्निक्षेपकमेतत्पुत्रक मा साहसं करिष्यसि ।
अत्र निहितानि मन्ये हृदयानि पुनर्न लभ्यन्ते ॥]

पुत्रा, असें साहस करूं नको. अशा आकर्षक ठिकाणीं हृदय गुंतविलें कीं परत न मिळणाऱ्या ठेवीप्रमाणें तें कधींही परतून येत नाहीं.

● ज्या सावकाराचे व्याजाचे दर आकर्षक असतात व गिन्हाइकांची सरबराई चाललेली असते तेथेंच ठेवी ठेवावयास लोक उत्सुक असतात, पण शेवटीं तेथें मुद्दलही बुडतें. व्यवहारकुशल लोक अशा सावकारांबद्दल सावधगिरीचीच सूचना देतात. सुंदर व विदग्ध, म्हणून आकर्षक, अशा स्त्रियांना आपण आपलें अंतःकरण अर्पण करतों, पण त्या प्राप्त होत नाहींत आणि हृदयही परतून येत नाहीं; म्हणून सावधगिरीची सूचना, कीं पुत्रा, ती फार आकर्षक आहे, तिच्यापासून दोन पावलें दूरच राहा.

१५५ अथाङ्ग : 155. Innocent.

णि[3]व्वुत्तरआ वि वहू सुरअविरामट्ठिइं अआणन्ती ।
अविरअहिअआ अण्णं पि किं पि अत्थि त्ति चिन्तेइ ॥५५॥

[निर्वृत्तरतापि वधूः सुरतविरा[4]मस्थितिमजानंती ।
अविरतहृदयान्यदपि किमप्यस्तीति चिन्तयति ॥]

१. दुष्पेक्खव. २. उणो. ३. विणिवुत्त. ४. अवसान.

ती स्वत: तृप्त झालेली आहे; पण सुरताची विरामस्थिति अनुभविलेली नसल्यामुळें आणि तुला तृप्त करावयाची इच्छा असल्यामुळें सुरत संपूर्ण झालें तरी या समारंभांत आणखी कांहीं तरी (विधि) असेल अशी त्या अजाणतीची समजूत आहे.

● मुग्धा नायिका. संशयग्रस्त होऊं नको किंवा खंत करूं नको. तुझ्याकडे कांहीं दोष नाहीं, त्याचप्रमाणें तिच्याकडेही. ती स्वतः संतुष्ट झालेली आहे; तुला संतुष्ट करावयास ती विशेष तत्पर आहे, एवढेंच !

१५६ वेश्यांचें प्रेम : 156. Hail Harlot.

णन्दन्तु सुरअसुहरसतह्णावहराइँ सअललोअस्स ।
बहुकैअवमग्गविणिम्मिआइँ वेसाणँ पेम्माइं ॥५६॥

[नन्दन्तु सुरतसुखरसतृष्णापहराणि सकललोकस्य ।
बहुकैतवमार्गविनिर्मितानि वेश्यानां प्रेमाणि ॥]

सर्व (प्रकारच्या) लोकांची सुरतसुखाची तहान भागवणारें आणि अनेक लबाड्यांनीं भरलेलें वेश्यांचें प्रेम विजयी होवो.

● प्रशंसेतही निंदा गर्भित आहे. वेश्याचें प्रेम सकल लोकांची, म्हणजे उत्तम, मध्यम, कनिष्ठ पुरुषाची तृष्णा हरण करतें; इतकेंच नव्हे, ज्याची ज्या वेळीं जशी वृत्ति तशी तिला अनुकूल साथ देण्यात त्या पटाईत असतात; कारण कालपरत्वें व कारणपरत्वें मनुष्याच्या वृत्तींतही क्षणिक बदल होत असतात. सुरत द्विविध असतें, बाह्य व अभ्यंतर. बाह्य सुरतांत वेश्या विशेष प्रवीण असतात; कारण जोडीदाराला त्यांतच अधिक गोडी वाटते, हें त्यांना

---

१. बहुमग्गविणिम्मिआइं. २. सुरआइं. ३. सुभ. ४. सुरते सुरभसाणि. ५. बहुपतिकानां मार्ग विनिर्मितानि.

ठाऊक असतें. गृहिणी प्रेमासक्त व विदग्ध असली तरी कौटुंबिक जीवनाच्या मर्यादांमुळें ती परतंत्रच असणार. तिच्या विलासांत विविधता, निःशंकता व आवेश कसा असणार ? आणि लबाडी तर मुळींच नाहीं. पुरुषाच्या मागण्या किती विविध व केव्हांकेव्हां किती अस्वाभाविक असतात हें मनोविश्लेषण-शास्त्राचे तज्ज्ञ जाणतात; आणि वेश्या त्याचे सर्व आग्रह पुरवितात, म्हणूनच त्या पुरुषांना प्रिय वाटतात. त्या प्रेम करतात व करवितात, एवढेंच नव्हे, प्रेम प्रत्यक्ष निर्माण करतात.

१५७ मत्सर : 157. Jealousy.

अप्पत्तमण्णुदुक्खो किं मं किसिअत्ति पुच्छसि हसन्तो ? ।
पावसि जइ चलचित्तं पिअं जणं ता तुह कहिस्सम्[1] ।।५७।।

[अप्राप्तमन्यु[2]दुःखः किं मां कृशेति पृच्छसि हसन् ।
प्राप्स्यसि यदि चलचित्तं प्रियं जनं तदा तव कथयिष्यामि[3] ।।]

तूं कृश कां झालीस, असें तुम्ही मला हंसून विचारतां. (संताप येतो, पण इलाज चालत नाहीं, अशा) क्रोधाचें दुःख तुम्हांला माहीत नाहीं चवचाल वृत्तीच्या पण प्रिय वाटणाऱ्या स्त्रीच्या प्रेमपाशांत तुम्ही गुरफटाल तेव्हां मी तुम्हांला माझ्या कृशतेचें कारण सांगेन.

● प्रियापराधजनितश्चित्तक्षोभो मन्युः ।

१५८ इषारा : 158. Warning.

अवहत्थिऊण सहिजम्पिआइँ जाणं कएँण रमिओसि ।
एआइँ ताइँ सोक्खाइँ, संसओ जेहि जीअस्स ।।५८।।

१. पुच्छिस्सम्. २. मानदुःखः ३. प्राप्नुहि यावच्चलचित्तं प्रियं जनं तावत्प्रक्ष्यामि ।
४. एक क, कए तुमं रमिओ.

[अपहस्तयित्वा सखीजल्पितानि येषां कृतेन रमितोऽसि ।
एतानि तानि सौख्यानि संशयो येर्जीवस्य ॥

सख्यांचा इषारा न जुमानतां ज्या सुखासाठीं मी तुला रमविलें तें तर मला मिळालें नाहींच, तुझ्यामुळें माझें जीवन मात्र धोक्यांत आलें.

● किंवा, सख्यांचा सल्ला झुगारून मी तुला संतुष्ट केलें नाहीं – यामुळें सुख तर मिळालें नाहींच जीव मात्र धोक्यांत आला. जें करूं नये तें केलें किंवा जें करावें तें केलें नाहीं म्हणजे जें होऊं नये तें होतें.

१५९ घर मोकळें : 159. At Home.

ईसालुओ पई से रत्तिं महुअं ण देइ उच्चेउम् ।
उच्चेइ अप्पण च्चिअ माए ! अइउज्जुअसुहाओ ॥५९॥

[ईर्ष्याशीलः पतिस्तस्या रात्रौ मधूकं न ददात्युच्चेतुम् ।
उच्चिनोत्यात्मनैव मातरतिऋजुकस्वभावः ॥

आई ग, तिचा पति इतका संशयी आहे कीं मधूकाचीं पुष्पें वेंचण्यासाठीं तो तिला रात्रीं बाहेर जाऊं देत नाहीं आणि इतका सरळ स्वभावाचा आहे कीं (तिच्यासाठीं) तो (रात्रीं अपरात्रीं रानावनांत हिंडून) स्वतःच फुलें गोळा करून आणतो.

● मधूक निकुञ्जांत संकेत ठरला होता, तिकडे न जातां तिच्या घरींच जा, अशी दूतीची नायकाला सूचना. कीं घर तिच्यावर टाकून तिच्या पतीला दुसरीकडे जावयाचें होतें ? गंगाधर सांगतो, शेजारणीच्या वर्णनाच्या निमित्तानें दूती मधूककुञ्जांत संकेत देत आहे.

---

१. अपहृत्य २. कृते त्वं रमितः, कृते न रमितोऽसि. ३. अपचेतुम्.

१६० पदराला धरूं नको, सोड ! :　　160. Scarf.

अच्छोडिअवत्थद्धन्तपत्थिए[1] मन्थरं तुमं वच्च ।
चिन्तेसि थणहराआसिअस्स मज्झस्स वि ण भङ्गम् ? ॥६०॥
[बलादाकृष्टवस्त्रार्धान्ते[2]प्रस्थिते मन्थरं त्वं व्रज ।
चिन्तयसि स्तनभरायासितस्य मध्यस्यापि न भङ्गम् ॥]

तूं घाईनें जायला निघाली आहेस, म्हणून मी तुझा पदर जोरानें ओढून धरला आहे. आतां निदान हळूं तरी चाल; नाहीं तर स्तनांच्या भारानें आधींच लवलेली तुझी कंबर नाहीं का मोडणार ?

● तूं माझें मन मोडून जाऊं नकोस, हिसकाहिसक केलीस तर बिचारी पातळ कमर मात्र मोडेल !

१६१ पाणपोई :　　161. Water-Stand.

उद्धच्छो पिअइ जलं जह जह विरलङ्गुली चिरं पहिओ ।
पावालिआ[3] वि तह तह धारं तणुइं पि तणुएइ ॥६१॥
[ऊर्ध्वाक्षः पिबति जलं यथा यथा विरलाङ्गुलिश्चिरं पथिकः ।
प्रपापालिकापि तथा तथा धारां तनुकामपि तनूकरोति[4] ॥

पाणपोईवरील पाणी घालणारी स्त्री (तहानलेल्या) पथिकाच्या ओंजळींत पाणी ओतीत आहे. त्यानें तिच्यावर नजर रोंखली आहे. ओंजळीचीं बोटें तो विरल करीत आहे व पाण्याची धार ती अधिकाधिक बारीक करीत आहे.

---

१. अक्कोलिअ, अक्खोडइ, अंछोडिअ. २. वस्त्रैकदेश. ३. पपापालिआ, पावलिआ. ४. तन्वीमपि तन्वीं करोति.

● पाणपोईवर पुष्कळ माणसें असावींत; म्हणून तर हे संकेत चालले आहेत. ती त्याच्यावर अनुरक्त झाली, त्याचें सान्निध्य अधिक काळपर्यंत लाभावें म्हणून तिनें पाण्याची धार बारीक केली. तो तहानलेला होताच. ऊर्ध्व दृष्टीनें तो तिचे हावभाव हेरीत होता; त्यानें तिचें इङ्गित ओळखलें आणि तिच्या संकेताला मान्यता दर्शविण्यासाठीं त्यानें बोटें विरळ केलीं. आजूबाजूच्या कोणाला संशय आलाच तर अडाणीपणाची सबब आहेच. अलंकारकौस्तुभांत अन्योन्य अलंकाराचें उदाहरण : 'अन्योन्यं वस्तूनां परस्परोत्कर्षहेतुत्वे।' श्री अप्पय्य दीक्षितांनीं कुवलयानन्दांत (निर्णयसागर: पृ. ११४) याच वचनाचा अनुवाद दिलेला आहे, 'यथोर्ध्वाक्षः पिबत्यम्बु पथिको विरलाङ्गुलिः। तथा प्रपापालिकापि धारां वितनुते तनुम्॥' श्री. ताम्बे यांनीं याच गाथेवरून 'पाणपोईवाली' ही कविता (समग्र कविता: पृ. २६६. क्र. २०५) लिहिलेली आहे कीं काय! "झाली ती ओणवी, तों पदर उरिं सरे सैल झाला झुले तो। पाणी दे पाणपोई जवळ उभि, पितां, ऊर्ध्वदृष्टी फुले तो! बोटें तीं ओंजळीचीं विरळ, मग तिची धार बारीक झाली, मधेच्छू काय पीतो अविचल, मदिराक्षी तरी काय झाली।"

१६२ दोघांचें प्रेम, तिसऱ्याचा लाभ : 162. Disguise.

भिच्छाअरो[1] पेच्छइ णाहिमण्डलं, सावि तस्स मुहअन्दम्।
तं चटुअं अ करङ्कं दोह्ण वि काआ विलुम्पन्ति ॥६२॥

[भिक्षाचरः प्रेक्षते नाभिमण्डलं सापि तस्य मुखचन्द्रम्।
तच्चटुकं[2] च करङ्कं द्वयोरपि काका विलुम्पन्ति ॥]

ती भिक्षेकऱ्याला वाढीत आहे. तो तिचें नाभिमण्डल पाहत आहे व ती त्याचा मुखचंद्र; आणि दोघांच्याही हातांतील पात्रें कावळे उडवीत आहेत.

१. भिक्खॉयरो. २. तच्च चटुकं करङ्कं.

● नणंदाजावानीं भरलेल्या घरांतल्या प्रियेचें दर्शन करें घ्यावयाचें ? त्यानें भिक्षेकऱ्याचा वेष घेतला व दारासमोरून आवाज दिला. ओळख पटतांच त्याची प्रिया स्वतःच त्याला वाढावयास आली व भान विसरली. सूनबाई एवढा वेळपर्यंत कोठें रेंगाळल्या, म्हणून चौकशी सुरू झाली. तेव्हा कोणी तरी चुगली केली. प्रियकराच्या अचानक दर्शनामुळें तिचें वस्त्र शिथिल झालें व नाभिमण्डल उघडें पडलें. दोघेंही बेभान झालेली पाहून कावळ्यांनीं अन्नावर ताव मारला. भिन्न पाठ: सा तस्स पेच्छइ मुहं भिक्खयरो णाहिमण्डलं तिस्सा । दोण्हं पि करङ्कं चड्डुअं च काया विलुंपंति ॥

१६३ जीवनाधार : 163. Fire.

जेण विणा ण जिविज्जइ अणुणिज्जइ सो कआवराहो वि ।
पत्ते वि णअरदाहे भण कस्स ण वल्लहो अग्गी ॥६३॥

[येन विना न जीव्यतेऽनुनीयते स कृतापराधोऽपि ।
प्राप्तेऽपि नगरदाहे भण कस्य न वल्लभोऽग्निः ॥]

ज्याच्यावांचून जीवन जगतांच येत नाहीं त्यानें अपराध केला तरी उलट त्याचीच मनधरणी करावी लागते. आगीमुळें गांव जळून जाण्याचा समय आला तरी अग्नि कधीं कोणाला अप्रिय होईल काय ?

● मुळातील प्रयोगाचा शब्दशः अर्थ : ' सांग, अग्नि कोणाचा वल्लभ नाहीं ? ' अग्नि हा प्रसिद्ध पारदारिक, स्त्रीजनांचा आद्यवल्लभ आहे, असा संकेत आहे.

१६४ कुग्रामनिंदा : 164. Reproach.

वक्क[1] को पुलइज्जउ, कस्स कहिज्जउ सुहं व दुक्खं वा[2] ।
केण समं व हसिज्जउ[3], पामरपउरे हअग्गामे ॥६४॥

१. वंकं, वक्कि. २. वलइज्जाइ. ३. विहसिज्जई.

[वक्रं कः प्रलोकयतां कस्य कथ्यतां सुखं वा दुःखं वा ।
केन समं वा हस्यतां पामरप्रचुरे हतग्रामे ॥]

क्षुद्र माणसांनीं भरलेल्या या कुग्रामांत मी वांकड्या नजरेनें कोणाकडे पाहूं ? सुखदुःखें कोणाला सांगूं ? आणि कोणाबरोबर हंसूं ?

● स्वच्छंदचारिणी खेड्यांत गेली व तेथील जीवनाला उबगली. अचानक पूर्वपरिचित मित्र भेटला; त्यानें कुशल विचारलें, त्याला उत्तर. ग्रामनिंदेच्या निमित्तानें स्वतःच्या वैदग्ध्याची सूचना.

१६५ नांगराची पूजा : 165. Plough-Worship.

फलहीवाहणपुण्णाहमङ्गलं लङ्गले कुणन्तीए ।[१]
असईअ मणोरहगब्भिणीअ हत्था थरहरन्ति ॥६५॥

[कार्पासीक्षेत्रपुण्याहमङ्गलं लाङ्गले कुर्वत्याः ।
असत्या मनोरथगर्भिण्या हस्तौ थरथरायेते ॥]

कपाशीच्या शेतांत पेरणी सुरू करण्यापूर्वीं नांगराची पूजा करतांना मनोरथांच्या आवेगामुळें शेतकऱ्याच्या छिनाल स्त्रीचा हात थरथरतो.

● मनोविकार प्रबळ झाले म्हणजे शरीर आपोआपच थरथरतें. शेत पिकलें म्हणजे त्याच्या आडोशाला काय काय करावयाचें हें तिनें अगोदरच ठरवून ठेवलें होतें. कीं तिला गेल्या हंगामाची आठवण झाली ? शेतांत पेरणी होण्यापूर्वींच ती मनोरथगर्भिणी झाली होती. हा शब्दप्रयोग आकर्षक वाटतो. नांगराच्या पूजेच्या वेळींही मनोरथांना प्रेरणा व्हावी, हा विषय आधुनिक मनोविश्लेषणाला योग्य आहे ! नांगराची पूजा चालली आहे, पण आसपास ब्राह्मण दिसत नाहीं !

१. वलहीगहनं, पलहीवाहय.

१६६ युक्ति : 166. Ruse.

पहिउल्लूरणसङ्काउलाहिँ असईहिँ बहलतिमिरस्स ।
आईप्पणेण णिहुअं वडस्स सित्ताइँ पत्ताइं ॥६६॥
[पथिकच्छेदनशङ्काकुलाभिरसतीभिर्बहलतिमिरस्य ।
आलेपनेन निभृतं वटस्य सिक्तानि पत्राणि ॥]

गर्द छाया असलेल्या वडाचीं पानें वाटसरू खुडतील या शंकेनें व्याकुल झालेल्या छिनाल स्त्रियांनीं त्याच्या पानांवर चोरून पिठाचें पाणी शिंपडलें.

● वाटसरूंनीं पत्रावळींसाठीं पानें तोडलीं तर आपलें संकेतस्थान नष्ट होईल अशी त्यांना धास्ती वाटली. पिठाच्या पाण्यामुळें वाटसरूंना अस्वच्छतेची शंका येईल व ते दुसरीकडे उतरतील अशी त्यांची अपेक्षा.

१६७ धार्मिक : 167. Vigilant.

भञ्जन्तस्स वि तुह सग्गगामिणो णइकरञ्जसाहाओ ।
पाआ अज्ज वि धम्मिअ ! तुह कहँ धरणिं विह छिवन्ति ॥६७॥
[भञ्जतोऽपि तव स्वर्गगामिनो नदीकरञ्जशाखाः ।
पादावद्यापि धार्मिक तव कथं धरणीमेव स्पृशतः ॥]

१ अलंपणेण. २. आतर्पणेन. ३. सवग्ग. ४. कण कह पाआ अज्ज वि धम्मिअ धरणिं । दोण्णि वि धम्मिअ अज्ज वि धराणिं चिअ. ५. तव कथं पादावद्यापि धार्मिक धरणीमेव.

नदीकांठच्या करञ्ज वृक्षाच्या फांद्या तूं तोडल्यास ? हे धार्मिक, तुला स्वर्गांत जाण्याची इच्छा आहे ना ? मग अजून तुझे पाय जमिनी-वर कसे आहेत ?

● तूं मरत कां नाहींस ? दुसऱ्यांच्या संकेतस्थानाचा भंग करणारा मनुष्य अवश्य धार्मिकच असला पाहिजे ! धर्माच्या नांवाखालीं अशीं पापें करणारा स्वर्गाला जात नाहीं, अधोगतीलाच जातो. एक टीकाकार सांगतो, धार्मिकानें करंजाच्या शाखा दंतधावनार्थ तोडल्या. हें शक्य दिसत नाहीं. करंजाचीं झाडें बहुशः नदीतीरावर असतात; तेथें कोणा स्वैरिणीचें संकेतस्थान होतें. त्याचें सुख पाहवलें नाहीं म्हणून म्हणा, किंवा अधार्मिक अनाचाराला अवसर मिळूं नये म्हणून म्हणा, धार्मिकानें पुष्कळ फांद्या तोडून संकेतस्थान उध्वस्त केलें, आणि म्हणूनच तिचा एवढा संताप झालेला असावा. .आणखी एक टीकाकार सांगतो : करंजाच्या झाडाखालीं एक शिवलिंग होतें. त्याची पूजा करण्याच्या निमित्तानें ती तिकडे जाई व पुष्कळ वेळपर्यंत पूजा करीत बसे. तिच्या देवाला चांगली सावली होती. ती या दुष्ट पुजाऱ्यानें नष्ट केली, म्हणून तिचा संताप झाला. प्राकृतापेक्षां प्राकृतांत सांगावयाचें म्हणजे ती म्हणाली असेल, तुझा मुडदा गेला ! स्त्रीवेदांतल्या एकाद्या दुसऱ्या कथेवर ही गाथा आधारलेली असावी.

१६८ औत्सुक्य : 168. Embankment·

अच्छउ दाव मणहरं पिआइ मुहदंसणं अइमहग्घम् ।
तग्गामछेत्तसीमा[1] वि झत्ति[2] दिट्ठा सुहावेइ ॥६८॥

[अस्तु तावन्मनोहरं प्रियाया मुखदर्शनमतिमहार्घम् ।
तद्ग्रामक्षेत्रसीमापि झटिति दृष्टा सुखयति ॥]

---

१ चित्ता, छित्त. २. ज्झति, झझति, झ्झइति.

प्रियेच्या अलभ्य, अमूल्य व मनोहर दर्शनाचा आनंद तर राहू द्या; ती राहते त्या गांवांतल्या शेताचा बांध दिसला तरी दृष्टीला सुख वाटतें.

● आत्मनिष्ठ आवडीमुळें आपण वस्तुस्थितीवर आकर्षकतेचा आरोप करतों. आसक्ति ओसरली कीं प्रत्यक्ष अगदीं रूक्ष वाटतें. तो बांध पाहतांच सुख कां वाटतें ? वाटतें, कीं संधि सांपडताच आपण तिला येथें घेऊन येऊं व बांधाच्या आडोशाला बसून तिच्याशीं चार गोष्टी करूं.

१६९ मृतभार्या : 169. Rustic.

णिक्कम्माहिँ वि छेत्ताहिँ पामरो णेअ वच्चए वसइम् ।
मुअपिअजाआसुण्णइअगेहदुःक्खं परिहरन्तो ॥६९॥

[निष्कर्मणोऽपि क्षेत्रात्पामरो नैव व्रजति वसतिम् ।
मृतप्रियजायाशून्यीकृतगेहदुःखं परिहरम् ॥]

प्रिय पत्नी मृत झाल्यामुळें शून्य झालेल्या घरीं जाण्याचें दुःख नको म्हणून बिचारा शेतकरी काम नसलें तरी शेतांतच वस्ती करतो.

● तो बिचारा गरीब आहे व नागऱ्या आहे म्हणून त्याचें कोणी कौतुक करीत नाहीं. आणि तुम्हीं ? तुमची भार्या जिवंत आहे व ती तुमच्या छंदानुसार वागणारी आहे, तरी तुम्हीं बाहेरच भटकत असतां— आणि तुमचें मात्र सर्वत्र कौतुक चाललें आहे ! कारण तुम्ही विदग्ध आहात !

१७० झञ्झावात : 170. Storm.

झञ्झावाउत्तिण्णिअघरविवरपलोट्टसलिलधाराहिं ।
कुड्डलिहिओहिदिअहं रक्खइ अज्जा करअलेहिं ॥७०॥

१. चित्ताहि, छित्ताहि. २. झञ्झावाउच्छल्लिअघर. ३. मुद्धा.

[झञ्झावातोत्तृणीकृतगृहविवरप्रपतत्सलिलधाराभिः ।
कुड्यलिखितावधिदिवसं रक्षत्यार्या करतलैः ॥]

झंझावातामुळें छपरावरील गवत उडून गेलें व छिद्रांतून गळणाऱ्या पाण्याच्या धारांमुळें भिंतींवर काढलेलीं पतीच्या प्रवासाचे राहिलेले दिवस मोजण्याचीं चिन्हें धुपून जाऊं लागलीं तेव्हां त्यांवर आपले हात धरून आर्या त्यांचें रक्षण करूं लागली.

● विरहकालाचे दिवस मोजण्यासाठीं देहलीवर पुष्पें ठेवणारी कालिदासाची नायिका (मेघदूत २-२७) गाथासप्तशतींतील नायिकांहून जास्त सुशिक्षित व उत्तरकालीन दिसते.

१७१ माकडचेष्टा : 171. Mustard.

गोलाणइए कच्छे चक्खन्तो राइआइ पत्ताइं ।
उप्फडइ मक्कडो खोक्खएइ पोट्टं अ पिट्टेइ ॥७१॥

[गोदावरीनद्याः कच्छे चर्वयन्राजिकायाः पत्राणि ।
उत्पतति मर्कटः खोक्खशब्दं करोत्युदरं च ताडयति ॥]

माकडानें मोहरींचीं पानें खाल्लीं. गोदावरीच्या कांठावर आतां तें खोखरत आहे, पोट पिटीत आहे आणि या फांदीवरून त्या फांदीवर उड्या मारीत आहे.

● त्या माकडासारखीच नायकाची अवस्था झाली आहे, आपण कोठें आहोंत तें तुला कळावें म्हणून तो सारखा खोकत आहे, तूं कोठें आहेस तें कळावें म्हणून झाडांवर चढून आजूबाजूला पाहत आहे. संकेताप्रमाणें त्याची त्वरित भेट घे अशी नायिकेला सूचना आणि चिडल्या माकडाच्या धास्तीनें तिकडे फिरकूं नये म्हणून इतरांना धोक्याची सूचना.

---

१. वर्षावातोच्छलितगृहविवरप्रवर्तमानसलिल, झञ्झावातोतृणितगृहविवरप्रत्यावर्तमानसलिलधाराभ्यः २. उत्तानित. ३. चिक्खन्तो. ४. उप्पडइ, उप्फिडइ.

१७२ घंटांची माळ : 172. Row of Bells.

गहवइणा मुअसेरहहुण्डुअदामं चिरं वहेऊण ।
वग्गसआई णेउण णवरिअ अज्जाघरे बद्धम् ॥७२॥
[गृहपतिना मृतसैरिभबृहद्घंटादाम चिरमूढ्वा ।
वर्गशतानि नीत्वानन्तरमार्यागृहे बद्धम् ॥]

आपल्या मेलेल्या रेड्याच्या गळ्यांतील मोठ्या घंटांची माळ तशाच एकाद्याच्या गळ्यांत घालावी म्हणून घरधन्यानें ती शेकडों कळपांकडे नेली आणि नंतर त्यानें ती चण्डिकेच्या देवळांत बांधली.

● त्या घंटांच्या जोगता रेडा त्याला कोठें आढळला नाहीं. ' मृतस्य अलंकारादिकं देवब्राह्मणयोर्देयम् इति धर्मः । ' तो अडाणी असूनही धर्माचरण करीत आहे आणि तुम्ही ? तुम्ही तर आपल्या जिवंत भार्येचे अलंकार क्षणिक सुखासाठीं दुसरीला देण्याला सज्ज झालां आहांत.

१७३ मोरपीस : 173. Peacock Feathers.

सिहिपेहुणावअंसा बहुआ वाहस्स गव्विरी भमइ ।
गअमोत्तिअरइअपसाहणाणँ मज्झे सवत्तीणम् ॥७३॥
[शिखिपिच्छावतंसा वधूर्व्याधस्य गर्विता भ्रमति ।
गजमौक्तिकरचितप्रसाधनानां मध्ये सपत्नीनाम् ॥]

१. हुंदुभदामे. २. मग्गसयामि. ३. डुण्डुम. ४. यूथ. ५. जेहुणा. ६. सिहिपिच्छकण्णऊरा. ७. गह. ८. मुत्ताफल. ९. काव्यानुशासन व ध्वन्यालोक यांतील पाठः सिहिपिच्छकण्णऊरा जाआ वाहस्स गव्विरी भमइ । मुत्ताफलरइअपसाहणाणँ मज्झे सवत्तीण ॥ १०. कर्णपूरा. ११. मुक्ताफल.

हत्तींच्या गंडस्थळांतील मोत्यांचे अलंकार सवतींनीं धारण केले आहेत. व्याधाची नवी वधू मात्र मोरपिसांचा तुरा धारण करून त्यांच्यामध्यें गर्वानें मिरवत आहे.

● नव्या नवरीच्या नादानें व्याध इतका दुबळा झाला कीं आता तो फक्त मोराचीच शिकार करूं शकतो, हत्तींच्या वाटेला जात नाहीं; त्याची शक्ति नष्ट झाल्याबद्दल तिला खेद वाटत नाहीं, कारण त्याच्या दौर्बल्याच्या भावी परिणामाची तिला कल्पना नाहीं. तो आपल्या आधीन आहे, यातच तिचा आनंद व अभिमान आहे, मग तो किती का अविवेकी असेना !

१७४ षोडशी : 174. Sweet Sixteen.

वङ्कच्छिपेच्छिरीणं उङ्कल्लविरीणँ वङ्कभमिरीणम् ।
उङ्कहसिरीणँ पुत्तअ पुण्णेहिँ जणो पिओ होइ ॥७४॥

[वक्राक्षिप्रेक्षणशीलानां वक्रोल्लपनशीलानां[1] वक्रभ्रमणशीलानाम् ।
वक्रहासशीलानां पुत्रक पुण्यैर्जनः प्रियो भवति ॥]

काण्या डोळ्यानें बघते, लाडे लाडे बोलते, भिरी भिरी चालते, गालांतल्या गालांत हंसते; पुत्रा, अशा स्त्रीची प्राप्ति लाधण्यास पुण्याई लागते.

● गाथासप्तशतींतलें अत्यंत मनोहर वर्णन. नुकत्याच अंगीं आलेल्या शक्तीच्या भारानें जड झालेल्या पापणीच्या आडोशानें फेंकलेली साभिप्राय नजर, रसरशीत व अर्धस्फुट ओठांतून निघणारे व जिवाला भेदून जाणारे लाडके बोल, नितंब वेळावून टाकलेलें मुरकतें पाऊल, नाजूक जिवणीला जराशी कलाटणी देऊन केलेलें खळीचें स्मित—कोणाला वाटेल आधुनिक सायंतारकांनीं किंवा रजततारकांनीं हीं लक्षणें अलीकडेच आत्मसात् केलेलीं असावींत; पण

1. वक्रोद्दीपनशीला.

नाहीं. अशी नखरेबाज स्त्री दिसणें हें भाग्य, तिचा परिचय होणें हें परम-भाग्य आणि तिच्या प्रेमाची प्राप्ति – धन्य, धन्य! अशा भाग्याची आम्हां पामरांना कल्पनाही होणार नाहीं. असा वस्तुलाभ होण्याला जन्मजन्मांत-रींची पुण्याई अवश्य असावी यांत काय आश्चर्य! कां कोण जाणे, गाथा-सप्तशतीचे सर्व टीकाकार सांगतात कीं भुजंगप्रलोभनासाठीं वेश्येनें हें आपल्या मुलीचें केलेलें वर्णन आहे. बिचारे!

१७५ भुकड : 175. Loafer.

भम धम्मिअ! वीसत्थो[1] सो सुणओ अज्ज मारिओ तेण[2]।
गोल[3]अडविअड[4]कुडङ्गवासिणा दरिअसीहेण ॥७५॥

[भ्रम धार्मिक विस्रब्धः[5] स शुनकोऽद्य मारितस्तेन।
गोदातटविकटकुञ्जवासिना दृप्तसिंहेन[6] ॥]

हे धार्मिक, गोदातीरावरील निबिड निकुञ्जांत निवास करणाऱ्या विक्राळ सिंहानें आजच तें कुत्रें मारून टाकलें आहे. तुला आतां निर्धास्तपणें हिंडण्यास हरकत नाहीं.

● आनन्दवर्धनाच्या ध्वन्यालोकाच्या भाषांतराच्या टीपेंत श्री. वीरकर (महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका, अंक ८३) सांगतात : " कोणा एका तरुणीचें हें संकेतस्थल आहे. आपल्या प्रियकराची मार्गप्रतीक्षा करीत ती तेथें उभी असतांना फुलें वगैरे गोळा करावयास आलेला एक भित्रा पण धर्मा-चरणी मनुष्य, तिला जवळपास हिंडावयाला नको आहे. म्हणून मोठ्या चातुर्यानें वरील वाक्य उच्चारून ती त्याला तेथें भटकण्यापासून परावृत्त करूं पाहते. येथें ' हिंड ' हा वाच्यार्थ आहे, पण श्लोक जरा बारकाईनें वाचल्यावर ' हिंडूं नको ' असा अर्थ सूचित होतो. कुत्रा मेला; पण

१. वीसद्धो. २. देण. ३. गोलाणइकच्छ. ४. तड. ५. विश्वब्धः, विश्वस्तः ६. दरीसिंहेन.

मारणारा क्रुद्ध सिंह इथल्या जाळींत आहे, हें सांगण्यानें, ' तूं इथें हिंडूं नकोस ' हेंच ती सुचवीत आहे." वाच्य अर्थाहून व्यङ्ग्य अर्थ वेगळा असतो याचीं उदाहरणें म्हणून गाथासप्तशतींतील ही व १६७ या गाथा ध्वन्यालोकांत दिलेल्या आहेत; वाच्य अर्थ विधिरूप व व्यङ्ग्य अर्थ निषेधपर, या प्रकाराचें उदाहरण म्हणून ही आणि वाच्य अर्थ निषेधपर व व्यङ्ग्य अर्थ विधिरूप याचें उदाहरण म्हणून ती. जेथें चांगलें संकेत-स्थान असेल तेथेंच, किंवा जवळपास धुनी अगर समाधि लावून बसण्याची किंवा निवान्तपणें विचार करण्याच्या निमित्तानें भटकण्याची, बऱ्याच धार्मिकाना मोठी हौस असते. पण हा कांहीं खरा धार्मिक दिसत नाहीं; असता, तर तो कुत्र्याला भ्याला नसता आणि लोकप्रिय संकेतस्थानाच्या भोंवतीं घुटमळला नसता; किंवा आपल्या एकान्ताचा भंग होतांच तेथून निघून गेला असता. पण नाहीं; कांहीं धार्मिक असेच असतात कीं ते स्वतः काहीं करीत नाहींत अगर करूं शकत नाहींत आणि दुसऱ्यांच्या संकेतात विघ्नें आणतात किंवा डोळे टवकारून आजूबाजूला उगाच लुडबुडत राहतात. मला वाटतें तें चावरें कुत्रें गांवांतलें असावें आणि त्याच्या भीतीनें या धार्मिकानें गांवांत हिंडावयाचें सोडलेलें असावें. नायिका त्याला सांगते कीं तें कुत्रें मेलें, आता खुशाल गावांत भीक मागत हिंड; येथें घोंटाळलास तर तुझी हड्डी नरम करण्यास उत्सुक असलेला माझा क्रूर प्रियकर लवकरच येथें येणार आहे ! श्रीजयदेवाच्या चंद्रालोकावरील राकागम व्याख्येंत श्रीगागाभट्ट या गाथेवरील टीकेंत सांगतात : अत्र गोदावरीतीरे सिंहोऽस्तीति तत्रायं मा गच्छत्विति व्यङ्ग्यम् । तद् यद्यपि वक्तृतात्पर्यविषयं, तथापि तन्मदीयं संकेतस्थानमिति व्यङ्ग्यमुपेक्षाविषयं सहृदयैकवेद्यं च ।

१७६ वारियानें कुण्डल झाले : 176. Lotus Pollen.

वाएरिएण भरिअं अच्छि कणऊरउप्पलरएण ।
फुक्कन्तो अविइह्णं चुम्बन्तो को सि देवाणम् ॥७६॥

१. कण्णरउप्पल, कण्णऊर.

[वातेरितेन भूतमक्षि कर्णपूरोत्पलरजसा ।
फूत्कुर्वन्नवितृष्णं चुम्बन्कोऽसि देवानाम् ॥]

कानावरील कमळांतील परागांना वाऱ्यानें प्रेरणा दिल्यामुळें त्यांवरील रज:कण तिच्या डोळ्यांत गेले. ते काढण्यासाठीं डोळ्यांत फुंकर घालण्याच्या निमित्तानें तूं तिचें पुनः पुनः चुंबन घेत आहेस. तूं धन्य आहेस.

● डोळ्यांत रज गेलासें वाटलें म्हणून ती पापणी चोळूं लागली. कदाचित् तिनें त्याच्याकडे काण्या डोळ्यानें, सस्मित, साभिप्राय पाहिलें असेल. एवढें निमित्त त्याला पुरलें. इंगित ओळखणें हें चातुर्य, त्याला व्यावहारिक स्वरूप देणें हें साहस; हीं ज्याच्या अंगीं असतील तो प्रिय वाटतो व यशस्वी होतो. टीकाकार सांगतात, तूं देवच असला पाहिजेस, कारण देवांपासून कांहीं लपून राहत नाहीं, कारण देवांचे डोळे कधीं मिटत नाहींत; आणि विचारतात, तूं कोणता देव आहेस ? कारण अशी दुर्मिळ व अमूल्य संधि मिळविणारा देवही विशेष भाग्यवान् म्हटला पाहिजे. 'देवानाम्' याचें हें स्पष्टीकरण पटलें नाहीं, म्हणून मी 'धन्य' हा अर्थ घेतला आहे. परिवृत्ति अलंकार.

१७७ गलोल : 177. Sling.

सहि ! दुम्मेन्ति कलम्बाइं जह मं तेह ण सेसकुसुमाइं ।
णूणं इमेसु दिअहेसु वहइ गुडिआधणुं कामो ॥७७॥

[सखि व्यथयन्ति कदम्बानि यथा मां तथा न शेषकुसुमानि ।
नूनमेषु दिवसेषु वहति गुटिकाधनुः कामः ॥]

---

१. कर्णरचितोत्पल, कर्णावतंसीकृतोत्पल. २. जह ण तहा. ३. गुलिआ. ४. दूनयति, दुर्मनायते.

सखि, दुसरीं कोणतींही फुलें मला व्यथित करीत नाहींत, कदम्बाचीं फुलें मात्र मला या दिवसांत व्याकुल करतात; तीं कामदेवाच्या गलोलांतील गोट्यांसारखीं दिसतात.

● कदम्बाचीं फुलें गोंट्यासारखीं असतात. गुटिकाधनु हें कामदेवाचें अभिधान अपरिचित आहे. धनुष्यावरून गुटिका कशा सोडतां येतील ? म्हणून या कुसुमास्त्रासाठीं धनुष्याऐवजीं गलोल वापरला आहे. टीकाकारांनीं न सांगितलेला एक श्लेष देतों. कलम्ब म्हणजे कदम्ब वृक्ष आणि बाण. ' कलम्बमार्गणशरः ' अमरकोश; ' कलम्बी शाकभेदेऽपि कदम्बशरयोः (स्याद्दंडशरयोः) पुमान् । ' मेदिनी. वसंतांतल्या विरहापेक्षां पावसाळ्यांतला विरह अधिक तापदायक. पुष्पित वृक्षाच्या छायेंत मुमुक्षु बसत नाहींत; ते जणूं प्रेमिकांसाठीं राखून ठेवलेले असतात. अशा या स्थानीं संकेत निश्चित केल्याची सूचना.

१७८ धर्मकृत्य : 178. Religious Duty.

णाहं दूई ण तुमं[1] पिओ त्ति, को अम्ह एत्थ वावारो[2]।
सा मरइ, तुज्झ अअसो, तेण अ धम्मक्खरं भणिमो[3] ॥७८॥

[नाहं दूती न त्वं प्रिय इति कोऽस्माकमत्र व्यापारः[4] ।
सा म्रियते तवायशस्तेन च धर्माक्षरं भणामः ॥]

मी तिची दूती नाहीं आणि तूं प्रियकरही नाहींस. आम्हांला या व्यवहाराची काय पंचाईत ? पण ती मेली तर तुझी अपकीर्ति होईल, म्हणून धर्माला अनुरूप अशीच गोष्ट मी तुला सांगत आहे.

---

१. ण तुमम्. २. वाल्अ ! णाहं दूदी तस्स पिओसि त्ति ण मह वावारो । ३. णाहं दूई सुंदर तीए पिओ सि ण अम्ह वावारो । सा मरइ तुज्झ विरहे एअं धम्मक्खरं भणिमो ॥ ४. नाहं दूती सुंदर तस्याः प्रियोऽसीति नास्माकं व्यापार ।

● सांगणार नव्हते, पण राहवत नाहीं. मला कशाचीही अपेक्षा नाहीं. तूं तिचा प्रियकर आहेस किंवा कसें हेंही मला माहीत नाहीं. तरी सांगतें, तिची अधिक उपेक्षा करूं नको. दूतीलाही पारमार्थिक पंचाईत. आक्षेप अलंकार: 'वस्तुनो वक्तुमिष्टस्य विशेषप्रतिपत्तये। निषेधाभास आक्षेपो वक्ष्यमाणोक्तगो द्विधा ॥' : साहित्यदर्पण.

१७९ केशरी कोडें : 179. Puzzle.

तीअ मुहाहिं तुह मुहँ, तुज्झ मुहाओ अ मज्झ चलणम्मि।
हत्थाहत्थीअ गओ अइदुक्करआरओ तिलओ ॥७९॥

[तस्या मुखात्तव मुखं तव मुखाच्च मम चरणे।
हस्ताहस्तिकया गतोऽतिदुष्करकारकस्तिलकः॥]

ह्या तिलकानें किती बिकट कामें केलीं, पाहा; तिच्या मुखावरून तुमच्या मुखावर, त्यावरून माझ्या चरणांवर; त्यांच्या हालचाली किती हातोहात झाल्या.

हें केशरी कोडें वात्स्यायनानें उलगडलें आहे : 'मुखे मुखमासज्याक्षिणी अक्ष्णोर्ललाटेन ललाटमाहन्यासा ललाटिका' या आलिंगनप्रकारामुळें हा चमत्कार झाला. एकीच्या पाया पडण्यापूर्वी दुसरीनें अर्पण केलेलीं प्रेमचिन्हें पुसून न टाकल्याचा परिणाम! तिलकाची हालचाल हातांच्या मध्यस्थी-शिवाय झालेली असूनही मुळांतला हातोहात हा प्रयोग ध्यानांत घेण्याजोगा आहे. पर्याय अलंकार.

१८० जांभळाचें पान माझ्या कानावरी : 180. Symbol.

सामाइ सामलिज्जइ[1] अद्धच्छिपलोइरीअ मुहसोहा।
जम्बूदलकअकण्णावअंसभरिए[2] हलिअपुत्ते ॥८०॥

१. सामलीए. २. भमिरे.

[श्यामायाः श्यामलायतेऽर्धाक्षिप्रलोकनशीलाया मुखशोभा।
जम्बूदलकृतकर्णावतंसभ्रमणशीले हलिकपुत्रे ॥]

जांभळाची डिकशी कानावर धारण करून शेतकऱ्याचा पोरगा भटकूं लागला. श्यामलेनें हें दृश्य अर्ध्या मिटलेल्या डोळ्यांनीं पाहिलें, तेव्हां तिच्या मुखावरील शोभा काळवंडली.

● श्यामलेनें त्याला जांभळाची डिकशी दिली, जांभळीजवळ भेटेन अशी सूचना देण्यासाठीं. बिचाऱ्याला संकेत समजला नाहीं. तिच्या हातून डिकशी मिळाली एवढ्यावरच खूष होऊन ती कानावर ठेवून तो गांवभर भटकूं लागला. बिचारीचा केवढा विरस झाला! आपला अनुराग कोणाला समजूं नये म्हणून ती डोळाही वर करीत नव्हती, पण आता तिला मान खालीं घालावी लागली. शिवाय त्या अडाण्याच्या बडबडीमुळें शोभा झाली असेल ती वेगळीच! रुद्रटाच्या काव्यालंकारात समानार्थी उल्लेख आहे : 'ग्रामतरुणं तरुण्या नववञ्जुलमञ्जरीसनाथकरम्। पश्यन्त्या भवति मुहुर्नितरां मलिना मुखच्छाया ॥ ३ ॥ ७९ ॥ अलंकाररत्नाकरात गूढ अलंकाराचें उदाहरण : 'गूढसाकाक्षोपनिबद्धं गूढम।' व सरस्वतीकण्ठाभरणात सूक्ष्म (प्रतीयमान) अलंकाराचें.

१८१ खाज : 181. Diplomacy.

दूइ ! तुमं विअ कुसला, कक्खडमउआइँ जाणसे बोल्लुम्।
कण्डूइअपण्डुरँ जह ण होई, तह तं करेज्जासु ॥८१॥

[दूति त्वमेव कुशला कर्कशमृदुकानि जानासि वक्तुम्।
कण्डूयितपाण्डुरं यथा न भवति तथा तं करिष्यसि ॥]

---

१. श्यामायते श्यामलायाः

दूती, तूं कुशल आहेस; कठोर केव्हां बोलावयाचें व मृदु केव्हां, तें तूं जाणतेस. खाज सुटली म्हणजे खाजवलें तर पाहिजेच, पण (अशा हलक्या हातानें कीं) व्रण होतां कामा नये. जरूर ती खबरदारी घेऊन योग्य तें कर.

● आणि आमचा समेट घडवून आण.

१८२ कृश : 182. Emaciation.

महिलासहस्सभरिए तुह हिअए सुहअ सा अमाअन्ती[1] ।
दिअहं[2] अणण्णकम्मा अङ्गं तणुअं पि तणुएइ ॥८२॥

[**महिलासहस्रभृते[3] तव हृदये सुभग सा अमान्ती[4] ।**
दिवसमनन्यकर्मा अङ्गं तनुकमपि तनूकरोति ॥]

सुभग, तुझ्या हृदयांत सहस्र स्त्रियांना स्थान आहे; त्यांत मावतां यावें म्हणून ती मूळची कृश आहे तरी स्वतःला आणखी कृश करून घेण्यांतच दिवसभर गढलेली असते.

● श्रीजयदेवाच्या चंद्रालोकावरील श्रीगागाभट्टांच्या राकागम व्याख्येंतील (चौखम्बा : पृ. १४२) संस्कृत पाठ थोडा वेगळा आहे: ‘ कान्तासहस्र भरिते हृदये सा न मात्यतः । तनूकरोति सुतनुस्तनून्यङ्गान्यपि द्रुतम् ॥ ’ अलंकाररत्नाकरांत उत्प्रेक्षेचें उदाहरण: ‘ विषयित्वेन सम्भावनमुत्प्रेक्षा । ’ व साहित्यदर्पणांत विशेषोक्तीचें.

१८३ गुप्त पाप : 183. Sin.

खणमेत्तं पि ण फिट्टइ[5] अणुदिअहविइण्ण[6]गरुअसंतावा ।
पच्छण्णपावसङ्क व्व सामली मज्झ हिअआओ ॥८३॥

---

१. ठाणमलहन्ती. २. अणुदिणम्. ३. भरिते. ४. स्थानमलभन्ती. ५. चुक्कइ. ६. दिण्ण.

[क्षणमात्रमपि नापयात्यनुदिवसवितीर्णगुरुकसंतापा।
प्रच्छन्नपापशङ्केव श्यामला मम हृदयात् ॥]

श्यामलेची आठवण हृदयांतून क्षणमात्रही नष्ट होत नाहीं. या आठवणींमुळें होणारा त्रास दिवसानुदिवस वाढतच आहे. गुप्तपणें केलेल्या पापाच्या आठवणीप्रमाणें ती माझ्या हृदयांतून जात नाहीं.

● आमचें एकांमेकांवर प्रेम आहे, पण त्याची सांगता कशी व्हावयाची? प्रेमाची वाच्यता झाली तर तिच्या कुलीनत्वाला धक्का बसेल आणि विरोध निर्माण होईल. हें पाप आहे हें समजतें, पण आठवण बुजत नाहीं, इच्छा नष्ट होत नाहीं. मित्रा, मी हें आजवर कोणाला सांगितलें नाहीं, तुला प्रथम सांगत आहें, कारण तूं माझा जिवलग आहेस.

१८४ अनभिज्ञ : 184. Ignorant.

अज्जअ! णाहं कुविआ, अवऊहसु! किं मुहा पसाएसि!।
तुह मणुसमुप्पाअएँण मज्झ माणेण वि ण कज्जम् ॥८४॥

[अज्ञ नाहं कुपिता उपगूह किं मुधा प्रसादयसि।
तव मन्युसमुत्पादकेन मम मानेनापि न कार्यम् ॥]

हे अज्ञ, मी रागाला आलेली नाहीं (व तूं माझा अपराधही केलेला नाहींस). तूं जा बघूं! मला प्रसन्न करण्याचा व्यर्थ प्रयत्न कां करीत आहेस? माझ्या रुसव्यामुळें तुला राग मात्र आला; असा मान मी कशाला धारण करूं?

● मनधरणीच्या अपेक्षेनें केलेलें मानधारण व्यर्थ झालें, कारण त्यामुळें अनुरागाऐवजीं राग निर्माण झाला. तुझ्यासारख्या अनभिज्ञाला त्याची काय चव! 'माने विसंवादन,' सरस्वतीकण्ठाभरण.

---

१. अपयति. २. दत्त. ३. अण्णुअ, उज्जुअ. ४. ऋजुक. ५. अवगूहस्व.

१८५ श्यामशबल : 185. Hot & Cold.

दीहुण्हपउरणीसासपआविओ[१] वाहसलिलपरिसित्तो।
साहेइ सामसवलं व तीऍ अहरो तुह विओए ॥८५॥

[दीर्घोष्णप्रचुरनिःश्वासप्रतप्तो बाष्पसलिलपरिसिक्तः।
साधयति श्यामशबलमिव[२] तस्या अधरस्तव वियोगे ॥]

दीर्घ व उष्ण निःश्वासांनीं तप्त झालेल्या तिच्या अधरांवर अश्रूंचें सिंचन होत आहे. जणूं तुझ्या विरहांत ती श्यामशबल व्रत करीत आहे.

● उन्हाळ्यांत ऊन्ह आणि पावसाळ्यांत पाऊस किंवा हिंवाळ्यांत हींव सोसणें, या व्रताला श्यामशबल किंवा अग्निपानीय व्रत म्हणत. ' यत्र अग्नौ प्रविश्य जले प्रविश्यते तत् ' असेंही एक टीकाकार सांगतो.

१८६ सरोवर : 186. Lake.

सरए महद्दहाणं[३] अन्ते सिसिराइँ[४] वाहिरुह्लाइं।
जाआइँ कुविअसज्जणहिअअसरिच्छाइँ सलिलाइं ॥८६॥

[शरदि महाह्रदानामन्तः शिशिराणि[५] बहिरुष्णानि।
जातानि कुपितसज्जनहृदयसदृक्षाणि सलिलानि ॥]

शरद ऋतूंत मोठ्या सरोवरांचें पाणी रागावलेल्या सज्जनांच्या हृदयाप्रमाणें बाहेरून उष्ण, पण आंतून थंड असतें.

१. सिप्पन्तो. २. अग्निपानीयव्रतमिव. ३. महद्दहाणं. ४. सीआइं, सीयाइं. ५. शीतानि.

● मध्यान्हाभिसारिका सरोवराचे काठीं जाऊन तुझी वाट पाहत बसली आहे अशी सूचना.

१८७ पहिलें साहस : 187. First Venture.

आअस्स किं णु करिहिम्मि?[1] किँ बोलिस्सं ? कहं णु होइहि इमं?[2] ति ।
पढमुग्गअसाहसआरिआइ[3] हिअअं थरहरेइ ॥८७॥
[आगतस्य किं नु करिष्यामि किं वक्ष्यामि कथं नु भविष्यति इदम् इति।
प्रथमोद्गतसाहसकारिकाया हृदयं थरथरायते[4] ॥]

तो आला म्हणजे मी काय करूं ? काय बोलूं ? काय होईल ? अशा विचारांनीं अभिसरणाचें साहस प्रथमच करावयास निघालेल्या स्त्रीचें हृदय थरारतें.

● हे विचार कोणाचे ? नायिकेचे ? आरंभीं सर्वांनाच अशी धास्ती वाटत असते. दूतीचे ? साऱ्याच दूती नायिकांबद्दल नेहमीं असेंच सांगत असतात !

१८८ नूपुर : 188. Anklet.

णेउरकोडिविलग्गं चिउरं[5] दइअस्स पाअपडिअस्स[6] ।
हिअअं पउत्थमाणं उम्मोअन्ती व्विअ कहेइ[7] ॥८८॥
[नूपुरकोटिविलग्नं चिकुरं दयितस्य पादपतितस्य ।
हृदयं प्रोषितमानमुन्मोचयन्त्येव[8][9] कथयति ॥]

१. किं णु काहम् किं वोच्छम्, वोच्छिस्सं. २. इमि ति. ३. साहसयाए घरिणिहियियं. ४. साहसिकाया हृदयं भयेण कम्पते. ५. चिहुरं. ६. पायलग्गस्स. ७. अहिअं माणपउत्थं उम्मोअं त्ति च्चिअ कहेइ. ८. मानमदोत्थमुन्मुक्तमित्येव. ९. उन्मूलयन्त्येव.

प्रियकर प्रियेच्या पायां पडला तेव्हां त्याचे केस तिच्या नूपुरांच्या जाळींत गुंतले. ते सोडवितांना जणुं तिनें त्याला सांगितलें, गेला, माझा रुसवा गेला.

● ती क्रुद्ध होती पण या लीनतेनें प्रसन्न झाली. नूपुरांत अडकलेले केस तिनें हलक्या हातानें सोडविले, तरी त्याला त्रास झाला असेलच. तरीही तो म्हणाला असेल, हा सारा माझाच अडाणीपणा; माझ्या ओढाताणीमुळें नूपुर तुझ्या घोंट्यावर घांसला नसला म्हणजे झालें; तुझ्या हृदयांतून मला असाच काढून टाकूं नको.

१८९ उच्छिष्टग्रहण : 189. Unguent.

तुज्झङ्गराअसेसेण सामली तह खरेण सोमारा[1]।
सा किर गोलाऊले ह्राआ जम्बूकसाएण ॥८९॥
[तवाङ्गरागशेषेण श्यामला[2] तथा खरेण सुकुमारा ।
सा किल गोदाकूले स्नाता जम्बूकषायेण ॥]

श्यामला सुकुमार आहे, तरी तुझ्या अंगाला लावून राहिलेलें जांभळाच्या रसाचें कडक उटणें आपल्या अंगाला लावून ती गोदातीरावर स्नान करीत आहे.

● तें कडक उटणें तिनें प्रत्यक्ष अंगाला लावलें कीं प्रवाहाच्या धारेंत खालच्या बाजूला न्हाऊन तिनें उटणें लावण्याचें अप्रत्यक्ष श्रेय मिळविलें ? उच्छिष्टग्रहणांतही अङ्गसंगाभिलाषाचीच भावना असते.

१९० ओसाड : 190. Deserted.

अज्जं व्वेअ पउत्थो, अज्ज व्विअ सुण्णआइँ जाआइं ।
रत्थामुहदेउलचत्तराइँ[3] अह्मं च हिअआइं ॥९०॥

१. सोमाला. २. श्यामली. ३. रच्छामुहं देवऊलं चत्तराइ अम्हं च गिहआइ सुण्णाइ ।

[अद्यैव प्रोषितोऽद्यैव शून्यकानि जातानि ।
रथ्यामुखदेवकुलचत्वराण्यस्माकं च हृदयानि ॥]

माझे पती आजच प्रवासाला गेले आणि म्हणून गांवांतील चौक, देवळांतील पटांगणें व आमचीं हृदयें आजच ओसाड झालीं.

● त्यांच्या विरहामुळें जीवनांतलें स्वारस्य नष्ट झालें. माझें एकटीचेंच नव्हे, आम्हां सर्वांचीं हृदयें शून्य झालीं. अलंकारकौस्तुभांत समुच्चय अलंकाराचें उदाहरण.

१९१ गौरव : 191. Elevation.

चिरिंडिं[1] पि अआणन्तो लोआ लोएहिँ गोरवब्भहिआ ।
सोणारतुले[2] व्व णिरक्खरा वि खन्धेहिँ उब्भन्ति ॥९१॥

[वर्णावलीमप्यजानन्तो[3] लोका लोकैर्गौरवाभ्यधिकाः[4] ।
सुवर्णकारतुला इव निरक्षरा[5] अपि स्कन्धैरुह्यन्ते ॥]

सोनाराच्या तागडीप्रमाणें निरक्षर असलेले लोकसुद्धां गौरवास पात्र मानले जाऊन खांद्यावर घेतले जातात.

● या गाथेचा समाधानकारक खुलासा होत नाहीं. व्यक्तीच्या बाबतींत निरक्षर म्हणजे ज्याला अक्षराचा संस्कार झालेला नाहीं असा; तुलापक्षीं 'अक्षरेखारहित' (गंगाधर), 'अंकरेखारहित' (कुलबालदेव). या अर्थावरून कर्नाटक कॉलेजांतील संस्कृतचे प्राध्यापक श्री. रा. ना. वळे, एम्. ए., पीएच्. डी. यांनीं मला पत्रद्वारें (ता. ४-१०-४९)

१. चिरिर्डि, विणइं, विरिर्डि. २. सुण्णार. ३. विनतिमप्याजनन्तो (विनतिं सिद्धिपादिकां सिद्धिरस्तु इत्यादिकाम् इति कुलबालदेव), सिद्धिरस्तु इत्यादि वर्णावली, वर्णमप्यजानन्तो. ४. गौरवाभ्यर्हिताः, गौरवगृहीताः, गौरवेणार्चिताः ५. अङ्करेखारहिता.

कळविलें तें असें : "निरक्षर शब्दावरची कोटी वाङ्मयांत बारंबार येते. सोनाराचा ताजवा 'बोलका' नव्हता. आज वजन किती झालें हें रेषांनीं व आंकड्यांनीं दर्शविणारे लहान मोठे बोलके कांटे अनेक आहेत. तथापि आपल्याकडील सोनाराचा नाजूक कांटा अजून तसाच आहे. स्वतंत्रपणें वजन किती झालें हें तो कांहींच सांगूं शकत नाहीं. सोनें तोलायचा कांटा म्हणजे त्याचा भाव केवढा, पण अकलेच्या नांवानें पूज्य. त्याला सोनें आणि गुंजा सारख्याच. सोन्यांतील गुणदोष अथवा सोन्याचा कस राहूं द्या, पण निदान आपण किती वजन केलें याचीं अक्षरें तरी दाखवावीं कीं नाहीं ?" हें स्पष्टीकरण पटत नाहीं. कर्पूरमञ्जरींत (सं: डॉ. मनमोहन घोष. कलकत्ता युनिव्हर्सिटी, पृ. ८७) असाच उल्लेख आलेला आहे : 'जदो तुवं णाराओ विअ णिरक्खरो वि रअणतुलाए णिउञ्जीअसि । अहं पुण तुल व्व लद्धक्खरा वि ण सुवण्णतोलणे णिउञ्जिआमि।' संपादकीय टीपेंत (पृ. १५४) ते सांगतात : 'णाराओ वि णिरक्खरो : As unlettered as jeweller's apparatus in which are used small gunjas and no weight pieces marked with letters"; "तुल व्व लद्धक्खरा—" one who has got letters like a big weighing machine which uses big pieces of stone marked with figures indicating weights." डॉ. घोष यांनीं टीपेंत या गाथेचा मुकाबला दिलेला आहे. यावरून दिसतें कीं तुलापक्षी निरक्षर या शब्दाचा संदर्भ तराजूकडे नसून त्यांतील वजनाकडे आहे. पण्डित मथुरानाथशास्त्री सांगतात : (काव्यमाला प्रत: पृ. ९३) 'सुवर्णकारतुला अक्षतोऽधिकमतोलयन्त्यः [निरक्षं रान्तीति निरक्षराः] अपि गौरवाभ्यधिकाः दत्ताधिकगौरवाः स्कन्धैर्नीयन्ते सावधानं नीयन्ते । षोडशमाषकैरक्ष इत्यमरः । वैद्यकमते तु तोलकद्वयमितः ।' सुवर्णकारतुला दोन तोळ्यांपेक्षां किंवा सोळा माशांपेक्षां अधिक तोलूं शकत नाहींत, तरीही जास्त वजन तोलणाऱ्या तागडीपेक्षां त्यांना अधिक गौरव मिळतो. कोणताही अर्थ घेतला तरी 'तागडीप्रमाणें खांद्यावर घेतलें जाणें' या प्रयोगाचा खुलासा होत नाहीं. सोनाराच्या तागडींत जें तोललें जातें तें तागडीपेक्षां मौल्यवान् असतें, तरीही सोनार तागडीच खांद्यावर टाकतो,

पण म्हणून ती कांहीं सोन्यापेक्षां जास्त मौल्यवान् ठरत नाहीं; शिवाय ज्या वेळीं तागडींत वजन नसतें किंवा तोलावयाची वस्तु नसते त्या वेळींच ती खांद्यावर टाकली जाते; त्याचप्रमाणें ज्यांना कांहींही मूल्य नाहीं किंवा वजन नाहीं अशीं निरक्षर माणसें इतरांनीं खांद्यावर घेतलीं म्हणून तीं मोठीं ठरतात असें नाहीं. तरीही प्रश्न राहतोच, सामान्य भंगारवाल्याप्रमाणें सोनार तागडी खांद्यावर कशाला घेईल? म्हणूनच वर म्हटलें आहे कीं या गाथेचा समाधानकारक खुलासा होत नाहीं.

अंगीं एकही गुण नसलेल्या साधारणीची भुजङ्गानें केलेली अवास्तव प्रशंसा असह्य झाल्यामुळें गुणगर्विता गणिकेनें हे उद्गार काढलेले असावेत. किंवा, या चिमुरडीला अद्याप चिरडीसुद्धां नेसतां येत नाहीं, पण केवढा तिचा उदो उदो! किंवा फुशारखोर पतीची वा उपपतीची नायिकेनें केलेली निंदा.

१९२ लाल गाल : 192. Touch Me Not.

आअम्बन्तकवोलं खलिअक्खरजम्पिरिं फुरन्तोट्ठिम्।
मा छिवसु त्ति सरोसं समोसरन्तिं पिअं भरिमो ॥९२॥

[आताम्रा[1]न्तःकपोलां स्खलिताक्षरजल्पनशीलां स्फुरदोष्ठीम्।
मा स्पृशेति सरोषं समपसर्पन्तीं प्रियां स्मरामः ॥]

गाल लालसर झाले आहेत, बोलण्यांत अक्षरें गळत आहेत, ओंठ थरथरत आहेत, अंगाला हात लावूं नका, असें रागानें सांगत आहे, त्या प्रियेची आठवण होते.

● कलहान्तरिता. ती एवढी रागाला कां आली होती? एक टीकाकार सांगतो, ती रजस्वला होती; आणि एवढेंही पुरत नाहीं म्हणूनच कीं काय कोण जाणे, आणखी एक टीकाकार सांगतो, शिवाय ती परस्त्री होती!

१. आताम्रायमाणकपोलां.

१९३ पवित्र पाप : 193. Sacred Sin.

गोलाविसमोआरच्छलेण अप्पा उरम्मि से मुक्को ।
अणुअम्पाणिद्दोसं तेण वि सा ओढमुवऊढा ॥९३॥[1]

[गोदावरी विषमावतारच्छलेनात्मा उरसि तस्य मुक्तः ।
अनुकम्पानिर्दोषं तेनापि सा गाढमुपगूढा ॥]

गोदावरीचें पात्र ओलांडतांना उतार अवघड असल्याच्या निमित्तानें तिनें त्याच्या छातीवर भार टाकला. (केवळ अनुकम्पेमुळें त्यानें तिला हात दिला होता व आतां निवळ नाइलाजामुळें त्यानें) तिला आलिंगन दिलें. खरोखर तो अगदीं निर्दोष आहे.

● विषय पूर्वीचाच (क्र. १०७), प्रणयी युगुलाची आतां थोडी प्रगति झाली आहे, एवढेंच. सर्वच पापें प्रारंभीं सरळ किंवा सबळ सबबीवर आधारलेलीं असतात आणि प्रथम पवित्र भासतात. बोभाटा झाला म्हणजे त्यांतील रहस्य किंवा रम्यता नष्ट होते आणि पापाचा सांगाडा भेडसावूं लागतो. सत्यसृष्टीच्या निकषावर स्वप्नसृष्टीचा कस कसा चमकणार ? सरस्वतीकण्ठाभरणांत अन्योन्य (प्रतीयमान) अलंकाराचें उदाहरण.

१९४ निर्माल्य : 194. Worn Garland.

सा तुइ सहत्थदिण्णं अज्ज वि रे सुहअ गन्धरहिअं पि ।
उव्वसिअणअरघरदेवदे[2] व्व ओमालिअं[3] वहइ ॥९४॥

[सा त्वया स्वहस्तदत्तामद्यापि रे सुभग गन्धरहितामपि ।
उद्वसितनगरगृहदेवतेव अवमालिकां[4] वहति ॥]

---

१. गाढं. २. हर. ३. णोमालिअं, णोमाणिअं. ४. नवमालिकां, निमाल्यिकं.

सुभग, तूं तिला दिलीस ती माळ गंधरहित व शिळी आहे, पण ती तूं धारण केली होतीस व तूं ती तिला आपल्या हातानें उतरून दिलीस म्हणून उध्वस्त नगरांतील गृहदेवतेच्या गळ्यांतील माळेप्रमाणें तिनें ती अद्याप धारण केली आहे.

● अवमालिका म्हणजे कोमेजलेली माळ. उध्वस्त नगरांतील गृहस्थानें परागंदा होण्यापूर्वी गृहदेवतेची पूजा करून तिच्या गळ्यांत माळ घातली, नंतर देवतेवर अवकळा आली व माळ सुकून कोळ झाली; त्याचप्रमाणें तुझ्या प्रेयसीची अवस्था झालेली आहे; तिच्यावर कृपा कर, असा निर्घृण नायकाला दूतीचा संदेश. एक टीकाकार सांगतो, निर्जन देवळांत संकेत ठरविल्याची या गाथेंत सूचना आहे.

१९५ उधार-उसनवार : 195. Lease & Lend.

केलीअ वि रूसेउं ण तीरए तम्मि चुक्कविणअम्मि ।
जाइअएहिँ व माए ! इमेहिँ अवसेहिँ अङ्गेहिं ॥९५॥

[केल्यापि रुषितुं न शक्यते तस्मिश्च्युतविनये ।
याचितकैरिव मातरेभिरवशैरङ्गैः ॥]

आई, त्याला विनय कसा तो माहीतच नाहीं; तरीही त्याच्यावर थट्टेतसुद्धां मला रागावतां येत नाहीं. दुसऱ्याकडून भीक मागून उसनीं आणल्याप्रमाणें माझीं गात्रेंही माझ्या आधीन राहिलेलीं नाहींत.

● आसक्तीमुळें त्याचा विनय नष्ट झाला आहे आणि माझाही त्याचा अनुनय इतका आकर्षक व आग्रही आहे कीं त्यापुढें माझा निग्रह नष्ट होतो, माझीं पराधीन गात्रें त्याच्याच छंदानें क्रिया करतात. त्याच्या अपराधांची आठवणही होत नाहीं; कारण माझें लौल्य किंवा त्याचें कौशल्य.

१९६ उत्फुल्लिका : 196. See-Saw.

उप्फुल्लिआइ[1] खेल्लउ, मा णं वारेहि, होउ परिऊढा[2]।
मा जहणभारगरुई[3] पुरिसाअन्ती किलिम्मिहिइ[4] ॥९६॥

[उत्फुल्लिकया[5] खेलतु मैनां वारयत भवतु परिक्षामा[6] ।
मा जघनभारगुर्वी पुरुषायितं कुर्वती क्लमिष्यति ॥]

ती बसफुगडी खेळत आहे, मोकळेपणानें खेळूं द्या, निवारण करूं नका, म्हणजे तिचें शरीर आटोपशीर होईल आणि पुढें तिचे जघन विशाल व जड झाले तरी ती पुरुषायिताचे वेळीं दमणार नाहीं.

● फुगडी खेळणाऱ्या मुलींना उत्तेजन देण्याच्या निमित्तानें आपण स्वतः कृशमध्या, जितश्वासा व विपरीतकुशला असल्याची नायिकेची सूचना. 'उत्फुल्लिकया खेलतु' हा प्रयोग 'पत्यांनीं खेळूं या,' 'झोक्यांना खेळूं या' असा कोल्हापुरी थाटाचा भासतो.

१९७ जुनें मद्य : 197. Old Wine.

पउरजुवाणो गामो, महुमासो, जोअणं, पई ठेरो[7]।
जुण्णसुरा साहीणा, असई मा होउ, किं मरउ ? ॥९७॥

[प्रचुरयुवा ग्रामो मधुमासो यौवनं पतिः स्थविरः ।
जीर्णसुरा स्वाधीना असती मां भवतु किं म्रियताम्[8] ॥]

---

१. उप्पुल्लिआ, उफलिआ, उफल्लिआ, दफुल्लिआ, उफुल्लिआ, पप्फुल्लिआइ, मन्दुल्लिआइ. २. परिखामा. ३. भाग. ४. किलम्मइइ, किलिस्सिहइ. ५. उत्फालिका. ६. परिगूढा, परितुष्टा. ७. थेरो. ८. असतीमाभम् भवतु.

ती तरुण व स्वतंत्र आहे. तिचा पति वृद्ध व तिच्या आधीन आहे; गांवांत पुष्कळ उनाड तरुण आहेत, वसंत ऋतु आला आहे आणि तिच्या संग्रहीं जुनें मद्य आहे अशा स्थितींत तिनें स्वैरिणी होऊं नये तर काय मरावें ?

● येथें स्थविर याचा अर्थ वृद्ध (थेरडा) असा घ्यावयाचा कीं बुद्धभिक्षु ? ज्याच्या वेदना त्याला ठाऊक. अशा परिस्थितींत प्रतिकारशक्ति नष्ट झाल्यामुळें शीलखण्डन झालें तर तो अपराध होणार नाहीं. हें प्रोत्साहन कीं समर्थन ? कीं सांत्वन ? एकूण जुन्या मद्याची लज्जत कांहीं नवी नाहीं ! अलंकारकौस्तुभांत तुल्ययोगिता व सरस्वतीकण्ठाभरणांत आक्षेप (रोध) या अलंकारांचें उदाहरण : ' विधिनाथ निषेधेन प्रतिषेधोक्तिरत्र या । शुद्धा मिश्रा च साक्षेपो रोधो नाक्षेपतः पृथक् ।। ' ' क्रियासूत्तिष्ठमानस्य वारणं कारणेन यत् । उक्त्या युक्त्या च रोधो य आक्षेपः सोऽज्यमुच्यते ।। प्रतिकूलोऽनुकूलश्च विधौ रोधोऽभिधीयते । निषधेऽप्युक्तियुक्तिभ्यां द्विप्रकारः स कथ्यते ।। '

१९८ ढोंग : 198. Pretext.

बहुसो वि कहिज्जन्तं तुह वअणं मज्झ हत्थसंदिट्ठम् ।
ण सुअं त्ति जम्पमाणा पुणरुत्तसअं कुणइ अज्जा[1] ॥९८॥

[बहुशोऽपि कथ्यमानं तव वचनं मम हस्तसंदिष्टम् ।
न श्रुतमिति जल्पन्ती पुनरुक्तशतं करोत्यार्या[2] ॥]

माझ्या हातून तुम्हीं पाठविलेला निरोप मी तिला किती वेळां तरी सांगितला म्हणून सांगूं ? पण नीट ऐकूं आला नाहीं, असें म्हणून आर्येनें तो शंभर वेळां तरी सांगावयाला लावला.

---

१. अज्ज. २. ईश्वरसुता.

● पत्र दिलें होतें असा उल्लेख नाहीं व सूचनाही नाहीं, तरी निरोप 'हातून' पाठविलेला आहे, हा प्रयोग विशेष लक्षांत घेण्याजोगा आहे; पूर्वी आलेल्या 'तिलकाची हातोहात हालचाल' या प्रयोगाप्रमाणेंच. नायकावरील प्रेमामुळें नायिकेला निरोप पुनःपुनः ऐकावासा वाटला. अलंकाररत्नाकरांत विनोदाचें उदाहरण : 'अन्यासङ्गात्कौतुकविनोदो विनोदः।'

१९९ संवरण : 199. Hide & Seek.

पांअडिअणेहसब्भावणिब्भरं तीअ जह तुमं दिट्ठो ।
संवरणवावडाए अण्णो वि जणो तह ब्वेअ ॥९९॥

[प्रकटितस्नेहसद्भावनिर्भरं तया यथा त्वं दृष्टः ।
संवरणव्यापृतया अन्योऽपि जनस्तथैव ॥]

तिनें तुझ्याकडे प्रेमपूर्ण दृष्टीनें पाहिलें; तशाच स्निग्ध दृष्टीनें ती इतरांकडेहि पाहते; मात्र हें तुझ्यावरील आपल्या प्रेमाचा बोभाटा होऊं नये म्हणून.

● ती तुझ्यावर खरोखरच अनुरक्त आहे. सर्वांकडे ती स्निग्ध दृष्टीनें पाहत असल्यामुळें इतरेजनांची समजूत झाली कीं ती अल्लड आहे, अदूर-दृष्टि आहे; पण खरी दूरदृष्टि तिचीच. सरस्वतीकण्ठाभरणांत तद्गुण अलंकाराचें उदाहरणः 'वस्त्वन्तरतिरस्कारो वस्तुना मीलितं स्मृतम् विहिता पिहिते चैव तद्गुणातद्गुणौ च तत् ॥'

२०० दंतव्रण : 200. Teeth Marks.

गेण्हह ! पलोअह इमं ! पहसिअवअणा पइस्स अप्पेइ ।
जाआ सुअपढमुब्भिण्णदन्तजुअलङ्किअं बोरम् ॥२००॥

१. पअडिअसणेहसंभावविब्भमंन्तिअ. २. प्रकटितस्नेह सद्भावविभ्रमतया. ३. निर्भरतया. ४. जनः कथं तथैव. ५. गिण्हइ, गेण्ह, हंद, हंदि. ६. वियसियवयना - णयणा. ७. घरिणी.

[गृण्हीत प्रलोकयतेदं प्रहसितवदना पत्युरर्पयति ।
जाया सुतप्रथमोद्भिन्नदन्तयुगलाङ्कितं बदरम् ॥]

मुलाला पहिले दांत आले. त्यांचे वण उमटलेलें बोर पतीला दाखवून हंसतमुखानें पत्नी म्हणाली– घ्या, हें बघा.

● कांहीं प्रतींत 'बदरम्' ऐवजीं 'वदनम्' असा पाठ आढळतो. मुलाच्या दांतांचे वण पत्नीच्या गालांवर उमटले होते, ते तिनें पतीला दाखविले आणि जणूं त्याच्याकडून त्यांची अपेक्षा केली. कीं मुलगा बापाच्या वळणावर आहे हें सुचविलें ! गंगाधर सांगतो, त्या बोरावरील व्रण तिच्याच दांतांचे असावेत व ते तिनें अगोदरच करून ठेवलेले असावेत. नाहींतर ती हंसती कशाला ! धर्माचारानुसार प्रसूतीनंतर कांहीं कालपर्यंत संभोग वर्ज्य असतो. अत्रिस्मृतींत (Dharma Sastra or the Hindu Law Codes, Text. Vol. I : P. 195) सांगितलें आहे: 'षण्मासान्कामयेन्मर्त्यो गर्भिणीमेव च स्त्रियम् । आदन्तजननादूर्ध्वमेवं धर्मो विधीयते ॥': सातव्या महिन्यापासून मुलाला दांत येईपर्यंत संभोग करूं नये. म्हणून पत्नी हंसून विचारते, आतां मुलाला दांत सुद्धां आले, आणखी किती थांबायचें ? अपत्यस्नेहाचा अतिरेक मातापित्याच्या स्नेहांतही व्यत्यय आणूं शकतो ! सरस्वतीकण्ठाभरणांत (सोद्भेद) भाव अलंकाराचें उदाहरण: 'अभिप्रायानुकूल्येन प्रवृत्तिर्भाव उच्यते । सोद्भेदोऽथ निरुद्भेदश्चैकतश्चाभितश्च सः ॥ ऽ

● ● ●

रसिअजणहिअअदइए कइवच्छलपमुहसुकइणिम्मइए ।
सत्तसअम्मि समत्तं बीअं गाहासअं एअम् ॥

● ● ●

१. विकसित नयना-विहसित. २. वदनम्.

तृतीयं शतकम् ।

२०१ निंदेसही अपात्र : 201. Beyond Censure.

अच्छउ ता जणवाओ, हिअअं विअ अत्तणो[1] तुह पमाणम् ।
तह तं सि मन्दणेहो जह ण उवालम्भजोग्गो सि ॥१॥

[अस्तु तावज्जनवादो हृदयमेवात्मनस्तव प्रमाणम् ।
तथा त्वमसि मन्दस्नेहो यथा नोपालम्भयोग्योऽसि ॥]

लोकप्रवाद कांहींही असो; तुमचें अंतःकरण हेंच खऱ्याखोट्याचें प्रमाण. मजवरील तुमची प्रीति इतकी मंद झालेली आहे कीं आतां निंदा करण्याइतकीही तुमची लायकी नाहीं.

● 'लोक काय वाटेल तें बोलतात, त्यांच्या तोंडाला कोण हात लावणार ?' 'कबूल, तुम्ही तरी छातीला हात लावून सांगाल का, कीं हा बोभाटा सर्वस्वीं खोटा आहे ?' निंदा कोणाची करावयाची ? ज्याचें अंतःकरण स्निग्ध असेल त्याची, कारण त्याचे अंगीं दाक्षिण्य असतें व म्हणून त्याचें परिवर्तन शक्य असतें. पण तुम्ही तर पूर्ण उदासीन आहांत; तुमच्यावर अशा मृदु अस्त्राचा काय परिणाम होणार ? हीसुद्धां निंदाच आहे, पण ती स्निग्ध आहे. आक्षेप अलंकार.

२०२ स्वच्छन्दी : 202. Self-Willed.

अप्पच्छन्दपहाविर ! दुल्लहलम्भं जणं वि मग्गन्त ! ।
आआसपहेहिँ भमन्त हिअअ ! कइआ वि भज्जिहिसि ॥२॥

---

१. अप्पणो.

[आत्मच्छन्दप्रधावनशील[1] दुर्लभलम्भं जनमपि मृगयमाण ।
आकाशपथैर्भ्रमद्धृदय[2] कदापि भङ्क्ष्यसे[3] ॥]

हृदया, तूं स्वच्छंदानें धांवत आहेस, जें अप्राप्य त्याची हांव धरीत आहेस, आभाळांत भराऱ्या मारीत आहेस; केव्हां ना केव्हां तरी तूं भग्न होशील.

● आभाळांतली भरारी सारखी निराधार, कारण मनोरथांच्या सिद्धीला दूतीचाही आधार नाहीं. तुझें स्वच्छंदी भ्रमण कोण स्थगित करूं शकेल!

२०३ गणिका : 203. Courtesan.

अहव गुणाव्विअ लहुआ, अहवा गुणअणुओ[4] ण सो लोओ ।
अहव ह्मि णिग्गुणा वा, बहुगुणवन्तो[5] जणो तस्स ॥३॥

[अथवा गुणा एव लघवोऽथवा गुणज्ञो न स लोकः ।
अथवास्मि निर्गुणा वा बहुगुणवाञ्जनस्तस्य ॥]

जगांत गुणांना किंमत राहिलेली नाहीं; किंवा त्याला गुणांची पारख नाहीं; किंवा मीच निर्गुणा आहे; किंवा त्याची प्रिया गुणी आहे.

● गुणगर्विता गणिकेचे उद्गार. गणिका म्हणजे साधारणी वेश्या नव्हे. गणिकांच्या अंगच्या अगणित गुणांचा संस्कृत साहित्याला परिचय आहे. अशा अनमोल गुणांची किंमत कशी करतां येईल ? रसिक बिदागी देतात, ती त्यांच्या रसिकतेची किंमत, किंवा दानमर्यादा. या गाथेचा नायक अरसिक

१. आत्मच्छन्दप्रभविष्णुं दुर्लभलभ्यं जनं विमार्गमाण. २. आयासवशैः ३. आत्मच्छन्दप्रभावशीले दुर्लभमलभ्यं जनमपि मार्गमाण । अशपथैर्हृदयक्रियापि भग्ना भवति ॥ ४. गुणअण्णुओ, गुणअएलओ. ५. बहुगुणो क्खु अण्णो जणो तस्स. ६. बहुगुणवन्तोजनास्तस्य.

नाहीं, कारण त्याला स्वजनांच्या गुणांची पारख आहे. गणिकेनें गुण उधळले असतील, म्हणूनच तो आतां तिला टाळीत असावा; किंवा चारुदत्ताप्रमाणें दारिद्र्यामुळें.

२०४ आरसा : 204. Mirror.

फुट्टन्तेण व्वि हिअएण मामि ! कह णिव्वरिज्जए तम्मि ।
आदंसे[1] पडिबिम्बं व्वि जम्मि[2] दुःखं ण संकमइ ॥४॥

[स्फुटितापि[3] हृदयेन मातुलानि कथं निवेद्यते तस्मिन्[4] ।
आदर्शे[5] प्रतिबिम्बमिव यस्मिन्दुःखं न संक्रामति ॥]

मामी, माझें हृदय दुःखानें फुटत आहे; पण हें मी त्याला कशाला सांगूं ? आरशांतल्या प्रतिबिम्बाप्रमाणें माझें दुःख त्याला दिसलें तरी तें कांहीं त्याच्या अंतर्यामांत प्रविष्ट होणार नाहीं.

● त्याचें हृदय आरशासारखें आहे; स्वच्छ, गुळगुळीत व चकचकीत; पण अस्निग्ध; त्याला माझ्याबद्दल आसक्तीच नाहीं, कीं तो अन्यासक्त आहे ! मी मात्र त्याच्यावर अनुरक्त आहे. माझें प्रेम कसें यशस्वी होईल !

२०५ काकबलि : 205. Hesitation.

पासासङ्की काओ णेच्छदि[6] दिण्णं पि पहिअघरणीए ।
ओअन्त[7]करअलोगलिअवलअमज्झट्ठिअं पिण्डम् ॥५॥

[पाशाशङ्की काको नेच्छति[8] दत्तमपि पथिकगृहिण्या ।
अवनत[9]करतलावगलितवलयमध्यस्थितं पिण्डम् ॥]

१. अद्दाए. २. जम्मि. ३. स्फुटितेनापि हृदयेन कथं भगिनी निर्वृत्तीभूयते तस्मिन् । ४. स्फुटं तेनापि हृदये मातुलि कथं निवारिते तस्मिन् । ५. अवदाते. ६. ण छिवई, णेच्छवइ. ७. ओणन्त, ओवन्त. ८. न स्पृशति दत्तमपि बलिं. ९. उन्नत.

पति प्रवासाला गेल्यामुळें कृश झालेली गृहिणी काकबली ठेवण्या-करतां खालीं वांकली, तेव्हां तिच्या हातांतली बांगडी गळून पिंडाभोंवतीं पडली. हा फांस असावा अशा शंकेनें कावळ्यानें त्याला स्पर्श केला नाहीं.

● पुष्कळ खटपट करून नायिकेचें मन वळविलें, निमित्त साधून तिला घराबाहेर काढली आणि आतां नसत्या शंका घेऊन तूं टाळाटाळ करीत आहेस. नायकाला दूतीचें आश्वासन व प्रोत्साहन.

२०६ भिंतीवरील रेघा : 206. Calendar.

ओहिदिअहागमासंकिरीहिँ सहिआहिँ कुड्डलिहिआओ ।
दोतिण्णि तहिं विअ चोरिआएँ रेहा पुसिज्जन्ति ॥६॥

[**अवधिदिवसागमाशङ्किनीभिः सखीभिः कुड्यलिखिताः ।**
द्वित्रास्तत्रैव चोरिकया रेखाः प्रोञ्छ्यन्ते ॥]

प्रवासाला गेलेल्या पतीच्या आगमनाची मुदत टळली असावी अशा शंकेनें मैत्रिणींनीं कुडावरील रेघा वाढविल्या; पण पत्नीनें त्यांपैकीं दोन तीन चोरून पुसून टाकल्या.

● वायद्याप्रमाणें पति परत आला नाहीं तर तिची अवस्था कठिण होईल अशी सख्यांना धास्ती वाटली म्हणून त्यांनीं रेघा वाढविल्या. प्रवासासाठीं ठरलेल्या दिवसांइतक्या रेघा भिंतीवर काढावयाच्या आणि दिवस उलटला कीं त्यांपैकीं एक रेघ पुसावयाची असा रिवाज असे. मैत्रिणींनीं रेघा वाढविल्या हें पत्नीच्या लक्षांत आलें. त्यामुळेंच त्याचें आगमन लांबणीवर पडेल या भीतीनें किंवा अधीरतेमुळें गृहिणीनें त्यांपैकीं कांहीं पुसल्या.

१. तीएँ लिहिरीए. २. भित्ति. ३. संकीर्तिनीभिः सखीभिस्तस्यालिखन्त्याः । द्वित्रास्तस्मिन् चोरिकया रेखाः प्रक्षिप्यन्ते ॥

२०७ विधिघटना : 207. Creation.

तुह मुहसारिच्छं ण लहइ त्ति संपुण्णमण्डलो विहिणा ।
अण्णमअं व्व घडेइउं पुणो वि खण्डिज्जइ मिअङ्को ॥७॥

[तव मुखसादृश्यं न लभत इति संपूर्णमण्डलो विधिना ।
अन्यमयमिव घटयितुं पुनरपि खण्ड्यते मृगाङ्कः ॥

पौर्णिमेच्या पूर्ण चंद्रालाही तुझ्या मुखाचें सादृश्य व सौंदर्य लाभत नाहीं हें पाहून जणूं दुसऱ्या कोणत्या तरी द्रव्यापासून चंद्र पुन्हा घडवावा म्हणून ब्रह्मा जणूं चंद्राचे कलाकलांनीं तुकडे करीत आहे.

● तुलनेसाठीं पाहा : "In moon, that waxing waning shines, as spots appear, Are any spots discerned in face of maiden here?" (The Sacred Kurral of Tiruvalluva Nayanar : Rev. G. U. Pope : p. 154.) वैशिष्ट्यांचीं नवीं मिश्रणें करून ब्रह्मा सौंदर्याचे नवेनवे नमुने निर्माण करीत असतो. तुझें सौंदर्य पाहून तो स्वतःच चकित झाला. जणूं त्याला चिरंतन स्वरूप देण्यासाठीं तो या नमुन्यावर चंद्राची घटना-विघटना करीत आहे. खुशामतीची परिसीमा. प्रतीप अलंकार : ' उपमानानर्थक्यं प्रतीपमस्योपमेयत्वम् । ' अलंकारकौस्तुभ.

२०८ गणित : 208. Calculation.

अज्जं गओत्ति, अज्जं गओत्ति, अज्जं गओत्ति, गणरीए ।
पढम व्विअ दिअहद्धे कुड्डो रेहाहिँ चित्तलिओ ॥८॥

[अद्य गत इत्यद्य गत इत्यद्य गत इति गणनशीलया ।
प्रथम एव दिवसार्धे कुड्यं रेखाभिश्चित्रितम् ॥]

१. तुज्झ. २. अण्णवमज्जं. ३. घडेउं. ४. पुनः पुनः

आज पति प्रवासाला जाणार असें पत्नीला कळलें. ते आज जाणार, आज ते गेले, ते आजच गेले, असें म्हणत ती भिंतीवर रेघा काढूं लागली आणि पहिल्या दिवसाच्या प्रथमार्धातच तिनें सारी भिंत रेघांनीं चित्रित केली !

● तरी बिचारीची गणना पुरी झाली नाहीं. प्रवासाला निघालेल्या पतीला पत्नीची विरहविकलावस्था दाखवून त्याला प्रवासापासून परावृत्त करण्याचा दूतीचा प्रयत्न.

२०९ सलज्जा : 209. Bashful.

ण वि तह पढमसमागमसुरअसुहे पाविएवि परिओसो ।
जह[1] बीअदिअहसविलक्खलक्खिए वअणकमलम्मि ।।९।।

[नापि तथा प्रथमसमागमसुरतसुखे[2] प्राप्तेऽपि परितोषः ।
यथा द्वितीय[3]दिवससविलक्षलक्षिते वदनकमले ।।]

(रात्रीच्या आठवणीमुळें) सलज्ज झालेलें तिचें मुखकमल दुसरे दिवशीं पाहतांना होतो तेवढा आनंद कांहीं प्रत्यक्ष प्रथम समागमांत होत नाहीं.

● गंगाधर सांगतो, तिनें प्रथम त्याला झिडकारलें होतें; पुष्कळ प्रार्थनां-नंतर तिनें संमति दिली. समागमामुळें ती संतुष्ट झाली. इतकी, कीं संमतीला विलंब लावला याबद्दल विमनस्क झाली. तिच्या मुद्रेवरील भाव पाहून नायकाला स्वतःच्या गुणांबद्दल धन्यता वाटली. प्रथम समागमांत आनंद असतो हें खरें, पण तो दुष्कर असतो, तोही आपण सुकर केला, याबद्दल नायकाला अभिमान वाटला. त्या लाजऱ्या मुद्रेत संतोष व अपेक्षा, पश्चात्ताप व कृतार्थता यांचें मधुर संमिश्रण होतें.

१. जह बीअदिअहरम्भे चुम्बणवलिए वअणकमलम्मि । २. सुखेनापि भवति परितोष : ३. द्वितीयस्तारम्भे चुम्बनवलिते.

२१० मदनशर : 210. Arrows of Love.

जे सँमुहागअवोलन्तवलिअपिअपेसिअच्छिविच्छोहा ।
अम्हं ते मअणसरा, जणस्स जे होन्ति ते होन्तु ॥१०॥
[ये संमुखागतव्यतिक्रान्तवलितप्रियप्रेषिताक्षिविक्षोभाः ।
अस्माकं ते मदनशरा जनस्य ये भवन्ति ते भवन्तु ॥]

(अनुनयासाठीं) प्रियकर सन्मुख आला. (मी त्याला उत्तेजन दिलें नाहीं म्हणून) तो विन्मुख होऊन (जाऊं लागला.) जातां जातां त्यानें उत्कण्ठेनें वळून पाहिलें. यामुळें माझें अंतःकरण क्षुब्ध झालें. त्याचे दृष्टिक्षेप मला मदनाच्या बाणांसारखे भासले; इतरांना काय वाटत असेल तें असो.

● मदनाचे बाण खरोखरच फुलांचे असतात का ग ? या सखीच्या प्रश्नाला उत्तर.

२११ कडदोरा : 211. Through Fire & Water.

इअरो जणो ण पावइ तुह जहणारुहणसंगमसुहेल्लिम् ।
अणुहवइ कणअडोरो हुअवहवरुणाणँ माहप्पम् ॥११॥
[इतरो जनो न प्राप्नोति तव जघनारोहणसंगमसुखकेलिम् ।
अनुभवति कनकदोरो हुतवहवरुणयोर्माहात्म्यम् ॥].

तुझ्या जघनांवर आरोहण करण्याचें किंवा त्यांना मिठी घालून डोलण्याचें सुख इतरेजनांना मिळत नाहीं व तें तुझ्या सोन्याच्या कडदोऱ्याला मिळतें. हें अग्नि व वरुण यांच्या कृपेचें माहात्म्य.

१. पमुहागअ. २. ये प्रमुखागतव्युत्क्रामद्वलितप्रियेप्रक्षिताक्षि. ३. कनकसूत्र हुतवहवर्णज्ञानमाहात्म्यम् .

● कनकडोर म्हणजे कमरपट्टा नव्हे, कडदोरा. चपटा कमरपट्टा कमरे-भोंवतीं गच्च बसतो आणि भरदार कडदोरा सैल असून नितंबांवर व जघनांवर ओघळतो आणि तो कडोसरींत गुरफटलेला किंवा कांसोट्यांत गुंतविलेला असल्यामुळें शरीराच्या हालचालींशीं ताल धरतो. प्राचीन शिल्पांत कडदोऱ्यांचे अनेक नमुने आढळतात; आणि आतां, क्वचित्, ग्रामीण जीवनांत. सोनार प्रथम सोनें तापवितो आणि तप्त सुवर्णावर कौशल्याचे संस्कार केल्यानंतर पाण्यांत बुडवतो. यामुळें अलंकारांना आपोआप अग्निपानीय व्रताचें श्रेय व फळ मिळतें. व्रतखंडांत असें कांहीं फळ सांगितलेलें असतें तर तें कितीतरींनीं स्वीकारलें असतें !

२१२ आश्चर्य : 212. Wonder.

जो जस्स विहवसारो[1] तं सो देइ त्ति किं त्थ अच्छेरम् ।
अणहोन्तं पि खु दिण्णं दोहग्गं तइ सवत्तीणम् ॥१२॥

[यो यस्य[2] विभवसारस्तं स ददातीति किमत्राश्चर्यम् ।
अभवदपि[3] खलु दत्तं दौर्भाग्यं त्वया सपत्नीनाम् ॥]

आपल्या वैभवाचें सार असें जें धन तें मनुष्य दुसऱ्यांना देतो, यांत आश्चर्य कसलें ? तुझ्यापाशीं नसलेलें दौर्भाग्य तूं आपल्या सवतींना देतेस, हें खरें आश्चर्य.

● विरोधालंकारः " अविरोधेऽपि विरोधो यत्रोक्तः स्याद्विरोधः सः । स्याज्जातेर्गुणकर्मद्रव्याणां स्वस्वपरयोगात् ॥ " अलंकारकौस्तुभ. अलंकार-रत्नाकरांत विशेषोक्तीचें उदाहरणः ' हेतुसाकल्ये फलानुत्पत्तिर्विशेषोक्तिः ।'

१. होइ सारं. २. यद्यस्य विभवसारं तत्स. ३. अविद्यमानपि.

२१३ निरुपम : 213. Unique.

चन्दसरिसं मुहं से सरिसो अमअस्स मुहरसो तिस्सा ।
सकअग्गहरहसुज्जलचुम्बणअं कस्स सरिसं से ॥१३॥

[चन्द्रसदृशं मुखं तस्याः सदृशोऽमृतस्य मुखरसस्तस्याः ।
सकचग्रहरभसोज्ज्वलचुम्बनकं कस्य सदृशं तस्याः ॥]

तिचें मुख चंद्रासारखें व अधररस अमृतासारखा आहे. तिचें केस धरून बलात्कारानें, घाईनें व आवेशानें तिचें चुंबन घेतलें, त्याला उपमा कशाची ?

● निरुपम म्हणून अद्वितीय कीं तोंवर अननुभवित म्हणून ? 'उज्ज्वलं मनोज्ञं,' सरस्वतीकण्ठाभरण. अलंकारकौस्तुभांत उपमानलुप्तोपमेचें उदाहरण: 'वाक्यसमासोभयगोपमानलुप्ता...अत्र सकचग्रहरभसहठचुम्बनं कस्य सदृशमिति उपमानस्याप्रयोगः।' अलंकाररत्नाकरांत सङ्कराचें उदाहरण: 'अङ्गत्वे तु सङ्करः'

२१४ विचक्षणा : 214. Caution.

उप्पण्णत्थे कज्जे अइचिन्तन्तो गुणागुणे तम्मि ।
चिरआलमन्दपेच्छित्तणेण पुरिसो हणइ कज्जम् ॥१४॥

[उत्पन्नार्थे कार्येऽतिचिन्तयन्गुणागुणौ तस्मिन् ।
चिरकालमन्दप्रेक्षित्वेन पुरुषो हन्ति कार्यम् ॥]

१. अमअसरिच्छो अ मुहरसो. २. रहसुव्वेल, रहसाअल. ३. रभसोद्वेल, रभसहठ, सकचग्रहणभासोज्ज्वल. ४. अइ सुन्दर सुण्हपेच्छित्तणेण. ५. अतिसुन्दर-श्लक्ष्णप्रक्षित्वेने, चिरकालशून्यप्रेक्षित्वेन, चिरकालसूक्ष्म.

यशापयशाच्या संभाव्यतेची व गुणावगुणांची फाजील विचक्षणा करणारा मनुष्य सावकाशपणें विचार करण्यांत काळ दवडतो आणि सिद्ध होत आलेल्या कार्याचा नाश करतो.

● हें शुद्ध सुभाषित आहे; तरीही गंगाधर सांगतो, दीर्घसूत्री नायकाला हें दूतीचें प्रोत्साहन आहे.

२१५ रागानुराग : 215. Motive.

बालअ ! तुमाहि अहिअं णिअअं विअ वल्लहं महं जीअम् ।
तं तइ विणा ण होइ, त्ति तेण कुविअं पसाएमि ॥१५॥

[बालक त्वत्तोऽधिकं[1] निजकमेव[2] वल्लभं मम जीवितम् ।
तत्त्वया विना न भवतीति तेन कुपितं प्रसादयामि ॥]

बालक, तुझ्यापेक्षां मला फक्त माझा जीवच जास्त प्रिय आहे. तुझ्याशिवाय जीव राहत नाहीं, म्हणून राग आवरून तुला प्रसन्न करण्याचा मी प्रयत्न करीत आहे.

● राग व अनुराग, दोघांचाही वर्ण आरक्त, फरक फक्त छटेचा. रागामागें प्रतिपक्षाचा अपराध असतो तर अनुरागामागें अनुनय; त्या मार्गे अहंकार, या मार्गे आसक्ति. मी तुझा अनुनय करीत आहे, म्हणून तुझा अपराध माझ्या निदर्शनास आलाच नव्हता किंवा मी तुझ्यावर अप्रसन्न झालेंच नव्हतें, असा गैरसमज करून घेऊं नको.

२१६ पुरावा : 216. Evidence.

पत्तिअ ! ण पत्तिअन्ती,[3] जइ तुज्झ इमे ण मज्झ रुअईए ।
पुट्ठीअ बाहबिन्दू पुलउब्भेएण भिज्जन्ता ॥१६॥

---

१. त्वत्तोऽप्यधिकं. २. नियतमेव. ३. पत्तअ ण पत्तअन्ती.

[प्रतीहि न प्रतीयन्ती यदि तवेमे न मम रोदनशीलायाः ।
पृष्ठस्य बाष्पबिन्दवः पुलकोद्भेदेन भिद्यमानाः ॥]

जीव तोडून सांगितलें तरी तुला माझा विश्वास वाटत नाहीं. पहा, तुझे अश्रु माझ्या पाठीवर पडत आहेत आणि माझ्या अंगावर उमलणारे रोमाञ्च त्यांचा भेद करीत आहेत.

● प्रथम मनधरणी केली, नंतर पायधरणी; तेव्हां तिचे अश्रु त्याच्या पाठीवर पडूं लागले व त्याचें शरीर रोमांचित झालें. खऱ्या प्रेमाशिवाय पुलकोद्भव होत नाहीं. रोमाञ्च हाच निरपराधित्वाचा पुरावा व प्रेमाचा प्रत्यय. दुर्जनांच्या चुगल्यावर विसंबूं नको, माझ्या वचनांवर विश्वास ठेव, प्रेमाचें प्रमाण पाहा आणि प्रसन्न हो, अशी नायिकेची विनवणी.

२१७ सन्मित्र :　　217. Friend Indeed.

तं मित्तं काअव्वं जं किर वसणम्मि देसआलम्मि ।
आलिहियभित्तिवाउल्लेअं व ण परम्मुहं ठाइ ॥१७॥

[तन्मित्रं कर्तव्यं यत्किल व्यसने देशकालेषु ।
आलिखितभित्तिपुत्तलकामिव न पराङ्मुखं तिष्ठति ॥]

असा मित्र करावा कीं जो कोणत्याही काळीं, देशीं व प्रसंगीं पराङ्मुख होणार नाहीं आणि भिंतीवर चित्रित केलेल्या बाहुलीप्रमाणें नेहमीं सन्मुख राहील.

● भारतांतील सर्व प्राचीन चित्रें व शिल्पें सन्मुखच असतात.

२१८ हाय ! हाय ! !　　218. Wail.

बहुआइ णइणिउञ्जे पढमुग्गअसीलखण्डणाविलक्खम् ।
उड्डेइ विहंगउलं हा हा पक्खेहिँ व भणन्तम् ॥१८॥

१. प्रत्ययमस्या. २. पुत्तलं, पुत्तलकं. ३. आलिखितचित्रवक. ४. मुळय.

[वध्वा नदीनिकुञ्जे प्रथमोद्गतशीलखण्डनविलक्षम् ।
उड्डीयते विहंगकुलं हा हा पक्षैरिव भणत् ॥]

नदीतीरावरील कुञ्जांत वधूचें शीलखण्डन झालें. हें दृश्य पाहून झाडांवरील पक्ष्यांना लाज वाटली आणि त्यांचा समूह पंख फडफडवीत, जणूं हाय ! हाय ! असे उद्गार काढीत तेथून उडून गेला.

● हें शीलखन्डन होत आहे, हें पक्ष्यांना कसें उमजलें ? त्यांनाही पातिव्रत्याची जाणीव असते कीं काय ? शिकारी सांगतात कीं परक्यांच्या आगमनाची जाणीव जंगलांतल्या जनावरांना देण्यासाठीं कांहीं पक्षी शिकाऱ्याच्या माथ्यावर चीत्कार करीत उडत राहतात आणि ही सूचना मिळतांच शिकार सावध होऊन इतरत्र झुडपांत आश्रयाला जाते. या गाथेंतल्या पांखरांनीं दिलेली साद कुञ्जांतल्या मिथुनाला सावध करण्यासाठीं दिली, कीं वाट पाहणाराला जोडीदाराच्या आगमनाची वर्दी देण्यासाठीं ?

२१९ वसन्तोन्माद : 219. Hot Season.

सच्चं भणामि, बालअ ! णत्थि असक्कं वसन्तमासस्स ।
गन्धेण कुरवआणं मणं पि असइत्तणं ण गआ ॥१९॥

[सत्यं भणामि बालक नास्त्यशक्यं[1] वसन्तमासस्य ।
गन्धेन कुरबकाणां मनागप्यसतीत्वं न गता ॥]

बालक, मी खरेंच सांगतें, (उन्मादक) वसंतांत कांहींही अशक्य नाहीं. कुरबकांचा सुगंध दरवळत असूनही ती थोडीही चळली नाहीं.

● बालक, तुला जीवनाचा अनुभव नाहीं, विरहवेदनांच्या तीव्रतेची कल्पना नाहीं, वसंतमास व कुरबकांचा सुवास यांच्या सामर्थ्याची जाणीव नाहीं. त्वरा कर, घरीं जा, नाहींतर तिच्या शीलाचा भरंवसा नाहीं.

---

१. असाध्यं.

२२० पिंजऱ्यांतलें पांखरूं :   220. Cage Bird.

एक्केक्कमवइवेठणविवरन्तरदिण्णतरलणअणाएं।
तइ वोलन्ते, बालअ! पञ्जरसउणाइअं तीए ॥२०॥

[एकैकवृतिवेष्टनविवरान्तरदत्ततरलनयनया।
त्वयि व्यतिक्रान्ते बालक पञ्जरशकुनायितं तया॥]

बालक, तूं गेलास तेव्हां कुंपणाच्या एकेका छिद्रांतून तिनें चंचल दृष्टीनें तुझ्याकडे पाहिलें, पिंजऱ्यांतलें पांखरूं पाहतें तसें.

● पिंजऱ्यांतलें पांखरूं एकेका काडीआडून मान वांकवून भिरभिरत्या नजरेनें बाहेर पाहत पाहत आंतल्या आडव्या दांडीवर अस्वस्थपणें हालचाल करीत असतें; जणूं कोठून, कसें व केव्हां बाहेर पडतां येईल याचाच विचार त्याच्या मनांत सदैव चाललेला असतो. ती परतंत्र नसती व तूं साद दिली असतीस तर पांखरासारखी ती तुझ्यामागें उडत आली असती.

२२१ कुंपण :   221. Fence.

ता किं करेउ, जइ तं सि तीअ वइवेढ्ढपेल्लिअथणीए।
पाँअङ्गुट्ठद्धुक्खित्तणीसहङ्गीअ वि ण दिट्ठो? ॥२१॥

[तत्किं करोतु यदि त्वमसि तया वृतिवेष्टनप्रेरितस्तनया।
पादाङ्गुष्ठार्धोत्क्षिप्तनिःसहाङ्गयापि न दृष्टः॥]

कुंपणाला अगदीं छाती भिडवून आणि रग लागेपर्यंत पायांच्या अर्ध्या अंगुष्ठांवर उभें राहून बिचारीनें तुझें दर्शन व्हावें म्हणून तडफड केली, पण तूं तिला दिसलाच नाहींस. मग तिनें बिचारीनें काय करावें?

१. वइवेठणविवरन्तरतरलदिण्णअणाए. २. एक्कम. ३. व्युत्क्रामति.
४. पाअङ्गुठद्धुक्खित्त. ५. पादांगुष्ठाग्रोत्क्षिप्त.

● संकेताप्रमाणें मी तिच्या दारावरून फेरी टाकली पण ती दिसली नाहीं, या नायकाच्या तक्रारीला दूतीचें उत्तर; माझें आणि तुमचें, दोघांचेंही दुर्दैव, दुसरें काय ! आणि कुंपणाचें सुदैव !

२२२ अश्रु : 222. Tears.

पिअसंभरणपलोट्टन्तवाहधाराणिवाअभीआए ।
दिज्जइ वङ्कग्गीवाएँ दीवओ पहिअजाआए ॥२२॥
[प्रियसंस्मरणप्रलुठद्बाष्पधारानिपातभीतया ।
दीयते वक्रग्रीवया दीपकः पथिकजायया ॥]

प्रियकराच्या आठवणीमुळें डोळ्यांत दाटलेल्या अश्रुधारा ओघळून ज्योत विझेल या भीतीनें प्रवाशाच्या पत्नीनें मान वळवून दिवा दिला.

● प्रोषितपतिकेचा अभिलाष करणाराला ती असाध्य आहे अशी दूतीची सूचना.

२२३ लवचिक : 223. Fragile.

तइ वोलन्ते, बालअ ! तिस्सा अङ्गाइँ तह णु वलिआइं ।
जह पुट्ठिमज्झणिवंतन्तवाहधाराओ दीसन्ति ॥२३॥
[त्वयि व्यतिक्रामति बालक तस्या अङ्गानि तथा नु वलितानि ।
यथा पृष्ठमध्यनिपतद्बाष्पधारा दृश्यन्ते ॥]

बालक, तूं जाऊं लागलास तेव्हां (तुझ्याकडे पहात पहात) तिनें आपलें अंग बसल्या जागीं इतकें वळविलें कीं तिचे अश्रु तिच्या पाठीच्या मध्यावर पडतांना दिसले.

● तुझ्यावरील प्रेमामुळें तिच्या शरीराची अशी दैना झालेली आहे.

---

१. धरणीए. २. प्रगलत्, प्रपतद्. ३. णिवलंत, णिवदंत.

२२४ चालेल : 224. Common Man.

ता मज्झिमो च्चिअ वरं, दुज्जणसुअणेहिँ दोहिँ वि ण कज्जम् ।
जह दिट्ठो तवइ खलो, तहेअ सुअणो अईसन्तो[1] ॥२४॥

[तन्मध्यम एव वरं दुर्जनसुजनाभ्यां द्वाभ्यामपि न कार्यम्[2] ।
यथा दृष्टस्तापयति खलस्तथैव सुजनोऽदृश्यमानः ।]

तो मध्यम गुणी आहे, हेंच ठीक आहे. दुर्जन व सज्जन या दोघांचेंहि कार्य नाहीं. दुर्जनाचें दर्शन तापदायक असतें आणि सज्जनाचें तर दर्शनही होत नाहीं.

● सज्जन दुर्मिळ व भेटला तरी निरुपयोगी; जगदुद्धारावर प्रवचन सुरू करावयाचा; दुर्जन भेटला कीं आयुष्याचें मातेरें व्हावयाचें. म्हणून ज्याचे गुणदोष सामान्य आहेत असाच पुरुष स्त्रियाना अधिक इष्ट वाटतो; तसें नसतें तर सामान्य जनांना कोण विचारता ?

२२५ कटाक्ष : 225. Side Glance.

अद्धच्छिपेच्छिअं मा करेहि, साहाविअं पलोएहि ।
सो वि सुदिट्ठो होहिइ, तुमं पि मुद्धा कलिज्जिहिसि ॥२५॥

[अर्धाक्षिप्रेक्षितं मा कुरु स्वाभाविकं प्रलोकय ।
सोऽपि सुदृष्टो भविष्यति त्वमपि मुग्धा कलिष्यसे[3] ॥]

तूं त्याच्याकडे कटाक्ष टाकूं नकोस, स्वाभाविकपणेंच पहा; म्हणजे तो तुला नीट दिसेल आणि फार तर लोक तुला अल्लड म्हणतील.

---

१. अदीसन्तो. २. न मे कार्यम्. ३. क्लिष्टा भविष्यसि.

● आपल्या पतीकडे काण्या डोळ्यानें पाहणाऱ्या स्त्रीप्रत पत्नीचे ईर्ष्योद्गार. अलंकार-रत्नाकरांत तंत्र अलंकाराचें उदाहरण: 'नानाफलप्रयुक्तः तन्त्रम् ।'

२२६ गुपचुप : 226. Silent Surrender.

दिअहं खुडक्किआए तीए काऊण गेहवावारम् ।
गरुए वि मण्णुदुःखे भरिमो पाअन्तसुत्तस्स ॥२६॥

[दिवसं रोषमूकायास्तस्याः कृत्वा गेहव्यापारम् ।
गुरुकेऽपि मन्युदुःखे स्मरामः पादान्तसुप्तस्य ॥]

दिवसभर ती घुश्श्यांत होती, गुपचूप होती. कामधाम आटोपल्यावर रागाचें दुःख विशेष असतानांही ती माझ्या पायांजवळ येऊन झोंपली, त्याची आठवण होते.

● जो अपराधी, त्याच्याच पायांचा बिचारीला आश्रय करावा लागला. कारण ती कुलीन, पतिव्रता होती. दशरूपकांत औदार्याचें उदाहरण.

२२७ उपदेश : 227. Counsel.

पाणउडीअ वि जालिऊण, हुअवहो जलइ जण्णवाडम्मि ।
ण हु ते परिहरिअव्वा विसमदसासंठिआ पुरिसा ॥२७॥

[पानकुट्यामपि ज्वलित्वा हुतवहो ज्वलति यज्ञवाटेऽपि ।
न खलु ते परिहर्तव्या विषमदशासंस्थिताः पुरुषाः ॥]

अग्नि काय, झोंपडींत पेटतो, तसाच यज्ञस्थानींही प्रज्वलित होतो. पुरुषांना विपन्नावस्था प्राप्त झालेली असली तरी त्यांना टाळूं नको.

१. खु दुक्खिआए सअलं.

● पानकुटी म्हणजे चाण्डालकुटी (गंगाधर), पर्णकुटी (वेबर), महाराचें घर, पिठा (भागवत), शौण्डिककुटी (सरस्वतीकण्ठाभरण) आणि मदिरापानकुटी, गुत्ता (मथुरानाथ). पण गुत्त्यांत अग्नीचें काय प्रयोजन ? कीं गुत्त्यांतच हातभट्टी लावीत असत ? गंगाधर सांगतो, अधम स्त्रीसंगामुळें दूषित झालेल्या धनिकाला झिडकारण्याच्या विचारांत असलेल्या दुहितेला व्यवहारचतुर वेश्यामातेनें केलेला हा उपदेश आहे. सरस्वतीकण्ठाभरणांत वक्र निदर्शनेचें उदाहरणः ' दृष्टान्तः प्रोक्तासिद्ध्यै यः सिद्धेऽर्थे तन्निदर्शनम् । पूर्वोत्तरसमत्वे तदृजु वक्रं च कथ्यते । '

२२८ मूलकारण : 228. Basic Principle.

जं तुज्झ सई जाआ, असईओ जं च सुहअ ! अह्मे वि ।
ता किं फुट्टउ ? बीअं तुज्झ समाणो जुआ णत्थि ॥२८॥

[यत्तव सती जाया असत्यो यच्च सुभग वयमपि ।
तत्किं स्फुटतु बीजं तव समानो युवा नास्ति ॥]

सुभग, तुझी पत्नी सती आहे व आम्ही असती आहोंत, याचें मूलकारण स्पष्ट सांगतें; तुझ्यासारखा तरुण (तिला प्राप्त झाला व आम्हांला लाभला) नाहीं.

● आग्रही मित्रांबरोबर एक तरुण एका गणिकेकडे गेला. त्याच्या आयुष्यांतला हा पहिलाच प्रसंग. तिचा निरोप घेतांना, तिच्या मंदिरांत पाऊल टाकतांना नव्हे, त्यानें विचारलें, तुम्ही इतक्या सुंदर, एवढ्या गुणी, या मार्गात कशा पडलांत ? त्याला तो प्रश्न नवा होता, तिला नेहमींचाच होता; कारण नवशिके बाजीराव आरंभीं हाच प्रश्न विचारतात. गिऱ्हाइकाची व त्याच्या धर्मपत्नीची स्तुति हें गणिकांच्या कैतवांचें एक वैशिष्ट्य आहे; आणि तेंच गृहस्थाला गुंगवितें !

२२९ हाताला हात : 229. Co-operation.

सव्वस्सम्मि वि दड्ढे[1] तहवि हु हिअअस्स णिव्वुदि च्चेअ।
जं तेण गामडाहे हत्थाहत्थिं कुडो[2] गहिओ ॥२९॥

[सर्वस्वेऽपि दग्धे तथापि खलु हृदयस्य निर्वृतिरेव।
यत्तेन ग्रामदाहे हस्ताहस्तिकया कुटो गृहीतः ॥]

गांवाला आग लागली, तींत तिचें सर्वस्व जळून गेलें; तरीही प्रियकरानें तिच्या हातांतून घडा घेतला तेव्हां तिच्या हृदयाला परम सुख झालें.

● आग विझविण्यासाठीं गांवकऱ्यांनीं पाणवठ्यापासून रांग लावली होती. पाण्यानें भरलेला घडा शेजाऱ्याला देतांना हिच्या हाताला त्याचा हात लागला. त्या परिस्थितींत व मनःस्थितींत एवढ्यानेंही तिला सुख वाटलें.

२३० चारुदत्त : 230. Poverty.

जाएज्ज वणुद्देसे कुज्जो[3] वि हु णीसाहो[4] झडिअपत्तो[5]।
मा माणुसम्मि लोए ताई[6] रसिओ दरिद्दो अ ॥३०॥

[जायतां वनोद्देशे कुब्जोऽपि खलु निःशाखः शिथिलपत्रः[7]।
मा मानुषे लोके त्यागी रसिको दरिद्रश्च ॥]

एकाद्या निर्जन जंगलांत वेड्यावांकड्या व खुरटलेल्या, फांद्या नसलेल्या व पानें झडलेल्या वृक्षाच्या जन्माला आलों तरी चालेल; पण

---

१. डड्ढे, डड्ढे, दड्ढे. २. कुण्डो. ३. खुज्जो. ४. खालुओ. ५. गलित, पडिअ, झडिअ. ६. एक्करसो. ७. स्थाणुको गलितपत्रः, घटितपत्रः, शटितपत्रः

मनुष्यलोकांत मात्र दानशील व रसिक, पण दरिद्री, अशाच्या जन्माला येऊं नये.

● गंगाधर सांगतो : ' दरिद्रो निर्धन : । अवसररहितश्च । ' आणि रसिक म्हणजे ' सानुरागः शृंगारी च । ' धनाचे अभावीं दरिद्री रसिकाला इच्छित स्थानीं प्रवेश मिळत नाहीं, त्याप्रमाणें गृहकृत्यांमुळें मला भेटीला येण्याला सवड नाहीं, असा असतांनें दरिद्री भुजंगाला दूतीकरवीं सुभाषित रूपांत पाठविलेला निरोप. गुणी परंतु दरिद्री चारुदत्तावर अनुरक्त होणारी वसंतसेना विरळा. अलंकाररत्नाकरांत विध्याभासाचें उदाहरणः ' अनिष्टविधानं विध्याभास : । '

२३१ साहस : 231 Daring.

तस्स अ सोहग्गगुणं अमहिलसरिसं च साहसं मज्झ ।
जाणइ गोलाऊरो वासा[1]रत्तोद्धरत्तो अ ॥३१॥

[तस्य च सौभाग्यगुणममहिलासदृशं च साहसं मम ।
जानाति गोदापूरो वर्षारात्रा[2]र्धरात्रश्च ॥]

महिलांचे ठायीं सहसा आढळणार नाहीं असें माझें साहस आणि त्याचें सद्भाग्य ही दोन्ही गोदावरीच्या पुराला व पावसाळ्यांतील मध्यरात्रीला माहीत आहेत.

● साहसावांचून अपूर्व फललाभ होत नाहीं. वेबरनें टीकेंत हेरो व लेॲंडर यांच्या कथेचा उल्लेख केलेला आहे. हेरो ही ॲफ्रोडीट या सौंदर्य-देवतेची पुजारीण. तिला भेटण्यासाठीं लेॲंडर हा रोज रात्रीं हेलेस्पॉंटची सामुद्रधुनी पोहून तिच्या मठांत येत असे. एका रात्रीं तो वादळांत बुडून मेला. त्याचें प्रेत पाहतांच हेरोनें समुद्रांत उडी घेऊन आत्मार्पण केलें. या

१. वरिसआलद्ध. २. वर्षाकालार्धरात्र्यः , धाराद्धार्थ.

गाथेची नायिका अधिक साहसी. शुकबहात्तरींत कथा आहेः भ्रमवती नदीतीरीं शेषपुर गांवीं सुराक्षस नामा शेती होता. त्याची स्त्री कालिका. नदीपार सिद्धेश्वरपुरींत एक ब्राह्मण होता. पालथ्या घागरीचे साह्यानें नदीपार होऊन ही त्याशीं संग करी. हें वर्तमान कर्णोपकर्णी समजल्यावरून शोध करावा म्हणून सुराक्षस कृत्रिम निद्रा करता झाला. रात्रीं कालिका चालली, तिचे पाठीमागून आपण गेला, नदीपार गेला. तिनें पति पाहिला. घागर पाण्यानें भरून ती सिद्धेश्वराचे देवळांत गेली व उदकाचा अभिषेक करून म्हणाली--' देवा ! तूं स्वप्नांत सांगितलेंस कीं जर मध्यरात्रीस मजला अभिषेक केलास तर तुझा पति वांचेल, नाहींतर पांच दिवसांत मरेल. यास्तव अभिषेक केला. आतां शतायु होऊं दे.' तिची सखी अंधारांत उभी होती. ती तथास्तु म्हणाली. ही आकाशवाणी ऐकून सुराक्षस संतुष्ट होऊन मागचे मार्गे घरास माघारीं आला आणि पाठीमागून स्वकार्य साधून कालिका स्वगृहास परत येती झाली. असेंच कांहीं साहस, कदाचित् तें समकालीन असेल, या गाथेंत अभिप्रेत असावें असें वाटतें.

२३२ गेले ते दिवस : 232. Bygone Days.

ते वोलिआ वअस्सा, ताण कुडङ्गाण थाणुआ[1] सेसा ।
अह्मे वि गअवआओ मूलुच्छेअं गअं पेम्मम् ॥३२॥

[ते व्यतिक्रान्ता[2] वयस्यास्तेषां कुञ्जानां[3] स्थाणवः[4] शेषाः ।
वयमपि गतवयस्का मूलोच्छेद्यं गतं प्रेम ॥]

ते आमचे मित्र गेले, त्या कुञ्जांतील वृक्ष वठून त्यांचीं खोडें झालीं, आम्ही वृद्ध झालों आणि आमचें प्रेमही समूळ नष्ट झालें.

---

१. खण्णुआ, खणुआ, खुणुआ. २. व्यतीता वेतसाः ३. कुरङ्गाणां. ४. स्थाणुकाः .

● या ना त्या निमित्तानें वयस्क असती ग्रामतरुणांना जागोजाग व वेळोवेळीं भेटत असे आणि त्यांचीं अडलीं कामें करीत असे. बरेच दिवस या पापमूर्तीचें दर्शन झालेलें नसल्यामुळें एका उनाड तरुणानें विचारलें, कां हो, अलीकडे कोठें भेटत नाहीं ? या उपहासगर्भ प्रश्नाला वठलेल्या वृद्धेचें उत्तर : आज तुम्ही मस्तींत आहांत, उद्यां तुम्हीही वयस्क व्हाल, तुमचे समानशील दोस्त सोडून जातील, उतारावरून घसरत असतांना आठवणी करतां येतील असें कांहीं तरी या वयांत करून ठेवा.

२३३ हिरवें खोड : 233. Strumpet.

थणजहणणिअम्बोवरि णहरङ्का[1] गअवआणँ वणिआणम्[2] ।
उव्वसिआणङ्गणिवासमूलबन्ध व्व दीसन्ति ॥ ३३॥

[स्तनजघननितम्बोपरि नखराङ्का[4] गतवयसां वनितानाम् ।
उद्वसितानङ्गनिवासमूलबन्धा इव दृश्यन्ते ॥]

वय उलटून गेलेल्या स्त्रियांच्या स्तनजघननितंबांवरील नखांचे ओरखडे मदनाच्या उध्वस्त निवासस्थानाच्या अवशेषांसारखे दिसतात.

● निवासमूल =भित्तिमूल= घराचा पाया. ओसाड घरांच्या पायांतले दगडही शेजारीपाजारी उकरून नेतात; मग पायाचे खंदक जमीनीवर ओढलेल्या ओरखड्यांसारखे दिसतात.

२३४ सौंदर्य : 234. Beauty.

जस्स जहं विअ पढमं तिस्सा अङ्गम्मि णिवडिआ दिट्ठी ।
तस्स तहिं चेअ ठिआ सव्वङ्गं केण वि ण दिट्ठम् ॥ ३४॥

१. दशणङ्का. २. विलआणं. ३. नखाङ्का. ४. दशनाङ्का.

[यस्य यत्रैव प्रथमं तस्या अङ्गे निपतिता दृष्टिः ।
तस्य तत्रैव स्थिता सर्वाङ्गं केनापि न दृष्टम् ॥]

तिच्या ज्या अवयवावर दृष्टि पडते तेथेंच ती खिळून राहते. (दुसरीकडे पाहावयाचें भानच राहत नाहीं.) यामुळें तिचें संपूर्ण सौंदर्य कोणीच पाहिलेलें नाहीं.

● तिच्यावर अनेकांची नजर आहे, पण आजवर ती कोणालाही वश झालेली नाहीं.

२३५ विष व अमृत : 235. Poison & Nectar.

विरहे विसं व विसमा, अमअमआ होइ संगमे अहिअम् ।
किं विहिणा समअं विअ दोहिं वि पिआ विणिम्मिअआ ? ॥३५॥

[विरहे विषमिव विषमामृतमया भवति संगमेऽधिकम् ।
किं विधिना सममेव द्वाभ्यामपि प्रिया विनिर्मिता ॥]

तिचा विरह विषासारखा असह्य व समागम अमृतासारखा सुखद आहे. विधीनें विष व अमृत यांचें मिश्रण करून प्रिया निर्माण केली कीं काय ?

● तुलनेसाठीं पहाः ' नामृतं न विषं किंचिदेका मुक्का नितम्बिनीम् । सैवामृतलता रक्ता विरक्ता विषवल्लरी ॥ ४४॥' ' मधु तिष्ठति वाचि योषितां । हृदि हलाहलमेव केवलम् ॥ अतएव निपीयतेऽधरो । हृदयं मुष्टिभिरेव ताड्यते ॥ ६० ॥' (शृङ्गारशतकम् : भर्तृहरी : निर्णयसागर : श्री. पणशीकर)

---

१. कि सममेव विधिना.

२३६ ओंजळींतलें पाणी : 236. Handful of Coins.

अद्दंसणेण पुत्तअ ! सुट्ठु वि णेहाणुबन्धघडिआइं ।
हत्थउडपाणिआइँ व कालेण गलन्ति पेम्माइं ॥३६॥

[अदर्शनेन पुत्रक सुष्टवपि स्नेहानुबन्धघटितानि ।
हस्तपुटपानीयानीव कालेन गलन्ति प्रेमाणि ॥]

पुत्रा, सतत स्नेहानें दृढ झालेलें प्रेमही दर्शनाभावामुळें ओंजळींतल्या पाण्यासारखें कालान्तरानें नष्ट होतें.

● दुहितेच्या दोषपरिहारार्थ वेश्यामातेचे भुजंगाप्रत उद्गार. गेल्या खेपेला तुम्हीं ओंजळ भरून द्रव्य दिलें होतें, त्याची मलाही आठवण आहे; इतक्या दिवसांत रांजणही झिरपून कोरडा झाला असता, मग ओंजळीची काय कथा ! तिनें तुम्हांला ओळखलें नाहीं यांत त्या बिचारीचा काय वरें दोष ?

२३७ विंचू : 237. Scorpion.

पइपुरओ व्विअ णिज्जइ विच्छुअदट्ठेत्ति जारवेज्जघरम् ।
णिउणसहीकरधारिअ भुअजुअलन्दोलिणी बाला ॥३७॥

[पतिपुरत एव नीयते वृश्चिकदष्टेति जारवैद्यगृहम् ।
निपुणसखीकरधृता भुजयुगलान्दोलनशीला बाला ॥]

१. बन्धिघडियआणं, बन्धगहिआइं. २. वाल्लन्ति. ३. गृहीतानि, स्नेहानुबद्ध-मनसोः ४. विंचुअडट्ठा, विच्चिअदक्खे, विछुआडक्क. ५. सहीकरलम्बिअकरवल-अन्दोलिरी, सहिअअसहीअणपसारिअ. ६. सहृदयसखीजनप्रसारिता.

विंचू चावल्याचें ढोंग करवून निपुण सखीनें दोन्ही दंडांना झटके देणारी बाला नवऱ्यासमोरून हात धरून जार वैद्याच्या घरीं नेली.

● वेबर सांगतो, स्त्रीवेदांत अशा अनेक युक्त्या आढळतात. विंचू चावल्याचें ढोंग करून विषवैद्याच्या वेषांत परपुरुषाला सखीच्या साह्यानें घरीं आणणाऱ्या धान्यकूटच्या तनुकेची गोष्ट शुकबहात्तरींत आहे. भूत उतरविणाऱ्या मांत्रिकासह छप्परपलंगावरून गांवच्या रस्त्यावरून मिरवून घेणाऱ्या व्यभिचारिणीची गोष्ट श्रुतस्मृतींत आहे !.' विंचु मोठा रंगेला सईबाई, माझा उतरून गेला चेहरा । येती मज लहरावरती लहरा । कोणी तरी माणूस धाडा शहरा ।' (लावणी-संग्रहः पृ. १५२). सखी सांगते, मी निपुण आहे, माझ्यावर विश्वास ठेव, कांहीं तरी युक्ति काढून मी तिला घरांतून काढीनच.

२३८ बैल : 238. Hearth.

विक्किणइ[1] माहमासम्मि पामरो पाइडिं[2] वइल्लेण ।
णिध्दूममुम्मुर[3] व्विअ सामलीअ थणो पडिच्छंन्तो[4] ॥ ३८॥

[विक्रीणाते माघमासे पामरः प्रावरणं बलीवर्देन ।
निर्धूममुर्मुरनिभौ[5] श्यामल्याः स्तनौ पश्यन् ॥]

धूम्ररहित व अग्निगोलांसारखे लकाकणारे आपल्या श्यामल पत्नीचे स्तन पाहतांच गरीब शेतकऱ्यानें ऐन हिंवाळ्यांत आपलीं ऊबदार पांघरुणें देऊन त्यांच्या मोबदल्यांत बैल खरेदी केला.

● माघांतली थंडी आणि यौवनाचा उष्मा – दोन्ही कल्पनांनीं हुडहुडी भरते ! काश्मीरांत अंगांत ऊबदार कपडे व त्यांवर गरम पांघरुणें असलीं

१. विक्केइ. २. पारइं, पारिडिं, पावलिं. ३. मुम्मुरसच्छहे. ४. णिअच्छन्तो.
५. निर्धूमाङ्गारसदृशयोः श्यामायाः स्तनयोर्नियच्छत.

तरी आंत पेटती शेगडी ठेवावी लागते. तेवढी थंडी आपल्याकडे नसते. म्हणून नव्या नवरीच्या उपस्थितींत एकीकडच्या थंडीची त्याला दिक्कत वाटली नाहीं. नांगरटीसाठीं त्याला बैल घ्यायचाच होता. या गाथेंतील वस्तुविनिमयाचा व्यवहार लक्षांत घेण्यासारखा आहे. परिवृत्ति अलंकार. ' रतिरूपेण हीनपात्रेषु रसाभास : ! ' सरस्वतीकण्ठाभरण.

२३९ ओढ : 239. Magnetism.

सच्चं भणामि, मरणे ट्ठिअह्मि, पुण्णे तडम्मि तावीए ।
[1]अज्ज वि तत्थ कुडङ्गे णिवडइ दिट्ठी तह च्चेअ ।।३९।।

[सत्यं भणामि मरणे[2] स्थितास्मि पुण्ये तटे ताप्याः ।
अद्यापि तत्र निकुञ्जे[3] निपतति दृष्टिस्तथैव ।।]

खरें सांगतें, तापीच्या पवित्र तीरावर मी आसन्नमरण अवस्थेंत पडलें आहे, तरी कांठावरच्या कुंजांकडे माझी दृष्टि अजून ओढ घेत आहे.

● स्त्रीचें वय झालें तरी तिचा भरंवसा देतां येत नाहीं असें पुरुषवेदांत वचन आहे. आसन्नमरण अवस्थेंत मनांत कोणते विचार व आठवणी येतात ? या प्रश्नावर एकमत होणें शक्य नाहीं !

२४० संकट : 240. Calamity.

[4]अन्धअरबोरपत्तं[5] व माउआ ! मह पइं विलुम्पन्ति ।
ईसाअन्ति महं विअ, छेप्पाहिन्तो फणो जाओ ।।४०।।

---

१. तत्थ तहिं चिय वलंति णयणा कुडङ्गम्मि. २. गृहीतमरणग्रस्ताऽस्मि. ३. कुरङ्गे. ४. अन्धलयबयरं. ५. पत्थि.

[अन्धकरबदरपात्रमिव मातरो मम पतिं विलुम्पन्ति ।
ईर्ष्यन्ति मह्यमेव लाङ्गूलेभ्यः फणो जातः ॥]

आई, आंधळ्याच्या हातांतल्या भांड्यांतलीं बोरें लुटलीं जातात; त्याचप्रमाणें इतर स्त्रियांनीं माझ्या पतीचें प्रेम लुटलें; आणि वर त्याच माझा मत्सर करतात. सर्पाला शेंपटीकडे आणखी एक फणा फुटावी, तशांतलाच प्रकार !

● त्यांना काय वाटतें, मीही आंधळीच आहे ?

२४१ ऐट : 241. Display.

अप्पत्तपत्तअं पाविऊण णवरङ्गअं हालिअसोण्हा ।
उअह ! तणुई ण माअइ रुन्दासु वि गामरच्छासु ॥४१॥

[अप्राप्तप्राप्तं प्राप्य नवरङ्गकं हलिकस्नुषा ।
पश्यत तन्वी न माति विस्तीर्णास्वपि ग्रामरथ्यासु ॥]

आपल्याला कधीं मिळेल अशी कल्पनाही नव्हती असें नवें रंगीत लुगडें शेतकऱ्याच्या सुनेला मिळालें. यामुळें ती इतकी फुगली कीं ती अंगानें सडपातळ होती व गांवांतले रस्ते रुंद होते तरी ती त्यांत मावेनाशी झाली !

● अल्पधनप्राप्तीनेंही नीचांचे अंगीं गर्वातिशयाचा संचार होतो. शेतकऱ्याची तरणी बांड, अवखळ व हौशी सून अल्पांत साध्य आहे अशी दूतीची सूचना. आठवड्याच्या बाजारांत व सणासुदीच्या दिवशीं अशीं दृश्यें खेड्यापाड्यांत दिसतातच.

---

१. अन्धस्य केलिफलकण्डोलं. २. मायाविन्यः ३. ईर्ष्यायति मह्यमेव पुच्छात्फेणा. १. कुसुम्भवस्त्रं, रक्तवस्त्रं.

२४२ बोलणें : 242. Argument.

आक्खेवआइँ[1] पिअजम्पिआइँ परहिअअणिव्वुदिअराइं ।
विरलो खु जाणइ जणो उप्पण्णे जम्पिअव्वाइं ॥४२॥
[वाक्षेपकाणि[2] प्रियजल्पितानि परहृदयनिर्वृतिकराणि ।
विरलः खलु जानाति जन उत्पन्ने जल्पितव्यानि ॥]

बोलणें कसें असावें ? ऐकणाराला संतोष होईल व गोड वाटेल आणि प्रतिपक्षाला निरुत्तर करील असें असावें. वेळप्रसंग पाहून योग्य तें बोलणें सुचतें अशीं माणसें विरळा.

२४३ शोभा : 243. Grace.

छज्जइ पहुस्स ललिअं, पिआइ माणो, खमा समत्थस्स ।
जाणन्तस्स अ भणिअं, मोणं च अआणमाणस्स ॥४३॥
[शोभते प्रभोर्ललितं प्रियाया मानः क्षमा समर्थस्य ।
जानतश्च भणितं मौनं चाजानतः]

सशक्ताची क्रीडा, प्रियेचा रुसवा, समर्थाची क्षमा, जाणत्याचें बोलणें व अजाणत्याचें मौन हीं शोभतात.

● दैनिक व्यवहारांत व राजकारणांतही ह्या सुभाषितांतील आशय प्रत्ययास येतो. तूं नावडती आहेस, सबब तुला मान शोभत नाहीं. अलंकार-कौस्तुभांत दीपक अलंकाराचें उदाहरण : 'प्रकृताप्रकृतानां यद्येकान्वयितास्ति दीपकं तत्स्यात् । '

१. वक्खेवआइ, सच्चं पिआइं. २. सत्यं प्रियाणि.

२४४ पत्रलेखन : 244. Letter.

वेविरसिण्णकरङ्गुलिपरिग्गहक्खलिअलेहणीमग्गे ।
सोत्थि च्चिअ ण समप्पइ पिअसहि ! लेहम्मि किं लिहिमो ? ॥४४॥

[वेपनशीलस्विन्नकराङ्गुलिपरिग्रहस्खलितलेखनीमार्गे ।
स्वस्त्येव न समाप्यते प्रियसखि लेखे किं लिखामः ॥]

बोटें थरकांपत आहेत, स्वेदानें ओलीं झालीं आहेत; त्यांतून लेखणी घरंगळत आहे. प्रियसखी, ' स्वस्ति ' एवढेंही लिहून होत नाहीं, मी पत्र कशी लिहिणार ?

२४५ वाळूचें घर : 245. House of Cards.

देव्वम्मि पराहुत्ते पत्तिअ ! घडिअं पि विहडइ णराणम् ।
कज्जं वालुअवरणं व्व कहँ वि बन्धं विअ ण एइं ॥४५॥

[दैवे पराङ्मुखे प्रतीहि घटितमपि विघटते नराणाम् ।
कार्यं वालुकावरण इव कथमपि बन्धमेव न ददाति ॥]

माझ्यावर विश्वास ठेव; दैव फिरलें म्हणजे माणसानें कामाची कशीही उभारणी केली तरी ती कोसळते; वाळूचा तट उभारूं पहावा, तो धर धरीत नाहीं, तसें होतें.

● तुझें काम यशस्वी करण्यासाठीं मी फार खटपट केली, जमलें नाहीं, यांत माझा दोष नाहीं.

---

१. क्खलियलेयणीसमग्गे. २. परसस्विन्नकराङ्गुलीः ३. वालुअउलम्. ४. देइ, लहई. ५. वालुकाप्राकारमिव कथमपि बन्धमेव न गच्छति ।

२४६ घोंट : 246. Draught.

मामि ! हिअअं व पीअं तेण जुआणेण मज्जमाणाए।
ण्हाणहलिद्दाकडुअं अणुसोत्तजलं पिअन्तेण ॥४६॥

[मातुलानि हृदयमिव पीतं तेन यूना मज्जन्त्याः।
स्नानहरिद्राकटुकमनुस्रोतोजलं पिबता ॥][1]

मामी, मी नदींत नहात होतें. तो प्रवाहांत खालीं उभा होता. माझ्या अंगावरील हळदीनें कडू झालेल्या पाण्याचा घोट घेऊन त्यानें जणूं माझ्या हृदयाचा घोट घेतला.

● औषधें कडू पण परिणामीं मधुर असतात. त्यानें घेतलेला घोट हरिद्रेमुळें कटु होता, पण तिच्या संसर्गामुळें तो तिला मधुर वाटला. त्याचें कडू झालेलें तोंड गोड कसें करावें याबद्दल मामीभाचींत वाटाघाट चालली आहे.

२४७ अशाश्वत : 247. Problem.

जिविअं[2] असासअं विअ, ण णिवत्तइ जोव्वणं अतिक्कन्तम्।
दिअहा दिअहेहिँ समा ण होन्ति, किं णिट्ठुरो लोओ ? ॥४७॥

[जीवितम[3]शाश्वतमेव न निवर्तते यौवनमतिक्रान्तम्।
दिवसा दिवसैः समा न भवन्ति किं निष्ठुरो लोकः ॥]

जीवन अशाश्वत आहे; तारुण्य उलटलें कीं तें परत येत नाहीं; दिवसासारखे दिवसही येत नाहींत; मग माणसें निष्ठुर कां होतात ?

---

१. हरिद्रासुरभिसमुस्रोतो. २. जीवं असासिअं. ३. जीवमाश्वासितमेव.

● जीवित क्षणभंगुर आहे, अशी संधि पुन्हां येणार नाहीं. निष्ठुर होऊं नको, कृपा कर, अशी विनंति.

२४८ कृष्णहट्टी : 248. Black Market.

उप्पाइअद्व्वाणँ वि खलाणँ को भाअणं? खलो च्चेअ।
पक्काइँ वि णिम्बफलाइँ णवँर काएहि खज्जन्ति ॥४८॥

[उत्पादितद्रव्याणामपि खलानां को भाजनं खल एव ।
पक्कान्यपि निम्बफलानि केवलं काकैः खाद्यन्ते ॥]

दुष्टांनीं द्रव्य संपादन[1] केलें तर ते त्याचें दान कोणाला करतात ? अर्थात् हलकटांनाच. लिंबाचीं फळें पिकलीं तरी तीं कावळेच खाणार.

● कृष्णहट्टी म्हणजे काळा बाजार करणारे व्यापारी. ते असहाय लोकांना लुटतात आणि यांना कल्लनी, कलाल व कोतवाल लुटतात. सफेत वस्त्रें परिधान करून व लोकोपयोगी संस्थांना दानें देऊन पापक्षालन करण्याची व मानमान्यता मिळविण्याची प्रथा मात्र आधुनिक आहे. सारेच कावळे. अलंकाररत्नाकरांत सम अलंकाराचें उदाहरण. अलंकारकौस्तुभांतील व्याख्या पहा : ' अन्योन्यसंगमार्हौ संबध्येते यदा समं तत्स्यात् । '

२४९ शतपावली : 249. Practice.

अज्ज मए गन्तव्वं घणन्धआरे वि तस्स सुहअस्स ।
अज्जा[2] णिमीलिअच्छी पअपरिवाडिं घरे कुणइ ॥४९॥

[अद्य मया गन्तव्यं घनान्धकारेऽपि तस्य सुभगस्य ।
आर्या निमीलिताक्षी पदपरिपाटिं गृहे करोति ॥]

---

१. उपार्जित. २. अक्का.

अंधार असला तरी आज रात्रीं भाग्यवान् प्रियकराची भेट घेण्याला जायचें ठरलेलें असल्यामुळें ती घरांतल्या घरांत डोळे मिटून चालण्याचा सराव करीत आहे.

● कोणी तरुणी डोळे मिटून अंगणांत शतपावली करीत होती. तरी तिचें इंगित ओळखलें गेलें! मांजर डोळे मिटून बसलें तरी त्याच्यावर इतरांची नजर असतेच!

२५० सुजनप्रशंसा : 250. In Praise of Goodness.

सुअणो ण कुप्पइ च्चिअ, अह कुप्पइ विप्पिअं[1] ण चिन्तेइ।
अह चिन्तेइ ण जम्पइ, अह जम्पइ लज्जिओ होइ ॥५०॥
[सुजनो न कुप्यत्येव अथ कुप्यति विप्रियं न चिन्तयति ।
अथ चिन्तयति न जल्पति अथ जल्पति लज्जितो भवति ॥]

सुजन सहसा संतापत नाहींत, संतापले तरी कोणाचें अप्रिय चिंतीत नाहींत, चिंतिलें तरी बोलून दाखवीत नाहींत आणि बोललेच तर त्यांना स्वत:ची लाज वाटते.

● अलंकाररत्नाकरांत अतिशय अलंकाराचें उदाहरण : 'सम्भावनयान्यथा वातिशयोऽतिशय :'

२५१ गुणप्रशंसा : 251. Reality.

सो अत्थो जो हत्थे, तं मित्तं जं णिरन्तरं वसणे।
तं रूअं जत्थ गुणा, तं विण्णाणं जहिं धम्मो ॥५१॥

---

१. अमंगलं.

[सोऽर्थो यो हस्ते तन्मित्रं यन्निरन्तरं व्यसने ।
तद्रूपं यत्र गुणास्तद्विज्ञानं यत्र धर्मः ॥]

प्रत्यक्ष हातांत असतें तें धन; संकटांत अंतर देत नाहीं तो मित्र; गुणांचें सान्निध्य असतें तेंच रूप; धर्माचें साहचर्य असतें तेंच विज्ञान.

● गंगाधर सांगतो, कोरडीं वचनें देणाऱ्या भुजंगाच्या आहारीं चाललेल्या सौंदर्यगर्विता दुहितेला हा वेश्यामातेचा उपदेश आहे ! अलंकार-कौस्तुभांत परिसंख्या अलंकाराचें उदाहरण : ' पृष्टमपृष्टं चोक्तं यद्यद्व्यंग्यं वापि वाच्यं वा । फलतीतरव्यपोहं परिसंख्या सा तु संख्याता । '

२५२ चांदणी रात : 252. Moonlit.

चन्दमुहि ! चन्दधवला दीहा, दीहच्छि ! तुह विओअम्मि ।
चउजामा सअजाम व्व जामिणी कहँ वि वोलीणा ॥५२॥

[चंद्रमुखि चंद्रधवला दीर्घा दीर्घाक्षि तव वियोगे ।
चतुर्यामा शतयामेव यामिनी कथमप्यतिक्रान्ता ॥]

चंद्रमुखी, दीर्घाक्षी, चार प्रहरांची चांदणी रात्र तुझ्या वियोगामुळें शंभर प्रहरांएवढी दीर्घ झाली. ती मीं कशी घालविली तें माझें मला माहीत.

● चंद्रदर्शनामुळें चंद्रमुखीची आठवण झाली आणि यामिनीच्या दीर्घत्वामुळें तिच्या दीर्घाक्षांची. आठवणीमुळें एकान्त असह्य झाला. प्रवासाहून परत आलेल्या पतीचें पत्नीशीं चाटुवचन. ' पडलें शुभ्र चांदणें, काय मी करूं । अशा चांदण्यामध्यें नाहीं पांगरूं ॥ ' (सगनभाऊ, लावण्या व पोवाडे. पृ. ३१.) विरोधालङ्कारध्वनि.

२५३ मृदंग : 253. Drum.

अउलीणो दोमुहओ, ता महुरो भोअणं मुहे जाव ।
मुरओ व्व खलो, जिण्णम्मि भोअणे विरसमारसइ ॥५३॥

[अकुलीनो द्विमुखस्तावन्मधुरो भोजनं मुखे यावत् ।
मुरज[1] इव खलो जीर्णे भोजने विरसमारसति ॥]

अकुलीन दुतोंडे असतात, भोजन चालू आहे तोंवर ते गोड बोलतात; खल हे मृदंगासारखे असतात, तोंडावरला (पिठाचा) लेप जरा कमी पडला (किंवा सुकला) कीं लगेच बदसूर होतात.

● ज्या तोंडानें जेवावयाचें त्याच तोंडानें बोलावयाचें असल्यामुळें भोजन चालू आहे तोंवर अकुलीनांची वाणी मिठास असते; तोंड बंद झालें किंवा फिरलें कीं लगोलग निंदा सुरू होते. मुखलेप कमी झाला कीं खल यजमानाची निंदा त्याच्या परोक्ष सुरू करतात. दुर्जन मुखीं पिंडदान केलें पाहिजे, सारखें पिंडदान करीत राहिलें पाहिजे.

२५४ चिथावणी : 254. Instigation.

तह सोण्हाइ पुलइओ दरवलिअन्तद्धतारअं[2] पहिओ ।
जह वारिओ वि घरसामिएण ओलिन्दए वसिओ ॥५४॥

[तथा स्नुषया प्रलोकितो दरवलितार्धतारकं[3] पथिकः ।
यथा वारितोऽपि गृहस्वामिना अलिन्दके सुप्तः ॥]

१. रज इव खलक्षीणो भाजने. २. अंतद्ध, वक्क, अवङ्ग. ३. मनाग्वलित-तिर्यक्तारकं, दरविवलितार्धतारकं, अन्तर्द्धारकम्.

घरधन्यानें पथिकाला (पथारी पसरण्याला) मनाई केली; पण तेवढ्यांत सुनेनें नखऱ्यांत मान वेळावून अपांग दृष्टीनें त्याच्याकडे असें पाहिलें कीं तो निःशंकपणें ओसरीवर झोंपला.

● या गाथेंतील गृहस्वामी हा शब्द स्नुषेच्या साहचर्यांत आल्यामुळें त्याचा अर्थ सासरा असाच घेतला पाहिजे. तिचा पति प्रवासी होता किंवा घरीं असूनही ती त्याला जुमानीत नव्हती. सासऱ्याचीही सुनेपुढें मात्रा चालत नव्हती. तिनें पथिकाला सुचविलें, विन्मुख जाऊं नको, देवडीवर नोकर माणसें झोंपतात, तूं ओसरीवर पथारी लाव आणि माझी वाट पहा. ही नाट्यवस्तु असावी असें वाटतें.

२५५ फुशारकी : 255. Bragging.

लहुआन्ति लहुं पुरिसं पव्वअमेत्तं पि दो वि कज्जाइं ।
णिव्वरणमणिव्वूढे णिव्वूढे जं अ णिव्वरणम् ॥५५॥

[लघयतो लघु पुरुषं पर्वतमात्रमपि द्वे अपि कार्ये ।
निर्वरणमनिर्व्यूढे निर्व्यूढे यच्च निर्वरणम् ॥]

मनुष्य पर्वताएवढा मोठा असला तरी दोन गोष्टी त्याला तावडतोब लघुता आणतात; कार्य केलेलें नसतां तें केलें आहे अशी फुशारकी मारणें आणि जें कांहीं केलेलें असेल त्याबद्दल प्रौढी सांगणें.

● पुनर्भेटीची अपेक्षा असेल तर बभ्रा करूं नये; संकेत ठरला असेल तर बकवा करूं नये. प्रेमाचें स्वारस्य रहस्यांत असतें.

२५६ अर्घकमल : 256. Lotus Offering.

कं तुङ्गथणुक्खित्तेण पुत्ति ! दाराट्ठिआ पलोएसि ।
उण्णामिअकलसणिवेसिअग्घकमलेण व मुहेण ॥५६॥

[कं तुङ्गस्तनोत्क्षिप्तेन पुत्रि द्वारस्थिता प्रलोकयसि ।
उन्नामितकलशनिवेशितार्घकमलेनेव मुखेन ॥]

मुली, उंच कलशावर पूजेचें कमळ ठेवावें त्याप्रमाणें उभार उरोजांवर मुख ठेवून, दारांत उभी राहून तूं कोणाची वाट पहात आहेस ?

● दारांत उभी राहणारी (' द्वारावस्थितिशीलिका: ' अनंगरंगः ८. १७) स्त्री सहजसाध्य असते असा कामशास्त्राचा सिद्धान्त आहे. ती संकेतानुसार उभी होती कीं संकेतासाठीं ? दूरचें दिसावें म्हणून आपण मान थोडी खालीं, थोडी पुढें करतों व छाती फुगवतों, नंतर नजर एकाग्र करतों, तसाच हा प्रकार दिसतो. दूती विचारते, तूं कोणाची वाट पहात आहेस ? सांग, मी त्याला घेऊन येतें; आणि सुचविते, तूं कोणीकडेही येण्याला तयार असलीस तर तसें सांग.

२५७ प्रसिद्धि : 257. Advertisement.

वइविवरणिग्गअदलो एरण्डो साहइ व्व तरुणाणम् ।
एत्थ घरे हलिअवहू एद्दहमेत्तत्थणी वसइ ॥५७॥

[वृतिविवरनिर्गतदल एरण्डः साधयतीव तरुणेभ्यः ।
अत्र गृहे हलिकवधूरेतावन्मात्रस्तना वसति ॥]

कुंपणाच्या छिद्रांतून बाहेर डोकावणारीं एरंडाचीं पानें तरुणांना जाहीर करतात कीं त्या पानांएवढे विशाल स्तन असलेली शेतकऱ्याची तरुण स्त्री येथें राहते.

● नायिकेच्या घराचा नक्की पत्ता दूती नायकाला समजावून सांगत आहे. पांचहि बोटें थोडीं वांकवलीं कीं एरंडाच्या पानांसारखीं दिसतात.

---

१. स्नुषा.

एरण्ड हा खल, त्याच्या तोंडीं रहस्य राहतच नाहीं; घरधनीणीच्या सौंदर्याचें दिग्दर्शन तो प्रतीक रूपानें येणाऱ्याजाणाऱ्याला दाखवीत आहे. अभिनयअलंकारः ' तदाभूतार्थविज्ञानजनकत्वेन हेतुना । नास्मादभिनयालेख्यमुद्राबिम्बादयःपृथक् ।। ' सरस्वतीकण्ठाभरण.

२५८ गजगति : 258. Slow Motion.

गअकलहकुम्भसंणिहघणपीणणिरन्तरेहिँ तुङ्गेहिं ।
उस्ससिउं[1] पि ण तीरइ किं उण गन्तुं हअथणेहिं ।।५८।।

[गजकलभकुम्भसंनिभघनपीननिरन्तराभ्यां तुङ्गाभ्याम् ।
उच्छ्वसितुमपि न तीरयति किं पुनर्गन्तुं हतस्तनाभ्याम् ।।]

हत्तीच्या छाव्याच्या गंडस्थळासारखे मोठे, भरदार, उंच व मध्यें अंतर नसलेले असे स्तन असल्यामुळें तिला नीट श्वासही घेतां घेत नाहीं, मग झपाझप चालतां कसें येईल ?

● केव्हां केव्हां गुण हे अवगुणांसारखे वाटतात, अडचण करतात, अडवणूक करतात.

२५९ रतिरहस्य : 259. Love Technique.

मासपसूअं, छम्मासगब्भिणिं, एक्कदिअहजरिअं[2] च ।
रङ्गुत्तिण्णं च पिअं पुत्तअ ! कामन्तओ होहि ।।५९।।

[मासप्रसूतां षण्मासगर्भिणीमेकदिवसज्वरितां च ।
रङ्गोत्तीर्णां च प्रियां पुत्रक कामयमानो भव ।।]

---

१. उअसिडं. २. दियहजरजरियं.

अतिसुख देणारी स्त्री कोणती ? एक महिन्याची बाळंतीण, किंवा सहा महिन्यांची गर्भिणी; एकच दिवस ज्वर येऊन गेलेली अगर नृत्य संपवून नुकतीच रंगपटांत आलेली. पुत्रा, अशा स्त्रीवर प्रेम कर.

● गंगाधर सांगतो, नृत्यकुशल कन्येची कुट्टिनीनें केलेली ही मलावण आहे. सुखसाध्य व सुखदायक स्त्रीबद्दलचें 'अनङ्गरङ्गा'तील वचन पहाः 'रङ्गाद्विश्रातदेहा चिरविरहवती मासमात्रप्रसूता। गर्भालस्या च नव्यज्वरयुततनुका त्यक्तमानप्रसन्ना ॥ स्नाता पुष्पावसाने नवरतिसमये मेघकाले वसन्ते। प्रायःसम्पन्नरागा मृगशिशुनयना स्वल्पसाध्या रते स्यात्' ॥४·३६॥

२६० स्तनप्रशंसा : 260. Glowing Globes.

पडिवक्खमण्णुपुंञ्जे[1] लावण्णउडे[2] अणङ्गगअकुम्भे।
पुरिससअहिअअधरिए कीस थणन्ती थणे वहसि ? ॥६०॥

[प्रतिपक्षमन्युपुञ्जौ लावण्यकुटावनङ्गगजकुम्भौ।
पुरुषशतहृदयधृतौ किमिति स्तनन्ती[3] स्तनौ वहसि ॥]

तुझे स्तन तुझ्या सवतींच्या क्रोधाच्या पुंजांसारखे आहेत; जणूं सौंदर्याचे घट आहेत, मदनरूपी हत्तीच्या गण्डस्थळासारखे आहेत. शेंकडों पुरुषांचीं हृदयें त्यांचा अभिलाष करीत आहेत. सौंदर्याची गर्जना करणारें हें वक्षःस्थल एवढ्या गर्वानें तूं कोणासाठीं धारण करीत आहेस ?

● स्तन कसे असावेत ? क्रोधपुञ्जासारखे लाल, लावण्यघटांसारखे घट्ट, अनङ्गगजाच्या गण्डस्थळासारखे विशाल !

१. उज्जे. २. उले. ३. थुणन्ती (थुण्णः दृप्तः) : श्री मथुरानाथशास्त्री.

२६१ शुभ : 261. Auspicious.

घरिणिघणत्थणपेल्लणसुहेल्लिपडिअस्स होन्तपहिअस्स ।
अवसउणङ्गारअवारविट्ठिदिअहा सुहावेन्ति ॥६१॥

[गृहिणीघनस्तनप्रेरणसुखकेलिपतितस्य भविष्यत्पथिकस्य ।
अपशकुनाङ्गारकवारविष्टिदिवसाः सुखयन्ति ॥]

गृहिणीच्या घट्ट स्तनांच्या प्रेरणेमुळें सुखद वाटणाऱ्या क्रीडेंत रत झालेल्या भविष्यत्पथिकाला प्रवासाकरितां अशुभ असलेले मंगळवार व विष्टीचे दिवस शुभ वाटतात.

● शुक्लपक्षांतील द्वितीया, सप्तमी व द्वादशी हे विष्टीचे दिवस आणि मंगळवार हे प्रवासाला अशुभ होत. ते गृहस्वामीला शुभ वाटले, कारण त्यांच्या सबबीवर त्याला प्रवास लांबणीवर टाकतां आला. जें विरोधी तेंही अनुकूल होऊं शकतें.

२६१ वन्दनमालिका : 262. Expectancy.

सा तुह कएण, बालअ ! अणिसं घरदारतोरणणिसण्णा ।
ओससई वन्दणमालिअ व्व दिअहं विअ वराई[1] ॥६२॥

[सा तव कृतेन बालकानिशं गृहद्वारतोरणनिषण्णा ।
अवशुष्यति वन्दनमालिकेव दिवसमेव वराकी ॥]

बालक, तुझ्या दर्शनासाठीं ती घराच्या दरवाजावरील गच्चीवर सारखी बसून आहे. दारावर बांधलेल्या तोरणासारखी बिचारी कोमेजून गेली आहे.

---

१. साहित्यमीमांसेंतील पाठ : सातुग्धज्जणबाळअणिच्चंघरदारतोरणिणाओ । सूररवंदणमालिणव्वदिअहंमिक्किळाहिच्चिरं अवारारं ॥

● घरदार म्हणजे घराचें दार. हा शब्द हल्लीं आपण प्रपंचाचा पसारा या अर्थानें वापरतों. तोरण म्हणजे घरदारावरील गच्ची किंवा गवाक्ष; वंदनमाला म्हणजे त्यावर लावलेली माळ; हल्लीं आपण वंदनमालेलाच तोरण म्हणतों.

२६३ वठलेला वड : 263. Flock of Parrots.

हसिअं सहत्थतालं सुक्खवडं उवगएहिँ पहिएहिं ।
पत्तअफलाणँ[1] सरिसे उड्डीणे सूअविन्दम्मि[2] ॥ ६३ ॥

[हसितं सहस्ततालं शुष्कवटमुपगतैः पथिकैः ।
पत्रफलानां सदृशे उड्डीने शुकवृन्दे ॥]

(पर्णफलांनीं गर्द दिसणाऱ्या) वडाजवळ वाटसरू आले तेव्हां त्यांची चाहूल लागतांच झाडावरल्या पानांफळांसारखा दिसणारा राघूंचा समुदाय उडून गेला व वृक्ष शुष्क झाला. हें पाहतांच ते टाळ्या वाजवून हंसले.

● पोपटांचीं शरीरें हिरवीं व चोंची लाल; तशींच वडाचीं पानें व फळें. नियोजित संकेतस्थानाजवळ परक्यांचा मुक्काम पडल्यामुळें संकेत रद्द केल्याची सूचना; किंवा, तीं पानें फळें जशीं लटकीं तसाच तुझा अनुराग, अशी निर्भर्त्सना; किंवा, अगावर अलंकार चढविले तरी शुष्कपणा लोपत नाहीं, अशी सूचना; किंवा, मूर्खानें वैदग्ध्याचें अगर वृद्धानें हिरवटपणाचें ढोंग आणलें तरी तें टिकत नाहीं. सरस्वतीकण्ठाभरणांत भ्रांतीचें (अतत्त्वे तत्त्वरूपा बाधिता) उदाहरण: ' भ्रांतिर्विपर्ययज्ञानं द्विधा सापि प्रयुज्यते । अतत्त्वे तत्त्वरूपा च तत्त्वे चातत्त्वरूपिणी ॥ अतत्त्वे तत्त्वरूपा या त्रिविधा सापि पठ्यते । अबाधिता बाधिता च तथा कारणबाधिता ॥' (३:३५-३६)

१. पत्तप्फलसारिच्छे. २. पूसवग्गम्मि.

२६४ दृष्टिसुख : 264 Key-hole.

अज्ज म्हि हासिआ, मामि ! तेण पाएसु तह पडन्तेण।
तीए वि जलन्ति दीववत्तिमब्भुण्णअन्तीए ।।६४।।

[अद्यास्मि हासिता मातुलानि तेन पादयोस्तथा पतता।
तथापि ज्वलन्तीं दीपवर्तिमभ्युत्तेजयन्त्या ।।]

पति अनुनय करतांना पत्नीच्या पायां पडत होता आणि ती दिव्याची ज्योत उजळवीत होती. मामी, हें पाहून मी मात्र हंसत होतें.

● अनुनयाचें दृश्य दाखवीन असें पत्नीनें सखीला कबूल केलें होतें, सारा प्रकार दिसेल अशा जागीं बसविलें होतें आणि स्पष्ट दिसावें म्हणून दिव्यांतली वात ती पुढें पुढें सरकवीत होती. अशीं व यांहून अधिक जिव्हाळ्याचीं दिलखुष दृश्यें अधूनमधून आजूबाजूला दिसतात; पण एवढ्या सोयी करणाऱ्या मित्रमैत्रिणी विरळा. फार वर्षांपूर्वी वाचलेली व आतां संदर्भ विसरलेली एक जर्मन गोष्ट आठवते. कथावस्तु अशीः राणीचें संपूर्ण सौंदर्य व कौशल्य निरखतां यावें म्हणून राजानें जिवलग मित्राला अंतः-पुरांतील सूक्ष्म गवाक्षाआड लपवून बसविलें. राणी इतकी नाजूक व पतिव्रता कीं परक्याच्या दृष्टिक्षेपांनीं तिचें अंग भाजलें. याचें रहस्य ओळखून तिनें दोघांनाही या अत्याचाराचें योग्य प्रायश्चित्त दिलें. तसा कांहीं प्रकार येथें झाला नाहीं. शारीरिक पावित्र्याच्या दृष्टीनें परस्त्री व परपुरुष दोघेही सारखीच; पण मनोवृत्तींत व प्रतिक्रियेंत केवढा फरक !

२६५ सौजन्य : 265. Mask.

अणुवत्तणं कुणन्तो वेसे वि जणे अहिण्णमुहराओ।
अप्पवसो वि हु सुअणो परव्वसो आहिआईए ।।६५।।

---

१. अब्भुत्तअंतीए. २. उज्वलयन्त्या, अभ्युन्नयन्त्या. ३. अभिण्ण.

[अनुवर्तनं कुर्वन्द्वेष्येऽपि जनेऽभिन्नमुखरागः ।
आत्मवशोऽपि[1] खलु सुजनः परवशः कुलीनतायाः[2] ॥]

सुजन हा वृत्तीनें स्वाधीन असला तरी आभिजात्यामुळें पराधीन असतो. त्याला द्वेष्यांना तोषवावें लागतें आणि मनोविकार मुखावर प्रकट होणार नाहींत अशी खबरदारी घ्यावी लागते.

● सखी सांत्वन करते कीं पति सवतीकडे स्नेहामुळें किंवा स्वखुषीनें गेला नाहीं, कुलीनत्वामुळें, नाइलाज म्हणून गेला.

२६६ आदर : 266. Honour.

अणुदिअहवड्ढिआअरविण्णाणगुणेहिँ जणिअमाहप्पो ।
पुत्तअ ! अहिआअजणो विरज्जमाणो व्वि दुल्लक्खो ॥६६॥

[अनुदिवसवर्धितादरविज्ञानगुणैर्जनितमाहात्म्यः ।
पुत्रकाभिजातजनो विरज्यमानोऽपि दुर्लक्ष्यः ॥]

पुत्रा, ती कुलीन व विदग्ध आहे. दिवसानुदिवस ती तुझ्याबद्दल अधिकाधिक आदर दर्शवीत आहे. आपले गुण व ज्ञान हीं तिच्या प्रत्ययास आल्यामुळें आपलें माहात्म्य वाढलें आहे असा गैरसमज करून घेऊं नको. ती तुझ्याविषयीं विरक्त होत आहे आणि तूं तिच्याकडे दुर्लक्ष करीत आहेस.

● विदग्ध व कुलीन वनितांच्या वर्तनाचें रहस्य तुला समजत नाहीं. तुझी अन्यवनितासक्ति तिच्या निदर्शनास आलेली आहे. हा आदर औदासीन्याचा द्योतक आहे. तिची विरक्ति दृढ होण्यापूर्वीच तिला प्रसन्न करून घे.

---

१. अपरवशो. २. आभिजात्याः .

२६७ लज्जा : 267. Disgrace.

विण्णाणगुणमहग्घे पुरिसे वेसत्तणं[1] पि रमणिज्जम् ।
जणणिन्दिए उण जणे पिअत्तणेणावि लज्जामो ॥६७॥

[विज्ञानगुणमहार्घे पुरुषे द्वेष्यत्वमपि रमणीयम् ।
जननिन्दिते पुनर्जने प्रियत्वेनापि लज्जामहे ॥]

ज्ञानी, गुणी व पूज्य अशा पुरुषाबरोबर वैर केलेलें पुरवलें, पण लोकनिंदेला पात्र झालेल्याबरोबर स्नेह केला तर त्यामुळें लज्जा प्राप्त होते.

● गंगाधर सांगतो, नायिका नवऱ्याबद्दल वैराग्य आणि अन्य विदग्धाबद्दल अभिलाष प्रकट करीत आहे !

२६८ अस्थिर : 268. Transitory.

कहँ णाम तीअ तह सो सहावगुरुओ वि थणहरो[2] पडिओ ।
अहवा महिलाणँ चिरं को वि ण हिअअम्मि संठाइ ॥६८॥

[कथं नाम तस्यास्तथा स स्वभावगुरुकोऽपि स्तनभरः पतितः ।
अथवा महिलानां चिरं कोऽपि न हृदये[3] संतिष्ठते ॥]

स्वभावतः भरदार व विशाल अशा तिच्या स्तनांचें अधःपतन कसें झालें ? खरोखर, महिलांच्या हृदयात कांहींही चिरकाल राहूं शकत नाहीं.

● सौंदर्याचा व यौवनाचा गौरव करण्यासाठीं निसर्ग स्तनांना उच्च स्थान व उत्तुंग स्थिति देतो. प्रजोत्पादनामुळें होणारें त्यांचें अधःपतनही नैसर्गिकच आहे. स्त्रियांच्या हृदयांत प्रेम तरी चिरकाल कोठें टिकतें ! जें चंचल तें उच्च कसें असणार !

---

१. दासत्तणं. २. स्तनयुग्मं. ३. हृदये न संस्थायी, हृदये को नाम संतिष्ठति.

२६९ माथ्यावर पदर : 269. Veil.

सुअणु ! वअणं छिवन्तं सूरं मा साउलीअे वारेहि ।
एअस्स पङ्कअस्स अ जाणउ कअरं सुहप्फंसम् ॥६९॥

[सुतनु वदनं स्पृशन्तं सूर्यं मा वस्त्राञ्चलेन[२] वारय ।
एतस्य पङ्कजस्य च जानातु कतरत्सुखस्पर्शम् ॥]

सुंदरी, तुझ्या मुखाला सूर्यकिरण स्पर्श करीत आहेत. पदरानें त्यांचें निवारण करूं नकोस. कमलाचा स्पर्श अधिक सुखदायक कीं तुझा, हें सूर्याला कळूं दे.

● मला वाटतें, तिनें माथ्यावर पदर घेतला होता. तिचें सौंदर्य नीट दिसावें, म्हणून ही खुशामत चालली आहे.

२७० रुसव्यावर औषध : 270. Dose.

माणोसहं व पिज्जइ पिआइ माणंसिणीअ दइअस्स ।
करसंपुडवलिउद्धाणणाइ[३] मइराइ गण्डूसो ॥७०॥

[मानौषधमिव पीयते प्रियया मनस्विन्या दयितस्य ।
करसंपुटवलितोर्ध्वाननया मदिराया गण्डूषः ॥]

रुसलेल्या प्रियेचें मुख दयितेनें ओंजळींत धरून वर उचललें, जरासें वळवलें आणि आपल्या मुखांतील मदिरेचा घोंट तिला पाजला. रुसव्यावरील औषध म्हणूनच ती तो प्याली.

● औषध पाजतांना थोडीबहुत जबरदस्ती करावीच लागते. जणूं तिला तें किंवा ती नकोच होती ! आणि या औषधाचा गुण तरी किती त्वरित !! मात्र तें अनुपानासह दिलें तरच ! ! !

---

१. साहुली, साकुलीअ. २. पल्लवछत्तिकया, पर्णछत्रया. ३. उत्तान.

२७१ दौर्बल्य : 271. Weakness.

कहँ सा णिव्वण्णिज्जइ जीअ जहा लोइअम्मि अङ्गम्मि ।
दिट्ठी दुब्बलगाई व्व पङ्कपडिआ ण उत्तरइ ? ॥७१॥

[कथं सा निर्वर्ण्यतां यस्या यथालोकितेऽङ्गे ।
दृष्टिर्दुर्बला गौरिव पङ्कपतिता नोत्तरति ॥]

चिखलांत रुतलेल्या दुबळ्या गाईला पाय बाहेर काढतां येत नाहीं; सुंदरीच्या एकेका अवयवाकडे पाहतांना दृष्टि तशीच, तेथेंच खिळून राहते; तेव्हां तिच्या संपूर्ण सौंदर्याचें अवलोकन कसें करायचें ?

● गाथा क्र. २३४ पहा; पुनरुक्ति.

२७२ मैत्री : 272. Friendship.

कीरन्ती व्विअ णासइ उअए रेह व्व खलअणे मेत्ती ।
सा उण सुअणम्मि कआ अणहा पाहाणरेह व्व ॥७२॥

[क्रियमाणैव नश्यत्युदके रेखेव खलजने मैत्री ।
सा पुनः सुजने कृता अनघा पाषाणरेखेव ॥]

खलांची मैत्री, पाण्यावरली रेघ; ओढली न ओढली तोंच नष्ट होते. सज्जनांची मैत्री, पाषाणावरली रेघ, एकदां कोरली कीं कायमची.

● अलंकाररत्नाकरांत उपमेचें उदाहरण: 'उपमानोपमेयस्य सादृश्यमुपमा ।'

२७३ जटा : 273. Matted Locks.

अव्वो दुक्करआरअ ! पुणो वि तन्ति करेसि गमणस्स ।
अज्ज वि ण होन्ति सरला वेणीअ तरङ्गिणो चिउरा ॥७३॥

१. पाहाण. २. चिहुरा.

[अथो दुष्करकारक पुनरपि चिन्तां करोषि गमनस्य ।
अद्यापि न भवन्ति सरला वेण्यास्तरङ्गिणश्चिकुराः ॥]

माझ्या केसांच्या जटा अजून सुटल्या नाहींत, तोंच तुम्ही फिरून प्रवासाला जाण्याचा विचार करीत आहांत. च् च् ! तुम्हांला अवघड कामांचीच आवड भारी.

● पति प्रवासांत असतांना पत्नीनें वेणीफणी करावयाची नसते. गुंता झालेल्या जटाच्या सुलल्या सौंदर्यबटा होण्याला किती तरी काळ लागतो !

२७४ चर्वितचर्वण : 274. Repetition.

ण वि तह छेअरआइँ वि हरन्ति पुणरुत्तराअरसिआइं ।
जह जेत्थ व तत्थ व जह व तह व सब्भावणेहरमिआइं ॥७४॥

[नापि तथा छेकरतान्यपि हरन्ति पुनरुक्तरागरसिकानि ।
यथा यत्र वा तत्र वा यथा वा तथा वा सद्भावस्नेहरमितानि ॥]

अंत:करणपूर्वक झालेला संभोग, मग तो कोणत्याही जागीं व कशाही प्रकारें केलेला असो, त्यामुळें रसिकांना होतें तेवढें सुख सुरतशास्त्रोक्त समागमांत होत नाहीं.

● कारण तें शिळें, तांत्रिक, चार्वितचर्वणासारखें वाटतें. खऱ्या प्रेमाला शास्त्राधार लागत नाहीं. त्याला कामशास्त्राचें तात्त्विक ज्ञान नाहीं, म्हणून त्याचा अव्हेर करूं नको. काव्यालंकारांचें विवरण फक्त पण्डितांनाच करतां येईल, पण रसग्रहण कोणाही विदग्ध रसिकाला. गंगाधर सांगतो, दुर्विदग्ध धनिकाचा घसमुसळेपणा झांकण्यासाठीं धूर्ता स्नेहप्रशंसा करीत आहे !

१. सुरआइं. २. रमिआइं. ३. जत्थव तत्थव. ४. सब्भावरमिआइं.

२७५ सवतींचें ओझें : 275. Load.

उज्झसि पिआइ समअं तह वि हु रे भणसि कीस किसिअं ? त्ति ।
उवरिभरेण अ अण्णुअ ! मुअइ बइल्लो वि अङ्गाइं ॥७५॥

[उह्यसे प्रियया समं तथापि खलु रे भणसि किमिति कृशेति ।
उपरि भरेण च हे अज्ञ मुञ्चति[1] बलीवर्दोऽप्यङ्गानि ॥]

कां ग, तूं एवढी कशानें वाळलीस, असें तुम्ही मला विचारतां; माझ्या हृदयांत तुम्ही आलांत आणि तुमच्याबरोबर तुमच्या प्रिया व माझ्या सवती. हे अज्ञ, एवढें ओझें लादलें तर बैल सुद्धां कृश होईल.

● आणि मी तर बोलून चालून अबला. बैल वाळला ओझ्यानें, बायको सुकली मत्सरानें ! तुम्ही एकटे असे मला कधीं दिसतच नाहीं; एकान्तांतही त्या तुमच्याभोंवतीं दिसतात, त्या साऱ्या जणी माझा उपहास करीत आहेत असा भास होतो. सरस्वतीकण्ठाभरणांत सहोक्तीचें उदाहरण: ' कर्त्रादीना समावेशः सहान्यैर्यः क्रियादिषु । विविक्तश्चाविविक्तश्च सहोक्तिः सा निगद्यते ॥ वैसादृश्यवती चेयमुच्यमाना मनीषिभिः । सहेवादिप्रयोगेषु ससादृश्याच दृश्यते ॥ ' (४:५७-५८)

२७६ गांठभेट : 276. Knot.

दिढमूलबन्धगण्ठि व्व मोइआ कहँ वि तेण मे बाहू ।
अम्हेहि ँ वि तस्स उरे खुत्त व्व समुक्खआ थणआ ॥७६॥

[दृढमूल[1]बन्धग्रन्थी इव मोचितौ कथमपि तेन मे बाहू ।
अस्माभिरपि तस्योरसि निखाताविव समुत्खातौ स्तनौ ॥]

१. गूढ.

ज्यांची जणूं घट्ट गांठ बांधलेली आहे असे माझे बाहु त्यांनीं कसे तरी सोडविले आणि माझे स्तन जणूं त्यांच्या छातींत रुतले होते ते मी उपसून काढले.

● जें मौल्यवान तें अवगुंठित करतांना गांठ जरा घट्टच मारावी लागते; जें मौल्यवान तेंच पुरून ठेवण्यांत व उकरून काढण्यांत येतें.

२७७ अगणित : 277. Innumerable.

अणुणअपसाइआए तुज्झ वराहे चिरं गणन्तीए ।
अपहुत्तोहअहत्थङ्गुरीअ तीए चिरं रुण्णम्[1] ॥७७॥
[अनुनयप्रसादितया तवापराधांश्चिरं गणयन्त्या ।
अप्रभूतोभयहस्ताङ्गुल्या तया चिरं रुदितम्[2] ॥]

अनुनयामुळें प्रसन्न झाल्यानंतर ती तुझ्या अपराधांची गणना करूं लागली; मोजतांना दोन्हीं हातांचीं बोटें संपलीं; तेव्हां ती रडूं लागली.

२७८ घाम : 278. Sweat.

सेअच्छलेण पेच्छइ ! तणुए अङ्गम्मि से अमाअन्तम् ।
लावण्णं ओसरइ व्व तिवलिसोवाणवत्तीए ॥७८॥
[स्वेदच्छलेन पश्यत तनुकेऽङ्गे तस्या अमात् ।
लावण्यमपसरतीव त्रिवलीसोपानपङ्क्तिभिः ॥]

नाजूक शरीरांत लावण्य मावत नाहीं, म्हणूनच जणूं घामाच्या रूपानें व त्रिवलीच्या मार्गानें तें ओसंडत आहे.

---

१. रुण्णं वराईए. २. रुदितं वराक्या.

● नर्तनाच्या परिश्रमामुळें स्वेदयुक्त झालेल्या दुहितेच्या सौंदर्याची वेश्यामातेनें प्रलोभनार्थ केलेली प्रशंसा; किंवा, चौर्यरतगोपनार्थ सखीची उक्ति. या गाथेंतील त्रिवलीची योजना यथार्थ वाटत नाहीं.

२७९ समाधान : 279. Fate.

देव्वाअत्तम्मि फले किं कीरइ, एत्तिअं पुणो भणिमो।
कङ्केल्लिपल्लवाणं ण पल्लवा होन्ति सारिच्छा॥७९॥

[दैवायत्ते फले किं क्रियतामियत्पुनर्भणामः।
कङ्केल्लिपल्लवानां[1] न पल्लवा भवन्ति सदृशाः॥]

पुन्हां सांगतें, आपण फक्त कर्म करावयाचें, फळ मिळणें न मिळणें दैवाचे हातीं असतें. अशोकासारखीं सुंदर पानें दुसऱ्या कोणत्याही झाडाला येत नाहींत.

● अशोकाला सुंदर पानें फुलें असतात, पण आंब्यासारखीं मधुर फळें नसतात, म्हणून काय त्याचें सौंदर्य हिणकस ठरतें ? गुणी नायकापासून द्रव्यलाभ झाला नाहीं तरी हरकत नाहीं, मिळेल त्यात समाधान मानलें पाहिजे, कारण त्याच्या सहवासांत सुखसर्वस्वाची प्राप्ति होणार. अलंकारकौस्तुभांत संकराचें उदाहरण : 'साधकबाधकमानाभावाच्चैकस्य निर्णयाभावे।' श्रीविश्वेश्वर पण्डित टीकेंत सांगतात : 'अत्र प्रकृष्टगुणनायकप्रतीतिः प्रकृताशोकवृत्तान्तेनेति समासोक्तिः। किं वा अप्रस्तुताशोकवृत्तान्तेन प्रस्तुतपुरुषप्रतीत्या अप्रस्तुतप्रशंसेत्युभयसंभावात्संदेहः। प्रकरणादेर्निवाहकस्याभावात्।'

२८० कलङ्क : 280. Spot.

धुअइ व्व मअकलङ्कं कवोलपडिअस्स माणिणी, उअह!।
अणवरअवाहजलभरिअणअणकलसेहिँ चन्दस्स॥८०॥

१. रक्ताशोकपल्लवाः, पल्लवानामन्येषां.

[धावतीव मृगकलङ्कं कपोलपतितस्य मानिनी पश्यत ।
अनवरतबाष्पजलभृतनयनकलशाभ्यां चन्द्रस्य ॥]

पहा, तिच्या गालावर प्रतिबिंबित झालेला चंद्र हा जणूं चंद्रावरील मृगकलङ्कासारखा दिसत आहे; जणूं नेत्रांच्या कलशांतून सारख्या वाहणाऱ्या अश्रूंच्या धारांनीं मानिनी हा कलङ्क धुवून काढीत आहे.

● कलहान्तरिता नायिका: वस्तुतः अश्रूंबरोबर ओघळणाऱ्या काजळामुळें तिच्या आरसपाणी, गालांवर चंद्रावरील मृगाङ्कासारखा कलङ्क निर्माण झाला होता. 'चंद्र तुझा पहा मुखचंद्रावर येउनिया बैसला कसा । प्रत्यक्ष भासतो फणीवर त्या नागाचा मणी जसा ॥' [अनंतफंदी : लावण्या पृ. ८०.]

२८१ अङ्ग सुगन्ध : 281. Aroma.

गन्धेण अप्पणो मालिआणँ णोमालिआ ण फुट्टिहइ ।
अण्णो को वि हआसइ मंसलो परिमलुग्गारो ॥८१॥

[गन्धेनात्मनो मालिकानां नवमालिका[1] न च्युता भविष्यति ।
अन्याः कोऽपि हताशाया मांसलः परिमलोद्गारः ॥]

नवमालिकेचें फूल इतर फुलांबरोबर माळेंत गुंफलें तरी तें आपल्या सुगंधापासून च्युत होत नाहीं. हा गर्द सुगंध इतरांहून वेगळाच असतो व तो इतरांना हताश करतो.

● तिचा पति बहुवल्लभ असला तरी हिचे गुण अद्वितीय आहेत, म्हणून तो तिच्यावर अत्यंत अनुरक्त आहे, म्हणून ती अप्राप्य आहे अशी सूचना; किंवा, निराश होऊं नको, तिला अनेक सवती असल्यामुळें ती आज नाहीं उद्यां अनुकूल होईल, असें आश्वासन. देहाचा विशिष्ट सुगंध मांसल या शब्दानें व्यक्त केलेला आहे, कीं केवळ गर्द गंध अभिप्रेत आहे ?

१. नवमल्लिका.

२८२ संपत्ति–विपत्ति : 282. Prosperity & Adversity.

फलसंपत्तीअ समोणआइँ तुङ्गाइँ फलविपत्तीए।
हिअआइ सुपुरिसाणं महातरूणं व सिहराइं ॥८२॥

[फलसंपत्त्या समवनतानि तुङ्गानि फलविपत्त्या ।
हृदयानि सुपुरुषाणां महातरूणामिव शिखराणि ॥]

मोठ्या झाडांच्या फांद्यांप्रमाणें मोठीं माणसें संपन्न झालीं कीं नम्र होतात आणि विपत्काळीं उन्नत होतात.

● फलभारानें फांद्या लवतात. वैभवप्राप्तीमुळें सुजन विनीत होतात आणि समृद्धीचा बहर संपला कीं उन्नत होतात. तुलनेसाठीं (नीतिशतकम् : ६१) ' भवन्ति नम्रास्तरवः फलोद्गमैर्नवाम्बुभिर्दूरविलंबिनो घनाः। अनुद्धताः सत्पुरुषा समृद्धिभिः स्वभाव एवैष परोपकारिणाम् ॥ त्याचप्रमाणें ' विपदि धैर्यमथाभ्युदये क्षमा ' हें महात्मनांचें लक्षण होय असें भर्तृहरीनें (नीति : ५२) सांगितलेलें आहे. गंगाधर सांगतो, या गाथेतील उद्गार कुट्टिनीचे आहेत व ते नष्टधन भुजंगाला उत्साहित करण्यासाठीं काढलेले आहेत ! ' दीपकअलंकार. '

२८३ धुगधुगी : 283. Pulsation.

आसासेइ परिअणं परिवत्तन्तीअ पहिअजाआए।
णित्थाणुवत्तणे वलिअहत्थमुहलो वलअसद्दो ॥८३॥

[आश्वासयति परिजनं परिवर्तमानायाः पथिकजायायाः ।
निःस्थामवर्तने वलितहस्तमुखरो वलयशब्दः ॥]

१. सुउरिसाणं. २. निःसहवर्तनवलित.

प्रवासाला गेलेल्या पतींची जाया विरहाच्या दुःखामुळें दुबळी झाली आहे. कुशीवरून वळतांना तिच्या बांगड्यांचा आवाज होतो व तेवढ्यानें नोकर माणसांच्या जीवांत जीव येतो.

२८४ सूर्यास्त : 284. Setting Sun.

तुङ्गो च्चिअ होइ मणो मणंसिणो अन्तिमासु वि दसासु ।
अत्थमणम्मि वि रइणो किरणा उद्धं च्चिअ फुरन्ति ॥८४॥

[तुङ्गमेव भवति मनो मनस्विनोऽन्तिमास्वपि दशासु ।
अस्तमनेऽपि रवेः किरणा ऊर्ध्वमेव स्फुरन्ति ॥]

मोठ्या मनाचे लोक निकृष्टावस्थेस पोंचले तरी त्यांचा स्वाभाविक मोठेपणा कायम असतो. सूर्य अस्तमानाला जात असतांही त्याचे किरण उर्ध्व दिशेलाच स्फुरण पावतात.

२८५ उद्धार : 285. Natural Inclination.

पोट्टं भरन्ति सउणा वि माउआ ! अप्पणो अणुव्विग्गा ।
विहलुद्धरणसहावा हुवन्ति जइ के वि सप्पुरिसा ॥८५॥

[उदरं बिभ्रति शकुना अपि हे मातर आत्मनोऽनुद्विग्नाः ।
विह्वलोद्धरणस्वभावा भवन्ति यदि केऽपि सत्पुरुषाः ॥]

आई, पांखरें सुद्धां पोट भरतात, त्यांना कशाचीही काळजी नसते. पण जे सत्पुरुष असतात त्यांची स्वाभाविक प्रवृत्ति दीनांचा उद्धार करण्याकडे असते.

---

१. विअलुद्धरणसमत्था. २. विकलोद्धरण.

● पक्षी मांसभक्षक असतात, आपल्या उदरंभरणासाठीं इतरांची हिंसा होते याची त्यांना जाणीव नसते, दुसरा तृप्त झाला आहे किंवा कसें याची पर्वा नसते. दूती सांगते, नायकाची विपन्नावस्था असली तरी ती त्याला विह्वलोद्धारामुळें प्राप्त झालेली आहे; त्याला विन्मुख पाठवूं नको, तो गुणी आहे, त्याचा उद्धार कर.

२८६ कांजी : 286. Old-Fox.

ण विणा सब्भावेण घेप्पइ[1] परमत्थजाणुओ लोओ ।
को जुण्णमज्जरं कञ्जिएण वेआरिउं तरइ ? ॥८६॥

[न विना सद्भावेन गृह्यते परमार्थज्ञो लोकः ।
को जीर्णमार्जारं काञ्जिकया प्रतारयितुं शक्नोति ॥]

ज्ञानी मनुष्य सद्भावाशिवाय आपलासा होत नाहीं. कांजी दाखवून म्हाताऱ्या मांजराला कसें फसवितां येईल ?

● कृत्रिम हावभावांनीं हुरळण्याइतका तो प्रेमव्यवहारांत नवखा नाहीं, अशी विदग्ध सखीची सूचना.

२८७ प्रेम : 287. Love.

रण्णाउ[2] तणं रण्णाउ पाणिअं सव्वअं[3] सअंगाहम् ।
तह वि मआणँ मईणँ अ आमरणन्ताइँ पेम्माइं ॥८७॥

[अरण्यात्तृणमरण्यात्पानीयं सर्वतः स्वयंग्राह्यम् ।
तथापि मृगाणां मृगीणां चामरणान्तानि प्रेमाणि ॥]

१. घेप्पइ. २. अरण्णादु. ३. सव्वदो.

अरण्यांत पाणी व तृण आपोआप व हवें तेवढें मिळतें. मृग व मृगी एकमेकांना कांहीं देत घेत नाहींत, तरी त्यांचें प्रेम आमरण कायम असतें. प्रेम देवघेवीवर अवलंबून नसतें.

● कबूल केल्याप्रमाणें त्यानें अलंकार आणले नाहींत म्हणून असंतुष्ट होऊं नको, त्याचा अव्हेर करूं नको अगर त्याचें प्रेम शिथिल झालें आहे असें मानूं नकोस. कुशल दूतीचें आश्वासन व प्रोत्साहन. अलंकार-कौस्तुभांत अप्रस्तुतप्रशंसेचें उदाहरण : 'अप्रस्तुतप्रशंसा प्रकृतप्रतिपत्तिरेया यत्र । कार्ये हेतौ व्याप्यव्यापकयोरन्यगीः समेतस्य ॥'

२८८ चन्दन : 288. Sandal Paste.

तावमवणेइ ण तहा चन्दणपङ्को वि कामिमिहुणाणम् ।
जह दूसहे वि गिम्हे अण्णोण्णालिङ्गणसुहेल्ली[1] ॥८८॥

[तापमपनयति न तथा चन्दनपङ्कोऽपि कामिमिथुनानाम् ।
यथा दुःसहेऽपि ग्रीष्मे अन्योन्यालिङ्गनसुखकेलिः[2] ॥]

असह्य अशा ग्रीष्मांतही प्रेमी जोडप्याचा ताप चन्दनाच्या लेपानें नष्ट होत नाहीं, आलिंगनाच्या विलासामुळें प्राप्त होणाऱ्या सुखानेंच तो शांत होतो.

● उन्हाळ्यांत कोणी जवळपास फिरकलें तरी काहिली होते, स्वतःच्या अवयवांनाही परस्परांचा स्पर्श असह्य होतो. पण प्रेमाचें तंत्रच वेगळें. प्रेमाचा उद्भव मनस्तापजनक व आलिंगन ऊष्मोत्पादक. तरीही आणि उन्हाळ्यांतही प्रेमामुळें तें सुखकारक व शीतल वाटतें. चंदनाची मध्यस्थीही असह्य होते. विरहिणी म्हणते, सख्यांनों, माझ्या अंगाला चंदन कशाला

१. महल्ली. २. सुखार्द्रिः.

लावतां ? या तापाचें नीट निदान करून योग्य तो उपाय अनुपानासह योजा. अलंकाररत्नाकरांत संकराचें उदाहरण : 'अङ्गत्वे तु संकरः ।' 'अत्र चन्दनपङ्करूपादुपमानादन्योन्यालिङ्गनस्याधिक्येन तापापनयाद् व्यतिरेकस्य तापजनकाद् गाढालिङ्गनात् तापस्योपशम इति व्याघातसंकरः ।'

२८९ न्हाणुली : 289. Face Cream.

तुप्पाणणा किणो चिट्ठसि त्ति पडिपुच्छिआएँ वहुआए ।
विउणावेढिअजहणत्थलाइ लज्जोणअं हसिअम् ॥८९॥

[घृतलिप्तानना[1] किमिति तिष्ठसीति परिपृष्टया वध्वा ।
द्विगुणावेष्टितजघनस्थलया लज्जावनतं हसितम् ॥]

तूं तोंडाला तूप लावून कां उभी आहेस, असें वधूला विचारलें, तेव्हां तिनें लाजून, जरासें हंसून, मान खालीं घातली आणि नेसतें वस्त्र जघनाभोंवतीं दुहेरी गुंडाळून घेतलें.

● ती कांहीं बोलली नाहीं, कारण रजस्वलेला पतीशीं बोलणेंही निषिद्ध आहे. आरंभीं तरी असे आचार पाळीत असत असें दिसतें.

२९० विलीन : 290. Merger.

हिअअ च्चेअ विलीणो ण साहिओ जाणिऊण घरसारम् ।
बान्धवदुक्खअणं विअ दोहलओ दुग्गअवहूए ॥९०॥

[हृदय एव विलीनो न कथितो ज्ञात्वा गृहसारम् ।
बान्धवदुर्वचनमिव दोहदो दुर्गतवध्वा ॥]

---

1. घृतलिप्तालका.

दरिद्री कुटुंबांतल्या वधूनें घरची परिस्थिति जाणून डोहाळे कोणाला सांगितले नाहींत. कानीं आलेल्या बान्धवांच्या दुर्वचनांप्रमाणें तेंही हृदयांत जिरवून टाकले.

● दरिद्री कुलवधूला परिस्थित्यनुरूप संयमाचा व मौनधारणाचा उपदेश.

२९१ अंबाडा : 291. Barber.

धावइ विअलिअधम्मिल्लसिचअसंजमणवावडकरग्गा ।
चन्दिलभअविवलाअन्तडिम्भपरिमग्गिणी घरिणी ॥९१॥

[धावति विगलितधम्मिल्लसिचयसंयमनव्यापृतकराग्रा ।
चन्दिलभयविपलायमानडिम्भपरिमार्गिणी गृहिणी ॥

न्हाव्याच्या धास्तीनें धांवणाऱ्या मुलग्याला धरण्यासाठीं पळणारी गृहिणी आपला सैल झालेला अंबाडा बोटांनीं सांवरीत आहे.

● धांवपळीमुळें सैल झालेला अंबाडा ती बोटांनीं सांवरीत आहे, हातांनीं नव्हे; एवढ्या गडबडींत केवढा नखरा! आणखी हें पाहिलेंत का? तिचा पदरही जाग्यावर नाहीं. यामुळें प्रकट झालेली शोभा कवि दाखवीत आहे. गंगाधराच्या मतें हे उद्गार तिच्या सवतीचे आहेत. मुलगा एवढा मोठा झाला आणखी ही निलाजरी भररस्त्यांतून उंडारल्यासारखी, बगला दाखवीत, धांवपळ करीत आहे; कुलस्त्रियांना हें शोभत नाहीं, असे सपत्नीचे निषेधोद्गार. अलंकाररत्नाकारांत स्वभावोक्तीचें उदाहरण : ' सम्यक् स्वभाववर्णनं स्वभावोक्तिः । '

२९२ भरती–ओहोटी : 292. Ebb & Tide.

जह जह उव्वहइ वहू णवजोव्वणमणहराइँ अङ्गाइं ।
तह तह से तणुआअइ मज्झो, दइओ अ पडिवक्खो ॥९२॥

१. मग्गेसिणि, मग्गेसिणी.

[यथा यथोद्वहते वधूर्नवयौवनमनोहराण्यङ्गानि ।
तथा तथा तस्यास्तनूयते मध्यो दयितश्च प्रतिपक्षः ॥]

वधूच्या अंगप्रत्यंगावर नवयौवनाचें सौंदर्य बहरूं लागलें; तसतशी तिची कंबर, तिचा पति व तिच्या सवती कृश होऊं लागल्या.

● तुल्ययोगिता अलंकार

२९३ पक्व प्रेम : 293. Ripe Love.

जह जह जरापरिणओ होइ पई दुग्गओ विरूओ वि ।
कुलबालिआणँ तह तह अहिअअरं वल्लहो होइ ॥९३॥

[यथा यथा जरापरिणतो भवति पतिर्दुर्गतो विरूपोऽपि ।
कुलपालिकानां तथा तथाधिकतरं वल्लभो भवति ॥]

पति दरिद्री व कुरूप असला तरी तो जसजसा म्हातारा होत जातो तसतसा कुलीन पत्नीला तो अधिकच प्रिय होतो.

● बिजवराबद्दल किंवा वयस्क पतीबद्दल उदासीन असणाऱ्या तरुण वधूप्रत पतिव्रता सखीचे उपदेशोद्गार. समसुखदुःखामुळें व साहचर्यामुळें पतिपत्नीचें प्रेम अकृत्रिम व निरुपाधिक असतें; तें रूप, वय, गुण यांवर अवलंबून नसतें. एक टीकाकार सांगतो, दारिद्र्यामुळें व वृद्धावस्थेमुळें तो यापुढें इतरत्र प्रेमप्रसंग करूं शकणार नाहीं म्हणून तो पत्नीला अधिकाधिक प्रिय होतो.

२९४ पाळी : 294. Queue.

एसो मामि ! जुवाणो वारंवारेण जं अडअणाओ ।
गिम्हे गामेक्कवडोअअं व किच्छेण पावन्ति ॥९४॥

[एष मातुलानि युवा वारंवारेण यमसत्यः ।
ग्रीष्मे ग्रामैकवटोदकमिव कृच्छ्रेण प्राप्नुवन्ति ॥]

मामी, गांवांतल्या वडाखालच्या एकाच एका विहिरीचें पाणी उन्हाळ्यांत मोठ्या कष्टानें, पाळीपाळीनें मिळतें; त्याचप्रमाणें या एकाच एका तरुणाचा लाभ येथील स्वैरिणींना फार आयासानें होतो.

● आणि तो मला अनायासें प्राप्त झाला असे असतीचे अभिमानोद्गार.

२९५ हर्षखेद : 295. Falling Leaves.

गामवडस्स, पिउच्छा ! आवण्डुमुहीणँ पण्डुरच्छाअम् ।
हिअएण समं असईणँ पडइ वाआहअं पत्तम् ॥९५॥

[ग्रामवटस्य पितृष्वस आपाण्डुमुखीनां पाण्डुरच्छायम् ।
हृदयेन सममसतीनां पतति वाताहतं पत्रम् ॥]

आत्याबाई, गांवाजवळच्या वडाचीं पानें वाऱ्याच्या सोंसाट्यानें गळून पडत आहेत आणि एकेका पानाबरोबर एकेका असतीची मुद्रा पांढरी फटफटीत होत आहे; जणूं एकेकीचें हृदयच गळून पडत आहे.

● संकेतस्थान नष्ट झाल्यामुळें आपला परसुरतलम्पट पति याउपर तिकडे जाणार नाहीं म्हणून कुलवधूला संतोष वाटला आणि असतीला खेद.

२९६ प्रथमानुराग : 296. Inaudible.

पेच्छइ अलद्धलक्खं, दीहं णीससइ, सुण्णअं हसइ ।
जह जम्पइ अफुडत्थं तह से हिअअट्ठिअं किं पि ॥९६॥

[पश्यत्यलब्धलक्ष्यं दीर्घं निःश्वसिति शून्यं हसति ।
यथा जल्पत्यस्फुटार्थं तथा तस्या हृदयस्थितं किमपि ॥]

ती विमनस्क दृष्टीनें पाहत आहे, दीर्घ निःश्वास टाकीत आहे, शून्य मुद्रेनें हंसत आहे, अस्फुट व असंबद्ध बोलत आहे; तिच्या मनांत कांहीं तरी घोटाळत आहे.

● प्रथमानुरागांतील विप्रलंभ.

२९७ सारवासारव : 297. Bold.

गहवइ ! गओम्ह सरणं रक्खसु एअं त्ति अडअणा भणिरी ।
सहसागअस्स तुरिअं पइणो व्विअ जारमप्पेइ ॥९७॥

[गृहपते गतोऽस्माकं शरणं रक्षैनमित्यसती भणित्वा ।
सहसागतस्य त्वरितं पत्युरेव जारमर्पयति ॥]

पति अकल्पितपणें घरीं आलेला पाहतांच पुढें होऊन व्यभिचारिणी म्हणाली, कारभारी, हा आपल्याला शरण आलेला आहे, आतां तुम्हीच याचें रक्षण करा. एवढें बोलून तिनें आपला जार पतीच्या हवालीं केला.

● प्रत्युत्पन्नमती असती. ती पतीला गृहपति, घरधनी म्हणते; बिचारा फक्त घराचा धनी होता. स्त्रीचरित्रांत अशा आशयाच्या अनेक गोष्टी आहेत. सावकार व त्याचा पुत्र, किंवा प्रधान व त्याचा पुत्र, दोघेही एकमेकांना न कळत अगर चुकवून व्यभिचारिणीकडे येत असत. एके दिवशीं संकेतांच्या गफलतीमुळें पुत्र आंत असतांना पिताजी दाखल झाले. तिनें त्याला कांहीं तरी सबब सांगून बाहेरच्या बाहेर वाटेला लावलें. तोंच नवराही हजर झाला ! परक्या पुरुषाला घरांतून बाहेर पडतांना

१. जारं समप्पइ, कंठम्मि लाएइ. २. रक्षस्वैनमित्यतिनिपुणं भणित्वा.